१९४९

म. ग्रं. सं. ठाणे

विषय इतिहास

सं. क्र. ८९२८

REFBK-0007245

REFBK-0007245

# टीटोचा युरोपविरुद्ध कट

[ अर्थात— रायकचें कारस्थान ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ........

लेखक

एडवर्ड के. कार्तुन

अनुवादक

ग. कृ. गणेश जोशी

पुरवणी

श्रीपाद अमृत डांगे

REFBK-0007245

किंमत दोन रुपये

गांतर प्रकाशन, मुंबई २

# चीनसंबंधींचीं महत्त्वाचीं पुस्तकें

माओ से-तुंग

- चीनची नवी लोकशाही — किं. ४ आणे
- चिनी क्रांति व चीनची कम्युनिस्ट पार्टी — किं. ५ आणे
- जनतेच्या लोकशाहीची सर्वाधिकारी सत्ता — किं. १॥ आणा

लिउ शाओ-ची

- आशियांतील जनतेच्या स्वातंत्र्याचा मार्ग (पेकिंग परिषदेंतील भाषण व पेकिंग परिषदेचा जाहिरनामा) — किं. १॥ आणा
- चीनमधील जमीन-मालकी सुधारणेचें प्रश्न — किं. ३ आणे

ली ली-सान

- चीनमधील ट्रेड युनियन चळवळ व कार्य — किं. २ आणे

चिनी जनतेच्या लोकराज्याचे कायदे

- चीनच्या लोकराज्याचा 'संयुक्त कार्यक्रम' — किं. २ आणे
- चिनी लोकराज्याच्या जमीन-मालकी सुधारणेचा कायदा — किं. १ आणा

चीनच्या कम्युनिस्ट पार्टीची घटना व कार्यक्रम यांचें सांगोपांग विवेचन करणारें अत्यंत महत्त्वाचें पुस्तक

## पार्टी विषयीं

लेखक : लिउ शाओ-ची

जानेवारी १९५१ मध्यें प्रसिद्ध होणार

पृष्ठ संख्या सुमारें १७५–किंमत सुमारें दोन रुपये

मिळण्याचीं ठिकाणें: (१) राजभवन, सँढर्स्ट रोड, मुंबई ४ (२) लोक-वाङ्मय गृह, २७७-७८ नारायण पेठ, पुणें २



Published by M. G. Guhagarkar, Yugantar Prakashan, Khatar Gali, Bombay 2 and Printed by Jayant Bhatt at New Age Press, 190-B, Khetwadi Main Road, Bombay 4.

## प्रत्येक वर्गजागृत कामगारानें व शेतकऱ्यानें वाचलींच पाहिजेत अशी कांहीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अन्नदाता | ( कादंबरी ) | ले. कृष्णचंद्र | २ रु. |
| २ | वाताहत | " | " " | ४ रु. |
| ३ | अभागीचा स्वर्ग | ( " ) | ले. शरच्चंद्र चटर्जी | १। रु. |
| ४ | सव्यसाची | " | " " | ५ रु. |
| ५ | शेष प्रश्न | " | " " | ५ रु. |
| ६ | भूमिगत | " | अनु. स. ह. मोडक | ३ रु. |
| ७ | जीवनसाथी | " | प. त्रिं. सहस्रबुद्धे<br>माई ऐतिवडेकर | ४ रु. |
| ८ | जंगल | " | ले. अप्टन सिंक्लेअर | ५ रु. |
| ९ | माणदेशी माणसें | ( कथा ) | व्यंकटेश माडगुळकर | ३ रु. |
| १० | मोर्ती | ( कादंबरी ) | ले. जॉन स्टाईनबेक | १। रु. |

अ भि न व प्र का श न, मुं ब ई १४

: कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंगल्स :

यांनीं १०० वर्षांपूर्वी लिहिलेला व शंभर वर्षांपूर्वीइतकाच आजहि जागतिक कामगार चळवळीचा प्रमाणग्रंथ असलेला

# कम्युनिस्ट जाहिरनामा

( मार्क्स-एंगल्सच्या प्रस्तावनांसहित )

किंमत एक रुपया

—:०:—

: कार्ल मार्क्स :

# मोल-मजुरी व भांडवल

मार्क्सनें खास कामगारांसाठीं सोप्या भाषेत लिहिलेलें पुस्तक

किंमत आठ आणे

—०—

: फ्रेडरिक एंगल्स :

# समाजसत्तावाद

मार्क्सवादाच्या पूर्वपीठिकेची व मुख्य तत्त्वांची सोप्या भाषेत सामान्य जनतेला व विशेषतः कामगारांना माहिती करून देण्याच्या हेतूनें एंगल्सनें तयार केलेलें पुस्तक

( दुसरी आवृत्ति ) किंमत बारा आणे

# टीटोचा युरोपविरुद्ध कट

# प्र स्ता व ना

रायकच्या कारस्थानाचा इतिहास एकाद्या कादंबरीपेक्षां कितीतरी आश्चर्य-कारक आहे आणि म्हणूनच मी ही माहिती मिळवली कोठून याविषयीं सांगणें हें अत्यंत जरूरीचें आहे. या पुस्तकांतील एकही सत्यघटना मी कल्पनेनें शोधून काढली नाहीं, गृहीत धरून चाललों नाहीं, किंवा तिखटमिठ लावून वाढवलेली नाहीं. हंगेरियन सरकारच्या खटल्यानंतर, "जनतेच्या कोर्टासमोर–लाझ्लो रायक व त्याचे साथीदार," हें जें पुस्तक प्रसिद्ध केलें त्याचाच मी मुख्यतः आधार घेतलेला आहे. कोर्टांत जें काय घडलें, जीं प्रश्नोत्तरें झालीं, तंतोतंत तींच या पुस्तकांत घेतलीं आहेत. हें पुस्तक वाचल्यानंतर एकाद्याच्या मनांत जर रायकच्या कारस्थानाविषयीं अधिक जिज्ञासा निर्माण झाली, तर त्यानें वरील पुस्तक वाचावें असा मी सल्ला देतों. तें आतां इंग्लीश भाषेंत प्रसिद्ध झालें आहे. खटल्याची ऐतिहासिक पार्श्वभूमि व युगोस्लाव्हियाविषयींची माहिती, ही मला वृत्तपत्रें व इतर नेहमीचीं संदर्भस्थानें यावरून घ्यावी लागली. मी माहिती कोठून घेतली याचा जरूर त्या ठिकाणीं उल्लेख केला आहे. निष्कर्ष काढतांना ते निष्कर्ष खुद्द माझे आहेत हें मी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या कटांतील व्यक्तींच्या भावना व विचार यांचा मी उल्लेख केला आहे याचें कारण हेंच कीं खटल्याच्या वेळीं त्या व्यक्तींनीं आपल्या पुराव्यांत त्याचें वर्णन केलें किंवा त्याचा परिस्फोट केला.

या खटल्याचे वेळीं अखेरपर्यंत मी कोर्टांत जातीनें हजर होतों. कट उघड-कीस येण्याच्या आधीं, ज्यांची रायक व त्याचे साथीदार यांच्याशीं चांगली दोस्ती होती, अशा व्यक्तींपाशीं मी चर्चा, चौकशी केली. पण या खटल्यांतील घटनांवरून मी जे निष्कर्ष काढले आहेत, त्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आहे.

बूदापेस्त, ऑक्टोबर १९४९.

देरेक कार्तुन

# अनुक्रम

१ १९४४–विश्वासघात
२ स्वीस गट
३ लाझ्लो रायकचा पूर्वेतिहास
४ बुदापेस्त–१९४५
५ टीटो व मॅक्लिन मिशन
६ हंगेरींतील यू. डी. बी.
७ अब्बासिया येथील भेट
८ लुबित्सा रिबारची कहाणी
९ केलिबिया येथील दुसरी भेट
१० इन्फर्मेशन ब्यूरोचा तडाखा
११ मिलोस मॉझखचा खून
१२ पाक्सची अखेरची भेट
१३ मॉस्कोंतील हेरगिरी
१४ लाझार ब्रांकोवचा पश्चात्ताप
१५ लष्करी कटाची तयारी
१६ धरपकडी
१७ रायक खटला
१८ टीटोचें पोलिसराज्य
१९ खटल्यावरून घ्यावयाचे धडे
२० पुरवणी

★

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........

# प्रकरण पहिलें

## १९४४ साल—विश्वासघात

१९४४ हें जर्मन फॅसिस्ट फौजांच्या पराभवाचें साल होय. वर्षाच्या सुरवातीस, शहरा मागोमाग शहरांना वेढा घालून हिटलरच्या फौजांचा पूर्व आघाडीवर धुव्वा उडवीत लाल फौजेचा मोर्चा पुढें सरसावला. उन्हाळ्याच्या सुमारास लाल फौज हंगेरीच्या सरहद्दीवर येऊन ठेपली व जर्मन फौजा हंगेरीयन राजधानीचा संरक्षण तट म्हणून उपयोग करण्याचा विचार करूं लागले. जूनमध्यें अखेरीस दुसरी आघाडी उघडली एकदांची व अँग्लो-अमेरिकन तडाख्यानें फ्रान्समधील जर्मन फौजा मागें रेटल्या गेल्या. पूर्व व पश्चिम दोन्ही आघाड्यांवर हिटलरचें सैन्य कोलमडून पडत होतें.

जर्मनांनीं व्याप्त केल्या दिवसापासून युरोपच्या देशांत भूमिगत प्रतिकार चळवळी निर्माण झाल्या होत्या. त्यांचें सामर्थ्य १९४४ सालीं अफाट वाढलें. त्या चळवळींत असामान्य धाडस व धैर्य दिसूं लागलें. इतर देशांप्रमाणें हंगेरींत सुद्धां कम्युनिस्ट पार्टी या भूमिगत प्रतिकार चळवळीचा आत्मा होती.

परंतु चळवळीचा व्याप विस्तार जरी वाढत असला, व नवेनवे लोक चळवळींत मोठ्या प्रमाणावर सामील होत असले तरी हंगेरींत १९४४ सालीं चळवळीवर कांहीं प्राणघातक घाले घातले गेले, व हे घाले कुणी व कसे घातले हें एक गूढच राहिलें.

× × ×

हंगेरीच्या ईशान्येस सातोरा लिआउयेली तुरुंग आहे. येथील कैद्यांनीं सामुदायिकपणें जेल फोडून निसटून जाण्याचा प्रयत्न केला. या जेलमध्यें फक्त राजकीय कैद्यांना ठेवण्यांत येत असे व त्यावेळीं हंगेरीयन व युगोस्लावियन असे दोन्ही देशांतील राजकीय कैदी तेथें डांबलेले होते. आपल्या येथें कोठड्यांतून काय काय चालतें याची खडान् खडा बातमी, जेलचा कमांडर लाजोस लिंडेन-बर्ग याला लागते हें राजकीय कैद्यांना माहित होतें. १९४३ सालीं कैद्यांनीं लपवून छपवून तुरुंगांत राजकीय वाङ्मय आणलें. लगेच ही बातमी लिंडेनबर्गला

लागली. त्यानें ताबडतोब प्रत्येक कोठडीची झाडून झडती घेतली व अशा रीतीनें महत्वाचीं पुस्तकें जप्त झालीं.

१९४४ च्या जानेवारींत येथील राजबंद्यांनीं जेल फोडून सामुदायिकपणें निसटून जाण्याची योजना आंखली. फेब्रुआरींत याची चर्चा होऊन महिन्याच्या अखेरीस योजना पक्की करण्यांत आली. या झटापटीच्या वेळीं गार्डाशीं चांगलीच जुंपणार हें उघड होतें म्हणून आघाडीची सर्व जबाबदारी युगोस्लावियन राजबंद्यांवर टाकली होती. या योजनेंत सुमारें तीनशें राजबंद्यांनीं भाग घ्यावयाचा होता. मार्चच्या आरंभीं सारी जय्यत तयारी होऊन फक्त तारीखच नक्की करायचें राहिलें होतें.

हंगेरींत १९ मार्चला जर्मन फौजा आल्या या घटनेचा राजबंद्यांच्या पुढाऱ्यांवर कांहीं परिणाम झाला कीं काय हें सांगणें कठीण आहे, पण २१ मार्चला खुणेचा इशारा होतांच युगोस्लाव राजबंद्यांचे गट गार्डांवर धांवून गेले, थोड्याच वेळांत सबंध जेलमध्यें दंगल माजली—पण यांत कुठेंतरी बेइमानी झाली हें सुद्धां लगेच उघडकीस आलें. कारण दंगल सुरू होतांच शेजारच्या कँम्पमधील सुसज्ज सशस्त्र तुकड्या जेलमध्यें घुसल्या व त्यांनीं राजबंद्यांना घेरून चौफेर गोळीबार सुरू केला. तरीसुद्धां या धामधुमींतून पंचाहत्तर राजबंदी निसटले ते थेट जेलच्या मेनगेटपाशीं जाऊन पोहोंचले व त्यांनीं बाहेर पडायची खटपट केली. आणि इथेंच कत्तलीला सुरवात झाली. जेलच्या बाहेर पडलेल्या चौपन्न राजबंद्यांना सशस्त्र सैनिकांनी व गार्डांनी पकडून जागच्या जागीं गोळ्या घालून ठार केलें. उरलेल्या एकवीस जणांना अटक करण्यांत आली.

याप्रमाणें जेल फोडण्याच्या योजनेचा संपूर्ण बोजवारा उडाला व राजबंद्यांची बेफाम कत्तल झाली. पांच दिवसांनंतर हंगेरिअन मिलिटरी कोर्टाचें कोर्ट मार्शल भरलें व आणखी अकराजणांना फांशीची सजा देण्यांत आली.

अशा रीतीनें जेलमधील चळवळीच्या सर्व पुढाऱ्यांची कत्तल झाली. सर्व पुढाऱ्यांची वाट लागली. पण होय—त्यांतून एक वांचला. बेकायदा कम्युनिस्ट युवक चळवळीचा पुढारी आंद्रास झालाई हा त्यावेळीं जेलमध्यें होता. जेल फोडून निसटण्याच्या योजनेची त्याला वित्तंबातमी होती. पण आश्चर्य हें कीं, मार्च ११ तारखेस म्हणजे या घटनेच्या दहा दिवस आधींच लिंडेनबर्गनें त्याला अनपेक्षीतपणें सोडून दिलें.

× × ×

हंगेरींत जर्मन दबा धरून बसले तेव्हांपासून हें प्रतिकार चळवळीचें काम अधिकाधिक धोक्याचें होऊं लागलें. आधींच झालासी सरकारचे सी. आय. डी. मोठे रानटी व त्यांचा चोखपणा पुरा पाशवी स्वरूपाचा नि त्यांत आतां गेस्टा-पोच्या कावेबाजपणाची व निर्दयतेची भर पडलेली. पण उन्हाळा संपेपर्यंत प्रचार, मोडतोड व फॅसिस्टांना जबरदस्त प्रतिकार करण्याचें कार्य चालू होतें व त्याबरोबरच चळवळीचें अपरिमित नुकसान होणें सुद्धां चालूच होतें.

२७ जुलै रोजीं बुडाच्या नागी बेला हॉटेलच्या बागेंत दोन तरुण बसले होते. दिसायला अगदीं साधेसुधे व त्यांनी कुणाचंहि लक्ष वेधून घेतलें नसतें. रविवारची दुपार व नागी बेला सारखें सुप्रसिद्ध हॉटेल! तेथील चविष्ट केक खायला आसपासच्या मध्यम वर्गीय भागांतील लोकांची नुसती झुंबड उडाली होती. दारापासून अगदीं दूर अशा झाडाखालच्या बांकावर अगदीं शांतपणें हे दोघे तरुण बसले होते. ते या ठिकाणीं बसायचें कारण असें कीं, दारांतून येणाऱ्या जाणाऱ्यावर अचूक पाळत ठेवावी—व कुणी भलताच इसम आंत पाऊल टाकतांना दिसला कीं लगेच काम उरकनां यावें. त्याचप्रमाणें आपण कुणाचें लक्ष वेधून घेऊं नये अशी त्यांची इच्छा होती.

त्या दोघांपैकीं एक दिसायला मोठा उमदा होता. त्याचें नांव आंद्री सगवारी असून तो एकोणतीस वर्षांचा होता. हंगेरीयन कम्युनिस्ट युवक चळवळीचा तो जनरल सेक्रेटरी असून आज कित्येक वर्षें तो पोलिसांच्या हातीं लागला नव्हता. दुसरा तरुण त्याच्याच गटाचा असून दोघांनी या हॉटेलांत भेटायचें असें ठरविलें होतें. भेटी घ्यायला तो नेहमी हीच जागा पसंत करी. कारण हें हॉटेल सारखें गजबजलेलें असे व या भागाकडे पोलिसांचें इतकें बारीक लक्ष नसे.

इतक्यांत एकदम दारांत पांच पोलिस उभे राहिले. सगवारीनें ताबडतोब विचार केला कीं आपण जर या पोलिसांच्या हातांत सांपडलों तर ते आपले हालहाल करतील व फेरेन्स रोझ्सा जसा १९४२ सालीं यांनीं छळ करून मारला तशीच ते आपली वाट लावतील. रोझ्सा हा कम्युनिस्ट पार्टीचा प्रमुख पुढारी होता. विश्वासघात न करतां, छळ सोसूनसुद्धां आपण आपल्या कॉम्रेडस्चीं नांवें फोडलीं नाहींत तर आपल्याला हे फांशी देणार हें उघड होतें. कारण १९४२ सालीं हंगेरीयन कम्युनिस्ट पार्टीचा जनरल सेक्रेटरी झोल्तान शोनहर्झ याला असेंच फांशी देण्यांत आलें होतें. आपल्याला हे पोलिस शोधीत आहेत हेंही सगवारीला

कळून चुकलें; आपल्या संघटणेंत पोलिसांचा कुणीतरी वगलबच्चा आहे व त्यानेंच ही आपली मुलाखतीची जागा पोलिसांना दाखवून दिली असावी असें त्याच्या ध्यानांत आलें. आतां सरळ दोन हात करण्याखेरीज मार्ग नव्हता. पोलिस आपल्याकडे येत आहेत असें पाहून त्यानें रिव्हॉल्वर बाहेर काढलें व दोघांवर गोळ्या झाडून त्यांना ठार केलें. पण लगेच त्याचें शरीर गोळ्यांनी जर्जर होऊन तो मरायच्या आधीं त्यानें दोघांना पल्ल्याला पोंचवलें. ही चकमक होत असतां त्याचा साथीदार सफाई निसटून गेला, कारण पोलिसांचें सारें लक्ष सगवारीवर खिळलें होतें.

सगवारीचा खून झाल्यानें बेकायदा कम्युनिस्ट युवक चळवळीचें मोठेंच नुकसान झालें. ही युवक चळवळ हंगेरींत जर्मन व हंगेरीयन फॅसिस्टांना निकराचा प्रतिकार करीत होती. पण हॉटेलांतील या भेटीची बातमी पोलिसांत दिली कोणी हें कोडें मात्र उलगडलें गेलें नाहीं. परंतु सगवारीच्या गटांत त्यावेळीं, फिक्कट रंगाचा, भव्य कपाळ असलेला व रुक्ष पुस्तकी पांडित्य प्रगट करणारा एक तरुण होता. त्याचें नांव आंद्रास झालाई व तो नुकताच जेलमधून सुटून आला होता.

* * *

त्या काळांत पूर्व यूरोपांतील अनेकजण भावी काळचीं चित्रें रंगवीत होते. जर्मन फौजा युद्ध हरणार हें तर आतां अगदीं स्पष्ट झालें होतें. ॲडमिरल हॉर्थीच्या फॅसिस्ट जमान्यांत ज्यांनी काम केलें होतें; नंतरच्या काळांतसुद्धां झालासीच्या नंग्या फॅसिस्ट सरकारांत काम करण्याइतकी ज्यांची फॅसिस्टांवर निष्ठा होती; अशांच्यापुढें आतां मोठाच पेंचप्रसंग येऊन पडला होता. ही राजवट कोसळतांच जर्मन फौजांबरोबर माघार घ्यावी व पश्चिमेकडून येणाऱ्या अमेरिकन्सची भेट होईल अशी आशा धरावी कीं इथेंच राहून लाल फौजेचें तानमान काय आहे तें पहावें ? या दोन्ही बाजू मोठ्या बिकटच होत्या. विशेषतः जॉर्ज पालिफसारख्याला तर त्या दोन्ही नुकसानीच्या वाटत होत्या.

लष्करांत आपण नशीव काढायचं असा कॅप्टन पालिफचा मनसुबा होता. त्याच्या घराण्याचा बँकांशीं संबंध होता, लुदोविका मिलिटरी ॲकेडमींत त्याचें शिक्षण झालें असून त्यानें मुसोलिनीच्या लष्करी संस्थांत एक वर्ष घालवलें होतें. इटालियन फॅसिस्ट पद्धतीनें याचवेळीं त्याच्यावर प्रभाव पाडला होता. परंतु, लष्करी जीवनाची जरी त्याला अतोनात आवड असली, अधिकारी होण्यासाठीं

जरी त्यानें लष्करी शिक्षण घेतलें असलें, तरी त्याची बायको ज्यू असल्या-कारणानें त्याला १९३९ सालीं लष्करांतून राजीनामा द्यावा लागला. १९३४ सालीं जॉर्ज पालिफची मनस्थिती मोठी बिकट झाली. एका बाजूनें तो हताश झाला होता; पण तो हंगेरीच्या वरिष्ठ वर्गांतून आलेला, जबरदस्त महत्वाकांक्षी फॅसिस्ट अधिकारी होता. काय करावें हें त्याला सुचेना. आपल्याला कुठच्या क्षेत्रांत कसें चमकायला मिळेल याचीच त्याला सारखी विवंचना लागली होती.

१९४२ च्या हिंवाळ्याच्या सुमारासच, आतां जर्मन फौजांची धडगत नाहीं हें त्यानें हेरलें होतें. दोन नदीवर मिळालेल्या प्रचंड तडाख्यानंतर हिटलरी फौजा टिकणार नाहींत हें त्यानें ओळखलें. आणि म्हणूनच १९४४ सालीं लाल फौज हंगेरीच्या पूर्व सरहद्दीवर येऊन ठेपली असें पाहून त्यानें आपली नजर डाव्या राजकारणाकडे वळवली. हंगेरी मुक्त झाल्यानंतर, हंगेरीयन कम्युनिस्ट पार्टीची ताकद प्रचंड प्रमाणांत वाढणार–इथें कदाचित कम्युनिस्ट सरकारसुद्धां स्थापन होईल असें त्याला वाटलें. त्याच्यासारख्या अचाट महत्वाकांक्षी माणसाला असं वाटलं कीं, कम्युनिस्ट चळवळ पुढें फारच लोकप्रिय होईल व त्यानंतर पार्टींत सामील होणें म्हणजे आरामाचें होईल तेव्हां त्यांत कांही अर्थ नाहीं. म्हणून आतांच, मुक्ततेच्या वेळींच पार्टींत सामिल व्हावें म्हणजे नंतर आपल्याला पुरा क्रांतिकारक म्हणून लोक ओळखतील–शिवाय आपल्यासारखे लष्करी अनुभव असलेले असे क्रांतिकारक हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असणार. पण पालिफ मोठा धूर्त इसम होता. तो मोठ्या सावधगिरीनें विचार करीत असल्यानें या साध्या व सरळ योजनेंतसुद्धां त्याला थोडेसे वांधे आहेत असें वाटलें. समजा कीं कम्युनिस्टांना सरकार स्थापनच करतां आलें नाहीं तर ? मग पुढें काय ? किंवा समजा कीं कम्युनिस्ट सरकार स्थापन झालें, आणि नंतर युद्ध किंवा प्रतिक्रांती सुरू झाली व अमेरिकनांनी येऊन पुन्हां हॉर्थी गटाच्या हातीं सत्ता सुपुर्द केली तर ?

आपण जर मागचापुढचा कांही विचार न करतां सरळ कम्युनिस्ट झालों, आणि हंगेरींत उजव्या गटाच्या राजकारणाची सरशी होऊन हॉर्थी सरकार आलें तर मग सगळाच कारभार आटोपला. इतकेंच नव्हे तर १९१९ सालचा अनुभव त्याच्या डोळ्यापुढें जिवंत उभा होता. त्यावेळीं हंगेरींत कामगारराज्य स्थापन झालें व पांच महिने तें राज्य टिकलें. पण त्याचें संरक्षण करणाऱ्या हजारों कम्युनिस्टांना त्यावेळीं कंठस्नान घालण्यांत आलें होतें हेंही

त्याला आठवलें व म्हणून आपलाही जीव या कचाटयांत धोक्यांत येईल व आपण नाहक प्राणास मुकूं अशी त्याला धास्ती पडली.

मग काय करावें ? जर्मनांबरोबर पळून जाऊन अमेरिकन किंवा ब्रिटिशांना सामील व्हावें ? युद्धानंतर परदेशांत गेलेले फॅसिस्ट लष्करी अधिकारी पैशाला पांसरीभर मिळतील हें पाल्फिला माहित होतं. जास्तींत जास्त म्हणजे हॅर्थीन्या बाजारबुणग्यांना हडेलहप्पी शिकविण्याची हवालदारी करण्यापलीकडे अमेरिकन आपल्याला काम देणार नाहींत अशी त्याची खात्री होती आणि शेवटीं म्हणजे म्हातारपणीं आपल्याला पॅरिस किंवा ब्रुसेल्समध्यें पैशान्या फिकिरींत दिवस कंठावे लागतील हें दारूण चित्र सुद्धां त्याच्यापुढें चमकलें.

पाल्फिसारख्या महत्वाकांक्षी माणसाला भावी काळ फारच निराशामय भासला. पण समजा, अमेरिकन्स अखेरीस जिंकलेच तर ? पुन्हां पश्चिम व पूर्व यूरोपांत युद्ध पेटलें व विजयानंतर परदेशांतील हंगेरियन्सनां मोठ्या थाटामाटांत परत आणलें गेलें तर ? मात्र हंगेरीच्या नव्या फॅसिस्ट सरकारांत आपल्या बुद्धिमत्तेला व महत्वाकांक्षेला साजेशी नोकरी मिळेल असा त्याला भरंवसा होता. पण मग नोकरी मिळेल म्हणून अर्ध्या पगारावर कुठच्यातरी भिकारड्या लष्करी शहरांत किती दिवस आशाळभूतपणानें दिवस मोजीत ताटकळत बसायचें ? शिवाय हें सारं घडून येईल अशी तरी छातीला हात लावून कोण हमी देत होता ?

एकंदरींत मोठा अडचणीचाच प्रसंग होता. बरं, हा प्रसंग एकट्या पाल्फिवरच बेतला होता असें नाहीं, तर पूर्व यूरोपच्या रस्त्यावरून त्याच्यासारख्या लोकांची- नुसती रांग लागली होती. कुठच्या गाडीवर स्वार व्हायचें याच्यामध्येंच त्यांचा जीव घुटमळत होता. नंतर त्यांच्यापैकीं अनेकजण सोशल डेमोक्रॅटिक पार्टींत शिरले. कांहीजण कम्युनिस्ट पार्टींत घुसले. पण युद्धानंतर निरनिराळ्या कम्युनिस्ट पार्ट्यांनी इतके वेळां पार्टीमधून असल्या लोकांना हांकलून काढलें कीं पाल्फिसारख्यांना यापुढें कम्युनिस्ट पार्टींत रहाणें मुष्किल झालें.

राजकीय व लष्करी भविष्य वर्तविण्याच्या गोंधळानें बेजार झालेल्या पाल्फिनें आपला जुना दोस्त कॅप्टन इस्तवान लान्झ याचा सल्ला घेतला. त्यावेळीं लान्झ हंगेरीयन लष्करांत होता पण आतां जर्मन फॅसिस्टांची घटका भरली हें त्यालासुद्धां कळून चुकलें होतें. दोघांनी एकंदरींन असा निष्कर्ष काढला कीं यापुढें बहुतेक कम्युनिस्ट पार्टीचेंच भवितव्य उज्ज्वल आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं हें समजल्यामुळें हे दोघे शहाणेसुर्ते इसम सरळ पार्टींत शिरले.

त्यांनी एक निराळाच बेत आंखला. हंगेरीयन फौजा हरूं लागल्या कीं लान्झ नें माघार घेत घेत पश्चिम यूरोपांत जावें. जर्मनीच्या शरणागतीनंतर त्यानें ब्रिटिश किंवा अमेरिकनांशीं संधान जुळवावें; अशा रीतीनें लान्झ पश्चिम यूरोपांत ब्रिटिश अमेरिकनांशीं आपलें बस्तान बसवीत असेल त्यावेळीं पाल्फि इकडे हंगेरींत कम्युनिस्ट पार्टींत घुसून, शक्य तों वरिष्ठ अधिकाराची जागा बळकावून बसलेला असेल. आणि मग कम्युनिस्टांची अखेरीस जर सरशी झाली तर मग पाल्फिनें लान्झला जामीन राहून त्याला हंगेरींत आणून बड्या पगाराच्या हुद्यावर नेमायचें आणि ब्रिटिश अमेरिकनांची सरशी झाली तर, पाल्फी हा उजव्या गटाचा विश्वासू माणूस आहे व मुद्दामच अमेरिकन्सच्या बाजूनें हेरगिरी करायला कम्युनिस्ट पार्टींत गेला होता असा कम्युनिस्ट पाल्फिबद्दल लान्झनें निर्वाळा द्यायचा. पाल्फी हा आपलाच माणूस आहे व अमेरिकन्ससाठीं तो पडेल तें काम करायला तयार आहे असें लान्झनें अमेरिकन्सनां सांगावें, असा हा डाव दोघांनी मिळून रचला.

डाव तसा साधा होता. लान्झनें पाल्फीला सांभाळायचें व पाल्फीनें लान्झला सांभाळायचें. हंगेरींत फासिझमचा पराभव झाला काय किंवा लोकशाहीचा पराभव झाला काय पाल्फि-लान्झचा विजय हटकून ठेवलेलाच आहे.

\+ + +

प्रतिकार चळवळ प्राणपणानें पोलिसांशीं झुंजत होती; तिचा झगडा तीव्र बनत चालला होता, पोलिसांची संख्या अधिक, ते तर सारखे हात धुवून मागें लागलेले, त्यांचा ससेमिरा न चुकवितां आल्यास त्या नराधम दैत्यांच्या हातून अमानुष मरण ठेवलेलें आहेच–ही परिस्थिती एका बाजूस तर दुसरीकडे, जॉर्ज पाल्फिसारखे जुन्या जमान्याचे पाठिराखे, भावी काळासाठीं स्वतःचीं कारस्थानें रचीत बसलेले आहेत. अशावेळीं एक इसम १९४४ सालीं हंगेरीयन कॉन्सेंट्रेशन कॅंपमध्यें राजबंदी म्हणून अडकून पडला होता. त्याला आक्टोबर १९४१ पासून डांबून ठेवलें असून, ऑक्टोबर १९४४ मध्यें त्याची अखेरीस सुटका झाली. पण बाहेर तो कांहीं महिनेच होता–४४च्या अखेरीस त्याला पुनः अटक करण्यांत आली. या वेळीं लष्करी हेर खात्यानें त्याला अटक केली. त्याच्या विनंतीवरून त्याचा खटला बंद कोर्टांत चालविण्यांत आला. ( म्हणजे खटल्याच्या वेळीं कुणालाहि हजर राहण्याची परवानगी नव्हती. ) या खटल्यांत बुदापेस्तचे बडेबडे पोलिस अधिकारी, सोप्रोनकोहिदाला आले व त्यांच्या पुराव्यावरून त्या इसमावरचे सर्व

आरोप मागें घेण्यांत आले. पण त्यावेळीं फॅसिस्टांचीं अखेरचीं पळें भरलीं. सोप्रोनकोहिदा शहर खालीं करण्यांत आलें. लाल फौजेचे घणाचे घाव हंगेरीच्या आघाडीवर पडल्यानें आघाडी कोसळून पडली. झालासीच्या पंचमदली सरकारनें बुदापेस्तमधून पळ काढला. लाल फौजेनें १३ फेब्रुवारीस बुदापेस्त शहर मुक्त केलें. हंगेरीच्या मुक्ततेस आरंभ झाला.

या इसमाची कॅंपमधून सुटका करण्याची संधी मिळण्याच्या आंतच त्याची इतर कैद्यांबरोबर जर्मनींत रवानगी करण्यांत आली. सोप्रोनकोहिदाच्या लष्करी खटल्यांतील या आरोपीनें जर्मनींत गेल्यावर जॉर्ज पालिफचा धडा गिरवला. त्यानें पुनः हंगेरींत येण्याचा डाव रचला पण त्याबरोबरच भावी काळांतील राजकीय घडामोडींचा दूरवर विचार करून, आपल्या एका दोस्ताला अमेरिकनांशीं संधान बांधण्यासाठीं तेथेंच ठेवून देण्यास मात्र तो विसरला नाहीं. पश्चिम जर्मनींत मागें राहून अमेरिकनांशीं संगनमत करण्याची व तेथील फॅसिस्ट हंगेरीयन्सशीं हात मिळवण्याची कामगिरी त्याच्यावर सोंपविण्यांत आली. त्या माणसाचें नांव इस्तवान स्तोल्त. ज्याच्या खटल्यानें बुदापेस्तच्या अधिकाऱ्यांचें लक्ष वेधून घेतलें त्याचें नांव लाझ्लो रायक. त्यावेळीं प्रतिकार चळवळींत त्याला हंगेरीयन कम्युनिस्ट पार्टीचा एक मोठा पुढारी म्हणून ओळखण्यांत येत होतें.

# प्रकरण दुसरें

## स्विस गट

गेल्या दोन महायुद्धांत, प्रमुख युद्धमान राष्ट्रांनी स्वित्झर्लंडचा, महत्वाचें हेरगिरीचें केंद्र म्हणून उपयोग केला होता. स्वित्झर्लंडची या कामासाठीं कां निवड करण्यांत आली हें उघड आहे. युरोपियन राष्ट्रांच्या युद्धमान खळबळलेल्या महासागरांत, स्वित्झर्लंड हें एकच "तटस्थतेचें" बेट होतें व म्हणून शत्रुप्रदेशांत पाश पसरवण्यासाठीं हीं आदर्श अशी जागा होती. बर्न, झूरिच, जिनेव्हा येथील परराष्ट्रीय वकिलाती व कॉन्सलच्या कचेऱ्यांत ठाण मांडून, निष्णात हेर, यूरोपखंडातील आपल्या देशोदेशींच्या हस्तकांना सूचना देत.

येथून हेरांच्या हस्तकांना हुकूम सुटत, तर त्यांच्या हेरगिरीच्या कामाचे रिपोर्ट आंत येऊन पडत. उदाहरणार्थ, जिनोआ बंदरांत जुलै महिन्यांत किती

जहाजें दिसलीं, हार्झ पर्वतात अगदीं दूरवर अनपेक्षितपणें बांधणीचें काम सुरू आहे, हंगेरियन किंवा इटालियन सरकारांत अरिष्ट प्रसंग निर्माण झाला आहे, पूर्व आघाडीवर लष्करी हालचाली दिसत आहेत, अशा प्रकारचे हे रिपोर्ट असत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत स्वित्झर्लंडांतील ब्रिटिश व अमेरिकन हेर संस्थांना या व अशा प्रकारच्या सर्व रिपोर्टांची अत्यंत मोठी जरूर होती.

बर्न शहरीं, ॲलन डलेस या महत्वाच्या लिगेशन अधिकाराच्या नेतृत्वाखालीं अमेरिकन्सनीं आपल्या युरोपियन हेरखात्याच्या जाळ्यांची मुख्य कचेरी चालविली होती. मि० डलेस हे गृहस्थ एकेकाळीं मोठे बँकवाले होते, सुप्रसिद्ध डॉवेस योजना आंखण्यांत यांचा हात होता. याच डॉवेस योजनेनें जर्मनीच्या मोडकळीस आलेल्या भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा डोलारा सांवरून धरून ॲडॉल्फ हिटलरचा मार्ग मोकळा करून दिला. या गृहस्थाचे सरकार दरबारीं चांगलेच संबंध होते. त्याचा भाऊ जॉन फॉस्टर डलेस हा प्रमुख रिपब्लिकन पुढारी असून हूवर, टॅफ्ट, व्हँडेनबर्ग व वॉशिंग्टन मधील इतर कित्येक डेमॉक्रॅटिक पक्षांच्या पुढाऱ्यांशी त्याची चांगलीच जानपछान होती. या डलेसच्या हातांत, बर्न, जिनेव्हा, झ्यूरिच या शहरीं अफाट पैसा खेळत होता व अत्यंत सुसज्ज अशी संघटना होती.

मि. डलेस यांची ओ. एस. एस. ची ( ऑफिस ऑफ स्ट्रॅटेजिक सर्व्हिसेस ) व्यूहरचना खात्याची कचेरी आहे असें जर त्यावेळीं ब्रिटन अमेरिकेंत त्यावेळीं कुणास कळलें असतें, तर जर्मन व त्यांचे दोस्त यांविरुद्ध ती हेरखात्याची कचेरी आहे असेंच त्यांनी या ओ. एस. एस. चें वर्णन केलें असतें. हें त्याच्या कचेरीचें कार्य एक होतें हें खरें पण तेवढेंच कार्य नव्हतें. जर्मनांविरुद्ध हेरगिरी हा त्या कार्याचा एक भाग होता. कारण डलेस व वॉशिंग्टनमधील त्याचे वरिष्ठ अधिकारी यांची युद्धपूर्व यूरोपवर नजर होती. कारण १९४४ च्या सुमारास लाल फौज जर्मन फौजांची तटबंदी तोडून यूरोपखंडाच्या मध्यावर येणार अशीं भयानक चिन्हें दिसूं लागलीं होतीं. ब्रिटिश किंवा अमेरिकन्स ऐवजीं लाल फौजच बरींच युरोपियन राष्ट्रें मुक्त करणार असा रागरंग दिसूं लागतांच डलेसच्या कार्याची दिशा बदलली.

१९४४ च्या सुमारास अमेरिकन व ब्रिटिश हेर खात्याचें सारें लक्ष ॲडॉल्फ हिटलरच्या फौजांवर नसून, सोविएत फौजा, लाल फौजांचें आनंदानें कृतज्ञतेनें स्वागत करणाऱ्या प्रतिकार चळवळी, याच्यावर लागलें होतें.

हाच मुख्य हेतू ध्यानांत घेऊन डलेस साहेबांनी स्वित्सर्लंडांत आलेल्या हंगेरियन्सकडे विशेष लक्ष पुरविण्यास सुरवात केली. हे लोक स्वतःला हंगेरियन स्वातंत्र्य आघाडीचा, स्वीस गट म्हणवून घेत असत. पूर्व यूरोपांतून आलेल्यांकडे ब्रिटिश अमेरिकन हेरसंस्था नेहमींच विशेष लक्ष देत, त्यांना हातांशीं धरण्याचे प्रयत्न करीत. पण लाल फौज हे देश मुक्त करणार हें निश्चित झाल्यापासून तर या कार्याला भलतेंच असाधारण महत्व प्राप्त झालें.

ॲलान डलेसला हें कांही मोठें बिकट कार्य वाटलें नाहीं कारण हे पळपुटे भुसभुशीत व राजकीय दृष्ट्या प्रतिगामी विचारसरणीचे असत. त्यांना या वैराण जीवनाचा कंटाळा आला असून कांही तरी लटपटी करून पुनः हंगेरींत जावें, चांगला व्यापार उदीम थाटावा व बुडापेस्तच्या कॉफीगृहांत कॉफी ढोशीत बसावें अशी यांची सुखस्वप्नें होतीं. हे सर्व मध्यमवर्गांतून आलेले होते; त्यांच्यापैकीं अनेक उजव्या गटाचे झार्यानिस्ट असून, हॉर्थी सरकारच्या ज्यूविरोधी धोरणामुळें त्यांची हंगेरींतून हकालपट्टी करण्यांत आलेली होती. मनांतून हे पळपुटे सोवियतचा द्वेष करीत व जिनेव्हांतील अमेरिकन अधिकाऱ्यांचें विलासी वैभव पाहून त्यांचे डोळे दिपून जात. त्यांच्यांत एकही कम्युनिस्ट नव्हता.

या पळपुट्या लोकांना हाताशीं धरणें म्हणजे अमेरिकन्सच्या हाताचा मळ होता. आज कित्येक वर्षे हे लोक युनिटेरियन सर्व्हिस कमिटीतर्फे मिळणाऱ्या मदतीवर जगत होते. ओ. एल एच. फिल्ड हा अमेरिकन हस्तक या कमिटीचा प्रमुख होता. यानें कोर्टांत दिलेल्या जबानीवरून हें स्पष्ट होतें कीं डाव्या जहाल गटांना गांठून त्यांना हेरगिरी करावयास लावणें, या कामांत त्याचा हातखंडा होता. फिल्डचें तंत्र पुढीलप्रमाणें होतें —ज्याला हाताशीं धरायचें तो मनाशीं योजीत असे त्याच्याशीं तो पहिल्या प्रथम सर्वसाधारण डाव्या गटाच्या राजकारणाच्या गप्पा सुरू करी. त्याचा विश्वास संपादन करून त्याचा स्वभाव कसा काय आहे, त्याचीं राजकीय मतें काय आहेत, याचा अचूक छडा लागेपर्यंत तो अशा डाव्या गटाच्या राजकारणाच्या गप्पागोष्टी करी. ज्या ठिकाणीं वैचारिक मुद्दे पटवून त्याला आपल्या हेरगिरीच्या कार्यांत अमेरिकन हस्तक म्हणून गुंतवणें कठीण जाई, तेथें तो निराळाच डाव टाकी. या पळपुट्या हंगेरियन्सनीं युनिटेरियन कमिटीची मदत घेतल्यावर ते पावत्यांवर सह्या करीत असत, त्या पावत्या पुढें करून, " या पहा पावत्या; जर पुढें मागें या तुमच्या नव्या

हंगेरियन सरकारच्या हातांत पडल्या तर पुनः तुम्ही धोक्यांत याल. " अशी धमकावणी देई.

या दोन्ही तंत्रांच्या जोरावर १९४४ मध्यें त्यानें ओ. एस्. एस्. व हंगेरियन्स यांच्यांतील दोस्तीचे संबंध मजबूत केले. या हंगेरियन्सचा पुढारी डॉ. तिबोर स्झोनी हा असून त्याच्या गटांत दहा बारा जण होते.

या स्झोनीचे झ्यूरिच व जिनेव्हांत अनेकांशीं संबंध होते. त्यांच्यांत नोएल एच्. फिल्ड व मिशा लोंपर नांवाचा युगोस्लावियन होता. स्झोनी जसा हंगेरियन गटाचा पुढारी तसा मिशा लोंपर हा युगोस्लावियन गटाचा पुढारी होता. १९४४ च्या आरंभीं स्झोनीची लोंपरशीं दोस्ती जमली असून तो त्याच्या राजकीय वजनाखालीं आला होता. लोंपरच्या सल्ल्यावरून तो आपल्या गटाला अमेरिकन तर्फी राजकारणाचें शिक्षण देऊं लागला.

हा गट केवळ हंगेरीस परत जाण्याचीच नव्हे तर हंगेरींत जाऊन, हंगेरीयन कम्युनिस्ट पार्टींत घुसून, पार्टी आंतून फोडून काढण्याची तयारी करीत होता लोंपर व फिल्ड यांनी त्यांना अर्ल ब्राऊडरच्या " तेहेरान आणि नंतर " व " विजय आणि नंतर, " या दोन पुस्तकांच्या प्रति दिल्या होत्या. त्यावेळीं अर्ल ब्राऊडरला, अमेरिकन कम्युनिस्ट पार्टीच्या जनरल सेक्रेटरीच्या जागेवरून हांकलण्यांत आलें नव्हतें व ब्राऊडर विचारसरणी अमेरिकन कम्युनिस्ट चळवळीचा विचका उडवीत होती. कामगार, " पुरोगामी " उद्योगधंदेवाले व बँकर्स यांच्यांत युद्धानंतर दीर्घकाल वर्गसलोख्याचें वातावरण निर्माण होईल अशी विचारसणी पसरवून ब्राऊडर क्रांतिकारक कामगार चळवळ खच्ची करूं पहात होता. युरोपियन कम्युनिस्ट पार्ट्यांत ब्राऊडरच्या या विचारसरणीमुळें सांवळा-गोंधळ निर्माण होईल, त्यांचें कार्य थंडावेल हें चलाख अमेरिकन हेरखात्यानें जाणलें व ताबडतोब त्यांनी ब्राऊडरच्या पुस्तकाचीं इटालियन व फ्रेंच भाषेंत भाषांतरें करून त्याच्या अफाट प्रति छापून स्वित्झर्लंडांत वांटल्या. स्झोनी व इतर गटांनीं ब्राऊडरच्या विचारसरणीची चर्चा करण्यासाठीं अभ्यासवर्ग चालविले व या सर्व कार्यावर अमेरिकन सरकारची कृपादृष्टी होती, त्याला हें कार्य मनापासून पसंत होतें.

आपण तुझी आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी ओळख करून देऊं असें फिल्डनें स्झोनीला १९४४ च्या सप्टेंबर महिन्यांत सांगितलें व त्याच महिन्यांत त्याची व ॲलान डलेसची पहिली भेट झाली. यानंतर त्याला जिनेव्हामधील

फिल्डच्या कचेरींतून हुकूम मिळण्याऐवजीं थेट बर्नमधील अमेरिकन लिगेशन मधून हुकूम मिळूं लागले.

पण ही सप्टेंबरमधील भेट होण्याच्या आधींच, स्झोनी व त्याचा निकटचा सहकारी फेरेन्स वार्गा यांनी हंगेरीच्या राजकीय भवितव्या संबंधीं एक प्रबंध तयार केला असून, त्यांनी अमेरिकन हेरखात्यांशीं सहकार्य करण्याची इच्छा दर्शविली होती. हा खलिता मिशा लोंपर या युगोस्लावियन तर्फे ॲलान डलेस-कडे पाठविण्यांत आला.

नोव्हेंबर अखेरीस स्झोनी अमेरिकेचा हस्तक बनला होता. "आर्थिक मदतीसाठीं" त्यानें फिल्डला ज्या पावत्या लिहून दिल्या होत्या त्या डलेसनें पुढें फडफडविल्या. अमेरिकन्सच्या मनांतून एकाद्याला आपल्या कामाला जुंपायचें असलें म्हणजे ते केवळ त्याच्या मतांवर किंवा कल्पनांवर विसंबून रहात नाहींत. ज्याच्या जोरावर त्याचा पुढेंमागें नायनाट करतां येईल—धमकी द्यायला उपयोग करतां येईल—असें कांहींतरी त्यांच्या हातांत हवें असतें. कारण हा मार्ग अधिक सुरक्षित असतो.

नोव्हेंबरच्या भेटींत, आपल्या गटाला हंगेरींत परत नेण्याच्या सूचना स्झोनीला देण्यांत आल्या. यूरोपमधून त्यांना नेण्याचें काम अमेरिकन्स करतील असें त्याला सांगण्यांत आलें. १९४५ सालच्या आरंभीचा हा प्रवास म्हणजे गेल्या महायुद्धांतील एक महाभयंकर प्रकरण आहे.

* * *

फेरेन्स वार्गा, जॉर्ज दिमित्र, गुला कुती, आंद्रास कालमन, जानोस दोबो व स्वतः तिबोर स्झोनी, अशा त्याच्या गटांपैकीं सहाजणांनीं प्रथम हंगेरींत शिरावें असें ठरलें.

डिसेंबरमध्यें डलेसची शेवटची मुलाखत झाल्यानंतर यंत्राचें काम चालूं झालें. फ्रेंच सरहद्द बेकायदेशीरपणें ओलांडून जाणें सोपें जावें म्हणून नोएल फिल्डकडून त्यांना ४,००० स्वीस फ्रँक्स मिळाले. मिशा लोंपरला तर पैसे मिळवण्याचे अनंत मार्ग होते, कारण आतां तो झ्युरिचमधील युगोस्लाव कॉन्सल झाला होता. हे सहाजण युगोस्लाव लष्करी अधिकारी असून ते सरकारी शिष्ट-मंडळ म्हणून युगोस्लावियांत परत चालले आहेत अशा अर्थाची खोटी कागद-पत्रें त्यानें तयार केलीं. नुकत्याच मुक्त झालेल्या बेलग्रादमधील गृहखात्याला देण्यासाठीं म्हणून लोंपरनें एक खाजगी पत्र तयार करून दिलें. हे सहाजण

अमेरिकन हस्तक असून ते हंगेरींत परत चालले आहेत व त्यांना युगोस्लाव अधिकाऱ्यांनीं मदत करावी अशी त्या पत्रांत विनंती करण्यांत आली होती.

मिशा लोंपर हा अमेरिकन हस्तक म्हणून, नव्या युगोस्लाव सरकार-विरुद्ध व युगोस्लावियन कम्युनिस्ट पार्टीविरुद्ध गुप्तपणें कार्य करणारा नसून बेलग्रादच्या सूचनांनुसारच हें सर्व करीत आहे, हें बहुतेक स्झोनी व त्याच्या साथीदारांच्या हळू हळू लक्षांत येऊं लागलें होतें. इतकेंच नव्हे तर खुद्द बेलग्राद मधील अधिकारी सुद्धां अमेरिकन्सच्या बाजूनें काम करीत आहेत असें त्यांना वाटूं लागलें. पण छेः ! हें कसें शक्य असेल ? आपण सोशालिझमचे पुरस्कर्ते आहोंत असें त्यांनी उघडउघड जाहीर केलें नव्हतें काय ? ब्रिटिश व अमेरिकन्सच्या यूरोपमधील धोरणांबद्दल ते फारच साशंक आहेत ही गोष्ट जाहीर नव्हती काय ? हरेक प्रसंगीं त्यांनी सोविएत युनियनचे गोडवे गायले नव्हते का ? शिवाय युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टी ही यूरोपच्या साऱ्या कम्युनिस्ट पार्ट्यांकडून आदर्श पार्टी म्हणून मानली जात नव्हती काय ?

या गूढ रहस्यांबद्दल डॉ. स्झोनी व त्याच्या पांच दोस्तांचें काय मत होतें हें सांगणें फार कठीण आहे. तें कांही असो, आपण अमेरिकन हस्तक आहोंत व हंगेरींत शिरून लाल फौजेच्या पिछाडीस राहून अमेरिकन हेरखात्यासाठीं काम करणार आहोंत, हें या युगोस्लाव अधिकाऱ्यांना माहित आहे व अखेर आपले जीव या अधिकाऱ्यांच्या हातांत आहेत असें त्यांना वाटलें.

लगेच हे सहाजण मार्सेल्सला जाऊन पोहोंचले व तेथील युगोस्लाव कॉन्सल जनरल लॅतिनोविच् याला जाऊन भेटले. तेथें त्यांना आणखी खोटीं-नाटीं कागद पत्रें देण्यांत आलीं. लॅतिनोविच् व मार्सेल्समधील अमेरिकन लष्करी खात्याच्या मुख्य कचेरीचा जी टू (जी. २) विभाग यांच्यांत कांही सल्लामसलती होऊन, एक लष्करी अमेरिकन विमान त्यांच्या हवालीं करण्यांत आलें. तेथून नेपल्स व नंतर सरळ ते बेलग्रादला जाऊन पोहोंचले.

युगोस्लावची राजधानी बेलग्राद ही नुकतीच लाल फौजेनें मुक्त केली असल्यानें सर्वत्र उत्सव समारंभाचें वातावरण पसरलें होतें. पण या सहाजणांना थेट गृहखात्याच्या मंत्रिमंडळाकडे नेण्यांत आलें. लोंपरचें पत्र दाखवतांच त्याचा परिणाम तावडतोब दिसून आला. त्यांना मेजर निकोलाय कालाफानिचकडे नेण्यांत आलें. हा मेजर कालाफातिच टिटोच्या सी. आय. डी. खात्याचा ( ओ. झेड. एन. ए. चा ) एक बडा अधिकारी होता.

लगेच कालाफातिच व डॉ. स्झोनी यांची वातचीत झाली. " बुदापेस्त-मध्यें अमेरिकन्ससाठीं तुम्ही जी माहिती गोळा करणार असाल ती कर्नल ओब्राद सिसमिल याच्या जवळ द्या. बुदापेस्तमधील दोस्तांच्या नियंत्रण समितीचा ( अलाईड कंट्रोल कमिटीचा ) हा कर्नल सिसमिल सभासद आहे. सिसमील ते रिपोर्ट बेलग्रादमध्यें माझ्या हातीं ( कालाफातिचच्या ) देईल, मी ते स्वतंत्र सरकारी दूता करवीं मार्सेलसमधील लॅतिनोविचला पाठवीन, तो मिशा लोंपर तर्फे बर्न लिगेशनमध्यें ॲलान डलेसला देईल "--अशा रीतीनें कालाफातिचनें डॉ. स्झोनीला ही सर्व योजना समजावून दिली. युगोस्लाव हेरखातें व अमेरिकन हेरखातें यांत काळेगोरे निवडणें फार कठीण आहे हें डॉ. स्झोनीच्या लक्षांत येऊन चुकलें.

असो,--दोघांची मुलाखत संपली. ओ. झेड. एन. ए. ची गाडी देण्यांत आली व नोविसाद, सुबोतिका मार्गानें ते सहाजण झेगेद या हंगेरियन शहरीं येऊन पोंचले.

येथें येतांच त्यांनी तीं कागदपत्रें नष्ट केलीं. त्यांच्या कामगिरीचा पहिला भाग त्यांनी यशस्वीपणें पार पाडला होता; लाल फौजेच्या पिछाडीला ते घुसले होते. ते आतां मुक्त झालेल्या हंगेरींत आले असून त्यांचे अमेरिकन हेरखात्यांशीं काय धागेदोरे आहेत हें कुणालाच माहित नव्हतें. अमेरिकन हेर म्हणून ते आतां कामाला लागणार होते. आणि ही गोष्ट मार्शल टिटोच्या हेरखात्याच्या मदती-मुळेंच शक्य झाली होती.

× × ×

## प्रकरण तिसरें

# लाइलो रायकचें पूर्वचरित्र

१९४४ सालीं तुरुंगांत असणाऱ्या लाइलो रायकची स्वभावरचना मोठी गुंतागुंतीची होती. एक तर तो अतिशय गर्विष्ठ; त्यांतून त्याला अमर्याद महत्वा-कांक्षेची जोड मिळालेली. उंच, दिसायला सुंदर, अगदीं हळवा, नेहमीं गंभीर चेहरा पण लगेच लहान मुलाप्रमाणें तोंडावर स्मित झळकत आहे अशी रायक ही व्यक्ति होती. त्याच्या बालिश हास्यामुळें त्याच्यांत कमालीचा मोकळेपणा भासे. पण त्याचे डोळे व तोंड एखाद्या साधूसारखें दिसे. स्त्रियांना तो मोठा आकर्षक वाटे व लोकसुद्धां त्याच्या व्यक्तिमत्वामुळें त्याच्याकडे खेंचले जात.

आपल्या आंगचा गर्व व महत्त्वाकांक्षा त्यानें लपवून ठेवली होती व त्याबरोबरच आपण भेकड आहोत हें सुद्धां त्यानें इतरांपासून झांकून ठेवलें होतें. खरें म्हणजे तो भेकड होता.

त्याच्या आंगच्या या भेकडपणामुळेंच १९३१ सालीं तो हॉर्थीच्या सी. आय. डी. ला सामील होऊन, बेकायदा कम्युनिस्ट चळवळींत हेरगिरीचें, बातम्या पुरविण्याचें व चिथावणी देण्याचें काम करूं लागला. एकदां कम्युनिस्ट हस्तपत्रकें वाटल्याच्या आरोपावरून युनिव्हर्सिटींतील इतर विद्यार्थ्यांबरोबर त्याला अटक करण्यांत आली. त्याला बुडापेस्तच्या सी. आय. डी. च्या मुख्य कचेरींत नेण्यांत आलें.राजकीय कैद्यांचे कसे हालहाल केले जातात हें आठवल्यानें तो भेदरून गेला, त्यानें सगळें कबूल केलें व भराभर आपल्या सहकाऱ्यांचीं नांवें सांगून टाकलीं.

पण त्याच्याबरोबर पकडल्या गेलेल्या इतर विद्यार्थ्यांपेक्षां त्याचें नशीब बलवत्तर होतें. कारण त्याचा मोठा भाऊ पोलिस अधिकारी होता व आपल्या भावाला नरमाईनें वागवा असें त्यानें सी. आय्. डी. च्या राजकीय खात्याला विनविलें. पुढें त्याचा मेव्हणा लाजोस बोकोर या पोलिस कॅप्टनचें सुद्धां वजन आणण्यांत आलें. पोलिस कचेरीच्या राजकीय खात्यांचा, प्रमुख इमरे हेत्येनी हा होता. १९३१ सालच्या पावसाळ्यांत त्याच्या खोलींत जी घटणा घडली तिचा परिणाम यूरोपच्या इतिहासावर होणार होता. पण ज्यांनी त्या घटनेंत भाग घेतला, त्यांना अर्थातच तसें कांहीं वाटलें नाहीं. त्यांच्या दृष्टीनें कामगार चळवळींत फूट पाडायला आणखी एक माणूस लाभला. आणखी एकजण सी. आय्. डी. चा कुत्रा बनला.

रायकला एक कागद देण्यांत आला व त्याच्यावर सही करण्यास सांगण्यांत आलें. 'कम्युनिस्ट चळवळीबद्दल मी पोलिसांना माहिती पुरविण्यास तयार आहें' असें या कागदावर लिहिलें होतें. इतक्या सहजासहजीं सुटका होते असें पाहून रायकला आनंद झाला व त्यानें त्या कागदावर सही केली. पण या कृत्यामुळें त्याच्या स्वभावाची आणखी एक बाजू उघडी पडली. केवळ गर्व व भेकडपणाच नव्हे, तर या तरुणाच्या आंगीं तत्वशून्यता होती.

युरोपियन साहसबाजांच्या दीर्घ परंपरेंत रायक पदार्पण करीत होता. यापुढें रायक हंगेरीच्या हॉर्थी सरकारचा सी. आय. डी. बनून काम करणार होता. पण रायकचा देशद्रोह निराळ्या प्रकारचा होता. आपल्या गुप्त धन्यांची विचारसरणी पटली किंवा त्यांच्या तत्वांवर विश्वास बसला म्हणून तो बेइमानी करण्यास तयार झालेला नव्हता. रायकचा स्वतःशिवाय कशावरही विश्वास

नव्हता. मग त्यानें विश्वासघात कां केला ? एक तर तो घाबरला; दुसरें म्हणजे आपल्या सहकाऱ्यांबद्दल त्याच्या मनांत तुच्छता होती व शेवटचें कारण म्हणजे त्याच्या धरसोडी वृत्तीच्या चंचल स्वभावाला, दुटप्पी भूमिका घेण्यांत एक प्रकारचा अद्भुतरम्य आनंद वाटत होता. त्याची वृत्ती आंतरराष्ट्रीय साहसबाजाची होती, आणि आतां तो आंतरराष्ट्रीय साहसबाज होण्याच्या वाटेस लागला होता.

पहिलें विश्वासघाताचें कृत्य केल्यानंतर त्याच्या मागोमाग तर्कशुद्ध रीतीनें व झपाट्यानें त्याची राजकीय व नैतिक अधोगती सुरू झाली. एका वर्षांत त्यानें युनिव्हर्सिटींत काम करणाऱ्या कम्युनिस्टांचीं नांवें पोलिसांना कळवलीं व मोठ्या प्रमाणावर धरपकडी झाल्या. त्यांत खुद्द रायक होता. कारण आपल्याबद्दल कुणाला शंका येऊं नये म्हणून त्यानें स्वतःला पकडून घेण्याचें कारस्थान रचलें होतें. ज्यांची धरपकड झाली त्यांत इस्तवान स्तोल्त होता व याच इसमानें तेरा वर्षानंतर रायकचा महत्वाचा संदेश पश्चिम जर्मनींत पोंचवला. १९३२ सालीं खुद्द स्तोल्त पोलिसांचा हस्तक म्हणून काम करीत होता. वर्षानंतर त्याच्या कारवाया उघडकीस आल्या व त्याची कम्युनिस्ट पार्टींतून हकालपट्टी करण्यांत आली.

१९३२ सालीं रायकचा, डॉ. जोसेफ सोंबोर श्वायनित्झेरशीं प्रथम संबंध आला. हा त्यावेळीं पोलिसखात्याचा वरिष्ठ अधिकारी होता पण पुढें तो हंगेरीचा पोलिस प्रमुख बनणार होता. हें नांव महत्वाचें आहे; कारण बरेच वर्षांनंतर हा डॉ. सोंबोर-श्वायनित्झेर युरोपियन राजकारणांत एक चमत्कारिक भूमिका घेणार होता.

१९३४ सालअखेर पर्यंत रायक क्षुद्र पोलिस खबरीचें काम करीत होता. पण त्यावेळीं गोंबोस सरकार झालें व हंगेरियन फॅसिझमनें उग्र स्वरूप धारण केलें. कामगार चळवळ साफ चिरडून टाकावयाचें धोरण गोंबोसनें आंखलें व त्या धोरणाच्या सांखळीतील अखेरचा दुवा म्हणून बिल्डिंग कामगार युनियनमध्यें रायकची पोलिस हेर म्हणून रवानगी झाली.

त्यावेळीं बुदापेस्तचे औद्योगिक कामगार, बिल्डिंग कामगारांच्या लढाऊ नेतृत्वाखालीं गोंबोसच्या काळ्या कायद्यांविरुद्ध शौर्यानें लढत होते. सार्वत्रिक संपाचें वातावरण पसरत होतें. १९३५ सालीं संपाला तोंड लागलें पण त्या सुमारास रायकनें बिल्डिंग कामगारांच्या पुढारीपणांत आपला शिरकाव करून घेतला होता. सरकारनें जरी जाहीर सभांवर कडक बंदी घातली होती तरी जाहीर सभा भरवावी अशी रायकनें सूचना मांडली. कामगारांनी ती सूचना

मान्य केली. बुदापेस्तमध्यें उजलीपोतवारोस भागांत बिल्डिंग कामगारांनीं प्रचंड निदर्शन केलें. पूर्वयोजनेनुसार पोलिस कामगारांत घुसले. दोनशें जणांना अटक झाली व संपाची वाट लागली.

१९३६ सालीं डॉ. श्वायनित्सेरनें सूचना दिल्यावरून रायक झेकोस्लोवाकियाच्या कम्युनिस्ट पार्टीत घुसण्यास गेला. पण आतां सबंध जगाला हादरून टाकणाऱ्या घटणा घडणार होत्या व हंगेरीयन पोलिसाचा हा फडतूस खबरी राजकारणाच्या भोंवऱ्यांत फेंकला जाणार होता.

१९३३ सालीं ॲडोल्फ हिटलरनें सत्ता घेतली. १९३६ च्या आरंभीं फॅसिस्ट मताचा, फ्रॅन्सिस्को फ्रँको नांवाचा एक अप्रसिद्ध स्पॅनिश लष्करी अधिकारी, पाद्री, कोट्याधीश व लष्करी अधिकारी, यांच्याशीं संगनमत करून नवोदित स्पॅनिश प्रजासत्ताक राज्य उलथून पाडण्याचें कारस्थान रचीत होता. जुलै १७ रोजीं स्पेनमध्यें युद्ध भडकलें व हिटलर, मुसोलिनीनें हें आपलें युद्ध समजून त्यांत भाग घेतला. त्यांनी स्पेनमध्यें फ्रँकोला मदत करण्यासाठीं, बॉंबफेंकी विमानें, लष्करी शिष्टमंडळें व गाड्या आणि पलटणी पाठविल्या. स्पेनमध्यें फॅसिझमविरुद्ध लोकशाही या लढ्याला तोंड फुटलें आहे, ही पहिली लढाई आहे हें ओळखून, लोकशाहीच्या संरक्षणासाठीं जगांतील कामगारवर्गानें आपले उत्कृष्ट योद्धे स्पेनला पाठविले.

तावडतोब आंतरराष्ट्रीय फलटण उभारण्यांत आली. लगेच ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका, इटली, युगोस्लाविया, हंगेरी व इतर देशांतून तुकड्या आल्या व गुप्त मार्गानें, वेडीवांकडी वळणें घेत स्पेनच्या रणभूमीवर उतरल्या. पूर्व यूरोपमधून सैनिक गोळा करून त्यांना संघटित करून स्पेनमध्यें पाठवण्याची जोखमाची कामगिरी जोसिप ब्रॉझ या माणसानें घेतली होती. याच जोसिप ब्रॉझने पुढें नांव बदलून वॉल्टर व अखेरीस टीटो हें नांव धारण केलें. ज्या शेंकडों हंगेरियन्सनीं स्पेनच्या हांकेला उत्तर दिलें त्यांत लाझ्लो रायक होता. डॉ. सोंबोरश्वायनित्झेरनें त्याला स्पेनला जाण्याचा हुकूम दिला असून त्याच्यावर दुहेरी जबाबदारी टाकली होती. रायकचें एक काम म्हणजे, हंगेरींतून जाणाऱ्या राकोसी बटॅलियन मध्यें कोण कोण आहेत त्यांचीं नांवें शोधून काढणें, व दुसरें काम म्हणजे त्यांच्यांत राजकीय फूट पाडून त्यांचें लष्करी सामर्थ्य खच्ची करणें हें होतें.

स्पेनमधील युद्ध म्हणजे भिजत घोंगड्यासारखें होतें. मध्येंच चकमकी झडत, लढाई होई, तर पुन्हां सामसूम. कारण त्यावेळीं जगांत तटस्थतेच्या

धोरणाचा फार्स चालला होता. हळूहळू जर्मन बॉंबर्सच्या व इटालियन लष्करी गाड्यांच्या जबरदस्त वजनानें लोकशाही स्पेन मागें रेटला गेला. प्रत्येक चकमकींत त्यांच्याविरुद्ध अजस्त्र शस्त्रें व सैनिक उभे करण्यांत आले. आणि अशा रीतीनें १९३८ च्या अपेशी नोव्हेंबरांत, एब्रोची घटना घटली.

या सुमारास रायक राकोसी बटॅलियनच्या कम्युनिस्ट पार्टीचा सेक्रेटरी झाला. आणि या अधिकारांत त्यानें एब्रोच्या लढाईआधीं, हास नांवाच्या बटॅलियनच्या एका अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई चालवली. या कारवाईचा हेतू हा कीं बटॅलियनमध्यें राजकीय खटके व द्वेष निर्माण व्हावे व तुकडीचें नीतिधैर्य कोसळावें. स्पॅनिश युद्धाच्या एका निर्णायक लढाईत एका आणीबाणीच्या आघाडीवर ही तुकडी लढणार होती त्यावेळी तिचें नीतिधैर्य खचलें ही गोष्ट त्यानें अनेक वर्षांनंतर कबूल केली.

स्पॅनिश लोकसत्ताक राज्य, हिटलर मुसोलिनीविरुद्ध युद्धांत हार खाणार ही गोष्ट फेब्रुवारी १९३९ च्या सुमारास रायकला स्वच्छ दिसूं लागली होती. माद्रिद शहर पेंचांत पडलें असून मार्च अखेरीस तें पडणार अशीं चिन्हें दिसत होतीं रायकनें आपल्या तुकडींतून पळ काढला व त्यानें फ्रेंच सरहद्द ओलांडतांच त्याला पकडून सेंट सिप्रियन कॅंपमध्यें अडकवून ठेवण्यांत आलें; पुढें गुर्स व नंतर व्हर्ने कॅंपमध्यें त्याची रवानगी झाली.

व्हर्नेला रायकची एनरिक गिरोनेलाशीं ओळख झाली. हा पी. ओ. यू. एम्. ( स्पॅनिश ट्रॉट्स्कीवादी पक्षाचा ) दुय्यम सेक्रेटरी जनरल होता व बार्सिलोनाच्या जनता कोर्टानें ठोठावलेली फांशीची शिक्षा चुकवून तो पळून आला होता. पुढें फ्रेंच गुप्त पोलिसांच्या मदतीनें तो मेक्सिकोस गेला. याचवेळीं प्रमुख युगोस्लाव ट्राट्स्किवाद्यांशीं रायकची जानपछान झाली. हंगेरियन्समध्येंसुद्धां त्यावेळीं ट्रॉट्स्कि गट होता व त्या गटांतील शेरेसन्येस नांवाच्या इसमानें पुढें एक आश्चर्यकारक भूमिका घेतली.

या इसमाबरोबर रायकनें कॅंपामधून ट्रॉटस्कीवादाचा प्रचार चालवला. दहा वर्षांनंतर या आठवणी सागतांना त्यानें ट्रॉटस्कीवादाचें असें वर्णन केलें कीं " ट्रॉटस्कीवादाला कोठल्याही तत्त्वज्ञानाचा राजकीय आधार नसून, क्रांतिकारक कामगार चळवळीच्या जें हिताचें असेल त्याच्यांत फूट पाडून त्याचा नायनाट करणें, हाच ट्रॉटस्कीवादाचा अर्थ आहे." आपल्याला सध्यां ही व्याख्या चालण्यासारखी आहे.

गुर्स व व्हर्ने या दोन्हीं कँपांत रायक काय करतो आहे हें फ्रेंच अधिकाऱ्यांना ठाऊक होतें व फ्रेंच गुप्त पोलिस खात्याच्या दुक्झेमि ब्यूरोच्या अधिकाऱ्यांनीं त्याची अनेकदां तपासणी केली होती. या दुक्झेमि ब्यूरोच्या अधिकाऱ्यांसमोर एक पोरकट नाटक चालायचें. रायक सारखे हंगेरियन ट्रॉटस्कीवादी युगोस्लाव ट्रॉटस्कीवाद्यांचीं नांवें सांगत तर याच्या उलट युगोस्लाव ट्रॉटस्कीवादी हंगेरियन ट्रॉटस्कीवाद्यांचीं नांवें सांगून मोकळे होत. अशा रीतीनें, पोलिसहेर, खबरी, चिथावणी देणें, अशी कामें करण्यास कोण कोण तयार होतील त्यांची पक्की यादी फ्रेंच गुप्त पोलिसांपाशीं तयार झाली.

कँपमध्यें हे घाणेरडे प्रकार चालले असतां, ३१ मार्च १९३९ ला स्पेनचा शौर्यशाली लढा संपला. पण थोड्याच महिन्यांत युरोपांत युद्धाचा गडगडाट होऊन, जर्मन्स पोलंडमध्यें घुसले. पश्चिमेकडे टेलिफोनी लढाई सुरू होती व तीसुद्धां फ्रेंच लोकसत्ताक राज्याचा नाश होऊन उत्तर फ्रान्स जर्मनीनें व्यापला तेव्हां म्हणजे १९४० च्या उन्हाळ्यांत संपली. दक्षिण फ्रान्समध्यें जुनापुराणा प्रतिगामी पेतँ याची गादीवर स्थापना करण्यांत आली व हिटलरच्या परवानगीनें त्याला ठेवण्यांत आलें.

पुन्हां एकदां इतिहासानें रायकला व्हर्ने कँपच्या चिखलांतून उचलून त्याच्यावर नव्या भूमिकेचीं वस्त्रें चढवलीं. स्पॅनिश युद्धाच्या सैनिकांत तो जो कोंबड्या झुंजवीत बसला होता तिथून उचलून पुनः एकदां त्याला पोलिस हेराचें काम देण्यांत आलें.

१९४१ च्या वसंत ऋतूंत, सोविएत युनियनवर जूनमध्यें हल्ला करण्यासाठीं हिटलर आपलें लष्करी यंत्र सुसज्ज करीत होता. जर्मनीच्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांत राबविण्यासाठीं युरोपच्या कोनाकोपऱ्यांतील कामगारांना वेठीस धरण्यांत येत होतें. फ्रेंच, बेल्जियन, डच, पोलिश, हंगेरियन व झेक कामगारांवर त्यांची कळसूत्री सरकारें किंवा त्या देशांतील फॅसिस्ट जर्मन सर्वाधिकारी त्यांना कधीं लालूच तर कधीं धमकावण्या देऊन जर्मनींत जाण्यास लावीत होते. ही गुलामी योजना यूरोपभर पसरली असून त्यांतच दोन वर्षें कँपमध्यें कुजत पडलेले स्पॅनिश योद्धे सांपडले.

एका जर्मन कमिशननें व्हर्ने कँपला भेट दिली. थोड्याच दिवसांत रायकला जर्मन मेजरच्या कचेरींत नेण्यांत आलें. "हंगेरियन पोलिस खात्याच्या प्रमुखानें तुझें नांव गेस्टॉपोच्या हातांत दिलें आहे. आठ वर्षांपूर्वी त्याच्याच कचेरींत तूं त्या कागदावर सही केली होतीस." असें त्याला सांगण्यांत आलें.

रायकनें हंगेरींत जाऊन पोलिसांना सहाय्य करीत राहावें म्हणून त्याला हंगेरींत पाठविण्याचें ठरलें. हिटलर गेस्टॉपोच्या हुकुमावरून व त्यांच्याच मदतीनें त्याला हंगेरींत पाठविण्यांत येणार होतें. हंगेरीयन पोलिसांची रायकनें आठ वर्षे इमानें इतबारें चाकरी बजावली होती; आतां व्हर्नेच्या कँपांत त्यांचे संबंध वाढले—आतांपासून तो नाझी पोलिसांचा हेर बनला.

जर्मन मेजरशीं रायकचें जें बोलणें झालें, त्यांतील एक गंमतीदार गोष्ट ही कीं, रायकला युगोस्लाव ट्रॉटस्कीवाद्यांबद्दल माहिती विचारण्यांत आली व ती त्यानें दिली. आपल्याला एकट्यालाच नाझी या कँपातून बाहेर पडायला मदत करणार आहेत असें नाहीं तर आणखीही आपल्या बरोबर इतरजण आहेत ही गोष्ट रायकच्या ध्यानांत आली. यावेळीं जर्मनांनी ज्या हंगेरियन्सनां या कँपांतून बाहेर सोडलें त्यांत इमरे गेयर होता ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हा इमरे गेयर म्हणजे दक्षिण अमेरिकेंतील एक साहसबाज इसम होता. हा स्पेनमध्यें लढायला म्हणून आला पण आंतरराष्ट्रीय ब्रिगेडमध्यें असतांना यानें एकाही लढाईत भाग घेतला नव्हता. सबंध युद्धकाळांत हंगेरीयन प्रतिकार चळवळीचें जें अपरिमित नुकसान झालें तें या इसमामुळेंच.

हंगेरींत परत येतांच लाझ्लो रायकनें दोन गोष्टी केल्या. तो पोलिसांच्या मुख्य कचेरींत जाऊन आला व त्यानें बेकायदा कम्युनिस्ट पार्टीशीं संबंध जोडले. आपण स्पेनमध्यें काय शौर्यशाली कृत्यें केलीं याचें रसभरीत वर्णन करून त्यानें कम्युनिस्टांची इमरे गेयरशीं ओळख करून दिली. "इमरे गेयर हा पार्टीचा अत्यंत विश्वासू सभासद असून राकोसी बॅटलीयनचे जे सभासद परत हंगेरींत येतील त्यांना तपासण्याचें काम त्याच्यावर सोपवावें असें रायकनें सुचवलें. गेयरच्या हालचालीमुळें संशय येऊं नये म्हणून पोलिसांनीं रायकला स्थानबद्ध करून ठेवलें.

आणि अशा रीतीनें १९४१ ते १९४४ हीं आणीबाणीचीं तीन वर्षे रायकनें हंगेरियन कँपमध्यें आरामांत काढलीं. परंतु या काळांत इमरे गेयरचें काम चालूच होतें. त्यानेंच १९४२ सालीं कम्युनिस्टांची मोठ्या प्रमाणावर धरपकड घडवून आणली, फेरेन्स रोझाव, झोल्तान शोनहर्झ यांचे खून पाडले, असें नंतरच्या रायकच्या कोर्टांतील जबानीवरून दिसून येतें.

१९४४ च्या ऑक्टोबर मध्यें रायकची सुटका करण्यांत आली. पुन्हा त्यानें प्रतिकार चळवळींत घुसावें असा त्याला हुकूम देण्यांत आला. अर्थात् धडाडीचा लढवय्या म्हणून चळवळींतील त्याची कीर्ति अजून अबाधित होती.

पण पुष्कळदां असें होतें कीं एका सरकारी खात्याच्या पोलिसांना, दुसऱ्या खात्याला जोडलेले पोलिस काय करीत आहेत हें माहित नसतें. या प्रकरणांत नेमकी हीच गोष्ट घडली.

फाजील उत्साहाच्या भरांत हंगेरीच्या लष्करी हेर खात्यानें भूमिगत संघटनेंतील भयंकर माणूस, म्हणून रायकला पकडून तुरुगांत डांबलें; आणि या प्रमाणें १९४४ च्या अखेरीस सोप्रोनकं हिदा येथें त्याच्यावर गुप्तपणें खटला चालविला गेला व पुन्हा घटणाप्रवाहाच्या जबरदस्त लोंढयानें त्याला उचललें व युद्धाच्या अखेरीच्या भीषण काळांत जर्मनींत नेऊन ठेवलें. जर्मनींत जातांच, एके काळचा हेर व आपला जुना दोस्त इस्तवान स्तोल्त, याला अमेरिकनांशीं संधान जुळविण्यास मागें ठेवून, रायक पुनः हंगेरीस कसा परतला हें आपण मागें पाहिलेंच आहे.

× × ×

१९३१ सालीं, बुदापेस्तचा पोलिस अधिकारी म्हणून ज्याच्याशीं आपली पहिली ओळख झाली तो डॉ. सोंबरश्वायनित्झेर झालासीच्या कळसूत्री फॅसिस्ट सरकारांत पोलिस प्रमुख झाला होता. १९४४ अखेर इतर फॅसिस्ट अधिकाऱ्यांबरोबर, लाल फौजेच्या तुफान वेगानें दौडणाऱ्या रणगाड्यांपुढें जीव मुठींत धरून तो पश्चिमेकडे पळत सुटला. या सोंबोर श्वायनित्झेरला जाऊन भेट असें रायकनें स्तोल्तला सांगितलें. हा हंगेरियन पोलिसांचा दादा अमेरिकन्स बरोबर 'म्युनिख जवळ कुठें तरी,' आहे असें त्यानें ऐकलें होतें.

१९४५ चा उन्हाळा-पावसाळाभर इमानी स्तोल्त त्याला धुंडाळीत होता. अमेरिकन नियंत्रित प्रदेशांत जाण्यास त्याला फारशी अडचण पडली नाहीं; अखेरीस डिसेंबर महिन्यांत, बव्हेरियाच्या वरच्या भागांत ट्रॅन्स्टाईन या गांवी त्याला श्वायनित्झेरचा पत्ता लागला. फॅसिस्ट हंगेरीचा जुना चाकर, व जर्मन गेस्टॅपोशीं निकटचें संगनमत करणारा हा डॉक्टर तिथें अमेरिकन हेर खात्याच्या ( सी. आय. सी. च्या ) हंगेरियन विभागाचा प्रमुख बनला होता! फॅसिस्टांच्या नोकरींतून बाहेर पडून श्वायनित्झेर फॅसिस्टांच्या तथाकथित शत्रूंच्या आपल्या नव्या धन्यांच्या हुकुमावरून, पूर्वीं जुन्या धन्यासाठीं जें काम करीत होता तेंच काम आज तो करीत बसला होता. मुक्त झालेल्या हंगेरीच्या पुरोगामी चळवळींत पाठवण्यासाठीं, राजकीय हेर निवडून काढणें, त्यांना पढविणें हें त्याचें काम होतें. घाईघाईनें त्यानें जो हा नवा घरठाव केला, त्यामुळें डॉ. च्या

विचारसरणींत काडीचा बदल झाला नव्हता. हॉर्थी, झालासी व हिटलर यांच्या राजवटींत तो फॅसिस्ट राजकीय पोलिस अधिकारी होता आणि अमेरिकन राजवटींत त्याचा येळकोट कायम राहिला. अमेरिकन हाय कमांडखालीं तो फॅसिस्ट राजकीय पोलिस अधिकारी म्हणूनच राहिला.

डॅा. श्वायनित्झेर व अमेरिकन्सनीं स्लोल्तचें, ट्रॅान्स्टाइन येथें मोठ्या आपुलकीनें स्वागत केलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. रायकबद्दल त्याला कसून प्रश्न विचारण्यांत आले. त्याला "वापरायला" मार्ग शोधून काढणें शक्य आहे असें श्वायनित्झेरचें म्हणणें पडलें.

# प्रकरण चौथें

# बुदापेस्त, १९४५

लाझ्लो रायक ज्या बुदापेस्तला परत आला तें बुदापेस्त शहर १९४५ च्या वसंत ऋतूंत दोन महिने शत्रूंशीं रस्त्यारस्त्यांत निकरानें झुंजत असल्यानें, नासधुस झालेलें होतें. पण कामकरी जनतेला तें मोठें आनंदी वाटे.

अखेर शेवटीं जर्मन्स गेले व त्यांच्याबरोबर तें दुष्ट झालासी सरकारही गेलें. जुन्या हंगेरियन फॅसिस्ट राजवटीचे पाठिराखे एक तर, जर्मनींत पळून गेले होते, किंवा हंगेरीत दबा धरून बसले होते; निदान तोंड बांधून शहाणपणानें गप्प बसले होते. ज्यांनी हंगेरीला तीस वर्षांच्या गुलामगिरीच्या व पिळणुकीच्या जोखडांतून मुक्त केलें त्या लाल फौजेचे सैनिक गटागटानें बुदापेस्तच्या रस्त्यांतून फिरत होते. सर्वसाधारण जनतेला १९४५ साल आशेनें व उत्साहानें शिगोशिग भरलेलें साल वाटत होतें.

पण भांडवलदारांना मात्र नेमकें याच्या अगदीं उलट वाटत होतें. अमेरिकन्स ऐवजीं लाल फौजेनें हंगेरीला मुक्त केलें या आघातामुळें ते जे आडवे झाले होते ते अजून उठले नव्हते. साधेभोळे व्यापारी व सरकारी नोकर भविष्यकाळाकडे फिकीरीनें व निराशेनें पहात होते. पण त्यांच्यांतले महाधूर्त व अतिशहाणे होते, त्यांनी अजून आशा सोडली नव्हती.

आतां बुदापेस्तमध्यें ब्रिटिश व अमेरिकन वकिलाती होत्या ना? 'लोकशाही' पक्ष, व 'लोकशाहीवाले' मुत्सदी जाहीरपणें समाजवादाच्या व खाजगी

भाषणांत भांडवलदारीच्या गप्पा मारीतच होते कीं नाहीं ? आतां निवडणुका होऊन त्यांत सोशल डेमोक्रॅट व "जहाल" गट आणि इतर शेतकरी व उदारमतवादी यांचे निवडक "डावे" गट—यांचे संमिश्र मोर्चे विजयी होणार होते ना ? राबणाऱ्या जनतेंत कम्युनिस्ट पार्टीला असामान्य पाठिंबा आहे ही गोष्ट स्पष्टच होती. पण या गोष्टी जमवून घ्यायच्या असतात व त्या घेणें शक्य असतें. पूर्वी हें अनेकदां शक्य झालें होतें—व हंगेरीच्या सत्ताधारी वर्गांना १९४५ सालीं पुनः असा विश्वास वाटला कीं आपला जुना कावेबाजपणा व हिक्मती स्वभाव पुनः उपयोगी पडेल. शिवाय त्यांचे जुने दोस्त होतेच.

पण कम्युनिस्टांचा मोर्चा पुढें सरसावत होता. तीस वर्षांत कम्युनिस्ट पार्टी पहिल्यानेंच कायदेशीर पार्टी झाली होती. भयानक काळांत ज्या स्त्रीपुरुषांनी खऱ्या हंगेरीचें प्रतिनिधित्व केलें, ते आतां अज्ञातवासांतून बाहेर आले होते. हंगेरीच्या उत्कृष्ट मार्क्सवाद्यांपैकीं कांहींजण मॉस्कोहून परत आले; त्यांच्यांत पार्टीचा जनरल सेक्रेटरी मात्यास राकोसी व अर्नो गेरो हे होते.

पार्टीचें सामर्थ्य व वजन फार झपाट्यानें वाढत चाललें व त्याजबरोबर पार्टीवरची जबाबदारीसुद्धां वाढली. पार्टी संघटणेंत, सरकारांत व मंत्रिमंडळांत अनेक महत्वाच्या जागा भरावयाच्या होत्या. पण या हत्याकांडातून थोडेसेच जिवंत राहिले होते. ज्यांच्या आंगीं कर्तबगारी होती, विश्वासूपणा होता व कम्युनिस्ट पार्टी सभासदाला साजेसें त्यागशील असें जबरदस्त काम करण्याची ज्यांनीं तयारी दर्शवली त्यांना जागा देण्यांत आली.

अशा परिस्थितींत लाझ्लो रायक पार्टींत झपाट्यानें वरिष्ठ हुद्यांवर चढला यांत आश्चर्य नको. त्याच्या पोलिस कारवाया पार्टी सभासदांना बिलकुल माहित नव्हत्या. स्पेनमध्यें राकोसी बॅटॅलियनमध्यें काय भानगडी झाल्या त्याच्याबाबत इतका गोंधळ माजला होता कीं रायक त्यांतून सफाईनें निसटूं शकला. खरें म्हणजे १९४५ सालीं लाज्लो रायक हा कम्युनिस्ट पार्टीचा एक अत्यंत महत्वाचा पुढारी म्हणून जनतेंत ओळखला जात होता. तो हंगेरींत परत आल्यानंतर थोड्याच आठवड्यांत त्याला बुदापेस्त कम्युनिस्ट पार्टी संघटनेचा सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

या काळांत रायक सत्तेच्या शिखरावर होता. त्याचें वय अवघें छत्तीस वर्षांचें, दिसायला सुंदर, सहजगत्या पल्लेदार भाषण करणारा व उघड दिसणारें बुद्धि कौशल्य या आंगच्या गुणांमुळें त्याची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत

होती. हा गृहस्थ हुशार नाहीं व वरवर दिसतें त्याप्रमाणें कर्तबगारही नाहीं हें मागाहून उघडकीस आलें. कागदावर टिपणें न करतां तो तीन तीन तास फर्डे वक्तृत्व गाजवी; आपल्या हाताखालच्या अगदीं साध्यासुध्या, क्षुल्लक अधिकाऱ्यांचीं नांवें व कामगिरी बिनचुक आठवण्याइतकी, नेपोलियनसारखी त्याची स्मरणशक्ति दांडगी होती; हरेक तऱ्हेच्या माणसाशीं वागायचें कसें याच्यांत तर त्याचा हातखंडा होता, पण या सर्व गुणांखालीं त्याच्या आंगचा जुनाट दोष दडला होता. शिवाय मार्क्सवादाचें ज्ञान व एकाद्या विषयावर बौद्धिक पकड घेणें या गोष्टी त्यांच्या आंगी मुळींच नव्हत्या. हळूहळू त्या उघडकीस आल्यानंतर त्याच्या निकटच्या सहकाऱ्यांच्या मनांत प्रथम संशय निर्माण झाला.

पण १९४५ सालीं क्षुद्र हेरगिरीचें काम संपलें होतें. आतां त्याला जेलच्या वाऱ्या करण्याची जरूरी नव्हती, डायरी करतां यावी म्हणून वाटेल तशीं हलकीं सलकीं अपमानास्पद कामें हातीं घ्यावीं लागत नव्हतीं कीं बेअकली पोलिस अधिकाऱ्यांचे हुकूम बजावावे लागत नव्हते. जरी रायक पूर्वीं साधा खबरी असला तरी त्या हेरगिरीचें फळ आतां त्याच्या पदरांत पडलें असून आतां तो फार मोठ्या प्रमाणावर साहसबाजी करणार होता. उच्च हुद्दा, त्या जागेचें सुख व लोकप्रियता व त्या बरोबरच दुटप्पी खेळ चालू ठेवण्याचा आसुरी आनंद—याचीं सुखस्वप्नें त्याला पडूं लागली.

रायक पुढें असा कां वागत गेला याचें कारण, या दुटप्पी धाडसी भूमिकेची नशा असणें खरोखरीच शक्य आहे. रायकचा अमेरिकन बँकवाल्यांवर लोभ अधिक म्हणून त्यानें हंगेरियन्सचा विश्वासघात केला असें म्हणतां येणार नाहीं. आपल्याला कुठची बाजू पटते याचा रायकनें गंभीरपणें विचार केला असेल कीं नाहीं याचीच शंका आहे. पण रायक आत्मप्रिय होता व त्यानें जी भूमिका वठवायचें ठरवलें होतें ती त्याला आवडत होती. आणि त्याबरोबरच, कधींतरी कोणत्या तरी मार्गानें उजव्या राजकारणाची फत्ते होणार याची शक्यता त्याला वाटत होती. अशी चौफेर वाढ व्हायला लागली कीं माणसानें सावधगिरी बाळगायला पाहिजे.

कांहीं काळानंतर, या सी. आय. डी. च्या हुजऱ्याच्या मनांत हंगेरीचा हुकुमशहा होण्याची आशा डोकावूं लागून त्याला बेभान करूं लागली.

* * *

या ठिकाणीं आपल्याला मागें भेटलेलीं माणसें काय करीत होतीं हें पाहणें आवश्यक आहे.

तिबोर स्झोनीचा गट स्वित्झर्लंडमधून सुखरूप हंगेरींत येऊन पोंचला. त्यांना आतां मार्क्सवादाची पोपटपंची करण्याइतकें ज्ञान असून ते हंगेरीयन डेमोक्रॅट म्हणून फिरत होते, त्यांच्यापैकीं प्रत्येकजण कम्युनिस्ट पार्टींत जाण्यास तयार होता. ते पार्टींत घुसले व १९४५ च्या मध्यास स्झोनीनें पार्टी हेड क्वार्टर्सवरील महत्वाची जागा पटकावली होती. त्यावेळीं पार्टीला माणसांची अत्यंत वाण पडली होती हें लक्षांत ठेवलें पाहिजे; आपण कित्येक वर्षें हाल-अपेष्टांना तोंड देऊन गुप्तपणें कम्युनिस्ट कार्य करीत आलों आहों अशी आपल्या भूमिकेला साजेशी बतावणी करण्यांत ते आतां तरबेज झाले होते व त्यासाठीं हेडक्वार्टर्समधील आपल्या जागेच्या अखत्यारांत स्झोनीनें आपले साथीदार पार्टी संघटणांतून घुसविले. वार्गा प्रथम पार्टीच्या छापखान्यांत व नंतर तेथून प्राईम मिनिस्टरच्या प्रेसडिपार्टमेंटमध्यें गेला; कालमननें पीपल्स वेल्फेअर मंत्रिमंडळांत महत्वाची जागा बळकावली. दिमित्र उद्योगधंद्यांत शिरला व पुढें टेक्नॉलॉजिकल ( तंत्रशास्त्रज्ञांच्या ) संस्थेंत जाऊन पोंचला. पुढें जसजसे स्वीस गटाचे लोक हंगेरींत परत येऊं लागले, तसें जेथून महत्वाची हेरगिरी करतां येईल अशा मोक्याच्या जागांवर त्यांची वर्णी लावण्यांत येऊं लागली.

स्झोनी आपले दोस्त पेरीत होता इतकेंच नव्हे तर स्वतःच्या किंवा कालमन, दिमित्रच्या घरीं आपल्या गटाच्या खाजगी सभा भरवीत होता. १९४५ च्या अखेरीस स्झोनीचा हेर-गट सुसंघटित झाला होता.

शिवाय ज्यानें सातोरा लिओझेजी तुरुंगांत कत्तल घडवून आणली तो रूक्ष विनोदशून्य तरुण होताच—( याच आंद्रास झालाईनें जेलफोडीची योजना फोडली होती, हें आपणांला लवकरच कळेल. )

या झालाईनेंसुद्धां कम्युनिस्ट पार्टीला चकविलें व तो उघडउघड सभासद झाला व त्यानें पार्टी प्रचार खात्यांतील महत्वाची जागा मिळविली.

मागें आपण पाहिलें कीं जेव्हां जर्मन फौजा पिछेहाट करूं लागल्या तेव्हां हॉर्थीच्या फौजेंतील पूर्वींचा महत्वाकांक्षी अधिकारी जनरल पाल्फि कम्युनिस्ट पार्टींत शिरण्याची खटपट करीत होता. पाल्फीनें आपलें काम इतकें चोख पार पाडलें कीं १९४५ सालीं तो हंगेरियन लष्कराच्या राजकीय विभागाचा प्रमुख बनला. १९४५ त पाल्फि–रायकची पहिली भेट झाली. त्यांच्या गप्पा चांगल्याच

रंगल्या व दोघेही अशा खुबीदार रीतीनें बोलत होते असे सूचकपणें बोलत होते कीं आपलीं राजकीय मतें एकच आहेत हे दोघांना पटलें. या नव्या राजवटींत—हंगेरींत ही जी नवी जनतेची लोकशाही राजवट स्थापन झाली होती—त्या राजवटींत कांही एक फायदा नाहीं हा दोघांच्या बोलण्याचा मतितार्थ होता. १९४६ पर्यंत दोघे एकमेकाला सावधगिरीनें चांचपून पहात होते व पुढें दोघांची उघडउघड राजकीय गट्टी जमली.

आतां आपल्याला लेफ्टनंट बेला कोरोंडीची ओळख करून घ्यायला पाहिजे. हा उद्दाम, गर्विष्ठ व तरुण महत्वाकांक्षी अधिकारी होता. तो हंगेरीच्या लुदोविका मिलिटरी ॲकेडमींत तयार झालेला होता. १९४५ च्या ऑगस्टमध्यें हा तरुण लष्कराच्या राजकीय विभागांत लागला व त्याची पाल्फीशीं भेट झाली त्यावेळीं पाल्फि कर्नल होता. जुन्या जमान्यांतील शक्य तितके जुने फॅसिस्ट लष्करी अधिकारी हंगेरीच्या नव्या लोकशाही लष्करांत घे, अशी पाल्फीची त्याला सूचना होती. ज्यांचे फारच भयंकर गुन्हे असतील किंवा ज्यांची अतिशय बदनामी झाली असेल अशांवरच खटले भर. अशा रीतीनें नव्या हंगेरीला विरोधी व प्रतिक्रांतीला कधींतरी उपयोगी पडेल अशी लष्करी संघटना उभारण्यांत पाल्फि व कोरोंडी गुंतले होते.

\+ \+ \+

त्या सालच्या उन्हाळयाअखेर, जर्मनीच्या अमेरिकन विभागांत इस्तबान सन्डोल्लनें जी धडपड चालविली होती तिला फळ आलें. तो डॉ जोसेफ श्वायनित्झेरला भेटला हें आपण मागेंच पाहिलें. आपला एकेकाळचा दोस्त लाझ्लो रायक याचा उपयोग करून घेतां येईल असें त्याला सांगण्यांत आलें होतें. तेव्हांपासून अमेरिकन संस्था कामाला लागली होती. आणि अशा रीतीनें बुदापेस्तला ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्यें लेफ्टनंट कर्नल जॉर्ज कोव्हाकनें रायकशीं संबंध जोडला. हा कोव्हाक अमेरिकन मिलिटरी मिशनचा सभासद असून, पुढें तो बुदापेस्तमधील अमेरिकेचा लष्करी वकील झाला.

कोव्हाकनें आडपडदा न ठेवतां बोलायला आरंभ केला. आपला पूर्वीचा अधिकारी सोंबोर-श्वायनित्झेर याच्या रायकला सूचना आहेत असें त्यानें सांगितलें. रायकनें स्वतःला अमेरिकेच्या हेरखात्याच्या ताब्यांत दिलें पाहिजे, आणि हें जर त्यानें कबूल केलें नाहीं, तर हंगेरीयन कम्युनिस्ट पार्टीसमोर त्याचा इतिहास मांडून धिक्कार केला जाईल. पण रायकला असा धाकदपटशा दाखवण्याची

जरूरच नव्हती. दुटप्पीपणानें वागणें आतां त्याच्या पुरतें आंगवळणीं पडलें होतें. असें वागल्यानें भावी काळांतील राजकीय घडामोडींच्या दृष्टीनें आपली बाजू आधींपासूनच बळकट केल्यासारखें होणार होतें—आणि शिवाय आपण आपल्या सहकाऱ्यांपेक्षां अतिशहाणे आहोंत असें समजणाऱ्या माणसाला ही वागणूक म्हणजे आकर्षक खेळ झाला होता.

" तुला लहानसहान हेरांवीं कामें दिलीं जाणार नाहींत, " असें त्यानें रायकला आश्वासन दिलें. अमेरिकन हेरखात्याला त्याच्याकडून अत्यंत महत्वाची राजकीय माहिती हवी होती. अमेरिकन्सचें, रायकनें पहिलें काम जें बजावलें त्याचा हंगेरीमधील १९४५ च्या नोव्हेंबर निवडणुकीशीं संबंध होता. " ही निवडणूक त्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची होती, " असें त्यानें नंतर सांगितलें.

कित्येक उजवे राजकीय पक्ष व सोशल डेमोक्रॅटसचासुद्धां उजवा गट, कारखाने व राज्य कारभारांत महत्वांच्या जागांवर प्रतिगाम्यांना बसवीत आहेत—ही बातमी जेव्हां त्यानें कोव्हाकला सांगितली-तेव्हां-" हें सर्व मला माहित आहे. अमेरिकन्सच हें संघटित करीत आहेत व त्याचे सूत्रधार आहेत "—असें कोव्हाकनें उत्तर दिलें.

हा तो लाझ्लो रायक ! हंगेरीयन फॅसिस्ट सरकारचा हेर म्हणून यानें कामाला सुरवात केली; गेस्टॅपोनें, अमेरिकन हेर बनण्याचें याचें शिक्षण पुरें केलें.

## प्रकरण पांचवें

# टिटो व मॅक्लिन शिष्टमंडळ

१९४५ सालीं युगोस्लाव सरकार, अमेरिकन हेरांना, सोविएत पिछाडीवर पोंचवायला मदत कां करीत होतें, हा प्रश्न या ठिकाणीं विचारणें योग्य ठरेल, युगोस्लाव, अमेरिका व ब्रिटिश हेरखातें यांचे कोणाला कल्पना येणार नाहीं इतके निकटचे संबंध होते व १९४५ मधील जर्मनांच्या पराभवाशीं त्याचा कांहींही संबंध नाहीं, हें आपल्या लवकरच लक्षांत येईल. या प्रश्नाला जर समाधानकारक उत्तर हवें असेल तर आपल्याला थोडा वेळ गुर्स व व्हर्नें कॅम्पसकडे नजर फिरविली पाहिजे.

व्हर्ने कँपमध्यें, लाझ्लो रायकचे युगोस्लाव ट्रॉट्स्कीगटांशी संबंध होते, व युगोस्लाव ट्रॉट्स्कीवादी पुढाऱ्यांचा आपल्या प्रमाणेंच दुक्झेमी ब्यूरोशीं संबंध आहे ही गोष्ट रायकला ठाऊक होती, हें आपल्याला माहित आहे. १९३९ सालीं व्हर्ने कँपात कमींत कमी दीडशें संघटित ट्रॉट्स्कीवादी होते. युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीचा इतिहास ध्यानीं घेतां यांत आश्चर्य करण्यासारखें असें कांहीं नाहीं. या ठिकाणीं त्या पुढाऱ्यांचीं नांवें सांगणें जरूर आहे, कारण पुन्हां निराळ्या परिस्थितींत त्यांच्याशीं आपला संबंध येणार आहे. इवान गोशन्याक, कोस्ता-नादी, मिलीच व स्तिफानोविच हे त्यांच्यांतील प्रमुख होत.

या लोकांची, कँपमध्यें रायकशीं ओळख झाली असून त्याच्याबरोबर त्यांनीं काम केलें होतें. त्याच्याचप्रमाणें १९४१ च्या वसंत ऋतूंत, फ्रान्स, पडल्यानंतर, जर्मन मेजर त्यांनासुद्धां व्हार्ने कँपांत भेटला होता. कोस्ता-नादी, गोशन्याक व इतर पुढारी यांच्याबद्दल मला जर्मन मेजरनें कसून प्रश्न विचारले, असें रायकनें, खटल्याचे वेळीं आपल्या जबानींत कबूल केलें. रायकसारखीच, आपल्या देशांत परत पाठविण्याची त्यांनी मागणी केली व जर्मन्स त्याला कबूल झाले. आपल्या राजकीय विरोधकांना युद्धकार्यासाठींसुद्धां आपल्या देशांत गेस्टॅपो पाठवीत नाहीं असें कदाचित म्हटलें जाईल. सर्व उघडउघड माहित असलेल्या कम्युनिस्टांना कॉन्सेंट्रेशन कँपमध्यें डांबण्यांत आलें होतें, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे, कारण आपण कम्युनिस्ट आहोंत असा इतर सहकाऱ्यां-समोर, व्हर्ने कँपांत, हे हंगेरियन व युगोस्लाव पुढारी दावा करीत होते. निदान गेस्टॅपोला तरी हे कोण आहेत याची चांगलीच माहिती होती असें दिसतें.

रायक ज्या गटाचा सभासद होता त्यांत अनेक युगोस्लाव असून ते १९४१ सालीं व्हर्नेहून जर्मनींत गेले. बुदापेस्टला जातांना वाटेंत लायप्झिगला थोडा वेळ केलेल्या मुक्कामांत रायकला असें आढळलें कीं, इथून अनेक युगोस्लाव गट गेस्टॅपोच्या परवानगीनें बेलग्रादला जात आहेत. रायक हा हंगेरियन कम्युनिस्ट पार्टींत फूट पाडणारा व चिथावणीबाज म्हणून जसा उपयोगी पडणारा माणूस म्हणून समजला जात होता, त्यांचप्रमाणें पुढें ज्यांनी प्रतिकार चळवळींत सत्तेच्या जागा पटकावल्या ते अगोदरच स्पेनमध्यें ट्रॉट्स्कीवादी होते व गेस्टॅपोच्या दृष्टीनें ते अत्यंत महत्वाचे हस्तक गणले जात होते ही गोष्ट उघड आहे. युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीला त्यावेळीं या गोष्टी माहित नव्हत्या हें सांगण्याची कांहीं जरूर नाहीं.

हे ट्रॉटस्कीवादी तर होतेच, पण शिवाय इरसाल राष्ट्रवादीही प्रतिकार चळवळींत सामील झाले होते. युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टी बेकायदेशीर असल्यानें कित्येक प्रामाणिक स्त्रीपुरुषांना हालअपेष्टांत दिवस कंठावे लागले. त्या काळांत त्यांचें व्यवस्थित मार्क्सवादी शिक्षण होऊं शकलें नाहीं, या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या तर पुढें घडलेल्या घटनांचा उलगडा व्हायला बरीच मदत होईल. आतां ही गोष्ट खरी कीं युगोस्लाव पार्टीच्या पुढाऱ्यांत अनेक अनुभवी व कसलेले मार्क्सवादी होते. पण त्यांचें काय झालें तें आपल्याला लवकरच कळेल.

१९४३ च्या आरंभी युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीची सेंट्रल कमिटी व प्रतिकार चळवळीची हायकमांड यांच्यामधील राजकीय परिस्थिती काय होती हें अचूकपणें सागणें शक्य नाहीं. टीटोच्या पुढारीपणाखालीं लढणारे प्रतिकार चळवळींतील सैनिकच फक्त जर्मनांविरुद्ध निकरानें झुंजत होते व मिहालोविच आणि इतर उजवे गट शत्रूंशीं उघडपणें सहकार्य करीत होते ही गोष्ट त्यावेळीं स्पष्ट झाली होती.

× × ×

इंग्लंडचे परराष्ट्र चिटणीस अँथनी ईडन यांनी १४ डिसेंबर १९४३ ला हाऊस ऑफ कॉमन्सपुढें खालील जाहीर निवेदन केलें: " आमच्या हातांत जी माहिती आली त्यावरून या वर्षीच्या वसंतऋतूंतच, ब्रिटिश लष्करी शिष्टमंडळाला जनरल टीटोनें भेटावें, अशी त्याला विनंती करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानें या विनंतीला " होकार " दिला व तेव्हांपासून त्याच्याबरोबर ब्रिटिश अधिकारी आहेत. या गृहाचे एक सभासद, ब्रिगेडियर फिट्झरॉय मॅकलिन हे त्या शिष्टमंडळाचे प्रमुख असून त्यांनी जनरल टिटोशीं उत्तम संबंध जोडले आहेत. " दोस्त राष्ट्रांच्या युद्धाच्या दृष्टीनें, जर्मनांविरुद्ध चाललेली टीटोची लढाई इतकी अमोल आहे कीं चर्चिलला सुद्धां नेहमीं कम्युनिस्टांविरुद्ध सैल सुटणारी जीभ आंवरून, त्याला लष्करी मदत द्यावी लागली, असें जगांतील जनतेला वाटलें.

पण हा मामला इतका साधा नि सरळ नव्हता. नाझी विरोधी युद्धाच्या उत्साहाच्या भरांत, लोक ही गोष्ट विसरले, पूर्वीचा इतिहास व राजकीय अनुभव असलेला चार्चिलसारखा मुरब्बी मुत्सद्दी, भावनाविवश होऊन किंवा शुद्ध लष्करी हेतूनें अशी मदत करण्यास कधींही तयार होणार नाहीं, कारण

टीटो हा जर कम्युनिस्ट असून ब्रिटिशांनी मदत द्यायला लायक ठरला, तर मग इतर देशांत कम्युनिस्ट प्रतिकार चळवळी होत्या, त्यांना अशा तऱ्हेची मदत कां देण्यांत आली नाहीं ?

फ्रेंच प्रतिकार चळवळीचा जीव म्हणजेच कम्युनिस्ट या विषयीं कुणाला संशय नव्हता, असें असतां, त्यांच्या शस्त्रास्त्रांच्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. ग्रीसमध्यें ई. एल. ए. एस. च्या नेतृत्वाखालीं टीटो इतकाच धैर्यशाली व उपयोगी अशी लढाई चालली असतांना त्यांना मदत करण्याऐवजीं ब्रिटिश फलटणी अथेन्सच्या रस्त्यांत त्यांना गोळ्या घालीत होत्या. मि. चर्चिल व एम्. १५ यांना मान्य होण्यासारखें असें टीटोच्या कम्युनिझमध्यें कांहीं निराळें होतें काय ?

चर्चिलची युद्धासंबंधीची जी प्रसिद्ध व्यूहरचना होती त्यामुळें जिज्ञासा अधिकच वाढते. इलियट रुझवेल्ट, जनरल आयसेन हॉवर, हॅरी हॉपकिन्स या सारख्या सुप्रसिद्ध युद्धकालीन व्यक्तींनीं आपल्या लिहून ठेवलेल्या आठवणींत, कांहीं झालें तरी बाल्कन देश सोवियत वजनाखालीं येऊं द्यावयाचे नाहींत हीच चर्चिलला मुख्य चिंता पडली होती यावर भर दिला आहे. हें धोरण इतकें विकोपास गेलें कीं १९४२-४४ कालांत, पश्चिम युरोपमध्यें दुसरी आघाडी उघडा म्हणून सोवियतची सारखी मागणी असतां, चर्चिलनें अँग्लो-अमेरिकन लष्कराची बाल्कन मोहिम आंखली. तेहेरानला चर्चिलला युद्धोत्तर काळाचीच अधिक काळजी लागल्यानें, तो एकसारखी बाल्कन मोहिमेची सूचना करीत होता असें आपले वडील सांगत होते—हें इलियट रुझवेल्टनें आपल्या रिपोर्टांत लिहिलें आहे.

चर्चिलला स्वारी करतां आली नाहीं हें खरें, पण त्यानें टीटोकडे शिष्ट-मंडळ पाठविलें. बाल्कनमध्यें चर्चिलला रक्तशून्य विजय मिळवून द्यायचा हा या शिष्टमंडळाचा हेतू होता. टीटोला भेटावयास गेलेले, निष्णात हेरखात्यांतील अधिकारी होते. कांहींच्याविरुद्ध घोटाळ्यांत आणणारी माहिती गोळा करून, त्यांना धमक्या देऊन, त्यांच्यावर वैयक्तिक छाप पाडून, किंवा त्यांचें मन वळवून व टीटोच्या मुख्य ठाण्यावर राजकीय कारस्थानें करून, प्रतिकार चळवळीच्या पुढाऱ्यांना जिंकतां येईल असें या हेरखात्याच्या अधिकाऱ्यांना माहित होतें. स्पेनहून परत आलेल्या ट्रॉट्स्कीवाद्यांची, गेस्टॉपो इतकीच, एम् १५ व अमेरिकन जी ३ यांना माहिती होती असें समजणें चुकीचें ठरणार नाहीं. शिवाय युद्धापूर्वी, ब्रिटिशांची युगोस्लावियांत उत्कृष्ट हेर संस्था काम करीत

होती; आणि ज्या कम्युनिस्ट पार्टीला आपला खुद्द जनरल सेक्रेटरी हाच पोलिस हेर आहे याचा पत्ता नव्हता, त्या पार्टींत ब्रिटिश अमेरिकन हस्तक असावेत हें स्वाभाविक होतें. ग्रीस व फ्रेंच यांच्याशीं जें चर्चिल करायला तयार नव्हता, तीच गोष्ट टीटोशीं करावयला एका पायावर तयार होता याचाच अर्थ हा कीं चर्चिलचा निर्णय अत्यंत विश्वासू माहितीवर आधारलेला होता.

टीटोकडे जाणाऱ्या शिष्टमंडळाचें नेतृत्व ब्रिगेडियर मॅक्लिन व अमेरिकन लष्करी अधिकारी, कर्नल हॅमिल्टन यांचेकडे होतें; शिवाय चर्चिलचे चिरंजीव मेजर रॅंडोल्फ चर्चिल या शिष्टमंडळांत सामील झाले. अशीच कुळसूत्री शिष्टमंडळें, मॉसिदोनिया, सर्बिया, धोजोवोदिना, क्रोशिया, स्लोवेनिया व व्हिस बेट या आघाड्यांवर पाठविण्यांत आलीं.

युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टी पुढाऱ्यांपैकीं–रांकोविच, कार्देली, जिलास व खुद्द, टीटो यांनी ( मार्क्सवादी तत्त्वें जर कधीं मानलींच असलीं तर ) त्यांना सोडचिट्ठी कधीं व केव्हां दिलीं हें सांगतां येणें कठीण आहे. पण हें दर्शविणाऱ्या कांहीं सूचक घटना आहेत.

उदाहरणार्थ, १९४४ मध्यें द्रवार ठाणें जर्मन छत्रीधारी सैनिकांनी वेढलें, तेव्हां युगोस्लाव पुढाऱ्यांना, बारी या सुरक्षित स्थळीं विमानानें नेण्यांत आलें. टीटोला आपल्या वजनाखालीं आणण्याची ही संधी आहे असें पाहून, युद्धकाळांत, त्याला व त्याच्या सहकाऱ्यांना ब्रिटिश युद्धनौकेंतून व्हिस बेटावर पोंचविण्यांत यावें, अशी मॅक्लिन व रॅंडोल्फ चर्चिल यांनी सूचना केली. रांकोविच, जिलास व कार्देली यांनी त्या सूचनेला जोराचा पाठिंबा दिला व अखेरीस टीटो जाण्यास कबूल झाला.

नंतर, आड्रिआटिक किनारा व्यापण्याची आपली पूर्व योजना अंमलांत आणतां येईल, अशी चर्चिलला अजून आशा होती. यावेळीं पुनः रांकोविच, कार्देली, जिलास त्याला कबूल झाले. प्रतिकार चळवळीच्या पुढाऱ्यांत या प्रश्नां-वर झगडा झाला. सच्चा कम्युनिस्टांनी अर्थातच उघडउघड दिसणाऱ्या कारणां-वरून या सूचनेला विरोध केला. टीटो डळमळला, आणि अखेरीस त्यानें सूचनेला विरोध केला.

शेवटीं, सर्बिया व युगोस्लावियाची राजधानी बेलग्राद यांच्या मुक्ततेचा प्रश्न आला. लाल फौज तुफान वेगानें दौडत असून, बल्गेरिया व रुमानियांत

येऊन ठेपली होती. टीटोला सोवियतची मदत झिडकारायला लावण्यासाठीं, रांकोविच, जिलास, कार्देली करवी, मॅकलेन व हॅमिल्टन यांनी जंगजंग पछाडले पण आपल्या सामर्थ्याच्या जोरावर शत्रूला मागें रेटतां येत नाहीं हें कळून आल्यावर, टीटोनें रशियन्सच्या सहाय्याची मागणी केली, व लाल फौजेच्या सैनिकांनी, बेलग्रादमधून जर्मनांना पिटाळलें.

या घटना, रायकच्या खटल्याच्यावेळीं, ज्याची आपली आतां लवकरच ओळख होणार आहे-त्या लाझार ब्रांकोवनें सांगितल्या. टीटोच्या लष्करी मंडळाचा, एक विश्वासू सभासद, कर्नल ओब्राद सिसमिल याच्या तोंडून हें आपण ऐकलें, असें ब्रांकोवनें सांगितलें. अर्थातच ब्रांकोवच्या जबानींतील सर्व बारिकसारिक तपशील अचूक आहे, असें मानणें अशक्य आहे. उदाहरणार्थ, व्हिस बेटा बाबत त्याचा पुरावा चुकीचा होता. मागें घडलेल्या घटना आठवतांना माणसाची चूक होते—हीच गोष्ट खटल्यावेळचा त्याचा एकंदर पुरावा खरा आहे—याची खूण आहे. पण इतर भोंवतालचा पुरावा सुद्धां इतका सबळ आहे कीं ब्रांकोवची जबानी खरी आहे असें मानून त्याचा गंभीरपणें विचार करणें जरूर आहे.

ॲलेक्झांडर रांकोविचचा पूर्वेतिहास, त्याचें खरेंखुरें राजकीय स्थान, व त्याचे निकटचे साथीदार, या विषयीं फार कांही सांगतां येण्यासारखें नाहीं. १९४४ सालीं रांकोविच पस्तीस वर्षांचा होता व वयाच्या विसाव्या वर्षापासून तो युगोस्लावियन कामगारचळवळींत जोराचा भाग घेत होता. प्रतिकार चळवळींतील त्याचें कार्य हें एक गूढ आहे. उदाहरणार्थ, त्याला व त्याच्या गटाला जर्मनांनी एका प्रसंगीं कैद केलें. त्यावेळीं त्याच्या सर्व साथीदारांना गोळ्या घालून ठार मारण्यांत आलें. पण रांकोविच मात्र कांही आठवड्यानंतर सुटला. ब्रांकोवनें सुचवल्याप्रमाणें, आपल्यापाशीं त्याची जी माहिती आहे त्यावरून, रांकोविच या वेळेपासून जर्मनांचा हस्तक बनवला गेला असणें शक्य आहे. रायकसुद्धां अशा, पण यापेक्षां कमी तीव्र परिस्थितींत पोलिसांचा हस्तक बनविला गेला.

टीटोनें १९४१-४२ काळांत जर्मनांशी बोलणीं सुरू केली होतीं. पण १९४३ च्या लाल फौजेच्या प्रचंड विजयानंतर, आतां जर्मनी जिंकू शकणार नाहीं अशी त्याची खात्री पटली व त्यानें वाटाघाटी बंद केल्या—अशा अर्थाचीं बोलणीं सुद्धां प्रतिकार चळवळींत चाललीं होती.

खुद्द टीटोसंबधीं तर्ककुतर्क लढविणें व्यर्थ आहे. तो नेमलेला हस्तक होता, कीं मार्क्सवादाचा बुरखा पांघरणारा राष्ट्रवादी होता, कीं तत्वांपेक्षां सत्तेवर आषक्त होणारा सत्ताबाज उद्दाम पुरुष असून आपल्या सहकाऱ्यांचा

बांधिल बनला—हें कांहीं असो—त्याची राजकीय व नैतिक अधोगती कशी झपाट्यानें होत गेली–हें पहावयाची आपणांस संधि मिळेल.

टीटोचें स्थान कांहीही असो; पण सत्तेला चिकटून राहण्याची त्याला भयंकर लालसा होती. त्याची मनोवृत्ति धरसोडीची आणि कमकुवत होती व ज्यांना आपण बेधडक हेर म्हणूं शकूं, अशांचा त्याच्या भोंवतीं गराडा पडला होता, असें मानण्यास बराच पुरावा आहे. पुढें त्याच्या गोतावळ्यांतील ट्रॉट्स्कीवादी व राष्ट्रवाद्यांनी पार्टींत व लष्करांत मोक्याच्या जागा बळकावल्या व तेव्हांपासून युगोस्लावियांत समाजवादाच्या प्रगतीस अवकळा लागली.

१९४३–४४ सालांत, त्यावेळीं टीटोगटाच्या राजकीय अपप्रवृत्त्या म्हणून ज्या समजल्या जात होत्या, त्यांविरुद्ध सच्चे मार्क्सवादी निकरानें लढत होते. टीटोच्या या टीकाकारांत, कर्नल जनरल्स, जोहानोविच झ्युजोविच व आंद्रिया हेब्रांग हे होते. आणि त्यांपैकीं झ्युजोविच व हेब्रांग हे पार्टीच्या सेंट्रल कमिटीचे सभासद होते—व हे दोघे जनरल स्टाफवर होते. प्रबल टीटोगटानें त्यांचा कांटा कसा काढला हें आपणांला लवकरच दिसेल.

या तिघांशिवाय, गनिमी सैनिकांच्या तुकड्यांत कित्येक प्रामाणिक व कर्तबगार मार्क्सवादी होते; व एकंदर चळवळींत हजारों कळकळीचे कम्युनिस्ट होते. पण ट्रॉटस्कीवाद्यांनी महत्वाच्या जागा बळकावल्यापासूनच उत्कृष्ट कम्युनिस्ट पुढाऱ्यांची वाट लावण्याची राक्षसी योजना अंमलांत आणली. जिथें ते हटकून गोळी लागून ठार होतील अशा धोक्याच्या आघाडीवर त्यांची रवानगी करण्यांत आली. आणि शिस्त तर इतकी कडक होती कीं त्यांचे हे बळी, ती कदापि मोडूं शकत नव्हते अशी या टॉट्स्कीवाद्यांची खात्री होती. अशा रीतीनें ज्यांनी युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टी व युगोस्लाव राज्य, यांचे भावी संकटांपासून रक्षण केलें असतें. त्याचें १९४४ पूर्वींच शिरकाण करण्यांत आलें.

× × ×

आतां आपल्याला जी माहिती आहे ती ध्यानांत घेतां त्यावेळच्या ब्रिटिश अधिकाऱ्यानीं जें कांही लिहून ठेवलें आहे तें पुन्हां वाचणें उद्बोधक ठरेल. वोज्वोदिनाला त्यावेळीं असलेल्या मि. बेसिल डेव्हीडसन यांनी “ गनिमी काव्याच्या युद्धांतील चित्रें,” हें पुस्तक लिहिलें आहे. टीटोला पाठिंबा द्या म्हणून परराष्ट्रीय खात्याचें मन वळविण्यांत किती वेळ गेला याचें त्यांनी वर्णन केलें आहे. १९४२-४३ सालीं, कॅबिनेटमधील मुत्सद्यांना जी सांगायला तयार होते त्यापेक्षां अधिक माहिती त्यावेळीं एम्. १५ पाशीं

होती असें दिसतें. टीटो हा वरवर दिसतो तसा नाहीं, हें मुत्सद्यांना समजावण्याची ( पण प्रत्यक्ष तो काय आहे हें मात्र न सांगतां ) हेरखात्याची धडपड चालली होती जसें दिसतें.

डेव्हीडसननें आपल्या पुस्तकांत, दक्षिणेकडील स्लाव लोकांच्या " स्वातंत्र्यप्रिय मनोवृत्तीवर " विशेष भर दिला आहे. " युद्धानंतर कोणतें वडें राष्ट्र युगोस्लावियाला जवळचें वाटेल " असा मी जेव्हां टीटोला प्रश्न विचारला तेव्हां, " स्वातंत्र्याबद्दलचें एक सर्वसाधारण विधान त्यानें केलें, " असें डेव्हीडसन म्हणतो.

१९४४ मधील द्रवार माघारीचा वृत्तांत ब्रिगेडियर मॅक्लिननें आपल्या " ईस्टर्न ॲप्रोचेस् " या पुस्तकांत केला आहे.

हें पुस्तक १९४९ सालीं प्रसिद्ध झालें. टीटो व त्याचे साथीदार नेहमींच कट्टर कम्युनिस्ट होते व मॅास्कोनें मात्र निष्कारण असह्य हुकूमवाजी चालविली आहे, या प्रचाराला उत्तेजन देणें हा या पुस्तकाचा राजकीय हेतू होता. त्या पुस्तकाचा इतिहास व त्यांत मांडलेली मतें-हीं जरा जपूनच विचारांत घेतलीं पाहिजेत.

मॅक्लीनच्या म्हणण्याप्रमाणें टीटो व त्याचे लष्करी अधिकारी, ब्रिटिश युद्धनौकेंतून व्हिस बेटावर गेले व तेथें त्यांनी कांहीं काळ आपलें मुख्य ठाणें स्थापन केलें. एके दिवशीं उठून पहातात तो सगळेच पसार ! मॅक्लिननें त्याचे वर्णन ( ४९८ पानावर ) खालीलप्रमाणें केलें आहे.

" टीटो गेला यांत संशय नव्हता. चर्चिलनें चवताळून केलेल्या तारेंत हेंच म्हटलें होतें. एके दिवशी सकाळीं, बेटाचा अधिकारी व्हिव्हियन स्ट्रीट, जनरल विल्सनचा निरोप घेऊन टीटोला भेटायला गेला, पण टीटो पसार झालेला. बेटावर त्याचा मागमूसही नव्हता. त्याच्यासंबंधी चौकशी केली तर टाळाटाळीचीं उत्तरें मिळालीं. मॅास्कोंत असतांना जशा हजार सबबी सांगण्यांत येत असत तशाच पुनः कानावर पडूं लागल्या. तो आजारीच आहे, कामांत आहे, फिरायला गेला आहे, एक ना दोन. त्याच्या लवाजम्यांतले महत्वाचे तीन असामी त्याच्याबरोबरच बेपत्ता झाले असावे; इतरांना माहिती असली तरी देण्याची त्यांची हिंमत नव्हती. पुढें, अधिक चौकशीअंतीं असें समजलें कीं एका न ओळखूं आलेल्या रशियन विमानांतून तो निसटून गेला. "

ब्रिगेडियर मॅक्लिनच्या वृत्तांतांतील तपशील खरा असो वा नसो, टीटोनें ब्रिटिशांची सूचना मान्य केली व तो व्हिस बेटावर गेला असा त्याचा दावा आहे. एकदां तेथें गेल्यावर, टीटोगटाचा, गनिमीयुद्धाच्या बाबतींत कांहींही अधिकार

राहिला नाहीं, हें उघड आहे. त्याचबरोबर सोविएत सरकारचीं या बाबतींत भिन्न मतें होतीं, याची खात्री आहे. आणि टीटोच्या अचानक पलायनाची हकिकत जर खरी असेल, तर त्याला दुजोरा मिळतो.

ज्यावेळीं लाल फौज दुसरी बाजू दाखवायला एकसारखी तयार होती, अशा परिस्थितींत, चर्चिलच्या बाल्कनमधील कारवाया माहित असलेला टीटो-गट, चर्चिलच्या हातांतील बाहुलें बनायला तयार होतो, या घटनेला कांहीं राजकीय महत्त्व व अर्थ आहे, याची मॅक्लिनला कल्पना नाहीं. चर्चिलचा तिळपापड कां उडाला हें आतां समजण्यासारखें आहे व त्या जळफळाटाला विशेष अर्थ आहे.

मग टीटो कां निसटला ? आपण चर्चिलच्या बाल्कन कारस्थानाचे कट्टर वैरी आहोंत, असा बहाणा करणें, टीटोच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें होतें. अशीच या घटनेची संगती लावतां येईल.

"ईस्टर्न ॲप्रोचेस्" हें पुस्तक धंदेवाईक सोविएतद्वेषाच्या भाषेंत लिहिलें आहे. पण त्यांतील ठराविक निंदा व भरमसाट फिरवाफिरवी केलेलीं विधानें, यांत कांहीं गमतीदार व अर्थपूर्ण वाक्यें आढळनात. उदाहरणार्थ, ३४० पानावर मॅक्लिन टीटोविषयीं म्हणतो: "अगोदरच मी त्याच्या स्वतंत्र बुद्धिमत्तेपुढें चकित झालों होतों. कट्टर कम्युनिझम व कोणत्याही प्रकारचें स्वातंत्र्य यांचे साहचर्य नसतें हें मला ठाऊक होतें."

टीटोकडे शिष्टमंडळ पाठविण्याच्या निर्णयाचें समर्थन करतांना मॅक्लिन म्हणतो. (पृ. ३४०) "त्यावेळीं संभवनीय वाटत होतें त्याचप्रमाणें, गनीमी-युद्धाचे पुढारी जर युगोस्लावियाचे धनी होणार होते, तर शक्य तितक्या लवकर त्यांच्याशीं समाधानकारक संबंध स्थापन करावें हें आपल्या दृष्टीनें बरें." ग्रीसमध्यें ई. एल.ए. एस्. बाबत असें कुणी, कधीं कां म्हटलें नाहीं ? सबंध पूर्व यूरोपभर कम्युनिस्ट-नेतृत्वाखालीं चालू असलेल्या प्रतिकार चळवळींबाबत कुणी असे उद्गार कां काढले नाहींत ?

सरतेशेवटीं टीटोच्या अमर्याद दुरभिमानाबद्दलचें, मॅक्लिनचें विकृत पण विदारक मत पहा· (पृ. ३२५) "युगोस्लावियाच्या राष्ट्रीयत्वावर शिंतोडा उडवला अशी जरी त्याला नुसती अंधुक कल्पना आली, तरी तो अपमान झाला असें समजून चवताळत असे. त्याच्या आंगच्या त्या राष्ट्रीय अभिमानाचें मला मोठें आश्चर्य वाटलें. कारण कम्युनिस्ट म्हणून त्याची आद्यनिष्ठा सोविएत युनियन या परकी सत्तेवरचे असावयास पाहिजे होती."

अर्थात् हें उघडच आहे कीं कम्युनिस्ट, सोविएत मैत्रीला आपल्या राष्ट्राभिमानापेक्षां उच्च लेखीत नाहींत. कारण, या दोन्ही गोष्टी परस्पर-निगडित आहेत. पण कम्युनिस्ट असलेल्या टीटोनें, मॅक्लिनसारख्याच्या मनांत हा विचार निर्माण करावा, हें खरोखरीच आश्चर्य आहे.

ब्रिटिश शिष्टमंडळ टीटोपाशीं होतें त्या काळांत, युगोस्लावियनांनीं अनेक पश्चिम युरोपियन देशांत आपले अधिकृत प्रतिनिधी नेमावे, हें मान्य करण्यांत आलें होतें. मार्सेल्सला लॅतिनोविच नांवाच्या माणसाला पाठवण्यांत आलें होतें. याची आपली ओळख आधींच झाली आहे ज्याला स्वित्झर्लंडमध्यें धाडण्यांत आलें त्या मिशा लोंपरला सुद्धां आपण ओळखतों. ज्याला लंडनला पाठविलें तो जनरल व्हेलिबिट, नेमलेला ब्रिटिश हेर होता हें आपणांला लवकरच समजेल. स्झोनीगटाला स्वित्झर्लंड ते हंगेरी हा प्रवास कसा करतां आला हें न उलगडतां येणारें कोडें, आतां सहज उलगडूं शकतें.

युद्धकाळांत युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीच्या नाशाला प्रामुख्यानें जे जबाबदार होते अशांची, खात्रीपूर्वक यादी देतां येणें शक्य नाहीं. ब्रांकोवनें नंतर नांवांची एक यादी दिली, पण ती सुद्धां पुरी नाहीं युगोस्लाव परराष्ट्रीय हेरखात्याच्या, यू. डी. बी. च्या गुप्त फायलींतून हीं नांवें मिळालीं असें तो म्हणतो; तो. यू. डी. बी. चा वरिष्ठ अधिकारी असल्यानें त्याला या फायली मिळणें सहज शक्य होतें.

रांकोविच्, कार्देली, जिलास, आणि इतर यांच्याबरोबर ब्रांकोवनें, मार्को वेलिनिचचें व आणखी खालील नांवें यादींत घातलीं होतीं. हा मार्को वेलिनिच पुढें क्रोशियाच्या मंत्रिमंडळाचा सभासद झाला; कार्लो म्राझोविच–ज्याचें नांव पुढें हकिकतींत अनेकदां येणार आहे तो–प्रथम बुदापेस्तमधील युगोस्लाव पर-राष्ट्रमंत्रि होता व पुढें तो मॉस्कोंत वकील म्हणून नेमला गेला; पीटर स्तांबोलिच —सर्बियाचा नंतरचा पंतप्रधानः आव्दो ह्यूमो बॉस्नियां कम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीचा सेक्रेटरी; मॅसिदोनियाचा लष्कराधिकारी-ले० जनरल मिहाइलोव अपोस्तोल्कि; नंतर युगोस्लाव सरकारांत गेलेला, स्वेटोझर वूकोमानेविच–वोज्वो-दिनाचा लष्कराधिकारी जनरल ओरोविचः वोज्वोदिना पार्टी सेंट्रल कमिटीचा सेक्रेटरी, जोवान वेसिलिनोवः त्याच कमिटीचा एक सभासद जोज्किच्—याला पुढें यू. डी. बी. चा हस्तक म्हणून हंगेरींत पाठविण्यांत आलें; मिहा मार्किो-स्लोविनियाचा नंतर झालेला पंतप्रधान; बोरिस किद्रिच–मध्यवर्ती सरकारचा सभासद—ब्रांकोवनें या सर्वांची नांवें यादींत घातलीं होतीं.

यांत पुढें दिलेली नांवें घातलीं पाहिजेत : सध्यांचा दुय्यम परराष्ट्रमंत्री ॲलेस बेबलर्, वहातुक मंत्रि, बोझिदार मास्लारिच; पुन्हां आपल्याला बुदापेस्तला भेटणारा सिसमिल—१९४९ सालीं याला लंडनला युगोस्लाव मंत्री म्हणून पाठविण्यांत आलें; व टीटोचा डेप्युटी–व कम्युनिस्ट पार्टीच्या पोलिटकल ब्यूरोचा सभासद—इवान गोश्न्याक.

चर्चिलनें पाठिंबा द्यायला लायक म्हणून जीं माणसें योग्यपणें—निवडलीं त्यांच्यांपैकीं कांही नांवें वर दिलीं आहेत. मॅक्लिन शिष्टमंडळानें चर्चिलच्या अपेक्षेप्रमाणें जरी नाहीं-तरी आपलें कार्य चोखपणें बजावलें. कारण त्यांची दृष्टि युगोस्लावियापलीकडे होती. राक्षसी महत्त्वाकांक्षेनें भरलेलें असें पूर्व-यरोपिअन राष्ट्रासंबंधीचें धोरण ते आंखीत होते. पुढें आपल्याला तें पहावयाचें आहेच.

१९४३ पासून युगोस्लावियांत चालविलेल्या कारवाया वायां गेल्या नाहींत. पहिला युद्धोत्तर ब्रिटिश वकील बेलग्रादला आला व दुसरे दिवशीं, १३ मार्च १९४५ ला ब्रिगेडियर फिझ्रॉय मॅक्लिननें बेलग्राद अखेरचें सोडलें तेव्हां त्यानें स्वतःची पाठ थोपटली असली पाहिजे, त्यानंतर पांच महिन्यानीं तो नव्या पार्लमेंटांत, लँकॅस्टर तर्फे टोरी सभासद म्हणून निवडून आला.

## प्रकरण सातवें

# हंगेरींतील यू. डी. बी.

१९४५ मध्यें, पराभूत हंगेरीमध्यें दोस्त राष्ट्रांचें नियंत्रण मंडळ कामास लागलें होतें त्यावेळीं, बुदापेस्तला, आम्हांला लष्करी शिष्टमंडळ पाठवूं द्या अशी मार्शल टीटोनें परवानगी मागितली. ती मान्य झाल्यावर कर्नल सिसमिलच्या नेतृत्वाखालचा युगोस्लाव गट, बुदापेस्तमध्यें येऊन दाखल झाला. गृहमंत्री रांकोविच व राष्ट्र मंत्री जिलास यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं हें शिष्टमंडळ बनविण्यांत आलें असून खुद्द मार्शल टीटोनें त्याला अखेरचा कानमंत्र दिला होता.

या शेवटच्या तीन सूचना, जर त्यावेळीं जाहीर झाल्या असत्या तर यूरपच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत सारे आश्चर्यचकित झाले असते. हंगेरींत स्थिरस्थावर झालें नसल्यानें तेथें चांगलें हेर खातें स्थापन करा ही मार्शल टीटोची पहिली सूचना. दुसरी सूचना अशी कीं बुद्धापेस्तमधील ब्रिटिश व अमेरिकन

अधिकाऱ्यांशी चांगले संबंध जोडा. दोस्त नियंत्रण मंडळावरील सोवियन प्रतिनिधींच्या वजनाखालीं येऊं नका ही तिसरी सूचना. या गुप्त सूचना काय होत्या, हें आपण जाणतों, कारण सिसमिलनें त्यांची आपल्या साथीदारांशी चर्चा केली व त्यापैकीं कांहींनीं पुढें त्या जगजाहीर केल्या.

युगोस्लाव शिष्टमंडळांतील मुख्य व्यक्तींची ओळख करून घेणें आपल्याला उपयोगी ठरेल. पुनः त्यांची आपली भेट होणारच आहे. पहिला सिसमिल. ब्रिटिश, अमेरिकन अधिकाऱ्यांशीं संबंध जोडणें हें याचें गुप्त कार्य. पुढें ब्रांकोवनें आपल्या जबानींत सांगितल्याप्रमाणें, सिसमिलनें तावडतोब ब्रिटिश प्रतिनिधी जनरल एजकुंब, याच्याशीं संबंध जोडून पद्धतशीरपणें हेरगिरीच्या वातम्यांची देवघेव चालू केली. (ज. एजकुंबनें २६ ऑक्टोबर १९३९ रोजीं "टाईम्सला" पत्र लिहून त्यांत ब्रांकोवचा पुरावा म्हणजे "शुद्ध बनवाबनवी" आहे असें म्हटलें आहे.) लेफ्टनंट पोपोविचनें सिसमिलचे रिपोर्ट ब्रिटिश जनरलकडे पोंचविले. ब्रांकोवच्या म्हणण्याप्रमाणें ब्रिटिश व्हाइस कौन्सल, मि. पेटिट, अमेरिकन व्यापारी प्रतिनिधी मि. मिल्टन, दोस्तांचा मिलिटरी परमिट ऑफिसर कॅप्टन मार्टी यांच्याशी सुद्धां संबंध जोडण्यांत आले.

हेर म्हणून त्यांचें महत्त्व लक्षांत घेऊन जर नंबर लावायचे झाले तर युगोस्लाव शिष्टमंडळांतील प्रतिनिधींचे नंबर खालील प्रमाणें लागतील. मेजर जावोर्स्कि, यू. डी. बी. चा हंगेरीतील मुख्य प्रतिनिधी; मेजर कोवाच, (याचा अमेरिकन ले. ज. कोवाचशीं कांहीं संबंध नाहीं); पुढें मिलिटरी मिशनचा प्रमुख झालेला, लाझार ब्रांकोव, हंगेरीतील यू. डी. बी. प्रमुख व मुख्य सूत्रधार मेजर स्मल्यानिच आणि इतर हलकेसलके इसम.

हंगेरींत हेर संघटणेचें जाळें विणण्याचें काम जावोर्स्किकडे होतें; लाल फौजेसंबंधीं माहिती गोळा करण्याचें मुख्य काम कोवाचचें व पहिल्या काळांत ब्रांकोवचें काम, नुकसान भरपाई कार्य व आर्थिक हेरगिरी सांभाळणें हें होतें.

हा ब्रांकोव चार वर्षांनंतर जगाच्या रंगभमीवर थोडा वेळ चमकला. पण तो व त्याचे साथीदार यांच्यापेक्षां अतिशय प्रबळ अशा शक्तींनीं तो पार उडवून दिला गेला. अशा या ब्रांकोवचें स्वभाव चित्र थोडावेळ अभ्यास करण्यासारखें आहे. अनेक युगोस्लावप्रमाणें, गनिमीयुद्धांत चार वर्षांत, याचें लढण्याचें व कारस्थानें करण्याचें ज्ञान वाढलें पण त्याबरोबर राजकीय वाढ न झाल्यानें, त्यांच्यांत टीटोबद्दल कडवी भक्ति वाढली. अगोदरच हा गर्विष्ठ पडला, त्यांतून

गनिमीयुद्धांतील व्यक्ति व त्याची स्वतःचीं कृत्यें यामुळें त्याच्यांत वैयक्तिक व राष्ट्रीय घमेंडखोरी निर्माण झाली. युद्धापूर्वी हा राष्ट्रवादी व दुरभिमानी होता कीं नाहीं, हें माहित नाहीं. पण युगोस्लावियन राष्ट्रवादी व दुरभिमानी गटाच्या शिक्षणामुळें तो आतां तयार झाला होता.

हंगेरिअन्सबद्दल त्याला वाटणारी तुच्छता तो पदोपदीं प्रगट करी. त्यावेळीं, ब्रांकोवसारख्याचे हे उद्दाम उद्गार—म्हणजे चार वर्षें डोंगरकपारींत हाल-अपेष्टा काढल्याचा मानसिक परिणाम आहे असें मानणें सोपें होतें. प्रत्येक युगोस्लावनें, युद्धाच्या इतिहासांत कधींहि कुणी काढल्या नसतील इतक्या हाल-अपेष्टा काढल्या आहेत, यावर जगाचा विश्वास होता. पुष्कळांच्या बाबतींत हें खरें होतें, पण जे पुढारी वांचले त्यांच्यापैकीं बहुतेकांच्या बाबतींत मात्र हें खरें नव्हतें. ब्रांकोव मोठ्या निळ्या जर्मन उघड्या मोटारींतून, बुदापेस्तच्या रस्त्यांतून जेत्याच्या डौलानें फिरत असे. त्याचा चेहरा व पोशाख अगदीं स्वच्छ पण वागणूक मात्र कठोर व हेकट होती. आपल्या धन्याची—चैनी मार्शलची—तो छोटी आवृत्ति होता.

× × ×

हंगेरींत युगोस्लाव मिशनला केवळ बेलग्रादमध्यें ठरवलेलींच कामें पार पाडावयाचीं होतीं असें नाहीं. लवकरच आणखी एक महत्वाची भूमिका पार पाडावयाची होती. कारण १९४६ च्या उत्तरार्धांत, हंगेरीमधील, ब्रिटिश व अमेरिकन हेर खात्याची मुख्य कामगिरी युगोस्लाव मिशनवरच सोंपविण्यांत आली. यासाठीं पावसाळ्यांत अमेरिकन हस्तक रायक याला अशा सूचना देण्यांत आल्या कीं त्यानें यापुढें आपले अमेरिकन संबंध तोडून युगोस्लाविया-शींच जोडावे. पण हें होईपर्यंत, हंगेरींत, युगोस्लाव व अमेरिकन अशी दोन हेर खातीं काम करीत होतीं. त्यांची संघटना स्वतंत्र असली तरी त्यांचें कार्य निकट सहकार्यानें चाललें होतें.

१९४५ च्या सुमारास टीटोगटाची मुख्य व्यूहरचना पक्की आंखण्यांत आली, पण ही गोष्ट, यू. डी. बी. चे वरीष्ठ अधिकारी वगळले तर इतरांपासून गुप्त ठेवण्यांत आली होती. जनतेच्या लोकशाही राष्ट्रांतील कम्युनिस्ट पार्ट्यांना आंतून सुरुंग लावायचा व त्याबरोबरच मार्शल टीटोची वैयक्तिक लोकप्रियता वाढवायची व त्याच्या युगोस्लावियाचे पवाडे गायचें हा या गटाचा मुख्य उद्देश होता. राजकीय उपायांनी व जरूर पडल्यास लष्करी सहाय्यानें, हे देश

सोवियत युनियनपासून अलग पाडायचे व युगोस्लावियाच्या उघड व प्रत्यक्ष नेतृत्वाखालीं त्यांचें बाल्कन फेडरेशन स्थापन करावयाचें. समाजवादी राष्ट्रांत परस्परसंबंध राखण्याची नवी शर्त-मार्क्सवादाची नवी वाढ म्हणून या कल्पनेचा प्रचार करावयाचा हें मुद्दां ठरलें होतें. ज्या मार्क्सवादाला फॅसिस्ट पोलिस हेर व ब्रि. आणि अमे. हेर खातें यांचें सहकार्य आवश्यक आहे तो मार्क्स-वादाचा प्रकार खरोखरच अजब मानला पाहिजे.

हें धोरण, म्हणजे युगोस्लाव, ब्रिटिश व अमेरिकन असें धोरण होतें. बेलग्रादमधील सत्ताधारी गटाला या धोरणानें आपल्या सरहद्दबाहेरील सत्ता देऊं केली. इतकेंच नव्हे तर युगोस्लाविया हें राष्ट्र, नव्या तऱ्हेचें बल्कन साम्राज्यशाहीचें केंद्र बनण्याची शक्यता निर्माण केली. टीटोगटाला अमेरिकन नियंत्रणाखालील ही मैत्री, म्हणजे सो. युनियन व खुद्द युगोस्लावियांतील खरीखुरी क्रांतिकारक चळवळ, याविरुद्ध प्रचंड टोला वाटला. यापैकीं कांहीं इसमांची उभी राजकीय हयात असलीं कारस्थानें रचण्यांत व हेतू साधण्यांतच गेली होती.

ब्रिटिश अमेरिकनांच्या दृष्टीनें या योजनेचे फायदे उघड होते. पूर्व युरोपियन राष्ट्रांतील उजवे राजकीय गट व सोशल डेमोक्रॅटस् यांचें राजकीय दिवाळें वाजलें आहे अशी त्यांना शंका येत होतीच व आतां ती लवकरच खरी ठरणार होती. १९४५ व १९४६ सालांत प्रत्येक निवडणुकींत उजव्या गटाचा जो धुव्वा उडत गेला तेव्हांपासून, सरळ पुन्हां भांडवलशाही राजवट स्थापन करण्याचीं त्यांचीं स्वप्नें हळूहळू मावळूं लागलीं. १९४८ च्या फेब्रुवारींत झेकोस्लोवाकियांत जेव्हां उजव्या गटाचा निर्णायक पराभव झाला तेव्हां तर त्यांच्या या आशावादाला मर्मभेदक तडाखा बसला.

१९४३ सालीं परराष्ट्रखात्याची जेव्हां युगोस्लावियांत मॅक्लीन मिशन पाठविण्याबाबत मनधरणी करण्यांत आली तेव्हांपासून, पूर्व यूरोपमधील साम्राज्यवाद्यांनीं आपली सारी आशा युगोस्लाव ट्रॉट्स्कीवाद्यांवर ठेवली होती. टीटोच्या पुढारीपणाखालीं बाल्कन फेडरेशन स्थापन करावें हें धोरण युगोस्लाव सरकारचें धोरण असूं शकेल; पण युगोस्लावियापेक्षां तें ब्रिटिश अमेरिकनांचेंच धोरण होतें. आणि म्हणूनच प्रथमपासून युगोस्लाव व अँग्लो-अमेरिकन हेरखात्यांनी हातांत हात घालून कार्यें केलीं. पुढें जेव्हां हंगेरींत हेर व अँग्लो-अमेरिकन परराष्ट्रीय प्रतिनिधी यांच्यांत उघड-उघड संबंध ठेवणें फारच धोक्याचें झालें तेव्हां युगोस्लाव व अँग्लो-अमेरिकन हेरखात्यांचें विलीनीकरण करण्यांत आलें.

लगतच्या देशांत हेंच धोरण अंमलांत आणावयाचें म्हणजे समांतर अशी अनेक धोरणें एकाच वेळीं अवलंबिलीं पाहिजेत. अँग्लो-अमेरिकन्स व त्यांचे हे उद्देश यांत जर कुणी खंबीरपणें खडें ठाकलें असेल तर त्या म्हणजे या देशांतील कम्युनिस्ट पार्ट्या होत. तेव्हां या पार्ट्यांतून गोंधळ माजवून फूट पाडणें व त्या सामर्थ्यशून्य बनविणें हें क्रमप्राप्तच ठरतें. हें साधावयाचें म्हणजे प्रत्येक देशाच्या कम्युनिस्ट पार्टींत टीटोतर्फे राष्ट्रीय गट संघटित केले पाहिजेत. दुसरें काम म्हणजे समजा राजकीय मार्ग फसलेच तर लष्करी कटाच्या जोरावर सत्ता घेण्यासाठीं कारस्थान शिजवलें पाहिजे. या कटांत कम्युनिस्ट नेत्यांचे खून पाडणें ओघानें येतेंच. तिसरें म्हणजे उजवा गट मजबूत केला पाहिजे. यांत प्रतिगामी पक्ष, जुने धर्मगुरु, ट्रॉट्स्कीवादी, उजव्या गटाचे सोशल डेमोक्रॅट व पश्चिम युरोपांत पळालेले पूर्व युरोपांतील गणंग हे येतात. नवोदित जनतेच्या लोकशाही राज्याच्या मार्गांत संकटें पेरायचीं म्हणजे याचा शक्य तों पाठपुरावा केला पाहिजे. आणि खुद्द सो. युनियन व हे देश याविरुद्ध जबरदस्त हेरगिरी सुरू केली पाहिजे.

हीं सारीं धोरणें एकमेकांला पूरक आहेत. बुदापेस्तमधील ब्रिटिश, अमेरिकन व युगोस्लाव हेरगटांनी यापैकीं प्रत्येक धोरण कसें अंमलात आणलें हें आपल्याला लवकरच कळेल. हंगेरींतील योजना एकमेव होती असें समजण्याची कांही जरूर नाहीं. असेच डाव व अशींच कारस्थानें, झेकोस्लोवाकिया, बल्गेरिया, पोलंड, रुमानिया व अल्बानिया या देशांत व ग्रीसमधील लोकशाही चळवळींत शिजविण्यांत येत होतीं.

× × ×

चांगलें हेरखातें तयार करा हें टीटोनें दिलेलें काम युगोस्लाव मिशननें ताबडतोब हातीं घेतलें. पहिल्या वर्षीं त्यांनीं ज्यांना आपल्या कार्यांत गोवलें, त्यांतील मानाचें स्थान साहाजिकच लाझ्लो रायकला द्यावयास पाहिजे. पण तो एकटाच नव्हता. आणखीही दुसरीं उपयोगी पडणारीं माणसें होतीं.

आंद्री झ्येब्येनी, गृहमंत्री मंडळाचा चलाख व कर्तबगार दुय्यम चिटणीस याला या कार्यांत गोवण्यात आलें. मागें फ्रान्सच्या व्हर्नें कँपांत भेटलेला ट्रॉट्स्की-वादी, सांदोर झेरेसन्येस याला हाताशीं धरण्यांत आलें. मध्यंतरी कांही वर्षें हा गृहस्थ ब्रिटिश लष्कराच्या मानसिक युद्धकलाखात्यांत काम करीत असतांना ब्रिटिशाचा हस्तक बनला. १९४६ पर्यंत तो ब्रिटिशांचा हस्तक असून त्यांच्या-बरोबर काम करीत होता, पण १९४४ त इटलीमध्यें बारी या ठिकाणीं, त्याचा

युगोस्लाव गुप्तहेरखात्याशी संबंध जडला व तो युगोस्लावियाचाही दलाल बनला. गृहखात्याचा प्रेसप्रमुख म्हणून काम करीत असताना पुनः युगोस्लाव हेरखात्यानें त्याला आपल्या पंजांत पकडलें. रायकनेंच त्याला या कामाला लावलें असून, रायक स्वतः २१ मार्च १९४६ ला गृहमंत्री झाला रायकचा ढोल पिटणें हें त्याचें काम व तेंच तो करीत होता.

परराष्ट्र खात्यांतील प्रमुख फेरेन्स गोंदी व दुसरा जोसेफ रेक्स यांनाहि या कामास जुंपण्यांत आलें. रेक्स पूर्वी युगोस्लाव गनिमी सैनिकातून पळून गेला होता व ब्रांकोवनें त्याचा गौप्यस्फोट करण्याची धमकी दिली होती.

हीं नांवें केवळ नमुन्यादाखल आहेत. यांच्याच तोलाचे आणखी कित्येक लोक हेरगिरींत गुंतवले गेले. हे सगळे मिळून एक मोठेंच हेरांचें कडें तयार झालें व त्यापासून हंगेरियन राज्याला धोका निर्माण झाला. यां यांतच मेजर जनरल जॉर्ज पालिफ याचें नांव घातलें पाहिजे. थोड्याच काळांत त्याची युगोस्लाव मिलिटरी मिशनशीं दोस्ती जमली. खरोखरीच पालिफ हा कशा प्रकारचा लोकशाहीवादी आहे हें सिमसिल, जावोर्स्कि व ब्रांकोवसारख्या धूर्तांच्या ताबडतोब लक्षांत आलें. १९४६ च्या सुमारास त्याला सगळें समजावून देण्यांत आलें व तो युगोस्लाव हस्तक बनला.

या ठिकाणीं आपण यांच्यांत पॉल जस्टसचें नांव घातलें पाहिजे. जस्टस हा सोशल डेमोक्रॅटसचा उजव्या गटाचा पुढारी होता. परंतु ब्रिटिश लेबर पार्टीच्या परराष्ट्र खात्यातर्फे डेनिस हिली जेव्हां बुडापेस्टला आला तेव्हां जस्टसनें, भविष्यकाल ह्याच राजकीय गटाचा आहे, हें जाणून ताबडतोब पगडी फिरवली. पुढें कम्युनिस्ट सोशल डेमोक्रॅट एकजुटीनंतर तो हंगेरीयन रेडिओचा व्हाइस प्रेसिडेंट झाला पण आपण ज्या काळाविषयीं बोलत आहों त्यावेळीं म्हणजे १९४५-४६ सालांत तो सोशलडेमॉक्रॅटिक पार्टी या कार्यकारिणीचा सभासद होता.

गेलीं वीस वर्षे हा ट्रॉट्स्कीवादी होता, १९३६ सालीं पॅरिसमध्यें व नंतर हंगेरींत परत आल्यावर, लाझ्लो रायक ज्या हेरखात्याची चाकरी बजावीत होता तिचाच हा सुद्धां हस्तक होता ही गोष्ट त्यावेळीं सर्वांस माहित नव्हती.

१९४५ अखेर कर्नल सिमसिल व मेजर जावोर्स्की यांची गांठ पडली. १९४६ च्या सुरवातीस मेजर जावोर्स्कीनें त्याच्यापुढें एक फोटो धरला. पॅरिसमधील हंगेरीयन लिगेशननें बुडापेस्त पोलिसांना पाठविलेल्या रिपोर्टाची ती

फोटो कॉपी होती. जस्टस पोलिसांचा हस्तक होता ही गोष्ट या फोटोवरून उघड झाली. " पुन्हां पोलिसांचा हेर बनायला तयार हो. नाहीं तर हा रिपोर्ट छापून टाकूं, " असें त्याला निष्ठुरपणें बजावण्यांत आलें. डॉ. सोंबोर श्वायनित्झेर हा उपद्व्यापी प्राणी पुनः हातपाय हालवायला लागला हें स्पष्ट आहे. त्यानें हॉर्थी राजकीय पोलिसांच्या फायली अमेरिकन्सना दिल्या व त्यांनीं त्यांचे पूर्व यूरोपांतील मुख्य एजंट युगोस्लावज यांच्या हातीं दिल्या.

पॉल जस्टसचें ट्रॉट्स्कीवादाचें व सोशलडेमॉक्रॅटिक उजव्या गटाचें शिक्षण जरी झालें असलें तरी वरील प्रकारच्या धमकावणीस तोंड कसें द्यायचें याला तें शिक्षण उपयोगी पडलें नाहीं हें अधिक सांगायला नकोच. आपण घाबरून युगोस्लावांचें काम करतों असें नव्हे तर आपल्याला त्यांच्या कल्पना पटतात म्हणून त्यांचें काम करतों, असा त्यानें बहाणा केला. पण तिबोर स्झोनीला स्वित्झर्लंडमध्यें आपल्या हेर दलांत दाखल करतांना, ॲलेन डलेसनें ज्याप्रमाणें वैचारिक विधानांपेक्षां व प्रबंधापेक्षां बदनामीकारक कागदपत्रांवर अधिक भर दिला, थेट त्याप्रमाणेंच मेजर जावोर्स्कि वागला. कारण आपल्या हयातींत पॉल जस्टसनें आतांपर्यंत अनेक राजकीय पवित्रे बदलले होते. पुनः तो कधीं पगडी फिरवील याचा नेम नव्हता. अशा माणसांना वठणीवर आणायला एकच उपाय होता, तो म्हणजे चांगली फोटो कॉपी.

## प्रकरण सातवें

# अबाझिया येथें झालेली भेट

१९४७ सालीं मे महिन्यांत हंगेरींतील यू. डी. वी. प्रमुख लाझार ब्रांकोवनें बेलग्रादमध्यें गृहमंत्री रांकोविचची भेट घेतली. तेथें ब्रांकोवला बाल्कन फेडरेशनची, युगोस्लाव योजना समजून देण्यांत आली. त्याला टीटोच्या व्यूहरचनेसंबंधीं प्रथमच उघड व अचूक माहिती मिळत होती. रांकोविच म्हणाला कीं, टीटो-योजना अंमलांत आणावयाची म्हणजे हंगेरीयन सरकारचें धोरण बदललें पाहिजे. आणि बुडापेस्टचें धोरण बदलण्याच्या मार्गांतील मुख्य अडचण म्हणजे, हंगेरीयन कम्युनिस्ट पार्टी पुढारी मात्यास राकोसी, आर्थिक कौन्सिल प्रमुख गेरो, व संरक्षण मंत्री फर्कास हे लोक होत. रायकची लोकप्रियता

वाढवली पाहिजे, तर या उलट राकोसी, गेरो व फर्कास यांचें वजन शक्य त्या मार्गानीं, हंगेरींत वावरणाऱ्या हस्तकांनीं, कमी केलें पाहिजे.

बेलग्रादला व्रांकोव-रांकोविच भेट झाल्यानंतर लगेच रायक उन्हाळ्याच्या सुटींत युगोस्लावियांत, अब्राझियाला गेला. सरहद्दीपासून त्याचें जें जंगी स्वागत करण्यांत आलें त्याच्याबद्दल तो पुढें म्हणाला, कीं अगदीं उघड उधळमाधळ करून हें स्वागत करण्यांत आलें होतें. प्रत्येक स्टेशन व रस्ते शृंगारण्यांत आले होते. आणि युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखालीं हजारों लोक त्याच्या स्वागतास लोटले होते.

युगोस्लाव सरकारनें मोठा राजेशाही वाडा त्याला उतरायला दिला. तेथें तो पाऊल ठेवतो न ठेवतो तोंच क्रोशियांतील यू. डी. वी. प्रमुख, सुमारें तीस वर्षांची एक अत्यंत रूपवती स्त्री, त्याच्या भेटीस आली. रांकोविचची तुम्हांला भेटायची इच्छा आहे व लवकरच तो अबाझियांत येईल असें तिनें हंगेरीयन भाषेंत सांगितलें. ती दुभाषी म्हणून भेटीच्या वेळीं राहणार असून, ही भेट अत्यंत गुप्त ठेवली पाहिजे असें तिनें सांगितलें.

हंगेरीयन व युगोस्लाव गृहमंत्र्यांची ही मुलाखत म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकीय कारस्थानांतील एक अत्युच्च बिंदु समजला पाहिजे. रांकोविच व्यवहाराचे रोकडे बोल रोखठोकपणें बोलत होता. " तूं हंगेरीयन राजकीय हेरखात्यांत काम करीत होतास ही गोष्ट मला माहित आहे, व टीटोला जर पुढें तूं पाठिंबा देणार नसशील, तर तुझा हा इतिहास प्रसिद्ध केला जाईल. हें मी प्रत्यक्ष मार्शलतर्फे सांगत आहें. "

आपण कधींच पोलिस हेर नव्हतों असा रायकनें गहजब केला. मला टीटोनें 'हंगेरीविषयक धोरण पटतें म्हणून मी त्याला पाठिंबा देतों. असें तो म्हणाला, पण रांकोविच ती बतावणीही ऐकून घ्यायला तयार नव्हता पुढें काय झालें तें पहाण्यासाठीं, रायकनें स्वतःच दोन वर्षांनीं कोर्टांत जबानी देतांना काय सांगितलें तें पाहूं या.

" या नंतर रांकोविचनें मिस्किलपणें खिशांतून फोटो कॉपी काढून ती मला वाचायला दिली. १९३१ सालीं मला अटक झाली त्या वेळीं मी हॉर्थीच्या राजकीय पोलिसखात्याचा अधिकारी हेत्येनी याला जें लिहून दिलें होतें त्याचीच ती फोटो कॉपी होती हें माझ्या लक्षांत आलें. ही कॉपी तुझ्याजवळ कशी आली म्हणून मी त्याला विचारलें......ही युगोस्लाव फॅसिस्ट पोलिसांच्या फायलींतून आली नाहीं, तर अमेरिकन्सनीं ती मला दिली आहे.

हॉर्थी पोलिस फायली पश्चिम युरोपांत नेण्यांत आल्या व त्या अमेरिकन्सच्या हातांत पडल्या. ”

टीटोच्या कल्पना आपल्याला पटत असल्यानें धमकावणीची जरूर नाहीं असा त्यानें कांगावा केला. पण रांकोविच पुरा बनलेला होता. तो ध्येयवादी व्हायला तयार नव्हता. ज्या रायकनें कम्युनिस्ट पार्टीबद्दल ही निष्ठा दाखवली तो टीटोबद्दल अधिक निष्ठा दाखवील असें मानायला तो बिलकुल तयार नव्हता. एक गृहमंत्री दुसऱ्या गृहमंत्र्याशीं बोलावा त्याप्रमाणें तो म्हणाला, “ कागदपत्राची ही फोटो कॉपी जर तूं ध्यानांत ठेवलीस तर ‘‘ तांत्रिक कारणांच्या ” दृष्टीनें बरें होईल. ”

१९४५ पासून बेलग्रादमध्यें, अमेरिकन प्रतिनिधींशीं रायकची काय बोलणीं झालीं, त्याची युगोस्लाव अधिकाऱ्यांना संपूर्ण माहिती आहे, असें रांकोविचनें रायकला सांगितलें. तुझ्या वैयक्तिक पुढारीपणाखालीं हंगेरीयन कम्युनिस्ट पार्टींत, भक्कम राकोसी-विरोधी गट तयार करणें हें तुझें मुख्य काम आहे, असें त्यानें रायकला सांगितलें. अशा रीतीनें लाझ्लो रायकला त्याच्या नव्या धन्यानें बुदापेस्तला पाठवून दिलें. हा नवा धनी युगोस्लाव सरकारचा गृहमंत्री असून, तें सरकार निष्ठावंत व तत्वनिष्ठ कम्युनिस्टांचें आहे असा जगांतील जनतेचा अजून विश्वास होता.

× × ×

रायक रांकोविचला अब्राझियाला भेटण्याच्या सुमारासच त्यानें आपली हेरगिरीची लायकी सिद्ध केली होती. त्यानें बुदापेस्तमधील ब्रांकोव व इतर युगोस्लाव हस्तकांना, हंगेरीयन अंदाजपत्रकसंबंधीचा प्राथमिक तपशील कळवला होता. जून १९४७ मध्यें फेरेन्स नागीचा कट उघडकीस कसा आला याविषयींच्या चौकशीची गुप्त माहिती त्यानें युगोस्लाव हस्तकांना दिली होती. वर्षारंभींच ही माहिती त्याच्या हातीं आली व कर्नल सिसमिलनें ती अमेरिकन लिगेशनला कळविली. हंगेरीयन पोलिस दलाचे नियम व राज्यकारभाराचा गुप्त नकाशा रायकनें त्यांच्या हातीं दिला होता. सर्वांत म्हणजे हंगेरीची अत्यंत महत्वाची अशी गुप्त बातमी—गृहखात्यानें हंगेरींत चालणाऱ्या ब्रिटिश व अमेरिकन हेर खात्यांविरुद्ध करावयाची उपाय योजना त्यानें ब्रांकोव व युगोस्लाव हस्तकांना पुरविली होती.

देशद्रोह व कारस्थान या दोन्ही क्षेत्रांत रायक सारखाच कामाला लागला होता. उजव्या गटाचीं कारस्थानें रचणारे, बेला वार्गा, करोली पेयर, जेलिग, सुल्योक व फेकर यांना हंगेरीतून निसटायला त्यानें मदत केली. यांनींच पुढें अमेरिकेच्या मार्गदर्शनाखालीं वॉशिंग्टनमध्यें आपला प्रतिक्रांतिकारक अड्डा स्थापन केला. नागी कटाच्या बाबतींत आणखी कांही व्यक्तींना गुंतवणारा असा कागदपत्रांचा पुरावा त्यानें दडपून टाकला.

युगोस्लाव-हंगेरी सरहद्द भागांत सत्तर हंगेरीयन कुटुंबें रहात होतीं. तीं टीटोविरोधी आहेत असा युगोस्लाव यू. डी. बी. चा त्यांच्यावर आरोप होता. तेव्हां ब्रांकोवच्या विनंतीवरून रायकनें त्या कुटुंबांना जबरदस्तीनें तेथून हालविलें. ही गोष्ट त्यानें सरकारपासून दडवून ठेवली. सरहद्दीवर टीटोतर्फी भावना तयार करण्यासाठीं त्यानें जी कृत्यें केलीं त्यांतील हें पहिलें कृत्य होय. पुढें सरहद्दीवरील खटक्याचे प्रसंग म्हणून जे घडवून आणण्यांत आले त्याची ही पूर्वतयारी होती.

याशिवाय १९४६-४७ सालांत कित्येक युद्ध गुन्हेगारांना व हस्तकांना त्यानें तुरुंगांतून सोडून दिलें. यांतच इमरे गेयर होता. स्पेनमधून परत आल्यानंतर याच गेयरला त्यानें १९४१ सालीं कम्युनिस्ट पार्टींत घुसविलें होतें, आणि रायकच्या म्हणण्याप्रमाणें यानेंच रोइसा व शोनहर्झ यांचे खून करविले होते. गेयरच्या मुक्ततेचा हुकूम १७ डिसेंबर १९४६ रोजीं देण्यांत आला व त्यावर लाझ्लो रायकची सही आहे. अजून तो बुदापेस्तमधील गृहखात्याच्या फायलींत ठेवलेला आहे.

* * *

या काळांत जनरल जॉर्ज पालिफ हा सुद्धां कामाला लागला होता. १९४६ मध्यें लष्कराच्या राजकीय खात्याच्या प्रमुख पदाच्या जोडीला त्यानें फ्रॉंटियरगार्डच्या सरसेनापतीपदाची वाढ केली. पालिफ आतां आपल्या धन्यांची चाकरी अधिक चांगली पार पाडूं शकत होता. १९४७ त तो व रायक उघड उघड बोलायला लागून जोडीनें काम करूं लागले होते, हंगेरीयन लष्कर रचनेचें काम चालूं होतें त्यावेळीं पालिफनें कामगारांना अधिकारी होण्याच्या शाळांतून बाहेर ठेवण्याकडे सारें लक्ष दिलें.

कामगार व शेतकरी वर्गाचे अधिकारी शिकवून तयार करावयाचे असें सरकारी धोरण असतांना, पालिफनें आपली कामगिरी इतकी चोख बजावली

कीं एकही कामगाराला शिक्षण मिळालें नाहीं. प्रतिक्रांतीला उपयोगी पडणारें साधन म्हणूनच लष्कराची रचना केली जात होती.

शिवाय युगोस्लाव हस्तक जी मागतील ती माहिती पालिक त्यांना पुरवीत होता. हंगेरियन फलटणी कुठें व कशा ठेवलेल्या आहेत, लष्करी मंडळाचे गुप्त नकाशे, सरहद्दीवर फौज कुठें आहे, तहाच्या कलमान्वयें देशांत लाल फौजेची ठाणीं कुठें आहेत ही सर्व माहिती त्यानें युगोस्लाव लिगेशनला दिली.

स्वित्झर्लंडांतून आलेल्या तिबोर स्झोनीच्याही उलाढाली चालू होत्या. १९४६ त त्याला स्वित्झर्लंडांतून खाजगी निरोप्यानीं गुप्त संदेश पाठविला:— "पीटरनें वॅगनरच्या फ्रेंच दोस्तांशी गांठ घ्यावी," बर्न सोडण्यापूर्वी, स्झोनीनें ॲलन डलेसशी (अमेरिकन ओ. एस्. एस्. प्रमुखांशीं) असें ठरवलें होतें कीं, महत्वाच्या बातम्या, बेलग्राद–मार्सेल्स–बर्नमार्गे न पाठवितां स्वतंत्र निरोप्याहातीं पाठवाव्या. स्झोनीचें नांव पीटर, व डलेसचें वॅगनर राहील. डलेस त्याच्याशीं रायकबद्दल बोलला असून आणि त्याच्याविषयी फ्रान्समध्यें ऐकलें होतें, असें म्हणाला होता.

हा संदेश मिळाल्यानंतर स्झोनीनें, 'मला भेट,' म्हणून रायकला विनंति केली. भेटीची जागा, ॲकेडेमिया स्ट्रीटवरील, पार्टी हेडक्वार्टर्सचें संघटनाखातें ही ठरली होती येथें प्रथम दोघांच्यांत उघड उघड बोलणें झालें: पुढें जेव्हां स्झोनीला १९४७ च्या नोव्हेंबरमध्यें, पार्टी कादर्स डिपार्टमेंटच्या प्रमुखाची जागा मिळाली, तेव्हां पासून हंगेरीच्या दृष्टीनें या युतीची भयानकता वाढूं लागली.

१९४६ त १४ जात्रोर स्ट्रीट या ठिकाणीं युगोस्लाव मिलिटरी मिशनच्या इमारतींत आंद्रास झालाई अधिकृतपणें युगोस्लावियाचा दलाल बनला होता. १९४४ सालीं, मातोरा लिआऊली जेलमधील कत्तलीला तोच जबाबदार आहे ही माहिती युगोस्लावियाला आहे असें सांगून तो हस्तक बनण्यास तयार नसेल तर ही माहिती बाहेर प्रसिद्ध करण्यांत येईल अशी त्याला धमकी देण्यांत आली. हेर बनण्यास त्याला नैतिक किंवा राजकीय कोठचीच अडचण भासली नाहीं. हयातभर त्याचा हा धंदाच होता. त्यानें दलाल बनण्याच्या कागदपत्रावर सही केली.

मिलिटरी मिशनचा मेजर स्मिल्यानिच् याला त्यानें अनेक प्रकारची माहिती पुरवली व नंतर १९४७ मध्यें त्यानें कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या

शाखेंत शिरकाव करून घेतला. या मोक्याच्या जागेवरून, पार्लमेंटरी उमेदवारांची निवड व अनेक खात्यांतील अधिकाऱ्यांची नेमणूक, यांवर वजन आणतां आलें. राज्य उलथण्याच्या कारस्थानांत तो पुरा माखला होता.

× + ×

१९४७ सालच्या मध्यास, अमेरिकन्सनीं, व युगोस्लावनीं संघटित केलेल्या, हेर संघटणांचें एक प्रचंड व भयानक असें जाळें करण्यांत आलें होतें. त्यापैकीं कित्येक संघटना हेरगिरीच्या अवस्थेंतून, राजद्रोही कट रचण्याइतक्या प्राथमिक अवस्थेपर्यंत पोंचल्या होत्या.

या कामासाठीं लष्कर तयार करण्याचें काम पालिफ करीत होता. गृहमंत्र्याच्या जागेवरून रायक पोलिस व अंतर्गत सुरक्षिततेच्या संघटना पोखरून काढीत होता. देशाच्या औद्योगिक, राज्यकारभाराच्या, इ. जीवनांत, हेर, माजी–फॅसिस्ट यांना सत्तेच्या स्थानांवर नेमण्यांत येत असून, कामगारांना वगळण्यांत येत होतें. याच वेळीं रायकच्या लोकप्रियतेचा नगारा बडविला जात होता व कम्युनिस्ट पार्टींत राजकीय गोंधळांचा बीजें पेरण्यांत येत होतीं.

जनतेच्या लोकशाही राज्यांत पुनः भांडवशाही आणावयाची, म्हणजे पूर्व तयारी म्हणून टीटोच्या नेतृत्वाखालीं बाल्कन फेडरेशन स्थापन करावयाचें, ही अमेरिकन योजना, रायक व मुख्य कटवाले यांना पुरी माहित झाली होती. लाझार ब्रांकोवला ही योजना रांकोविचनें समजावून दिली होती व अवाझियाच्या भेटींत रायकला सांगितली गेली होती. हंगेरीयन जनतेच्या मनांत, सोविएत युनियनऐवजीं, युगोस्लावियाच तुमचा मित्र व रक्षणकर्ता आहे ही कल्पना रुजविण्याची कल्पना, कारस्थानातील इतर लहानसहान सभासदांना आतां समजावून देण्यांत येत होती.

टीटोला लोकप्रिय करण्याची जय्यत तयारी करण्यांत आली होती टीटो, हंगेरी—युगोस्लाव दोस्तीच्या करारावर सही करण्यासाठीं बुदापेस्तला येणार होता–यावेळीं म्हणजे १९४७ च्या अखेरीस ही लोकप्रियतेची मोहिम सुरू करायला मुहुर्त होता. पण त्यापूर्वीं आपण, जुबित्सा रिबार नांवाच्या एका युगोस्लाव तरुणीची कहाणी ऐकूं या.

## प्रकरण आठवें

# जुबित्सा रिबारची कहाणी

जुबित्सा रिबार ही एक तीस वर्षांची युगोस्लाव तरुणी निराश्रित म्हणून आज कित्येक वर्षें हंगेरींत रहात होती. हंगेरीच्या राजधानींत तिचे अनेक युगोस्लाव मित्र होते. रूडोल्फ सासिनोविच हा त्यापैकींच एक होता. नांव नोंदण्यासाठीं ती १९४५ त युगोस्लाव मिलिटरी मिशनमध्यें गेली तेव्हां नवीनच आलेल्या मेजर जावोर्स्कीशीं तिची भेट झाली. जावोर्स्कि हा यू. डी. बी. चा प्रमुख सभासद आहे ही गोष्ट जुबित्सा रिबारला माहित नव्हती. गृहमंत्री रांकोविच यानें हंगेरींत हेर संघटणांचे प्रचंड जाळें विणण्याविषयीं त्याला सूचना दिल्या होत्या हें आपल्याला ठाऊक आहे.

पहिल्या भेटींत जावोर्स्कीनें तिची कसून चौकशी केली. दुसऱ्या भेटींत पुनः प्रश्नोत्तरें सुरू झालीं—युगोस्लाव सरकारला शक्य त्या सर्व मार्गांनीं मदत करणें हें तुझें कर्तव्य आहे, असें त्यानें यावेळीं पहिल्या प्रथम सुचविलें. श्रीमंत वर्ग व धर्मगुरू यांच्यांत तिचे दोस्त आहेत, या बाबतींत त्यानें विशेषच कुतुहल दर्शविलें. तिनें युगोस्लाव हेरखात्याला मदत करावी या जावोर्स्कीच्या मागणीला सासिनोविचनें पाठिंबा दिला--पण तिनें ही मागणी नाकारली.

१९४७ च्या उन्हाळ्यांत, यू. डी. बी. च्या या युगोस्लाव हस्तकांनी तिला धमक्या द्यायला प्रथम सुरवात केली. रायक व त्याच्या साथीदारांच्या खटल्याच्या वेळीं तिनें या घटनेचें खालीलप्रमाणें वर्णन केलें.

" माझ्याशीं अत्यंत जरुरीचें बोलायचें आहे, असें सांगून सासिनोविचनें मला स्झेंत इस्तवान हॉस्पिटलमध्यें बोलावून घेतलें. भेटीच्या वेळीं त्यानें मला एक युगोस्लाव वर्तमानपत्र दाखवलें. सरकारविरोधी कटाचा सभासद म्हणून माझ्या भावाला युगोस्लावियांत अटक करण्यांत आल्याची बातमी त्या वर्तमानपत्रांत होती. मी जर यू. डी. बी. ला मदत करण्याचें नाकारलें तर माझ्या भावाला फांशीची शिक्षा देण्यांत येईल असें सासिनोविचनें मला सांगितलें. ' तुला कुटुंबाविषयीं किती प्रेम आहे हें मी जाणतों, आणि म्हणूनच तूं काम करायला तयार आहेस असें मी बेलग्रादला कळवलें आहे. ' असें तो म्हणाला. मी कांहींच बोललें नाहीं—माझ्या स्तब्धतेचा अर्थ, त्यानें मान्यता असा केला."

या क्षणापासून जुवित्सा रिवारच्या या नाट्यप्रसंगाला रंग चढत चालला. वर्षा अखेरीस तिनें ऑस्ट्रियांतील आपल्या मुलीला भेटावयास जावयाचें असल्यानें, युगोस्लाव कॉन्सलकडे पासपोर्टसाठीं अर्ज केला. त्या अर्जाच्या बाबतींत लिगेशन अधिकारी तुझी भेट घेऊं इच्छितात असें डिसेम्बरमध्यें सासिनोविचनें तिला सांगितलें. ती ऑफिसांत जातांच तिला स्मिल्यानिच भेटला. 'तुला पासपोर्ट देण्यांत येणार नाहीं, कारण तुला ऑस्ट्रियांत पळून जायचें आहे,' असें स्मिल्यानिचनें तिला कठोरपणें बजावलें.

नंतर बुदापेस्तमध्यें खुद्द युगोस्लाव कॉन्सल कचेरींत तिला अटक करण्यांत येऊन मागच्या खोलींत बंद करण्यांत आलें.

पुढें काय झालें तें तिच्याच शब्दांत सांगितलेलें बरें. खटल्याचे वेळीं आपल्या जबानींत ती म्हणाली,

"यानंतर दोन दिवसांनीं, संध्याकाळीं, लिगेशनमधील दोघांनीं मला जबरदस्तीनें मोटरींत बसविलें. गडबड करूं नको, म्हणून मला दटावण्यांत आलें. दुसरा एकजण व शोफर निकोलाय गाडींत चढला आणि आम्ही सरहद्दीकडे जाऊं लागलों. आम्ही कोठें चाललों याची त्यावेळीं मला कल्पना नव्हती.

सरहद्दीच्या थोडी अलीकडे आमची गाडी थांबली. मला खालीं उतरविण्यास लावून पलीकडे नेण्यांत आलें. युगोस्लाव हद्दींत एक बंद मोटारगाडी उभी होती. त्या गाडींत मला बसविण्यांत आलें. माझ्यावर तीन सैनिकांचा पहारा होता. थोड्या वेळानें, हात व डोळे बांधलेल्या तीन इसमांना गाडींत भरण्यांत आलें. गाडी पुन्हा चालू झाली. थोड्या तासानंतर आम्ही एका इमारतीच्या आवारांत पोंचलों. खालीं उतरायच्या आंतच माझे डोळे बांधले गेले. जेलमध्यें नेल्यावर माझे डोळे सोडले गेले.

१५ डिसेंबर ते ५ जानेवारी १९४८ पर्यंत मला तेथें ठेवण्यांत आलें. त्यानंतर ब्लाझिच, जावोर्स्कि व मला माहित नसलेला एक यू. डी. बी. अधिकारी यांनीं मला बुदापेस्तमधील, ब्रिटिश कौन्सल जनरल मि. पेटिट यासंबंधीं प्रश्न विचारले; ब्रिटिश लिगेशनशीं माझे काय संबंध आहेत याची चौकशी करण्यांत आली. हंगेरीयन सरकारविरुद्ध हेरगिरी केली पाहिजे असें मला सांगण्यांत आलें. व त्याचप्रमाणें युगोस्लाव व ब्रिटिश हेर यांच्यात मी संबंध ठेवावा असें त्याचें म्हणणें होतें. मी जेव्हां हें नाकारलें तेव्हां

मला नाहींसें करण्याची धमकी देण्यांत आली. यानंतर, मी युगोस्लाव यू. डी. बी. करितां काम करावयास तयार आहें अशा जबानीवर माझी सही घेण्यांत आली.

ही सही झाल्यानंतर, तासाभरानें मला तुरुंगांतून काढून पुन्हां गाडींत बसविण्यांत आलें. गाडी एका नाक्यावर थांबली व सासिनोविच गाडींत चढला व आम्हीं सरहद्दीवर आलों. ड्रायव्हर निकोलायनें खिशांतून तीन पासपोर्ट काढून त्यांची व्यवस्था केली व नंतर बुदापेस्तला मला नेऊन माझ्या घरांत सोडण्यांत आलें."

युगोस्लाव व अमेरिकन हेरखातीं रंगरूटभरती कशी करतात हें लुबित्सा रिबारच्या उदाहरणावरून दिसून येतें. खुद्द लुबित्साला धमक्या देण्यांत आल्या, तिच्या भावाला धाकदपटशा दाखवून तिच्यावर नैतिक दडपण आणण्यांत आलें. तिला अशा प्रकारें छळून तिची हेर बनण्याबद्दल जबरदस्तीनें संमति घेतल्यावर तोच कागद, पुनः तिनें हेरगिरीचें काम चालू ठेवावें म्हणून धमकी देण्यासाठीं वापरण्यांत आला.

अमेरिकन्सप्रमाणें युगोस्लाव यू. डी. बी. नें आपल्या हस्तकांची निष्ठा कायम ठेवण्यासाठीं धमकीचा मार्ग स्वीकारला.

## प्रकरण नववें

# केलेबिया येथें दुसरी भेट

मार्शल टीटोनें ज्यावेळीं १९४७ मध्यें बुदापेस्तला भेट दिली, तेव्हां ती भेट म्हणजे एकाद्या जेत्याची विजयी भेट आहे अशा थाटानें सजविण्याची, रायक व युगोस्लाव लिगेशननें कोशीस केली. रस्तोरस्तीं निशाणें फडकाविण्यांत आलीं, मिरवणुका काढण्यांत आल्या, उत्सव करण्यांत आले. पण मार्शल टीटो ही किती महान व्यक्ति आहे हें हंगेरियन जनतेच्या मनावर बिंबविण्यासाठीं शहरांत इतका कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला कीं जनतेला तें गैरसोईचें झालें होतें.

टीटोच्या आगमनापूर्वी रांकोविचनें, यू. डी. बी अधिकारी मिलिच याच्या नेतृत्वाखालीं रायककडे एक शिष्टमंडळ पाठविलें. मार्शल ज्या मार्गानें जाणार असेल तेथें ठिकठिकाणीं सशस्त्र सैनिक तयार ठेवा, अशी मिलिचनें

रायकला सूचना दिली होती; ज्या मार्गानें मार्शल जाणार त्याच्या आजूबाजूचीं घरें जबरदस्तीनें रिकामी केलीं गेलीं पाहिजेत; न जाणों त्याच्यावर कुणी बाँब फेंकायचा; म्हणून सुरक्षिततेच्या दृष्टीनें हा बंदोबस्त जरूर आहे; तसेंच त्याची मिरवणूक ज्या रस्त्यानें जाणार त्या रस्त्याचीं गटारें आधल्या दिवशींच तपासून ठेवलीं पाहिजेत. शिवाय टीटोला राहण्यासाठीं म्हणून एक टोलेजंग राजवाडा दिला पाहिजे.

या साऱ्या सूचना रायकला कसोशीनें पार पाडतां आल्या नाहींत. कारण यू. डी. बी. च्या कांही भरमसाट योजना अंमलांत आणायला हंगेरियन सरकारनें विरोध केला. मुख्य म्हणजे टीटोसाठीं त्याला बादशाही राजवाडा कांही मिळवितां आला नाहीं. पण याचा युगोस्लाव लिगेशनवर मात्र कडक परिणाम झाला. मार्शल टीटोच्या स्थानाला साजेशा अशा सुरक्षा योजना जर अंमलांत आणल्या गेल्या नाहींत, तर ही भेट रद्द केली जाईल, असा निरोप, म्राझोविच या नव्या मंत्र्यानें हंगेरियन सरकारला, भेटीच्या आधीं छत्तीस तास कळवला.

एका बाजूस हा फार्स चालला असतां, फेडरेशन ऑफ पीपल्स कॉलेजेस, हंगेरियन-युगोस्लाव सोसायटी, व हंगेरीचें दक्षिण स्लाव लोकशाही युनियन अशा संस्थांना हाताशीं धरून, रायक, बुदापेस्तमध्यें टीटोमहोत्सवाची तयारी करण्यांत गुंतला होता. यापैकीं पहिली संस्था हें खुद्द रायकचें अपत्य असून त्यांत शक्य तितके टीटोतर्फी लोक शिकवून पढवून भरले होते. हंगेरीयन सरहद्दीच्या आसपास वस्ती करून टाकणारे परंतु मूळचे युगोस्लाव, यांच्यांत असंतोष माजविण्यासाठीं दक्षिण स्लाव लोकशाही युनियन ही संस्था, युगोस्लाव बगलबच्चांनी बळकावली असून तसा त्या संस्थेतर्फे प्रचार चालला होता.

युगोस्लाव सरकारनें भेट रद्द करण्याची वरवर जरी धमकी दिली असली तरी, मार्शल टीटोच्या भव्य मूर्तीचें हंगेरींत प्रदर्शन करण्याची संधी वायां दवडण्याचें त्यांच्या मनांत बिलकुल नव्हतें; अखेरीस टीटो मोठ्या मान मरातबानें बुदापेस्तला आला. शहराचें जीवन जरी तात्पुरतें गैरसोईचें झालें असलें तरी रायकनें भव्य देखावा निर्माण केला.

बुदापेस्तमध्यें टीटोचें अशा तऱ्हेनें आगमन झाल्यानंतर, युगोस्लाव शिष्टमंडळासाठीं मुद्दाम, केलेबिया नजीक शिकारीचा बेत करण्यांत आला. युगोस्लाव गृहमंत्री रांकोविच हा त्या शिष्टमंडळांत होता. आणि युगोस्लाव रेल्वेच्या एका स्वतंत्र डब्यांत, केलेबियाला त्याची व लाझ्लो रायकची दुसरी भेट झाली. यावेळीं हंगेरींतील यू. डी. बी. प्रमुख लाझार ब्रांकोव हा दुभाष्याचें

काम करीत होता. केलेबियाचीही भेट मागें झालेल्या अबाझियाच्या भेटीइतकीच महत्वाची आहे.

टीटोच्या नेतृत्वाखालीं बाल्कन फेडरेशन स्थापण्याच्या योजनेवर रांकोविचनें जोर दिला. या फेडरेशनमध्यें सामिल होणाऱ्या देशांनीं समाजवादाची प्रगती थांबवून करुन राजकीय समाजपद्धती म्हणून पश्चिमी भांडवलदारी लोकशाहीची कांस धरावी असें ठरवलें. रायक खटल्यांतून पुढें असें उघडकीस आलें. युगोस्लावियांतील मार्शल टीटोच्या वैयक्तिक हुकूमशाही सारखी वैयक्तिक हुकूमशाही स्थापन करण्याचें, त्यावेळीं, रांकोविच व रायक या दोघांच्याही मनांत होतें या फेडरेशनला अमेरिकेचा पाठिंबा मिळेल असें रांकोविचनें पुढें सांगितलें.

रांकोविच म्हणाला कीं मुक्ततेनंतर युगोस्लाव सरकारला भरमसाट समाजवादी योजना हातीं घ्यावयाला लागल्या, कारण ती युगोस्लाव जनतेची मागणी होती; आणि याच कारणासाठीं त्यांनी सोविएत युनियनशीं उठून दिसेल अशी मैत्री ठेवली होती. त्यावेळीं बाल्कन फेडरेशनचे पुरस्कर्ते म्हणून सोविएत युनियनला विरोध करून पुढें सरसावण्याची जरुरी नव्हती, कारण पूर्व युरोपमधील अनेक राष्ट्रांत उजव्या गटाची सरशी होण्याची चिन्हें दिसत होतीं. उजवे गट जर यशस्वी झाले असते, तर अमेरिकेचा पाठिंबा असलेला सोविएतविरोधी लष्करी गट–युगोस्लावियाच्या नेतृत्वाखालीं तयार झाला असता.

पण हंगेरीसकट सर्व देशांत कम्युनिस्ट पक्षांचे सामर्थ्य वाढत जात असल्यानें, युगोस्लावियाला उघडपणें मैदानांत उतरून हंगेरी व इतर देशांतील कम्युनिस्ट पक्षांचें धोरण बदलण्याचा प्रयत्न करावा लागला. यापुढें युगोस्लावियाच "जनतेच्या लोकशाहीचे" तत्त्वांवर देशांची संघटना करणारा व मार्गदर्शक म्हणून पुढें आला पाहिजे. हें सर्व खुद्द टीटोचें विवेचन आहे असें रांकोविच म्हणाला.

पण हें नवें सोंग उठविणें सोपें नव्हतें, कारण कम्युनिस्ट पक्ष सामर्थ्यशील झाले असून सोवियन युनियन बद्दलची मैत्रीची भावना दृड झाली होती—आणि म्हणून कावेबाजपणें वागणें जरूर होतें.

युगोस्लावियाच्या साम्राज्यशाहीविरोधी भूमिकेवर जोर दिला पाहिजे;—(संयुक्त राष्ट्र संघामधील, ॲलेस बेबलची ब्रिटिश अमेरिकनविरोधी दिखाऊ आतषबाजी बहुधा रांकोविचच्या मनांत असावी.) बाल्कन गटाचे आर्थिक फायदे दाखवले पाहिजेत; युगोस्लावियाच्या नेतृत्वाखालीं क्रीडाविषयक, सांस्कृतिक व ट्रेड युनियन संस्था बाल्कन फेडरेशनच्या पायावर स्थापन केल्या पाहिजेत;

आणि शेवटीं सर्वांत अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे हंगेरियन सरकार उलथून पाडलें पाहिजे; हा रांकोविचच्या सूचनांचा मतितार्थ होता. हें कार्य फक्त हंगेरी पुरतें मर्यादित नसून, इतर पूर्व युरोपियन देशांतसुद्धां याचवेळीं हें चाललें आहे, असें रांकोविच म्हणाला.

या क्षणीं रांकोविचनें सांगितलें कीं, राकोसी, फर्कास व गेरो या कम्युनिस्ट पुढाऱ्यांचे खून पाडावे लागतील. प्रत्यक्ष "खून" हा शब्द त्यानें जरी वापरला नसला तरी त्याच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट होता.

संभाषणाच्या अखेरीस, रांकोविचनें आपले मुद्दे अधिक विस्तारले व रायकचें हंगेरीतील कार्य हें एका मोठ्या कार्याचा भाग असून, त्यांतील कांहींना आंतरराष्ट्रीय महत्त्व आहे असें सांगितलें, तें मोठें गमतीदार आहे. तो पुढें म्हणाला कीं, मार्शल योजना स्वीकारल्यानें जनतेच्या लोकशाही देशांची आर्थिक संकटें वाढतील व त्यामुळें यूरोपच्या अर्थव्यवस्थेची दोन शकलें पडतील. यामुळें पूर्व यूरोपमधील प्रतिगाम्यांना जोर चढेल व बाल्कन फेडरेशनला आर्थिक पाया मिळेल. शिवाय पश्चिम-युरोपांत युद्धाची भाषा सुरू झाली हें एका परीनें चांगलें आहे—कारण राजकीयदृष्ट्या कच्चे लोक, संशयग्रस्त होऊन, गोंधळांत पडून, आशेनें अमेरिकेकडे डोळे लावतील. या शिवाय, ब्रिटिश लेबर पार्टी, फ्रेंच व इटालियन ( सारागाट कंपू ) सोशॅलिस्ट, यांच्या प्रभावी प्रचाराची आपल्याला मदत होईल.

रायकनें जर आपलें कार्य यशस्वी रीतीनें पार पाडलें तर युगोस्लावियांतील हंगेरीयन भाषा बोलणाऱ्या लष्करी तुकड्यांची त्याला मदत मिळेल असें रांकोविचनें भेटीच्या अखेरीस आश्वासन दिलें.

केलेबियाच्या भेटीचे परिणाम ताबडतोब दिसून आले. कारण आतां आपल्या हातांत सर्व सत्ता एकवटणार याचें उन्मादक सुखस्वप्न रायकच्या डोळ्यांना दिसूं लागलें. त्यावेळच्या त्याच्या सामर्थ्यामुळें त्याला आत्मविश्वास वाटणें स्वाभाविक होतें. पोलिसांसकट, राज्याच्या सुरक्षिततेचीं सर्व साधनें त्याच्या हातांत होतीं. पालफि हा त्याच्या शंभर टक्के विश्वासांतील माणूस, त्यानें जवळ जवळ जुन्या फॅसिस्ट लष्कराचीच उभारणी केली होती. प्रत्येक खात्यांतील महत्वाचीं माणसें युगोस्लावियाच्या मुठींत होतीं व लष्करी कटाला त्यांचा खात्रीनें पाठिंबा मिळाला असता, आणि आतां तर, सरहद्दीवरून मी लष्करी कुमक पाठवतों, असें रांकोविचनें आश्वासन दिलें होतें.

जी भूमिका पार पाडावयाची त्या कारस्थानी भूमिकेमुळें, रायक गुंगून गेला. ब्रिटिश परराष्ट्रीय खातें व अमेरिकन सरकारी खातें आपल्या पाठीशीं आहे या जाणिवेनें तो फुगून गेला. अशा परिस्थितींत, आतां बुदापेस्तला जाऊन कामाला लागायचें असा रायकनें जातांना निश्चय केला यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

केलेबियाला येण्यापूर्वीच त्यानें रांकोविचनें नेमून दिलेलीं अनेक कामें चोख पार पाडलीं होतीं. उदाहरणार्थ, उन्हाळ्यांतील निवडणुकांच्या प्रसंगीं, उजव्या गटाचे सोशल डेमोक्रॅटस वगळून, निवडणुक प्रचार मोहिमेचा मुख्य हल्ला इतर उजव्या राजकीय पक्षांवर केला पाहिजे, असें मत त्यानें कम्युनिस्ट पक्षांतील चर्चेच्या वेळीं मांडलें होतें. पार्टी एकाच वेळीं दोन आघाड्यांवर लढूं शकत नाहीं व त्यामुळें असा हल्ला करणें प्राप्त आहे असें त्यानें सुचवलें. अशा डावपेंचानीं पश्चिम युरोपीयन देशांचा फायदा होईल हें त्याला ठाऊक होतें; कारण पश्चिम युरोपांतील देश आतां कट्टर उजव्यांना सोडून, सोशल डेमॉक्रॅटिक पक्षांच्या उजव्या गटाला पाठिंबा देत होते.

पोलिसांमधून कम्युनिस्ट पार्टीचें वजन वाटेल तें करून कमी कर, असा रांकोविचचा आदेश येतांच रायकनें पोलिसदलांतील कम्युनिस्टांसकट सर्व पार्टी संघटणांचें विसर्जन केलें. पुढें हाच प्रयोग लष्करांत करण्यांत आला.

या ठिकाणीं, मागें ओळख झालेला, पूर्वीचा लेफ्टनंट व आतां कर्नल बेला कोरोंडी पुनः एकदां दिसतो. हॉर्थीच्या फौजेंतील हा एक अधिकारी. यानें ऑगस्ट १९४५ त पाल्फीच्या हाताखालीं, नव्या लष्कराच्या राजकीय विभागांत नोकरी धरली. रिटायर झालेल्या जुन्या फॅसिस्टांची लष्करांत भरती करण्यांत त्यानें पाल्फीला मदत केली. १९४६ च्या नोव्हेंबरांत त्याची गृहखात्यांत बदली झाली; रायकनें सशस्त्र पोलिसांचें खातें त्याच्या ताब्यांत दिलें व स्पेशल पोलिससंघटणा उभारण्याच्या सूचना दिल्या. १९४७ च्या वसंत ऋतूंत रायकनें, मोटर गाड्यांची सुसज्ज फौज तयार ठेवण्याचा हुकूम दिला व या फौजेंतील अधिकारी, पाल्फीनें पास केलेल्या फ्रॉंटियरगार्डमधील असले पाहिजेत असें सांगितलें. या फौजांशी मोठ्या तोफा असून त्या प्रभावी शक्ति होत्या.

१९४८ च्या मार्चमध्यें रायकनें कर्नल कोरोंडीला आपल्या ऑफिसांत बोलावून घेतलें. या प्रसंगाचें वर्णन त्यानें पुढें असें केलें,

" मी प्रश्न विचारतों तो महत्त्वाचा आहे " अशा सुरांत रायकनें मला विचारलें, 'तूं माझे वैयक्तिक हुकूम पाळावयास तयार आहेस काय?' मी होकार दिल्यावर तो पुढें म्हणाला कीं, " मी सरकारविरुद्ध लष्करी कट करीत आहे.— सैनिकांच्या स्वतंत्र तुकड्या बनवून सरकारी सभासद व त्यांतल्यात्यांत राकोसी, फर्फास व गेरो या मंत्र्यांना अटक करणें तुला शक्य आहे. "

याच वेळीं, अमेरिकेचा बुदापेस्तमधील मंत्री सेल्डन चॅपिन याच्याशीं रायकचें बोलणें झालें होतें. ( माझा रायकशीं कधींही संबंध नव्हता असें मि. चॅपिननें नंतर सांगितलें ) " बंडाची वेळ आली की नेमकें त्याच क्षणी अमेरिका कांहीं तरी कुलंगडें उकरून काढून सोवियत युनियनचे हात जखडून ठेवील म्हणजे—हंगेरीप्रकरणांत सो. यु. ला हस्तक्षेप करतां येणार नाहीं. " या रांकोविचच्या आश्वासनाची रायकनें चॅपिनकडे कबुली दिली. चॅपिननें प्रथम आढेवेढे घेतले पण पुढें युगोस्लाव योजना माहिती असल्याचें कबूल केलें. त्यानें पुढें म्हटलें कीं—" युगोस्लावियन धोरण अंमलांत आणण्याच्या मार्गात अमेरिका अडथळे आणणार नाहीं, हे मला ठाऊक होतें. "

याच सुमारास रायकनें युगोस्लावियाच्या, ट्रेड युनियन्स, युवक इत्यादि संस्थांतून युगोस्लाव वजन वाढविण्यासाठीं, बाल्कन संस्था स्थापन करण्याच्या सूचना अंमलांत आणण्याच्या खटपटी केल्या होत्या.

पूर्व यूरोपच्या पोलिसखात्यांच्या तालमींत तयार झालेल्यांना आतांपर्यंतचें कारस्थान रचणें म्हणजे शुद्ध पोरखेळ होता. जगांतील हेरखात्यांच्या अंकलिप्यांत असलेल्या सावधगिरीच्या सूचना पाळण्यापलीकडे त्यांना दुसरें कांहीं करावयाचें नव्हतें. त्यांनीं आपली हुकुमी माणसें महत्वाच्या जगांवर बसवलीं होतीं–इतकी बसवतां येतील अशी खुद्द त्यांनांच कल्पना नव्हती. गृहमंत्री त्यांचाच होता–शिवाय तो कम्युनिस्ट पार्टीचा पुढारी व देशांतील अत्यंत लोकप्रिय व्यक्ति ! कम्युनिस्ट पार्टी त्यांचा मुख्य शत्रु—पण पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या खात्याचा प्रमुख व उपप्रमुख यांच्या मुठींतले. एकाद्याची कोणत्या कामासाठीं शिफारस करावयाची हें याच खात्याच्या हातांत असे. फ्रँटियर गार्ड व लष्कराचा राजकीय विभाग त्यांचा होता. शिवाय हें कारस्थान ब्रिटिश किंवा अमेरिकन्सच्या करवीं चाललेलें नसून—कारण तसें करणें फार धोक्याचें होतें—संशयातीत अशा युगोस्लावतर्फे चाललें होतें–युगोस्लाविया नव्या तऱ्हेच्या जनतेच्या लोकशाहीचा आदर्श म्हणून अजून मानला जात होता व कारस्थान रचणारे

अशा आदर्श देशाचे प्रतिनिधी–मग त्यांच्याविषयीं तेव्हां कुणाला कसा संशय येणार? पण आतां मात्र जसें १९४८ साल जायला लागलें तशी संकटें डोकावूं लागलीं.

या वर्षाच्या आरंभींच कम्युनिस्ट व सोशल डेमॉक्रॅटिक पक्षांची एकजूट करण्याविषयींची बोलणीं सुरू झालीं होतीं. याचाच परिणाम जूनमध्यें संयुक्त हंगेरियन वर्कर्स पार्टी स्थापन होण्यांत झाली. ताबडतोब निरनिराळ्या जागांवरील अधिकारी बदलण्यांत आले व या घडामोडींत रायकचे बगलबच्चे जागांवरून बाजूला सारले गेले. त्यांनी कॅथलिक चर्चच्या प्रतिगामी पुढाऱ्यांवर मिस्त ठेवली होती तीसुद्धां आतां धुळीस मिळाली. कारण या वर्षाच्या सुरुवातीस सरकारनें धर्मगुरूंच्या राजकीय कारवाया बंद पाडण्यासाठीं कडक उपाय योजले. या धर्मगुरूंचे पुढारीपण कार्डिनल मिंझेंटीकडे होतें. या नवीन कायद्यान्वयें आतांपर्यंत चर्चच्या छत्राखालीं असलेल्या शाळा सरकारनें आपल्या नियंत्रणाखालीं आणल्या.

पण याहीपेक्षां महत्वाचा घाव म्हणजे जून १९४८ मधील बुखारेस्ट-मधील घटना. या घटनेनें आतांपर्यंत वकिलाती व परराष्ट्रीय कचेऱ्या यांच्या मागील खोल्यांतून गुप्तपणें चाललेलें टीटोचें कारस्थान प्रथम चव्हाट्यावर आणलें. जूननंतर टीटो व रांकोविचच्या राजकीय धोरणाची चर्चा जगांतील कामकरी जनता उघडपणें करणार होती.

१९४७ सालांत, युरोपच्या नऊ कम्युनिस्ट पक्षांनीं (सोवियत, पोलिश, बल्गेरियन, हंगेरियन, रुमानियन, युगोस्लाव, झेकोस्लोवाक, फ्रेंच व इटालियन) कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरो स्थापन करून त्याचें मध्यवर्ती केंद्र बेलग्रादला ठेवलें होतें. रुमानियाची राजधानी बुखारेस्ट येथें ब्यूरोची एक खाजगी सभा २८ जूनला भरली होती. युगोस्लाव्ज्नीं या सभेस हजर राहण्याचें नाकारलें. या सभेनंतर इन्फर्मेशन ब्यूरोनर्फे युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टींतील एक परिस्थिती-संबंधीं ऐतिहासिक महत्वाचा ठराव जाहीर करण्यांत आला.

हा फटका आपल्यावर पडणार हें टीटो व त्याच्या गटाला आधींपासूनच माहित होतें. कारण रायक, हंगेरियन वर्कर्स पार्टीच्या पोलिट-ब्यूरोचा सभासद असल्यानें त्याला या भावी ठरावाची पूर्व सूचना होती व त्याचा सारांश त्यानें इमानेंइतबारें बेलग्रादला कळवला होता. पण आतां हा घाव रोखणें शक्य नव्हतें. यामुळें टीटोगटाचें स्वरूप उघडें नागडें करण्यांत येऊन त्यांची आंतरराष्ट्रिय कम्युनिझमच्या फौजेंतून हकालपट्टी होणार होती.

# प्रकरण दहावें

# इन्फमेंशन ब्यूरोचा तडाखा

युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट पार्टीची आपल्याला जी १९४३ पासूनची माहिती आहे, त्यामुळें सोविएत युनियनच्या कम्युनिस्ट पार्टीनें युगोस्लाव पुढाऱ्यांच्या १९४५ ते १९४८ सालांतील हालचालींकडे बारिक लक्ष पुरवलें, याचें आश्चर्य वाटणार नाहीं. त्यावेळीं ज्या घटना घडल्या त्या चुका किंवा दोषच वाटले; व याचें कारण म्हणजे टीटो व त्याच्याभोंवती गोळा झालेल्या गटाचा फाजील आत्मविश्वास, गर्व व घमेंडखोरी हें होय.

१९४५ च्या मे महिन्यांत टीटोनें लुब्लिआना येथें एक भाषण केलें. त्यावरून त्याचा कच्चा मार्क्सवाद उघडकीस आलाच व अगदीं सौम्य भाषेंत सांगावयाचें झालें तर, सोविएत युनियनविषयीं त्यानें घेतलेली भूमिका, तो एक कम्युनिस्ट पार्टीचा पुढारी होता, हें ध्यानांत घेनलें तर मोठी आश्चर्यकारक होती. त्यावेळीं युगोस्लाविया एकसारखा ट्रिएस्टवर हक्क सांगत होता व या ट्रिएस्ट प्रकरणामुळें आंतरराष्ट्रीय तेढ निर्माण झाली होती. अशा या ट्रिएस्टविषयीं बोलतांना टीटो म्हणालाः "प्रत्येकानें आपल्या घराचें मालक असावें अशी आमची मागणी आहे. आम्ही दुसऱ्याचीं कर्जें फेडण्यास तयार नाहीं. इतर लोकांच्या देवघेवीसाठीं रोकड पैसा पुरविण्याची आमची इच्छा नाहीं. गटबाजीच्या धोरणांत आम्ही फसूं इच्छित नाहीं."

या भाषणाचा अर्थ काय होतो ? तर सोवियत युनियन व पश्चिम युरोपियन राष्ट्रांचा गट यांच्या भांडणांत, आपण शिकार बनूं अशी युगोस्लावियाला धास्ती वाटते हाच होय. पण खरी वस्तुस्थिती अशी होती कीं युगोस्लावियाचा ट्रिएस्टवरील हक्क न्याय्य असल्यानें, मुत्सद्देगिरीच्या लठ्ठालठ्ठीला न जुमानतां सोवियत युनियनचा युगोस्लावियाला पाठिंबा होता. मार्शल टीटोच्या या बेलगामी व अर्थपूर्ण वक्तृत्वाबद्दल सोवियत युनियननें त्याची हजेरी घेतली यांत कांहीं नवल नाहीं.

५ जूनला बेलग्रादमध्यें याच बाबतींत, युगोस्लाव परराष्ट्र मंत्री कार्देली व बेलग्रादचा सोवियत मंत्री साज्जिकोव यांची मुलाखत झाली. यावेळीं अचानक बेसावधपणें कार्देलीनें टीटोच्या भाषणावरील सोवियत टीका मान्य केली. साज्जिकोवच्या रिपोर्टाप्रमाणें, "टीटोचा कल युगोस्लावियाला स्वयंपूर्ण

मानण्याकडे असून कामगार क्रांतीची व समाजवादाची वाढ यांच्याशी आपल्या देशाचा संबंध नाहीं असें त्याला वाटतें. दुसरी गोष्ट अशी कीं पार्टींत परिस्थिती इतक्या थराला येऊन पोंचली आहे कीं, सेंट्रल कमिटीचें संघटित राजकीय केंद्र म्हणून अस्तित्वच शिल्लक राहिलें नाहीं."

मार्शल टीटोविषयींचें त्याचें मत व त्याचा स्वतःचा दुटप्पीपणा या दोन्ही दृष्टीनें कार्देलीचें हें वाक्य फार महत्वाचें आहे. कारण त्यावेळीं त्याचीं राजकीय मतें अगदीं टीटोगटासारखींच होतीं.

युद्ध संपल्यानंतर लगतच्या काळांत, मि. मोलोतोव यांनी, युगोस्लाव दुय्यम परराष्ट्रमंत्री जनरल व्हेलेबिट हा ब्रिटिशांचा हस्तक आहे, असें कार्देली व जिलास यांना सांगितलें होतें. ही गोष्ट सिद्ध करायला सोविएत युनियन तयार होतें. रशियन्सनां याची इतकी खात्री होती कीं, १९४८ च्या सुमारास सोविएत परराष्ट्रखातें त्यांच्या (युगो.) परराष्ट्रखात्यांकरवीं युगोस्लाव सरकारशीं बोलणीं करण्यास तयार नव्हतें. पण आम्ही जनरल व्हेलेबिटच्या पूर्व चरित्राची चौकशी चालविली आहे एवढें म्हणण्यापलीकडे युगोस्लाव पुढाऱ्यांनी या बाबतींत कांही केलें नाहीं. (हा प्रकार व जुब्लिआनाचें भाषण हे दोन्ही मुद्दे सोविएत युनियन कम्युनिस्ट पार्टी व युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टी यांच्या सेंट्रल कमिट्यांच्या पत्र-व्यवहारांत आले असून, तो पत्रव्यवहार खुद्द युगोस्लावजूनीच प्रसिद्ध केला असून, त्याच्या खरेपणाबद्दल संशय घेण्यास जागा नाहीं.)

१९४५ च्या सुमारास, युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीच्या गटागटांत, सोवियत-विरोध हा सामान्य गप्पांचा विषय झाला होता. सोवियत कम्युनिस्ट पार्टी कुजलेली आहे, "सोवियत दुरभिमान" वाढत आहे-असा या बोलण्याचा सर्वसाधारण रोख असे; सोवियत समाजवाद क्रांतिकारक राहिला नसून युगोस्लावजूनीं आतां क्रांतीचें निशाण उचलून धरलें आहे, असें सुचवलें जात होतें. या सुमारास सेंट्रल कमिटींतून सच्चा मार्क्सवाद्यांची साफ हकालपट्टी करण्यांत आली असून तिच्यांत टीटोचे वैयक्तिक पाठिराखे भरले गेले होते.

ही सेंट्रल कमिटी पूर्वीं, १९ ते २३ ऑक्टोबर १९४० यावेळीं भरविलेल्या युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीच्या गुप्त परिषदेंत निवडली गेली होती. तेव्हां कमिटीवर, बावीस सभासद व सोळा उमेदवारांची निवड झाली होती. पूर्वींच्या या संपूर्ण सभासदांपैकीं दहा युद्धांत मारले गेले व नव्या सोळा जणांना स्वीकृत सभासद करून घेण्यांत आलें. याप्रमाणें युद्धाच्या अखेरीस कमिटीचें प्रातिनिधिक स्वरूप नष्ट झालें. कारण कमिटीवर स्वीकृत सभासदांचीच बहुसंख्या झाली होती.

पार्टीच्या सेंट्रल कमिटींत आंद्रिया हेब्रांग व श्रेतेन झ्यूजोविच हे होते. कमिटींत मार्क्सवाद्यांविरुद्ध जो लढा झाला त्याचा मुख्य जोर या दोघांविरुद्ध होता. जेव्हां टीटोगट ब्रिटिश मिशनच्या वजनाखालीं येत चालला होता तेव्हां या दोन अनुभवी मार्क्सवाद्यांनी रांकोविच व टीटो यांना सतत विरोध केला होता. त्यांच्या अपप्रवृत्तींचें पुढें जेव्हां विश्वासघातांत पर्यवसान झालें तेव्हां हेब्रांग, झ्यूजोविचची टीका अधिक प्रखर झाली.

एप्रिल १९४८ च्या पहिल्या पंधरवड्यांत भरलेल्या सेंट्रल कमिटीसभेंत या विरोधाचा कळस झाला. या सभेंत हेब्रांग व झ्यूजोविचनीं सोविएत युनियनच्या धोरणाचा निकरानें बचाव करून, सोविएत कम्युनिस्ट पार्टी युगोस्लाव पार्टीवर जी टीका अजून करीत होती तिला पाठिंबा दिला. टीटोगटानें या हेब्रांग-झ्यूजोविच "प्रकरणा" विषयीं जें अधिकृत पत्रक काढलें त्यांत—युगोस्लाव सेंट्रल कमिटींत चर्चा स्वातंत्र्य नाहीं अशी हेब्रांग-झ्यूजोविचनीं या सभेंत टीका केली होती—हें कबूल केलें आहे ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे.

टीटोगटाच्या होयबांची कमिटीवर बहुसंख्या होतीच. त्यांच्याकडून टीटो गटानें या प्रकरणांत एक चौकशी कमिशन नेमून घेतलें. पूर्वी स्पेनमध्यें ट्रॉट्स्की-वादी असलेला व आतां टीटोचा डेप्युटी झालेला इवान गोश्न्याक या चौकशी कमिशनचा प्रमुख होता. हेब्रांग व झ्यूजोविज यांनीं सर्व प्रकारचे राजकीय गुन्हे केले आहेत असा या चौकशी कमिशननें शोध लावला यांत नवल नाहीं. गटबाजी, आर्थिक पुनर्रचनेच्या बाबतींत अडथळे आणणें, देशद्रोह हे नेहमीचे आरोप लादले होतेच पण जर्मनांशी संशयित संबंध ठेवणें या आरोपाची भर घालण्यांत आली होती. हे आरोप रांकोविच व गोश्न्याकनें करावे या घटनेंत कमालीचा उपरोध भरलेला आहे.

कमिशनचे हे शोध हातीं येतांच लगेच रांकोविच व त्याच्या साथीदारांनीं या दोन मार्क्सवाद्यांना शिक्षा दिली; हेब्रांग आर्थिक समितीचा अध्यक्ष होता त्या जागेवरून त्याची उचलबांगडी करण्यांत आली, त्याचप्रमाणें झ्यूजोविचला पदभ्रष्ट करण्यांत आलें. यानंतर लगेच त्यांची पार्टींतून हकाल-पट्टी झाली व त्यांना तुरुंगांत डांबण्यांत आलें.

१९४५-४८ सालांत काय घडत होतें हें सोवियन युनियन कम्युनिस्ट पार्टीला स्पष्ट होत होतें. टीटो राजवट ही खरीखुरी जनतेची लोकशाही राजवट नाहीं व युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टी ही ट्रॉट्स्कीवादी व राष्ट्रवादी यांच्या हातांत गेली आहे–याची चिन्हें सो. यु. कम्युनिस्ट पार्टीला दिसूं लागली होतीं,

मार्च १९४८ पर्यंत अशा तऱ्हेचा पुरावा भरपूर जमा झाला होता. बेलग्रादमध्यें ज्या विचित्र घटना आढळत व आतांपर्यंत ज्या प्रामाणिक चुका म्हणून मानल्या जात तिकडे दुर्लक्ष करणें आतां कठीण झालें. बेलग्रादमधील सोवियत मिशनच्यामागें पोलिसांचा ससेमिरा लागला व त्याच्या कार्यांत अडथळे निर्माण होऊं लागले. युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टी संघटणेच्या दृष्टीनें अजून भूमिगत कटवाल्यांसारखीच होती व तिच्या सभासदांना किमान लोकशाही हक्क सुद्धां राहिले नव्हते, तसेंच युगोस्लावियांत वर्गयुद्धाला हळूहळू सोडचिठ्ठी देण्यांत येत होती–या गोष्टी आतां स्पष्ट झाल्या.

युगोस्लावजूच्या विनंतीवरून पाठविण्यांत आलेलें सोवियत मिलिटरी मिशन मागें बोलावलें जाईल, असें १८ मार्चला टीटोला कळविण्यांत आलें. १९ मार्चेला, युगोस्लाव सरकारला सल्ला देणाऱ्या सोवियत मुलकी तज्ज्ञांना सुद्धां परत बोलावण्यांत आलें. २० मार्चेला मार्शल टीटोनें आश्चर्य व दुःखपूर्ण असें पत्र मि. मोलोतोव यांना पाठविलें. सोवियत कम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटी कडून, मार्शल टीटो व युगोस्लाव सेंट्रल कमिटी यांना २७ मार्च रोजीं उत्तर पाठविण्यांत आलें. सोवियत मार्क्सवाद्यांना युगोस्लावियांतील परिस्थितीच्या कांहीं गोष्टींबद्दल काळजी वाटत होती व ती या पत्रांत व्यक्त केली होती.

मार्च ते २७ जून पर्यंत दोन पक्षांत पत्रव्यवहार चालू होता. सोवियत कम्युनिस्ट पार्टीनें आपली बाजू निस्संशयपणें स्पष्ट मांडली. पण युगोस्लाव कसलाच पुरावा न देतां सरसहा सगळेंच नाकारूं लागले. कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोच्या इतर सभासदांना या घडामोडीची माहिती देण्यांत येत होती व जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यात त्यांची बुखारेस्टला जेव्हां बैठक भरली, तेव्हां त्यांना टीटोच्या युगोस्लावियाचें नवें मोजमाप करता येणें शक्य झालें.

बुखारेस्ट बैठकीनंतर जो ऐतिहासिक खलिता बाहेर पडला, त्यांत युगोस्लाव पार्टीच्या पुढारीपणाचें स्वरूप सर्वांच्या समोर उघडेंनागडें करण्यांत आलें.

"युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीच्या पुढारीपणाचें गृह व परराष्ट्रखात्याचें धोरण अलीकडे चुकीचें असून तें मार्क्सवाद-लेनिनवादापासून ढळलें आहे–" असें ठरावांत जाहीर केलें गेलें.

"कम्युनिस्ट पार्टी ही युगोस्लावियांत देशाची प्रमुख व अग्रशक्ति मानली जात नसून, पीपल्स फ्रंट-जनतेचा मोर्चा, ही मानली जाते. युगोस्लाव पुढारी कम्युनिस्ट पार्टीची भूमिका तुच्छ लेखीत असून पार्टी, जनतेच्या मोर्चांत

मिसळवून टाकीत, आहेत. युगोस्लाव पुढाऱ्यांनीं पार्टींत जी नोकरशाही राजवट स्थापन केली आहे ती युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीचें अस्तित्व व प्रगति या दृष्टीनें घातुक आहे. पार्टींत अंतर्गत लोकशाही राहिली नाहीं; निवडणुका घेतल्या जात नाहींत; टीका किंवा आत्मटीका होत नाहीं.

"युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीसारख्या संघटनेला पंथप्रवृत्तीय नोकरशाही याशिवाय दुसरें नांव देतां येत नाहीं. या धोरणामुळें अग्रगामी कार्यक्षम संस्था म्हणून पार्टीचें विसर्जन करण्यांत पर्यवसान होतें, व एकेकाळीं ट्रॉट्स्कीनें ज्या पुढारीपणाच्या पद्धती घुसविल्या, तशा प्रकारच्या पुढारीपणाच्या लष्करी पद्धती, पार्टींत निर्माण केल्या जातात. युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टींत सभासदांच्या अत्यंत प्राथमिक हक्कांची पायमल्ली होते, पार्टींत ज्या तऱ्हेनें काम चालतें त्याच्यावर जर थोडीशी टीका केली तर लगेच उग्र दडपशाही होते– हें कोणी सहन करणार नाहीं.

"युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीचे सभासद, कॉमरेड झ्यूजोविच व हेब्रांग यांनी युगोस्लाव पुढाऱ्यांच्या सोवियत विरोधी धोरणावर टीका करण्याचें धैर्य दाखविलें, व युगोस्लविया आणि सोवियत युनियन यांच्या मैत्रीचा पुरस्कार केला म्हणून त्यांची पार्टीमधून हकालपट्टी करण्यांत येऊन त्यांना अटक करण्यांत आली-ही घटना इन्फर्मेशन ब्यूरोला लाजिरवाणी वाटत आहे. कम्युनिस्ट पार्टी अशी बदनाम व दहशतवादी सुलतानशाही राजवट सहन करूं शकत नाहीं, असें इन्फर्मेशन ब्यूरोचें स्पष्ट मत आहे. युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीचें अस्तित्व व प्रगति या दृष्टीनें अशा राजवटीचा नायनाट करणें आवश्यक आहे."

"युगोस्लाव पुढाऱ्यांनीं आपल्या कृतीनें आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचा विश्वासघात केला असून, स्वतः होऊन ते बंधुभावानें वागणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांच्या कुटुंबाच्या व इन्फर्मेशन ब्यूरोच्या बाहेर पडले आहेत."

युगोस्लाव पुढारीपणाची सफाई दुटप्पी करण्याची सद्दी संपली. सोवियत युनियनचे दोस्त व साम्राज्यवाद्यांचे शत्रू म्हणवून बतावणी करणें व कुणी या सोंगाला फसतील अशी आशा करणें यापुढें युगोस्लाव पुढाऱ्यांना अशक्य झालें.

# प्रकरण अकरावें
# मिलोस मॉइखचा खून

इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावाचे परिणाम गंभीर झाले. जगांतील कम्युनिस्ट चळवळींत, टीटोचा युगोस्लाविया म्हणजे समाजवादाकडे कूच करण्याचा जनतेचा वीर्यशाली आदर्श मानण्यांत येत असल्यानें, कामगार वर्गाच्या इतिहासांतील या प्रचंड विश्वासघातानें, सर्वांना भयंकर धक्का बसला. पण ठरावांत स्पष्ट आरोप करण्यांत आले होते, व आपण कोण आहोंत हें खुद्द युगोस्लाव पुढारी लवकरच दाखवून देणार होते. त्यामुळें हा जो गौप्यस्फोट करण्यांत आला, त्याचा अर्थ जनतेनें लवकरच जाणला व त्यापासून योग्य धडे घेतले.

टीटोगट, कम्युनिस्ट पार्टीचीं स्वतःला पाठिंबा देणारीं अशीं जीं निदर्शनें घडवून आणीत होता, तो एक भला मोठा तमाशा होता हें स्पष्ट झालें.

जे युगोस्लाव देशाबाहेर होते, वकिलाती व परराष्ट्रीय कचेऱ्यांत काम करीत होते त्यांना या ठरावानें देश मुक्त करण्याची संधि आणून दिली. आपल्या जागांचा राजीनामा देऊन, जनतेच्या लोकशाही देशांत, जी स्वतंत्र युगोस्लाव कम्युनिस्ट चळवळ तावडतोब उभारली गेली तिच्यांत सामिल होणें त्यांना शक्य होतें.

× × ×

इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावाचा ज्यांच्यावर परिणाम झाला त्यांत मूळचा युगोस्लावियातील पण आतां हंगेरियन, असा मिलोस मॉइख हा होता. हंगेरीच्या दक्षिण स्लाव फेडरेशनचा हा कार्यकर्ता होता. त्याला युगोस्लावज्नी आपला हस्तक बनविलेलें होतें, पण आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीच्या टीकेवर विचार करून त्यानें टीटोपासून फुटून निघण्याचें व जाहीर निवेदन करण्याचें ठरविलें.

दक्षिणस्लाव फेडरेशनचें अध्यक्षपद, उन्हाळ्यापर्यंत ॲंतन रॅाब याच्याकडे होतें. हा रॅाब हंगेरियन पार्लमेंटचा सभासद होता; कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या खात्यांतील, तिबोर स्झोनी याच्या तर्फे हा १९४५ पासून हेरखात्याचा हस्तक बनला होता. ठराव प्रसिद्ध झाल्यानंतर त्याला बुदापेस्तमध्यें राहणें

अशक्य झाल्यामुळें, युगोस्लाव लिगेशननें त्याला खोटी कागदपत्रें देऊन, लिगेशनच्या गाडींत घालून युगोस्लावियांत पळवून नेलें.

आतां अध्यक्षाची जागा रिकामी पडली होती. मॉइखनें इन्फर्मेशन ब्यूरोला उघड पाठिंबा दिला होता. टीटोविरुद्ध फेडरेशनच्या सर्वसाधारण सभासदांत इतक्या प्रखर भावना होत्या कीं त्याची अध्यक्षस्थानीं निवड झाली.

पण मॉइखला यू. डी. बी. चा इंगा माहित नव्हता. इतक्या घाईनें व उघड उघड वागण्यापेक्षां त्यानें सावधगिरी दाखवायला पाहिजे होती— आपल्या पूर्वींच्या हस्तकानें सगळें सांगून टाकूं नये म्हणून युगोस्लाव वाटेल तें करायला मागें पुढें पाहणारे नव्हते. ब्रांकोवनें मॉइख फुटल्याची बातमी कळविल्यावर, मॉइखला युगोस्लावियांत पाठवा, किंवा हें न जमल्यास त्याचा खून पाडा अशा गृहमंत्री रांकोविचनें सूचना दिल्या. मॉइखची अध्यक्षपदीं निवड होणार ही बातमी कम्युनिस्ट पार्टी कार्यकर्त्याच्या खात्याचा उपप्रमुख आंद्रास झालाई याला प्रथम लागली व लगेच त्यानें ती लिगेशनला कळविली हे लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यानें जर अध्यक्षपदाचा स्वीकार केला तर प्राणास मुकावें लागेल असें ब्रांकोवतर्फे त्याला सांगण्यांत आलें.

८ जुलैला झालाई व युगोस्लावजमध्यें वरील संभाषण झालें. दोन दिवसानंतर दहा तारखेस, दोझा जॉर्जी स्ट्रीटवरील लिगेशन कचेरींत युगोस्लाव मंत्री म्राझोविच याच्या खोलींत सभा भरविण्यांत आली. झिव्को बोरोव,—युगोस्लाव प्रेस अधिकारी, यू. डी. बी. प्रमुख व लिगेशन कौन्सिलर लाझार ब्रांकोव, दुसरा यू. डी. बी. चा अधिकारी व्लाझिच व खतः मंत्री एवढेजण सभेंत हजर होते. या सभेंत बोरोवनें, मॉइखचा खून करण्याचें ठरलें; कारण बोरोव मॉइखच्या अगदीं लगतचा होता. आणि या कामासाठीं खुद्द मंत्र्यानें आपल्या स्वतःचें रिव्हॉल्व्हर त्याच्या हवालीं केलें.

त्या दिवशीं संध्याकाळीं बोरोव मॉइखच्या घरीं गेला. "चल, लिगेशनमध्यें आपण यावर बोलूं" असें त्यानें सांगितलें, पण मॉइखनें आमंत्रण नाकारण्याची सावधगिरी दाखवली. मॉइख जर गेला असता तर लुवित्सा रिबारप्रमाणें त्याला पळवून, ओझ्नाच्या (ओ. झेड. एन. ए.) तावडींत दिलें गेलें असतें. बोरोवनें पुढें रायक खटल्याच्या वेळीं सांगितलें कीं—"तूं आपल्या प्राणांशी खेळत आहेस" असें मॉइखला सांगण्यांत आलें. दोघांत भांडण जुंपलें. अखेर बोरोवनें म्राझोविचचें रिव्हॉल्व्हर काढून मॉइखला गोळी घातली व तो पळून गेला.

पण वोरोवनें खून करण्यांत गडबड केली. वोरोव बाहेर पडतो तो मॉईखची मैत्रीण येत होती तिला तो दिसला. ती पहाते तों मॉईख रक्ताच्या थारोळ्यांत पडलेला होता. पण तो अजून जिवंत होता. " वोरोवनें तुला मारलें काय ? " या तिच्या प्रश्नाला त्यानें " होय, " असें उत्तर दिलें व प्राण सोडला.

त्या बाईनें नंतर पोलिसांत वर्दी दिली व बोरोवला पकडण्याची तयारी झाली. पण त्यानें युगोस्लाव लिगेशनचा आश्रय घेतल्यानें त्याला संरक्षण मिळालें व तो बाहेर पडेना.

या नंतर हंगेरियन व युगोस्लाव सरकारांत पत्रापत्री झाली. हा निसटूं नये, म्हणून लिगेशनवर कडक पहारा बसविण्यांत आला. अखेरीस बोरोवला पोलिसांच्या हातीं देण्यांत आलें व त्याची तुरुंगांत रवानगी झाली. रायक-ब्रांकोव खटल्यांत तो पुढें महत्त्वाचा साक्षीदार ठरणार होता.

कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोचा ठराव प्रसिद्ध झाल्यावरोवर, हंगेरींतील हेर गटाला जर मुख्य असें कोणतें काम देण्यांत आलें असेल तर तें म्हणजे, टीटोतर्फी चौफेर प्रचार करणें हें होय. पण हें आतां पूर्वी इतकें सोपें राहिलें नव्हतें, कारण टीटोला आतां आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीनें वाळींत टाकलें होतें. बेलग्राद-मध्यें निरनिराळ्या भाषेंत छापलेलें प्रचार-वाङ्मय जनतेच्या लोकशाही राज्यांत फक्त बेकायदेशीरपणेंच येऊं शकत होतें. हें साहित्य हंगेरीस आणण्याच्या कामांत जनरल जॉर्ज पाल्फिची मदत घेण्यांत आली.

" ज्या जागेंतून हें प्रचार-वाङ्मय हंगेरींत छपवून नेतां येईल अशा सरहद्दी-वरील जागा निवड, " म्हणून झोकाली या युगोस्लाव लिगेशन अधिकाऱ्यानें पाल्फिला सांगितलें. पाल्फि हंगेरीयन लष्कराचा फ्रॉंटियर गार्डप्रमुख असल्यानें त्याला हें सहज जुळवितां आलें. ट्रान्स-दान्युबियांत तीन व दान्युब आणि तिस्झा-मध्यें दोन अशा एकंदर पांच जागा त्यानें निवडल्या. या ठिकाणांची भौगोलिक रचनाच अशी होती कीं प्रचार-वाङ्मय छपवून नेणें विशेष सोपें होतें, कारण त्या ठिकाणीं आधींच गार्डांची संख्या कमी होती व पाल्फिच्या हुकूमांवरून ती ती आणखी कमी करण्यांत आली.

पाल्फिला हातभार लावावा, म्हणून युगोस्लाव लिगेशननेंच प्रचार-वाङ्मयाचे भारेच्याभारे आणायला सुरवात केली. वाङ्मय गोळा करण्यासाठीं लाझार तोर्बिका नांवाच्या लिगेशन अधिकाऱ्याला बेलग्रादला पाठविण्यांत आलें. तो

जें साहित्य घेऊन आला तें बोरोवच्या प्रेस खात्यातर्फे हंगेरींत वाटण्यांत आलें. ज्यांना हें वाटायचें त्यांचीं नांवें-पत्ते वगैरेची यादी तिबोर स्झोनीनें दिली.

पण हंगेरीयन जनतेवर विशेषतः हंगेरीयन कम्युनिस्टांवर, टीटोच्या बाजूनें वजन पाडायच्या या सफाईच्या कारवाया फुकट गेल्या. कारण इन्फर्मेशन ब्यूरोचा ठराव सर्वत्र पार्टींत अभ्यासला जात असून त्याचा अर्थ संपूर्णपणें समजला होता.

## प्रकरण बारावें

# पाक्सची अखेरची भेट

ऑगस्टमध्यें ब्रांकोव बेलग्रादला गेला, तेव्हां इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावा-मुळें जी परिस्थिती निर्माण झाली होती, तिच्याविषयीं त्याचें व रांकोविचचें बोलणें झालें. त्यांच्या या संभाषणाचें सार असें निघालें कीं, पुढें हंगेरींत कसें काय काम करावयाचें याची चर्चा करण्यासाठीं रायकनें रांकोविचची भेट घ्यावी. बुदापेस्तला येतांच ब्रांकोवनें रायकला रांकोविचचा निरोप दिला; रायक भेटीस तयार होता पण त्याच्या मतें ही भेट गुप्तपणें व हंगेरीच्या हद्दींतच व्हावयास पाहिजे होती.

रायकचें असें मत असायला कारणें अगदीं साधीं होती. जूनपासून युगोस्लाव मुत्सद्यांबद्दल सर्वत्र संशयाचें वातावरण निर्माण झालें होतें. अशा परिस्थितींत या दोन मंत्र्यांच्या भेटीविषयीं सरकारांत व पार्टींत प्रश्न विचारले गेले असते. जूननंतर संयुक्त हंगेरीयन वर्कर्स पार्टी स्थापन झाल्यापासून रायकचे अनेक इमानी साथीदार स्थानभ्रष्ट झाले होते; ठरावाची चर्चा चालू असल्यानें, जनता, युगोस्लावची व त्याच्या प्रमुख पुरस्कर्त्यांचीं अलिकडचीं कांहीं कृत्यें पुनः तपासून पहात होती.

एवढेंच नव्हे तर ५ ऑगस्टच्या घटनेनें कारस्थानाला भयंकर जबरदस्त धक्का बसला. सरकार व हंगेरीयन वर्कर्स पार्टीच्या पुढारीपणाच्या निर्णयान्वयें रायकची गृहमंत्र्यांच्या जागेवरून परराष्ट्र-मंत्र्याच्या जागेवर बदली करण्यांत आली.

तसें पाहिलें तर या बदलीमुळें रायकला मागें खेंचण्यांत आलें असें नव्हे, पण रायकच्या दृष्टीनें हा बदल म्हणजे घातच होता. आतां यापुढें त्याचा पोलिस व अंतर्गत सुरक्षासंस्थावर प्रत्यक्ष ताबा चालूं शकत नव्हता. पण त्यापेक्षां धोक्याची गोष्ट म्हणजे, त्याच्या जागेवर आलेला नवा मंत्री रायकनें कशा तऱ्हेच्या माणसांना गोळा केलें हें पाहून संशय घ्यायचा. कारण रायकच्या खात्यांत वरिष्ठ अधिकाराच्या जागेवर एकाही कामगाराला नेमण्यांत आलें नव्हतें ज्यांचे राजकीय पूर्वचरित्र संशयास्पद होतें अशा लोकांचीच महत्वाच्या जागयावर स्थापना करण्यांत आली होती

आपल्याला रायकचा संशय आला आहे, असें वर्कर्स पार्टीच्या पुढाऱ्यांनीं कोणत्याही प्रकारें दर्शविलें नव्हतें. पण रायकच्या स्वतःच्या मनांतच चांदणें अ ल्यानें त्याला संशयपिशाच्च सर्वत्र भेडसावीत होतें. आपल्याला परराष्ट्रीय पदावर नेमण्यांत आलें हें जरी प्रत्यक्ष संशयामुळें नसलें, तरी सावधगिरी म्हणूनच खात्रीनें नेमलें असलें पाहिजे, असें त्याच्या मनानें घेतलें. पण ही सावधगिरी कां बाळगण्यांत आली असावी ? सावधगिरीचें मूळ संशयांत असतें– म्हणजे प्रथम आपल्यांविषयीं यांना कांहीं तरी संशय आले असले पाहिजेत.....

× × ×

रांकोविच रायकला हंगेरींत भेटण्यास तयार झाला व त्याप्रमाणें तयारीस लागण्याच्या संस्थेत सूचना देण्यांत आल्या. या दोघांची ही तिसरी भेट घडवून आणण्याची योजना व तिची अंमलबजावणी, यावरून या कटवाल्यांनीं आपलें षड्यंत्र किती व्यवस्थितपणें सुसज्ज ठेवलें होतें हें दिसून येतें.

ऑक्टोबरच्या आरंभीं रायकनें पालिकला बोलावून सरहद्द ओलांडण्याची तयारी करण्यास सांगितलें. गार्डांनीं हटकल्याशिवाय जेथें मोटरगाडी सरहद्द ओलांडून जाऊं शकेल अशी जागा त्यांना हवी होती. हंगेरियन हद्दींत कुणाला संशय येऊं नये म्हणून मोटरवर हंगेरीयन नंबरप्लेट्स लावावी. ट्रान्स-डान्यूबियांत शक्य तितकी पूर्वेच्या बाजूस कोठें तरी ही ओलांडण्याची जागा असावी; हें काम दिवसाढवळ्या झालें पाहिजे व लगेच त्या मोटरनें हंगेरीची हद्द उलटून परत जावें.

पालिकचें म्हणणें पडलें, कीं हें सगळें जुळूं शकेल; तीनचार दिवसांनीं त्यानें अशी बातमी आणली कीं, मोहाक्सच्या दक्षिणेस दहा ते वीस किलोमीटरवर

उद्वार नांवाचें खेडें आहे व तें या कामाला उपयोगी पडेल. उद्वारच्या उत्तरेस दोन किलोमीटरवर, हंगेरींतील इस्झेक ते मोहाक्स रस्ता सरहद्दीला समांतर आहे–त्याच्या म्हणजे हंगेरीच्या हद्दीपलिकडे युगोस्लावची शेतें आहेत. व तिथून अनेक वाटा आहेत. हंगेरीच्या सरहद्दींत घुसणें सोपें आहे. कसें ? तर युगोस्लावियांतून शेताच्या या वाटेपर्यंत मोटर आणायची. मुख्य रस्त्यांवर थांबायचें; हा मुख्य रस्ता म्हणजेच हंगेरी-युगोस्लावियाची सरहद्द, आणि कुणी पहारेकरी नाहींत अशी खात्री करून घेऊन, रस्त्यावरून सरळ हंगेरींत घुसायचें.

या भागांतील गार्डांची संख्या कमी करावी, व रोज दोनच गार्डांचा पहारा ठेवावा, अशी पाल्फिनें व्यवस्था केली होती. अशा रीतीनें अडथळा शक्य तों होणारच नाहीं, याची पूर्ण काळजी घेण्यांत आली होती.

या रीतीनें रांकोविच व त्याचे दोन साथीदार यांनीं, हंगेरींत सरहद्द ओलांडून प्रवेश केला. पण या भेटींत काय झालें तें पहायच्या आधीं थोडें मागें जाऊन एक निराळीच घटणा सांगितली पाहिजे. ती म्हणजे हंगेरींतील युगोस्लाव मंत्री, कार्लो म्राझोविच् याचें प्रेमप्रकरण ही होय.

हा मंत्री दिसायला मोठा सुंदर उमदा तरुण होता. या युगोस्लाव मुत्सद्याचें लक्ष जॉर्जी तारिझ्न्यास नांवाच्या एका साध्या मास्तरणीवर जाऊन तिच्यावर त्याचें प्रेम जडलें. तिचा बाप युगोस्लाव हद्दीजवळील पाक्स गांवाचा कारकून होता व ती त्याच गांवांत शिकवीत असे

पाक्सनजीक बिरीतोपुझ्ता नांवाचें शिकारीसाठीं राखलेलें रान होतें. अँतल क्लाइन नांवाच्या जुन्या श्रीमंत गृहस्थाच्या मालकीचें हें रान; जुन्या हंगेरीच्या या अवशेषाला, क्लाइनला, १९४७ च्या मे महिन्यांत दिन्येस सरकार अधिकारावर आलें तेव्हांपासून, त्यांच्यापैकीं कमी क्रांतिकारक असलेल्या सभासदांना इथें शिकारीस बोलाविण्याचा नाद होता. शिकारीला कधीकधीं मुत्सद्दीसुद्धां यायचे; आणि क्लाइन, जुन्या जमान्यांतला असल्यानें या परकीयांशीं त्यांच्या भाषेंत कुणी बोलण्यासारखा आहे का हें शोधूं लागला. जॉर्जी तारिझ्न्यासला कांहीं भाषा बोलतां येत असत म्हणून १९४८ च्या जानेवारींत तिला क्लाइननें बोलावलें. यावेळीं म्राझोविच् हजर होता.

जॉर्जी व युगोस्लाव मंत्री यांच्यांत कसलें नातें होतें याचा कयास बांधणें व्यर्थ आहे. बुदापेस्तला पोलिश लिगेशननें पार्कक्लबमध्यें मेजवानी दिली

त्यावेळीं पुनः या दोघांची भेट झाली. यानंतर म्राझोविच अनेकदां पाक्सला तिच्या घरीं गेला होता. त्यांचें लग्न होणार अशी गांवांत वातमी पसरली होती.

सप्टेंबर महिन्यांत ती शाळेंतून घरीं येत असतां म्राझोविच् तिला घरापाशीं भेटला. दोघे वॉमन-रेस्टॉरंटमध्यें गेले. तिथें क्लाइन जेवत होता. म्राझोविच म्हणाला कीं, इन्फर्मेशन ब्यूरोचा हा ठराव पास झाल्यापासून मला हंगेरियन दोस्तांना भेटणें मुष्किल झालें आहे. तेव्हां मी माझ्या दोस्तांना घेऊन शिकारीला आलों व तुझ्याकडे आलों तर चालेल का ? असें त्यानें क्लाइनला विचारलें. माझ्या बरोबर जॉर्जी येईल का ? त्याच्या दोन्ही प्रश्नांना होकार मिळाला.

रायक खटल्याच्यावेळीं अँतल क्लाइननें जी जबानी दिली त्याचा कांहीं भाग आम्ही पुढें देत आहोंत.

"म्राझोविच् म्हणाला: "मी माझ्या मित्रांना घेऊन येणार आहे तेव्हां तूं तुझी गाडी घेऊन ये व बुडापेस्त-झेकस्झार्डरोडवर, ११६ व्या किलोमीटर-जवळ, ६ नं. रस्त्यापाशीं जेथें वाट रस्त्याला मिळते तेथें थांब. त्यापुढें रेताड जमीन असल्यानें मोटार जाऊं शकत नाहीं म्हणून तो आल्यानंतर मी त्याला माझ्या गाडींतून पुढें न्यावें. शिवाय तो वेष बदलून शिकारीला येणार असल्यानें मी स्वतःच गाडी चालवावी. या सर्व गोष्टी करण्याचें मी कबूल केलें.

"नंतर कांहीं दिवसांनीं ऑक्टोबरच्या सुरवातीस मी माझी गाडी घेऊन ठरल्यावेळीं सहा नंबरच्या रस्त्याजवळ गेलों. सुमारें अर्ध्या तासानंतर म्राझोविच् आला. त्याच्याबरोबर हिरवा कोट घातलेला व काळा चश्मा लावलेला एक अनोळखी इसम मोटारींतून उतरला. ते दोघेही माझ्या गाडींत बसले. मी त्यांना बिरितोपुझ्तापर्यंत नेलें. इमारतीपासून बऱ्याच अंतरावर मी गाडी उभी केली.

"जॉर्जी लारिझ्न्यासला घेऊन दोघे खालीं उतरले व तिनें आणलेले खाण्याचे पदार्थ व दोन बंदुका घेऊन रानांत शिरले. दोन अडीच तासानंतर ते परत आल्यावर त्यांना घेऊन मी मुख्य रस्त्यावर नेऊन सोडायचें असें ठरलें. ते गेल्यानंतर काय झालें तें मला माहित नाहीं. दोनअडीच तासानंतर ते परत आल्यावर मी त्यांना माझ्या गाडींतून मुख्य रस्त्यावर आणून सोडलें."

जॉर्जीनें आपल्या जबानींत सांगितलें कीं, ते राखणदाराच्या झोंपडीपाशीं गेले; शिकारीचे कपडे घातलेला एक बंदुकधारी इसम तेथें त्यांची वाट पहात

उद्वार नांवाचें खेडें आहे व तें या कामाला उपयोगी पडेल. उद्वारच्या उत्तरेस दोन किलोमीटरवर, हंगेरींतील इस्झेक ते मोहाक्स रस्ता सरहद्दीला समांतर आहे–त्याच्या म्हणजे हंगेरीच्या हद्दीपलिकडे युगोस्लावची शेतें आहेत. व तिथून अनेक वाटा आहेत. हंगेरीच्या सरहद्दींत घुसणें सोपें आहे. कसें ? तर युगोस्लावियांतून शेताच्या या वाटेपर्यंत मोटर आणायची. मुख्य रस्त्यांवर थांबायचें; हा मुख्य रस्ता म्हणजेच हंगेरी-युगोस्लावियाची सरहद्द, आणि कुणी पहारेकरी नाहींत अशी खात्री करून घेऊन, रस्त्यावरून सरळ हंगेरींत घुसायचें.

या भागांतील गार्डांची संख्या कमी करावी, व रोज दोनच गार्डांचा पहारा ठेवावा, अशी पाल्फिनें व्यवस्था केली होती. अशा रीतीनें अडथळा शक्य तों होणारच नाहीं, याची पूर्ण काळजी घेण्यांत आली होती.

या रीतीनें रांकोविच व त्याचे दोन साथीदार यांनीं, हंगेरींत सरहद्द ओलांडून प्रवेश केला. पण या भेटींत काय झालें तें पहायच्या आधीं थोडें मागें जाऊन एक निराळीच घटणा सांगितली पाहिजे. ती म्हणजे हंगेरींतील युगोस्लाव मंत्री, कार्लो म्राझोविच् याचें प्रेमप्रकरण ही होय.

हा मंत्री दिसायला मोठा सुंदर उमदा तरुण होता. या युगोस्लाव मुत्सद्याचें लक्ष जॉर्जी तारिझ्न्यास नांवाच्या एका साध्या मास्तरणीवर जाऊन तिच्यावर त्याचें प्रेम जडलें. तिचा बाप युगोस्लाव हद्दीजवळील पाक्स गांवाचा कारकून होता व ती त्याच गांवांत शिकवीत असे.

पाक्सनजीक बिरीतोपुझ्ता नांवाचें शिकारीसाठीं राखलेलें रान होतें. अँतल क्लाइन नांवाच्या जुन्या श्रीमंत गृहस्थाच्या मालकीचें हें रान; जुन्या हंगेरीच्या या अवशेषाला, क्लाइनला, १९४७ च्या मे महिन्यांत दिन्येस सरकार अधिकारावर आलें तेव्हांपासून, त्यांच्यापैकीं कमी क्रांतिकारक असलेल्या सभासदांना इथें शिकारीस बोलाविण्याचा नाद होता. शिकारीला कधीकधीं मुत्सद्दीसुद्धां यायचे; आणि क्लाइन, जुन्या जमान्यांतला असल्यानें या परकीयांशीं त्यांच्या भाषेंत कुणी बोलण्यासारखा आहे का हें शोधूं लागला. जॉर्जी तारिझ्न्यासला कांहीं भाषा बोलतां येत असत म्हणून १९४८ च्या जानेवारींत तिला क्लाइननें बोलावलें. यावेळीं म्राझोविच् हजर होता.

जॉर्जी व युगोस्लाव मंत्री यांच्यांत कसलें नातें होतें याचा कयास बांधणें व्यर्थ आहे. बुदापेस्तला पोलिश लिगेशननें पार्कक्लबमध्यें मेजवानी दिली

त्यावेळीं पुनः या दोघांची भेट झाली. यानंतर म्राझोविच अनेकदां पाक्सला तिच्या घरीं गेला होता. त्यांचें लग्न होणार अशी गांवांत वातमी पसरली होती.

सप्टेंबर महिन्यांत ती शाळेंतून घरीं येत असतां म्राझोविच् तिला घरापाशीं भेटला. दोघे बॉमन-रेस्टॉरंटमध्यें गेले. तिथें क्लाइन जेवत होता. म्राझोविच म्हणाला कीं, इन्फर्मेशन ब्यूरोचा हा ठराव पास झाल्यापासून मला हंगेरियन दोस्तांना भेटणें मुष्किल झालें आहे. तेव्हां मी माझ्या दोस्तांना घेऊन शिकारीला आलों व तुझ्याकडे आलों तर चालेल का? असें त्यानें क्लाइनला विचारलें. माझ्या बरोबर जॉर्जी येईल का? त्याच्या दोन्हीं प्रश्नांना होकार मिळाला.

रायक खटल्याच्यावेळीं अँतल क्लाइननें जी जबानी दिली त्याचा कांहीं भाग आम्ही पुढें देत आहोंत.

"म्राझोविच् म्हणाला: "मी माझ्या मित्रांना घेऊन येणार आहे तेव्हां तूं तुझी गाडी घेऊन ये व बुडापेस्त-झेकस्झार्डरोडवर, ११६ व्या किलोमीटर-जवळ, ६ नं. रस्त्यापाशीं जेथें वाट रस्त्याला मिळते तेथें थांब. त्यापुढें रेताड जमीन असल्यानें मोटर जाऊं शकत नाहीं म्हणून तो आल्यानंतर मी त्याला माझ्या गाडींतून पुढें न्यावें. शिवाय तो वेश बदलून शिकारीला येणार असल्यानें मी स्वतःच गाडी चालवावी. या सर्व गोष्टी करण्याचें मी कबूल केलें.

"नंतर कांहीं दिवसांनीं ऑक्टोबरच्या सुरुवातीस मी माझी गाडी घेऊन ठरल्यावेळीं सहा नंबरच्या रस्त्याजवळ गेलों. सुमारें अर्ध्या तासानंतर म्राझोविच् आला. त्याच्याबरोबर हिरवा कोट घातलेला व काळा चश्मा लावलेला एक अनोळखी इसम मोटारींतून उतरला. ते दोघेही माझ्या गाडींत बसले. मी त्यांना बिरितोपुझ्तापर्यंत नेलें. इमारतीपासून बऱ्याच अंतरावर मी गाडी उभी केली.

"जॉर्जी लारिझ्न्यासला घेऊन दोघे खालीं उतरले व तिनें आणलेले खाण्याचे पदार्थ व दोन बंदुका घेऊन रानांत शिरले. दोन अडीच तासानंतर ते परत आल्यावर त्यांना घेऊन मी मुख्य रस्त्यावर नेऊन सोडायचें असें ठरलें. ते गेल्यानंतर काय झालें तें मला माहित नाहीं. दोनअडीच तासानंतर ते परत आल्यावर मी त्यांना माझ्या गाडींतून मुख्य रस्त्यावर आणून सोडलें."

जॉर्जीनें आपल्या जबानींत सांगितलें कीं, ते राखणदाराच्या झोंपडीपाशीं गेले; शिकारीचे कपडे घातलेला एक बंदुकधारी इसम तेथें त्यांची वाट पहात

बसला होता. या जबानीवरून असें दिसतें कीं, शिकारीच्या बेताविषयीं क्राइननें कोर्टांत कबूल केली, त्यापेक्षां त्याला अधिक माहिती असावी.

मध्यम उंचीचा व सुमारें चाळीशीच्या आसपास वयाचा तो इसम होता. असें जॉर्जीनें त्याचें वर्णन केलें. युगोस्लावियाचा गृहमंत्री रांकोविच याचा फोटो दाखविल्यावर, आपल्याला झोपडीपाशीं भेटलेला शिकारी तो हाच इसम असें तिनें कबूल केलें. खटल्याच्या वेळची तिची जबानी पहा.

" म्राझोविच्नें मला झोपडींतच राहून जेवण तयार करण्यास सांगितलें. याची किंवा गाडींतून उतरलेला दुसरा इसम त्याची व माझी ओळख करून देण्यांत आली नाहीं, याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. झोंपडीपासून दूर परंतु झोंपडीपुढें दोघे येरझारा करीत बोलत होते. मधून मधून ते जवळ येत, तेव्हां त्यांच्यापैकीं एकाला, मी कोणत्या तरी स्लाव भाषेंत बोलतांना ऐकलें. ती रशियन भाषा नव्हती याची मला खात्री आहे, कदाचित सर्ब भाषा असावी. हिरवा कोट घातलेला इसम हंगेरियन भाषेंत बोलत असून, म्राझोविच् दुभाष्याचें काम करीत होता.

" ते जवळ आल्यावर त्यांच्या बोलण्यांतील कांहीं भाग मला समजे. उदाहरणार्थ, म्राझोविच् युगोस्लावियाविषयीं बोलत होता; " आतां उठाव केलाच पाहिजे-' असें म्राझोविच् म्हणाला. तो अनोळखी इसम, त्या स्लाव भाषेंत बोलत असल्यानें, त्याचें म्हणणें मला समजूं शकलें नाहीं. नंतर ते पालिफसंबंधीं, व त्याला संरक्षणमंत्री केलें जाईल, असें म्हणत होते. राकोसी व फर्कास या मंत्र्यांचीं नांवेंसुद्धां त्याच्या बोलण्यांत अनेकदां आलेलीं मी ऐकलीं.

" त्यांचें बोलणें संपल्यावर ते झोपडींत आले व त्यांनीं फराळ केला. आम्हीं गाडीकडे जायला परत फिरलों. तो अनोळखी इसम मात्र, आपल्या दोघां दोस्तांबरोबर झांपापुस्ताच्या दिशेनें निघून गेला. "

पाक्सच्या या मारवरणीला, ( कदाचित् तिच्या नकळत, ) त्या दिवशीं इतिहासाच्या भोंवऱ्यांत खेंचण्यांत आलें. आपल्याशीं कुणी बोलत नाहीं म्हणून मी कानावलें होतें, असें तिनें कोर्टाला सांगितलें. अशा मनस्थितींत ती खाण्याचे पदार्थ तयार करीत असतां, रांकोविच व रायक यांची तिसरी भेट होत होती. लष्करी कटाचें व हंगेरीच्या पुढाऱ्यांच्या खुनाच्या कटांचें कारस्थान शिजत होतें.

या भेटींत, टीटोची युगोस्लावियांत पुढची काय योजना ठरली होती, हें रांकोविच रायकला तपशीलवारपणें समजावून देत होता. या योजनेची प्रत्यक्षांत

कशी अंमल बजावणी झाली तें आपल्याला लवकरच कळेल. युगोस्लाव जनतेला समाजवादाच्या छावणींतून साम्राज्यशाही गोटांत ओढण्याचें काय तंत्र आहे, याची रांकोविचनें रायकला पूर्वकल्पना दिली, एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

युगोस्लावियाच्या नेतृत्वाखालीं बाल्कन फेडरेशन स्थापन करण्याच्या हेतूला इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावामुळें बाध येत नाहीं, बाल्कन फेडरेशन स्थापन करण्याची पद्धत मात्र थोडीफार बदलली पाहिजे, असें रांकोविच म्हणाला. इन्फर्मेशन ब्यूरोचा ठराव पास झाल्यानंतर, आतां जनतेच्या लोकशाही राज्यांत शांततेच्या मार्गानें सत्ता हातीं घेतां येणार नाहीं, असें टीटोचें ठाम मत झालें होतें. लष्करी कटानेंच राजकीय सत्ता बळकवावी लागेल.

पूर्व यूरोपचा व्यापार मारून तेथें आर्थिक दुर्दशा माजविण्याच्या हेतूनें, पश्चिमी राष्ट्रें, मार्शल योजनेच्या नांवाखालीं, आर्थिक दडपण आणीत आहेत इकडे त्यानें रायकचें लक्ष वेधलें. कार्डिनल मिंझेटीनें नुकतीच जी बेकाम सरकार-विरोधी मोहीम चालविली होती, तिचा पुरा फायदा घेतला पाहिजे, असें त्यानें सुचविलें. रांकोविच म्हणाला कीं, हंगेरियन सरकारवर हा जो हल्ला होत आहे, याचें कारण मिंझेटीच्या वैयक्तिक कल्पना किंवा श्रद्धा नव्हे. जनतेच्या लोकशाही राज्यांत समाजवादाची वाढ कशी रोखली जाईल याची व्हॅटिकनला ( रोमच्या पोपमहाशयांना ) मोठी काळजी लागून राहिली होती. मिंझेटीनें चर्चच्या शाळांच्या राष्ट्रीयीकरणाला विरोध केला म्हणून कांहीं महिन्यापूर्वीं पॉक्सपेत्रीला शेतकऱ्यांचें एक छोटेसें बंड झालें; आतांच्या या नव्या मोहिमेमुळें प्रत्येक शहर गांवांत बंडें पेटलीं पाहिजेत.

तुमच्या लष्करी उठावाला सुरुवात झाली, कीं,लगेच तुम्हांला युगोस्लावियाची सशस्त्र मदत मिळेल; हंगेरीयन भाषा बोलणाऱ्या हंगेरियन गणवेश घातलेल्या, युगोस्लाव सैनिकांच्या तुकड्या, सरहद्दीपलिकडे जय्यत तयार ठेवण्यांत येतील, असें तुला सांगायचा टिटोनें मला अधिकार दिला आहे; असें रांकोविचनें, रायकला सांगितलें. रांकोविच पुढें म्हणाला, आणखी पक्का बंदोबस्त म्हणून या तुकड्यांचे अधिकारी सर्व राहतील. सशस्त्र उठावाच्या वेळींच सरकारी अधिकाऱ्यांना कैद करून, राकोसी, फर्कास व गेरो यांना ठार मारणें अत्यावश्यक आहे. अर्थात, यांत धडधडीत पाशवीपणा दिसून येतां कामा नये. त्यांच्यापैकीं एक अपघातांत सांपडला, दुसरा आजारानें वारला, तिसऱ्यानें आत्महत्त्या केली, किंवा पळून जाण्याचा

प्रयत्न करीत असतां त्याला गोळी घालण्यांत आली, असें मागाहून जाहीर करतां येईल.

टीटो या तीन पुढाऱ्यांना महाभयंकर समजत होता, व त्यांना समूळ नष्ट करून टाकण्यांत आलें पाहिजे, असा त्याचा हट्ट होता; व हें काम उरकण्यासाठीं, त्यानें निवडक युगोस्लावज्चीं नांवें सुचवलीं. टीटोच्या मतें हे निवडक इसम, "लोकांना कसें नाहींसें करून टाकायचें हें गनिमी युद्धांतील अनुभवांवरून, शिकून तरबेज झाले होते." इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावाला पाठिंबा देणारांपैकीं ज्यांना अटक झाली होती ते, किंवा ज्यांनीं निसटायचा प्रयत्न केला ते, या अनुभवांविषयीं बोलूं शकतील.

हॉर्थी राजवटींतील फलटणी, जर्मनी व ऑस्ट्रेलियाच्या अँग्लो-अमेरिकन विभागांत होत्या, त्यांच्यांशीं संबंध जोडण्याचें काम चालूं आहे, असें रांकोविचनें सांगितलें. या फलटणी युगोस्लावियांतून हंगेरींत आणल्या जातील व त्या उठावांत भाग घेतील. पुढें खटल्याचे वेळी रायकनें कबूल केलें कीं, अशा फॅसिस्ट फलटणींनीं "ज्या लोकशाही शक्तींनीं त्यांना देशांतून पिटाळून लावलें, त्यांच्याविरुद्ध अत्यंत निर्दय व रानटी अत्याचार केले असते."

हंगेरी, सरहद्दींचा फेरविचार करा असें म्हणते, असा हंगेरीवर पुन्हा आरोप लादावयाचा कट कार्देली-जिलासनें रचला आहे, असें तो म्हणाला. ज्या भागांत हंगेरियन्स वस्ती करून आहेत तो भाग हंगेरींत सामील करावा, अशी हंगेरीची मागणी आहे—हा आरोप लादल्यानंतर, मुद्दामच सरहद्दीवर चकमकी घडवून आणण्यांत येतील, व त्याचें खापर हंगेरियन्सवर फोडण्यांत येईल. या हल्ल्याचें काय झालें तें आपणांला पढें दिसेलच

भेटीनंतर रायक बुदापेस्टला परतला त्यावेळीं तो गांजलेला होता. एका भयानक बंडाचें पुढारीपण घे, म्हणून युगोस्लाव धन्यांची त्याच्यामागें टोंचणी लागली होती. आपल्यावर अगोदरच संशय आला आहे याची त्याला खात्री होती. पण आतां त्याला माघार घेतां येत नव्हती, व सुटकेचाही मार्ग दिसत नव्हता.

ग्रं. क्र. ११८७

## प्रकरण नवावें

# मॉस्कोंतील हेरगिरी

युगोस्लाविया, इतर जनतेच्या लोकराज्यांत हेरांची व उठावांची संघटना करीत आहे, असें रांकोविचनें रायकला पाकरच्या भेटींत सांगितलें होतें. इतकेंच नव्हे तर खरी वस्तुस्थिती अशी होती कीं, युगोस्लावज् मॉस्कोंत ब्रिटन अमेरिकेतर्फे हेरगिरी करीत होते. इन्फर्मेशन ब्यूरोचा ठराव प्रसिद्ध होण्यापूर्वीं युगोस्लाव मुत्सद्यांना दोस्त म्हणून मॉस्कोंत आदरानें वागविण्यांत येत होतें, व त्यामुळें वाटल्यास, हेरगिरी करण्यास त्यांना सवड होती. पण ठरावाच्या प्रसिद्धीनंतर, युगोस्लाव वकिलातीच्या बाबतींत सोवियत अधिकाऱ्यांनीं दक्षता बाळगली, आणि म्हणून येथेंही रांकोविचला, हंगेरियन दोस्तांची मदत घ्यावी लागली.

जॉर्ज पाल्फिनें युगोस्लावज्साठीं जे हस्तक गोळा केले, त्यांत देझसो निमिथ नांवाचा एक लष्करी अंमलदार होता. १९४६ च्या पावसाळ्याच्या सुमारास तो फ्रॉंटियर गार्डसचा चीफ-ऑफ-स्टाफ झाला; १९४७ त त्याचा व ब्रांकोवचा संबंध जोडला गेला व ब्रांकोव मागेल ती माहिती त्याला पुरव, अशा निमिथला सूचना दिल्या गेल्या. मे १९४८ पर्यंत तो हें काम करीत होता व यू. डी. बी. त्याच्या कामावर खूष होतें. कारण शक्य असल्यास त्याला मॉस्कोंतील हंगेरीयन वकिलातींत लष्करी वकील म्हणून पाठविण्यांत यावें, अशी मे महिन्यांत यू. डी. बी. नें पाल्फिला विनंति केली.

पाल्फि लष्कराच्या राजकीय विभागाचा प्रमुख असल्यानें, त्याच्या शिफारसीवर निमिथची बदली झाली. जाण्यापूर्वीं, मॉस्कोंतसुद्धां युगोस्लावज्साठीं हेरगिरीचें कार्य चालू ठेव, अशी सूचना त्याला मिळाली. युगोस्लावनां ( व अमेरिकन ) हेरखात्याला मॉस्कोंतून काय माहिती हवी होती ? सोवियत सेनेची संघटणात्मक रचना, शस्त्रास्त्रें, पुरवठ्याची परिस्थिती, व शिस्त, यासंबंधीं त्यांना माहिती हवी होती.

निमिथनें मॉस्कोंतील आपल्या कामाची, रायक खटल्याचे वेळीं दिलेली माहिती पहा:—

मॉस्कोंत १९४९ च्या वसंतऋतूंत मी, युगोस्लाव वकिल कार्लो म्राझोविच याच्याशीं संबंध जोडले. ( या सुमारास म्राझोविचची बुदापेस्तहून मॉस्कोंत

बदली झाली होती. रायक खटल्यांत त्याची हेरगिरी बाहेर पडल्यानें, ऑक्टोबर ४९ मध्यें सोविएत सरकारनें, सोवियत युनियनमधून याची उचलबांगडी केली जावी, अशी मागणी केली. ) आमची पहिली भेट एका मेजवानीच्या प्रसंगीं झाली. म्राझोविच्, पालिफ, ब्रांकोवचा, उल्लेख करून म्हणाला, "युगोस्लाव हेरखात्याच्या हुकूमावरून व तर्फे-मी तुझ्याशीं संबंध जोडणार आहे" नंतर पालिफनें मला काय सूचना दिल्या त्याची चौकशी केली. तें सांगितल्यावर, या सूचनांच्या आधारावरच तो म्हणाला कीं, आतांपर्यंत तूं जी माहिती गोळा केली आहेस ती मला दे.

"दुसरी भेटसुद्धां आम्ही मेजवानीच्याच वेळीं ठरवली होती; तेव्हां सोवियत सेनेबद्दल, मी जी माहिती गोळा केली होती, ती त्याला बंद लखोट्यांत घालून दिली. गुप्तपणा राखण्याच्या दृष्टीनें, आपण नेहमींच या मेजवान्यांचे वेळीं भेटत जाऊं व कुणाचें लक्ष वेधून न घेतां या खास संधीचा एकमेकांशीं बोलण्यासाठीं फायदा घेऊं, असें म्राझोविच् म्हणाला.

"सो. यु. च्या लष्करी मंत्रिमंडळाच्या अधिकाऱ्यांपासून सोवियत लष्कराविषयीं गुप्त माहिती मिळविण्याची खटपट कर; तसेंच जनतेच्या लोकशाही राज्यांच्या लष्करी वकिलांची, व हंगेरियन वकिलातींतील इतर अधिकाऱ्यांची टीटोच्या धोरणाबद्दल राजकीय मतें काय आहेत, याचा शोध काढ—असें म्राझोविच्नें मला सांगितलें.

"सो. यु. च्या व जनतेच्या लोकशाही-राज्याच्या लष्करी वकिलांनीं माझ्यावर, दोस्तराष्ट्राचा लष्करी वकील म्हणून विश्वास टाकल्यानें, मला ही माहिती मिळवितां आली. पुढच्या भेटींत मी ही माहिती लखोटाबंद करून त्याला दिली व शिवाय तोंडी सांगितली: ही सारी माहिती सर्वस्वी अत्यंत गुप्त स्वरूपाची होती."

त्याचा युगोस्लाव हेरखात्याचा, साम्राज्यवादी राष्ट्रांना किती उपयोग होतो हें पहाण्याच्या दृष्टिनें निमिथचें उदाहरण उद्बोधक आहे. इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावाच्या प्रसिद्धीमुळें, परदेशांतील यू. डी. बी. कशी हुळीपांगळी झाली, व हा ठराव साम्राज्यवादी राष्ट्रांना किती जबरदस्त टोला होता, हें यावरून दिसून येतें.

# प्रकरण चवदावें

# लाझार ब्रांकोवचा पश्चाताप

२७ ऑक्टोबरला, बुदापेस्तमध्यें अशी घटना घडली कीं, ज्यामुळें हंगेरियन वर्कर्स पार्टीतील सगळे कटवाले हादरून गेले. त्या दिवशीं कित्येक युगोस्लाव अधिकाऱ्यांनीं आपण टीटोपासून फुटून बाहेर पडल्याचें जाहीर-पत्रक काढलें, व कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावाला पाठिंबा जाहीर केला.

ही घटणा घडावी, यांत कांहीं नवल नव्हतें, कारण जगांतील अनेक युगोस्लाव कम्युनिस्टांनीं, अगोदरच हें केलें होतें. पण यादींतील पहिलें नांव वाचून कटवाल्यांचें धाबें दणाणलें. लाझार ब्रांकोव हें तें नांव.

आपल्याला ठाऊक आहे कीं, ब्रांकोव हा बुदापेस्तमधील यू. डी. बी. प्रमुख होता. म्राझोविच्च्या गैरहजेरींत, तो लिगेशनचा मुख्य अधिकारी बनला होता. ब्रांकोव तर अगदीं पहिल्यापासून या कारस्थानांत होता व त्याला कटाची इतकी माहिती होती कीं, तिच्या जोरावर तो आज कमींतकमी वीसजणांना तुरुंगांत डांबूं शकत होता. ब्रांकोव बोलेल का ?

पण ही भयाण अनिश्चितता चार दिवसांनीं विकोपास गेली. हंगेरियन वर्कर्स पार्टीच्या मुखपत्रांत--झाबाद न्येप-मध्यें—ब्रांकोवचे स्वदस्तुरचें लांबलचक निवेदन प्रसिद्ध झालें. त्यांत टीटोवर सरळ तडफदार हल्ला चढवला होता, व युगोस्लावियांत चाललेल्या दडपशाहीबाबत, कांहीं नवी माहिती उजेडांत आणली होती. सगळ्या कारस्थानाचें वाटोळें व्हायची वेळ आली—हें उघड होतें.

"ब्रांकोवनें लिहिलें:-" जगांतील कम्युनिस्ट पक्षांना, बोल्शेविक आत्मटीका करून, आपलें कार्य तपासण्यास व त्यांत कांहीं दोष आहेत कीं काय हें पाहण्यास, इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावामुळें मदत झाली व उत्तेजन मिळालें."

"या ठरावाचा परिणाम म्हणून, युगोस्लावियाची कम्युनिस्ट पार्टी वगळल्यास, जगांतील इतर सर्व कम्युनिस्ट पक्ष, मोठ्या कळकळीनें, आपल्या कार्याचा दर्जा वाढविण्यास लागले......टीटोगट मुख्य प्रश्न बाजूला डावलून, "अपमान"-व "राष्ट्राची इज्जत"-याबद्दल वटवट करीत आहे. सो. यु. युगोस्लावियांत समाजवादाच्या बांधणीस अडथळा आणीत आहे. असा गलिच्छ

आरोप करून, टीटोगट बेइमानपणें आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीच्या पाठींत खंजीर खुपसत आहे."

इथपर्यंत मामला भयानकच होता–पण त्याच्याही पुढें आणखी कांहीं घटणा चव्हाट्यावर येणार होत्या.

"आमचे विजय, विशेषतः लोकयुद्धांत आम्ही मिळविलेले विजय, त्याबद्दल जगांतील जनतेनें केलेला आमचा गौरव, यावरून आमची हळूहळू अशी समजूत होऊं लागली कीं, आम्ही इतर लोकांपेक्षां श्रेष्ठ आहों. परिणाम असा झाला कीं, आमच्या कार्यांत सावधगिरी सैल पडूं लागली; आमच्या देशाची पुनर्रचना करण्याच्या कार्यांत, आमच्या हातून ज्या चुका घडत होत्या, त्या आम्हांला दिसल्या नाहींत.—आमची झोंप उडविण्यास सणसणीत चपराक लगावावी लागली...टीटोगटानें युगोस्लाव जनतेच्या राष्ट्रीय व राजकीय स्वातंत्र्याला सुरुंग लावला आहे.

"टीटोगटाच्या प्रमुख व्यक्तींशीं गेल्या कांहीं महिन्यांत, माझी जी कांहीं बोलणीं झालीं त्यावरून, त्यांना एकाच गोष्टीचा ध्यास लागून राहिला आहे ती म्हणजे, इतर कम्युनिस्ट पार्टींत म्हणा, किंवा पार्टी पुढाऱ्यांत म्हणा, सोविएत-विरोधी मतें असलेले कोण लोक आहेत व अशांशीं संधान कसें जुळवतां येईल?

"कट्टर आंतरराष्ट्रीय धोरणामुळें युगोस्लावियांत ज्यांना अटक झाली आहे किंवा मारले गेले आहेत व युगोस्लावियांतील वाढत्या राक्षसी दडपशाही-मुळें जे देश सोडून पळाले आहेत अशा कॉमरेडसनां बदनाम करा, अशा अर्थाच्या खाजगी तारा, रांकोविचनें निरनिराळ्या ठिकाणीं पाठविल्या आहेत. या पत्रकावर सह्या करणारे कॉम्रेडस व मी— आम्ही टीटोचे विश्वास-घातकी धोरण मान्य करण्याचें नाकारलें, म्हणून रांकोविचनें आमच्यावर पैसे खाल्याचा आरोप केला आहे, पण मी किंवा माझे कॉमरेडस कधीं खजीनदार नव्हतों, किंवा खातां येईल असा सार्वजनिक निधी, आमच्या हातांत कधींही नव्हता.

"रांकोविचचे ठग, कायदा गुंडाळून ठेऊन, लोकांना ठार मारतात, व नंतर ते देश सोडून गेले असा रिपोर्ट करतात. ज्यांना अटक झाली आहे किंवा ज्यांना ठार मारण्यांत आलें आहे, त्यांच्या नातेवाईकांना, तुम्ही चौकशी न करणेंच बरें, असें कळविण्यांत आलें आहे. स्वातंत्र्ययोद्धा कर्नल-जनरल असों योहानोविच याला हुकुमावरून ठार करण्यांत आलें; नंतर, त्यानें हद्द

ओलांडून पळून जाण्याचा प्रयत्न केला, असा फार्स करण्यांत आला. यू. डी. बी. अधिकाऱ्यांनीं हें नाटक केलें, व त्याबद्दल त्यांना बढती मिळाली.

"युगोस्लावियाचे तुरुंग, जे आंतरराष्ट्रीय कामगार चळवळींशीं एकनिष्ठ राहिले अशा कम्युनिस्टांनीं भरले आहेत. जुन्या युगोस्लावियन राज्यांमधील "ग्लावन्याचा" या कुप्रसिद्ध तुरुंगांत, आंद्रिया हेब्रांग व श्रेतेन झ्यूजोविच, या पोलिट-ब्यूरोच्या सभासदांना, व लोकप्रिय पुढाऱ्यांना डांबण्यांत आलें आहे. वोझा ल्यूकोविच, मॉंटेनिग्रो सरकारचा उपपंतप्रधान, व आपल्या जागेचे राजीनामे दिलेले, मॉंटेनिग्रो व बॉस्निया सरकारचे सभासद हे इतरां-बरोबर आज तुरुंगांतच आहेत.

"देशांतील सारे तुरुंग, पार्टीच्या, गांव शहर व जिल्हाकमिटीच्या सभासदांनीं भरलेले आहेत. तानजुग (युगोस्लाववृत्त संस्था) या संस्थेचा डायरेक्टर, सिमा बालेन, ट्रेड युनियन्सच्या सेंट्रल कमिटीचा सभासद ज्यूरो स्पोलारिच्, "स्वातंत्र्ययुद्धांतील वीर"—या पुस्तकाचा लेखक कॉमरेड शोत्रा, वोज्वोदिना कंट्रोल-कमिटीचा सेक्रेटरी, कॉ. नोवाकोव–यांना अलिकडे अटक करण्यांत आली आहे.

"जनतेच्या लोकशाही राज्यांचे, युगोस्लावियच्या भूमीवर हक्क आहेत व त्यांना सोवियत युनियनचा पाठिंबा आहे, अशा अर्थाचा खोटानाटा प्रचार देशांत चालला आहे. टीटोगटानें जनतेचें व हजारों पार्टी सभासदांचें रक्त सांडून सत्ता बळकावली आहे, व आतां त्याला, आंतरराष्ट्रिय कामगार चळवळीची विचार-सरणी मोडून काढून, आपल्या देशाला साम्राज्यशाहीच्या गोटांत न्यावयाचें आहे."

पत्रकाच्या अखेरीस स्तालिन व सो. यु. च्या कम्युनिस्ट पार्टीला, धन्य-वाद दिले होते. कटवाल्यांची घटका भरत आली असल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

पण त्यांना तसें घाबरून जाण्याचें कारण नव्हतें. कारण ३१ ऑक्टोबरला सकाळीं, "झाबाद न्येप" मध्यें, त्यांनीं लाझार ब्रांकोवचें जळजळीत पत्रक वाचलें; तें म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून, बेलग्रादला रांकोविच व बुदापेस्त-मध्यें युगोस्लाव, या दोघांनीं शिजविलेला अत्यंत धूर्तपणाचा व कावेबाजपणाचा डाव होता, हें त्यांना लवकरच समजलें. ब्रांकोव बाजू बदलीत नव्हता. त्याला स्वतःला कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोचा ठराव मान्य नव्हता. परंतु त्याला निर्वा-सित युगोस्लाव कम्युनिस्टांत, आपलें काम चालू ठेवण्यास पाठविण्यांत येत होतें.

ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून, "झाबाद न्येप" मधील पत्रक पुन्हां एकदां वाचा. म्हणजे तें पत्रक आधुनिक इतिहासांतील एक अत्यंत तुच्छतापूर्ण व ढोंगी

पत्रक आहे याची खात्री पटेल. कारण ब्रांकोवच्या पत्रकांत टीटोच्या युगोस्लावियाची खरी परिस्थिती मांडली होती.

टीटोगट उर्मट होता, तो कम्युनिस्ट पक्षांत सोवियत विरोधक हुडकण्यांत दंग होता, आपल्या विरोधकांची धरपकड करून तो त्यांना ठार करीत होता, व कम्युनिस्टांनीं तुरुंग भरून काढीत होता. असो योहा पेत्रिचचा खून करण्यांत आला होता व हेब्रांग आणि झ्यूजोविच यांना तुरुंगांत डांबण्यांत आलें होतें, ही वस्तुस्थिती होती. जवळच्या देशांचा युगोस्लावियावर डोळा आहे असा खोडसाळ प्रचार टीटो करीत होता ही गोष्ट खरी आहे. प्रामाणिक मनुष्यानें हें पत्रक वाचल्यावर तो टीटोपासून फुटून निघाला असता व हें कार्य अधिक चोख व्हावें, म्हणूनच ब्रांकोवनें तें प्रसिद्ध केलें होतें.

× × ×

ब्रांकोवनें खटल्याचे वेळीं जी जबानी दिली ती जर खरी मानली—खरें म्हणजे या मुद्याच्याबावत त्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं—तर "तूं हें धोकेबाज पाऊल पुढें टाक" असें ब्रांकोवला सांगणें व त्याला या कार्यास उद्युक्त करण्यासाठीं त्याचें मन वळवणें रांकोविचला अत्यंत त्रास पडला. तें हें करण्यास काम इतकें सोपें व सहजासहजीं होणारें नव्हतें.

पाकसच्या पुन भेटीनंतर, ऑक्टोबरमध्यें, ब्रांकोव बुदापेस्तला गेला होता. "तूं आपली बाजू बदल–" अशा त्याला सूचना देण्यांत आल्या. ब्रांकोवला बाजू बदलण्यास सांगण्याच्या पोटांत हा हेतू होता कीं, त्यानें निवसित युगोस्लाव कम्युनिस्टांत हेरगिरी सुरू करावी, व शक्य तर अशी माहिती गोळा करावी, कीं जिच्या जोरावर हंगेरीयन सरकार युगोस्लावियाच्या अंतर्गत व्यवहारांत ढवळाढवळ करीत आहे, असें युगोस्लाव सरकारला सिद्ध करतां येईल; शिवाय अशा तऱ्हेनें बाजू बदलल्यामुळें, संशय जागा न करतां, रायकवर नजर ठेवतां येईल.

पण ब्रांकोवपुढें निराळाच पेंचप्रसंग उभा राहिला असल्यानें, त्याची मानसिक अवस्था मोठी बिकट झाली. आतांपर्यंत तो वकिलातीतील मुत्सद्दी असल्यानें, हंगेरीत त्याला अटक होण्याची बिलकुल धास्ती नव्हती. पण रांकोविचचें म्हणणें जर मान्य केलें तर तो देशाच्या बाहेर असलेला युगोस्लाव ठरणार असून, तो हंगेरीयन कायद्याच्या देखरेखीखालीं आला असता. आणि मग हंगेरीयन वर्कर्स पार्टीनें त्याच्यावर राजकीयदृष्ट्या, डोळ्यांत तेल घालून

करडी नजर ठेवली असती, म्हणून तो या बाजू बदलण्याच्या कारस्थानाला सहजासहजीं तयार होत नव्हता.

बुदापेस्तला आल्यावर त्यानें सगळ्या गोष्टींचा सारासार विचार केला; पण रांकोविचचा हुकूम मानण्याची त्याला हिंमत होईना. पंधरवड्यानंतर मुत्सद्देगिरीच्या राजकीय पत्रव्यवहाराच्या बंद लखोट्यांत, त्याला रांकोविचचें पत्र आलें. कांहीं झालें तरी रांकोविच कच्च्या गुरुचा चेला नव्हता. तो पोलिस प्रमुख व हेरांचा दादा असल्यानें तो ब्रांकोवची नाडी पुरी ओळखून होता. आपला कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोला पाठिंबा आहे, असे ब्रांकोव ढोंगीपणानें जाहिर करण्यास जर तयार नसेल, तर त्यानें खरोखरीचाच ब्यूरोला पाठिंबा दिला आहे, असें युगोस्लाव सरकार मानील. युगोस्लावियांतील त्याच्या कुटुंबाविरुद्ध पुढें. उपाय योजावे लागतील. ब्रांकोव भेकड आहे हें रांकोविचला ठाऊक असल्यानें अशा अडचणीच्या प्रसंगीं, धाकदपटशांनींच स्वारी वळेल हें तो ओळखून होता. लगेच २७ ऑक्टोबरला ब्रांकोवनें निवेदन प्रसिद्ध केलें.

यानंतर कांहीं दिवसांनीं, नोव्हेंबरमध्यें, त्याची भेदरलेल्या रायकशी गांठ पडल्यावर, " आतां काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं "–असें त्यानें रायकला सांगितलें. वर्कर्स पार्टी या मुख्य कचेरींत, गॅलरींत कर्मधर्मसंयोगानें त्यांची भेट झाली, तव्हां त्याला हें ऐकायला मिळालें. या अनपेक्षित भेटीच्या प्रसंगीं रायकला दरदरून घाम सुटला, हा या घटणेंतील विनोद आहे. रायक साधा एकमार्गी कटवाला होता, ब्रांकोव त्याच्यापेक्षां सवाई झाला आहे व दुहेरी भूमिका घेतो आहे, हें त्याला अजून माहित नव्हतें.

या काळांत ब्रांकोवची बेलग्रादशीं संबंध ठेवण्याची योजना मोठी गंमतीदार होती. लिगेशनस्टाफमधील एका अधिकाऱ्याला तो ठरल्यावेळीं, गगरहील नजीक उघड्या माळावर भेटत असे. पालिक, रायक, स्झोनी, झालाई, व इतरांशीं संबंध ठेवणें त्याला सोपें होतें. पण तो स्वतः मात्र या प्रकरणांत फारच चवाठ्यावर उघडा होत होता. अटकेपूर्वीं कांहीं क्षण लाझार ब्रांकोव भेदरला, व दुःखी झाला होता.

# प्रकरण पंधरावें

## लष्करी कट तयार झाला

आतां, आपण या आश्चर्यकारक घटनांच्या, अत्युच्च बिंदूच्या जवळ जवळ येत आहोंत. शक्य तितक्या लवकर लष्करी कटाची संघटणा कर, अशा सूचना घेऊन रायक पास्कसहून परत आला आहे. लाझार ब्रांकोवनें टीटोचा जाहीर धिक्कार केला, व तो बुडापेस्तमध्यें राहून कटाच्या तयारीवर देखरेख करीत आहे. स्झोनी व झालाई, आपलीं माणसें कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या खात्यांत मोक्याच्या जागीं घुसविण्याचे प्रयत्न करीत आहेत, व त्याहीपेक्षां आहेत त्या माणसांना, ठेवण्यासाठीं धडपडत आहेत. कारण अशा माणसांना तेथें ठेवणें दिवसेंदिवस कठीण होत चाललें आहे. पुन्हा एकदां जनरल जॉर्ज पालिफ कटाचा मुख्य सूत्रधार म्हणून आपल्या डोळ्यापुढें येत आहे.

आपण मागे पाहिल्याप्रमाणें, १९४८ सालाच्या आरंभापासून कटवाल्यांच्या मार्गात अडचणी निर्माण होत होत्या; १९४९ च्या सुरवातीस लाझ्लो रायकला कटाच्या यशाबद्दल संशय येऊं लागला. आपल्यावर संशय असून, आपल्याला केव्हांहि अटक होईल अशी ब्रांकोवला धास्ती वाटत होती. आपल्यावर, वर्कर्स पार्टीचा खरोखर विश्वास नाहीं, पण विश्वास दाखविण्याचें सोंग करण्यांत येत आहे, अशी ब्रांकोवची भावना होती व ती खरी होती. रांकोविचच्या लोखंडी पंजांत सांपडल्यामुळेंच कटवाले कामें करीत होते. बेलग्रादहून यू. डी. बी. च्या एकसारख्या सूचना व हुकूम येत होते, व ते मोडण्याची त्यांना धास्तीमुळें हिंमत नव्हती.

ऑक्टोबरअखेर व पुनः नोव्हेंबरमध्यें रायकला, ब्रांकोव व युगोस्लाव मंत्री म्राझोविच् भेटले होते. हंगेरींतील संथ प्रगति बेलग्रादला समाधानकारक वाटत नाहीं, असें ते म्हणाले. युगोस्लाव सरहद्दीवर, फलटणींची जमवाजमव करण्यांत आली होती. पण यावर रायकनें आपल्या अडचणींचा पाढा वाचला. ज्याच्यावर मोठी मदार, असा कार्डिनल मिंझेंटी पकडला गेला. हंगेरीयन जनतेचा मोर्चा स्थापन झाल्यानें, सरकारचें सामर्थ्य वाढलें होतें; लष्करी व मुलकी खात्यांची कसून चांचपणी झाल्यानें, रायकचीं माणसें काढून टाकण्यांत आलीं

होतीं. सगळा मामला गुंतागुंतीचा, आणि शिवाय वरतीं रांकोविचचा आडमुठा हेका आहेच.

पण रांकोविच नकार ऐकून घ्यायला तयार नव्हता. १९४९ च्या सुरुवातीस त्यानें रायक, पालफीफच्या मागें सारखी टोंचणीं लावून त्यांना पुढें ढकललें; एकदां बुदापेस्तमध्यें उठावाला नुसती सुरुवात होऊं दे, कीं फलटणीच्या फलटणी सरहद्दींतून घुसल्याच, त्याचवेळीं सोवियत युनियनचें लक्ष आपण दुसरीकडेच वेधून ठेवूं, असें ब्रिटिश अमेरिकन्सनीं खात्रीनें वचन दिलें आहे—त्यांना धीर देऊन उत्साहित करण्यासाठीं रांकोविचनें सांगितलें, व शेवटीं प्रत्यक्ष धमक्या दिल्या.

बुदापेस्त शहरांतील मोक्याच्या जागा, क्रांतिकारक कामगार वस्तीचे विभाग-ताब्यांत घेतील, अशा विश्वासू लष्करी तुकड्यांची यादी तयार करण्याच्या, पालफीला सूचना देण्यांत आल्या. वर्कर्स पार्टी मुख्य कचेरी, संरक्षण व गृहखातें, रेडिओ, "झाबादन्येप" ची कचेरी, प्रमुख रेल्वे स्टेशनें व इतर महत्वाचीं नाकीं व इमारती, हें सर्व ताब्यांत कसें घ्यावयाचें याची पालफीनें तपशीलवार योजना तयार केली. मात्यास राकोसी, अर्नो गेरो व मिखाइल फर्कास–या तीन हंगेरियन वर्कर्स पार्टीच्या पुढाऱ्यांचा खून, ही लष्करी कटाची निशाणी ठरली.

हे खून पाडण्यासाठीं कुणाची नेमणूक करायची? बाराजणांचा एक असे तीन गट तयार ठेवण्याचें काम कर्नल बेला कोरोंडीकडे सोंपविलें होतें. हे गट म्हणजे, हॉर्थीच्या जुन्या पोलिसांतील फॅसिस्ट गुंडाचीं टोळकीं असून, तीन कम्युनिस्ट पुढाऱ्यांना पकडून, त्यांना जागच्याजागीं ठार मारण्याचें काम यांच्यावर सोंपवायला कांहीं हरकत नव्हती. या उलट, रांकोविचचें म्हणणें असें होतें कीं, या कामासाठीं मुद्दाम निवडक युगोस्लाव गट बुदापेस्तला पाठवितां येईल, व त्यांच्यावरच हें काम सोंपवावें. अखेरीस या तीन पुढाऱ्यांचा बेमालूम खून कसा पाडावा म्हणून, तिघांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठीं त्यानें राजकीय खून करण्यांत पटाईत अशा दोन तज्ज्ञांना बुदापेस्तला पाठविलें.

पार्टीच्या राजकीय कमिटीच्या किंवा मंत्र्यांच्या सभेसाठीं, तिघे बुदापेस्तमध्यें हजर असणार, त्यावेळीं कटांतील पहिलें पाऊल टाकायचें असें ठरलें. रायकच्या सूचनेप्रमाणें रात्रीं अकरा वाजतां, तिघेही सभा संपवून घरीं जात असतील, तेव्हां त्यांच्या जिवावर घाला घालण्यांत यावा, असें ठरलें. स्पेशल खुनी तुकड्यांनीं त्यांच्या घरांतील अधिकाऱ्यांवर हल्ले चढवून खून पाडावे. १ मे पूर्वी

रायकचें कोरोंडीशीं या बाबतींत सविस्तर बोलणें झालें असून, हे मारेकऱ्यांचे गट त्यावेळीं तयार असतील, असें कोरोंडीनें सांगितलें.

या अवधींत, पाल्फीनें लष्करी कटाची कडेकोट तयारी ठेवली होती. रात्रीं राकोसी, गेरो, फर्कास यांचे खून पाडायचे, दुसऱ्या दिवशीं, प्रांतांतील निवडक तुकड्या राजधानींत घुसणार-अशी कटाची योजना होती. मध्यंतरी उन्हाळ्यांत पार्टी कॉंग्रेस भरवून, या लष्करी कटावर कायदेशीर शिक्कामोर्तब करवून घेण्यासाठीं, स्झोनीला पार्टी कॉंग्रेसची तयारी करण्यास सांगितलें होतें. ही नकली कॉंग्रेस रायकचें पार्टी पुढारीपण कायम करणार होती.

हें सर्व चालू असतां, म्हणजे नोव्हेंबर १९४८ ते मे १९४९ या काळांत–आम्ही सोवियतचें लक्ष दुसरीकडे गुंतवून ठेवण्यासाठीं कांहीं तरी खुसपट काढूं, असें जें अमेरिकेनें वचन दिलें होतें तें पुरें करण्याची खटपट चालली होती असें दिसतें. १९४८ च्या जूनमध्यें बर्लिन पेंचप्रसंगाला आरंभ झाला. वर्षाअखेरीस लंडन वॉशिंग्टनमध्यें युद्धाच्या धमक्या घुमूं लागल्या. युद्धाचें वातावरण इतकें गंभीर झालें कीं, त्याला विरोध करण्यासाठीं जागतिक शांतता चळवळ जन्मास आली.

रशियावर बॉंबफेंक केली जाईल, सोवियत युनियनच्या हातीं ॲटम बॉंब येण्याच्या आंतच सोवियत युनियनवर युद्ध पुकारलें जाईल, अशा धमक्या वॉशिंग्टनमधील कॉंग्रेसपुढारी उघड उघड देऊं लागले. युगोस्लाव व अमेरिकन्सनीं रचलेले कट सहज घडून यावे, अशा तऱ्हेचें वातावरण मुद्दाम तयार करण्यांत आलें.

बुदापेस्तच्या हंगेरीयन कामकरी जनतेनें, परेडीचा कार्यक्रम आंखून मे दिन प्रचंड उत्साहानें साजरा केला. लाझ्लो रायक, हंगेरीयन वर्कर्स पार्टीच्या पुढाऱ्यांबरोबर, असंख्य जनतेसमोर उभा राहून सलामी घेत होता. मध्येंच रायक उठून पाल्फिसह मागें गेला, व "आतां कट पुढें ढकलणें शक्य नाहीं" असें म्हणाला. बहुतेक अमेरिकन्सशीं बोलून, रांकोविच स्वतः तारीख ठरविणार होता. आपणच तारीख ठरविणार असा त्याचा हट्ट होता—आणि आतां फक्त त्याच्या खुणेचीच सगळे कटवाले वाट पहात होते; केवळ रायकच्याच बाबतींत नव्हे, तर इतरांबद्दल सुद्धां संशयाचें वातावरण दिवसेंदिवस वाढत चाललें आहे, असें दोघांचें आपसांत बोलणें झालें. पार्टीला पाल्फीचाही संशय आल्याचीं चिन्हें दिसत होतीं.

सुशोभित चवुतऱ्यामागें हे दोन मारेकरी खुनी कारस्थानें रचीत बसले होते, तर समोरून हंगेरीची असंख्य आनंदी जनता, उत्साहानें शांततेच्या व समाजवादाच्या घोषणा देत चालली होती.

सरहद्दीवर मुद्दाम चकमकी घडवून आणण्यांत येतील, व त्यांचें खापर हंगेरीयन्सवर फोडण्यांत येईल, असें रांकोविचनें पाक्सच्या भेटींत रायकला सांगितलें होतें, हें आठवत असेलच. या सरहद्दीवरील चकमकी एप्रिलमध्यें झडूं लागल्या.

२५ एप्रिलला रात्रीं, युगोस्लावज्नीं सरहद्दीपलीकडून, दोन हंगेरीयन गार्डस्वर गोळया झाडल्या. चारच दिवसांपूर्वी रात्रीं, हस्तकांची मोठी तुकडी हंगेरींत घुसविण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. हंगेरियन अधिकाऱ्यांनीं सुमारें शंभरांना अटक केली. या तुकड्यांत कोणकोण होते ? तर जर्मनांबरोबर पश्चिमेकडे पळून गेलेले, हॉर्थी राजवटींतील पोलिस, अधिकारी, सैनिक आणि इतर फॅसिस्ट.

या दोन्हीं प्रकरणांच्या बाबतींत, हंगेरीयन परराष्ट्र मंत्रिमंडळानें युगोस्लाव सरकारला तीव्र निषेधाचे खलिते पाठविले होते. रायक परराष्ट्र मंत्री असल्यानें, हें खलिते लिहिण्याचें काम त्याच्याकडे होतें. हीं निषेधाचीं पत्रें, आपल्या कार्याशीं जुळण्यासाठीं, तो पुनः पुनः मसुदे तयार करी व आवश्यक इतकीच राजकीय प्रखरता त्यांत उतरेल, अशी दक्षता घेई. या चिथावणीच्या मुळाशीं रांकोविच आहे; हिचा उद्देश सरहद्दीवरील जनतेंत खळबळ माजवायची व आपण जो उठाव करणार, त्याला याचा पाठिंबा मिळणार, या सर्व गोष्टी रायकला ठाऊक होत्या.

१४ मे रोजीं, ६०० मीटर हंगेरीच्या हद्दींत उभ्या असलेल्या, हंगेरियन सैनिकावर, युगोस्लावियाच्या बाजूनें गोळ्या झाडून ठार करण्यांत आलें. " सुसंस्कृत व लोकशाही युगोस्लावियन जनतेचें सरकार, सरहद्दीवरील असह्य झालेली परिस्थिती नष्ट करण्यासाठीं, सर्व उपाय योजील, अशी साहजिकच हंगेरियन सरकारची अपेक्षा होती. पण प्रत्येकवेळीं, घटणा त्यांच्या डोळ्यांपुढें आणलीं असतांसुद्धां, तिकडे युगोस्लाव सरकारनें दुर्लक्ष केलें–" असें परराष्ट्रमंत्री रायकनें लिहिलें.

३० मे रोजीं युगोस्लावज्नीं पुनः गोळीबार करून, मिक्लोस वेतेसी नांवाच्या हंगेरीयन शिपायाला ठार केलें. पुन्हा एकदां वरवर तिखट भासणारें, पण ढोंगी निषेधाचें पत्र, रायकनें बेलग्रादला पाठविलें.

मे महिन्यांत बड्या चार राष्ट्रांच्या मंत्र्यांची परिषद भरली, व आंतरराष्ट्रिय परिस्थितीचें तंग वातावरण थोडेसें कमी झालें. कटवाल्यांचा डाव हुकला, असें वाटूं लागलें.

पण आतां हंगेरीयन अधिकारी कामाला लागतील, अशी लाझ्लो रायकला पक्की खात्री होती—म्हणून मे महिन्याच्या अखेरीस, किंवा जूनच्या आरंभीं, काम सुरू करावें, असें त्यानें पाल्फि व इतर प्रमुख कटवाल्यांना सांगितलें.

# प्रकरण सोळावें

## धरपकडी

पण आतां हें कारस्थान ठेंचून काढायची वेळ आली आहे, असें अखेरीस अधिकाऱ्यांनीं ठरविलें.

ब्रांकोव, रायकला, आपल्यावर संशय आहे अशी जी शंका होती ती खरी होती. पोलिट-ब्यूरोत सारखी राजकीय चर्चा चालू होती, त्यांत रायकची कसोटी लागत असल्यानें गेले कांहीं महिने त्याला असह्य झाले होते. पार्टीच्या पोलिट-ब्यूरोत तीक्ष्ण व प्रखर बुद्धीचे मार्क्सवादी होते; ते या ढोंगी इसमापेक्षां शतपटीनें अधिक सुसंस्कृत व भेदक राजकीय दृष्टीचे होते; त्यामुळें त्याचीं कृत्यें, रांकोविचनें त्याला घ्यावयास भाग पाडलेलें धोरण; त्याचा तात्विक कच्चेपणा; हरघडी बदलत्या परिस्थितींत या सर्व गोष्टी उघड्या झाल्या व त्याच्यावर प्रथम घेतलेला अंधुक संशय दृढ होण्यास त्यांची मदत झाली. याप्रमाणें जे निष्कर्ष निघत गेले, त्यांना पोलिसांच्या हातीं जी माहिती मिळत गेली त्यामुळें दुजोरा मिळाला.

अखेरीस कटवाल्यांचा नायनाट करण्यासाठीं पोलिसांनीं काळजीपूर्वक रचलेली योजना अंमलांत आणली. १८ मे रोजीं तिबोर स्झोनी व आंद्रास झालाई यांना पकडण्यांत आलें. (झालाईला अटक झाली त्यावेळीं त्याच्या टेबलावर आंद्री सगवारीचा मोठा फोटो ठेवला होता. आंद्री कम्युनिस्ट हुतात्मा असून, त्याला बुदा हॉटेलच्या बागेंत १९४४ सालीं पोलिसांनीं ठार मारलें होतें. जेव्हां पार्टी सभासद झालाईला भेटायला येत, तेव्हां सगवारीच्या फोटोकडे

बोट दाखवून, सगवारीसारखे सच्चे कम्युनिस्ट व्हा, असा तो कठोरपणें आदेश देत असे.)

स्झोनी-झालाई यांची अटक म्हणजे, 'तूं सुद्धां आतां फार दिवस मोकळा राहणार नाहींस' असा रायकला जणूं इशाराच होता. पोलिसांच्या हातीं कांहींही माहिती असो, रायक हा कटाचा मुख्य सूत्रधार आहे व त्याच्या हुकूमावरूनच आम्हीं हें सगळें चालविलें होतें असें हे दोघे ताबडतोब सांगणार हें उघड होतें.

आणि खरोखरीच रायक अवघे बारा दिवसच मोकळा राहिला. सोमवार ता० ३० मे रोजीं पहांटे राहत्या घरीं त्याला मुकाट्यानें अटक करण्यांत आली.

पॉल जस्टसला १८ जूनला पकडण्यांत आलें. तो हंगेरियन रेडिओच्या आपल्या कचेरींत दिवसभर होता, घरीं जात असतां समोर पोलिसांची गाडी आली व त्याच्या शोफरला गाडी रस्त्याच्या बाजूला उभी करण्याची खूण करण्यांत आली, दोन मिनिटांत जस्टस या गाडींत जाऊन बसला व जेलच्या वाटेला लागला.

पण या अवधींत जॉर्ज पाल्फि बुचकळ्यांत पडला, आणखी एक महिना तो तळमळत रहाणार होता. त्याला १८ जुलैला पकडण्यांत आलें. दुसऱ्याच दिवशीं, पूर्वीचा युगोस्लाव मंत्री, यू. डी. बी. चा हंगेरीतील प्रमुख, लाझार ब्रांकोव याची तुरुंगांत रवानगी झाली.

या काळांत लहानसहान कटवाले पकडले जात होते; आपली पाळी चुकेल अशा आशेनें तें वाट पहात होते–पण हें शक्य नाहीं याची त्यांना जाणीव होती–तरी निरनिराळ्या तऱ्हेनें आपण संपूर्णपणें साळसूद आहोंत, अशी ते बतावणी करीत होते.

पकडलेली माणसें ज्यांच्या ओळखीची होतीं, त्यांच्यांत अर्थातच चर्चा सुरू झाली. बाकीचे कटवाले पाचकळपणें बडबडूं लागले. ज्यांनीं राजधानींतील प्रत्येक मंत्रीखातें कबजांत घेण्याचें कारस्थान रचलें होतें, त्याच इसमांनीं सरकारनें कचेऱ्यांच्या सुरक्षिततेसाठीं जे नवे नियम सुरू केले होते त्यांची अत्यंत कसोशीनें अंमलबजावणी करायला सुरवात केली. पंतप्रधानाच्या कचेरींतील एकजण तर सावधगिरीचा मूर्तिमंत आदर्श बनला. पण अशा ढोंगधत्तुऱ्यांनीं पोलिस फसले नाहींत. त्यांनीं त्याला अटक केली. दुसरा एक रेडिओ कचेरींत होता. तो प्रत्येकजण गुन्हेगार आहे अशा दृष्टीनें मस्करीची भाषा वापरून सर्वांस हंसवूं लागला–पण अखेरीस तोसुद्धां पकडला गेला.

पंतप्रधानाची कचेरी, गृहमंत्रीखातें, परराष्ट्रीयखातें, सार्वजनिक हित-संरक्षण खातें, हंगेरियन-सोवियत ऑईल कंपनी, लष्कर, पोलिस, दक्षिण स्लाव फेडरेशन व इतर अनेक संस्थांतून कटवाल्यांना वेंचून काढून पकडण्यांत आलें. ही सगळी साफसुफी व्हायला कांहीं महिने लागले तरी हें काम पक्कें झालें.

आपण या चौकशा कशा केल्या, आपल्याला, दुवे कसे लागत गेले, माहिती कशी मिळाली, हें साहजिकच हंगेरियन पोलिसांनीं उघड केलें नाहीं. पण या पकडलेल्या इसमांपैकीं अनेकजण आपल्या साथीदारांचीं नांवें सांगण्यास व दोष दिसेल त्याच्या माथीं मारण्यास तयार होते. ही एक गोष्ट तर होतीच, पण या काळांत काळजीपूर्वक श्रम घेऊन गोळा केलेला प्रत्यक्ष पुरावा, या दोन्हीमुळें, पब्लिक प्रॉसिक्यूटरला, जबरदस्त व कडेकोट चिरेबंदी अशी केस भरतां आली.

## प्रकरण सतरावें

## " रायक खटला. "

लाझ्लो रायक व त्याचे सात साथीदार यांच्या वरचा खटला, बुदापेस्तला मेटल वर्कर्स ट्रेड युनियनच्या हॉलमध्यें, १६ सप्टेंबर १९४९ ला सकाळीं नऊ वाजतां सुरू झाला. बुदापेस्त जनता कोर्टाच्या स्पेशल कौन्सिलनें हा खटला चालविला, डॉ. पीटर यांको हा कोर्टाचा अध्यक्ष असून त्याच्या जोडीला चार न्यायाधीश होते. राजद्रोह, युद्धगुन्हे, हेरगिरी, हंगेरीतील लोकशाही राज्य उलथून पाडण्याचा कट, हे निरनिराळे आरोप पब्लिक प्रॉसिक्यूटर डॉ. ग्यूला अलापी यानें मांडले. आरोपींनीं बचावासाठीं स्वतःचे वकील निवडले होते.

न्यायाधीशासमोर आरोपींना बसण्यास खुर्च्यांची रांग मांडली होती. रायकच्या बाजूला जॉर्ज पाल्फि, लाझार ब्रांकोव, डॉ. तिबोर स्झोनी, आंद्रास झालाई, मिलान ऑग्येनोविच, बेला कोरोंडी व पॉल जस्टस हे बसले होते. कोर्टांत बुदापेस्तच्या कारखान्यांतील कामगार, कारकून व आसपासच्या खेड्यांतील शेतकरी असे हजारों लोक खटला ऐकण्यास जमले होते. हंगेरीच्या प्रेसशिवाय जगांतील चौदा देशांतील, सत्तेचाळीस पत्रप्रतिनिधी हजर होते.

खटला एक आठवडाभर चालला. त्या नाट्यपूर्ण मानवी प्रसंगाचें चित्र रंगविण्यांत इथें हांशील नाहीं. हा खटला म्हणजे आधुनिक इतिहासांतील एक असामान्य खटला होता. खटल्यांतील कारस्थानाचे लागेबांधे, त्यांचे आंतरराष्ट्रीय परिणाम, आरोपींचे महत्व व जगाची खटल्यावर लागलेली नजर या सर्व दृष्टीनें हा खटला अजोड होता.

आपल्या आतांपर्यंतच्या कथानकांत, खटल्यांतील महत्वाचे भाग राहून गेले आहेत. कारण कारस्थानांतील जे बारिकसारिक तपशील मागें दिले आहेत, ते खुद्द आरोपींच्या व अनेक साक्षीदारांच्या तोंडून बाहेर पडले होते.

आठांपैकीं आठही कटवाल्यांनीं गुन्हा कबूल केला व त्यांना माहित असलेले सर्व कबूल केलें, हें सर्वांना ठाऊक आहे. अशा तऱ्हेच्या राजकीय खटल्यांत या तऱ्हेची कबुली आरोपी देतात-आणि पश्चिमी राष्ट्रांत नेमक्या याच घटनेवर कांही खरे व कांही दुष्ट हेतू-पूर्ण,-असे तर्ककुतर्क लढविण्यांत आले. परंतु तसें पाहिलें तर या कबुलीजबाबांत गूढ असें कांहीं नाहीं.

प्रथम याविषयीं खुद्द डॉ. तिबोर स्झोनी काय म्हणतो तें पाहूं:—

" या ठिकाणीं किंवा माझी पूर्वी चौकशी झाली त्यावेळीं, मी या आरोपाच्या बाबतींत मला जेथें कांही माहित होतें तें, प्रांजलपणें व खुल्या दिलानें सांगितलें आहे. मला अटक होण्यापूर्वींच मी जें कांही करीत होतों तें, बरोबर आहे, अशी माझी खात्री नव्हती. म्हणूनच मला माहित असलेल्या सर्व गोष्टी मी उघड करून सांगूं शकतों. मला माझ्या कृत्यांचा पश्चात्ताप झालेला आहे, व इतक्या उशिरां जितकें शक्य आहे, त्या मानानें माझ्या गुन्ह्यांचें परिमार्जन करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

मला या गोष्टीचा स्पष्ट नामनिर्देश करून त्यावर भर द्यावासा वाटतो. कारण माझा या बाबतींत असा अनुभव आहे, कीं कांही विशिष्ट कंपू व विशिष्ट तज्ज्ञ लेखकांना एक खोड लागून गेली आहे. ती ही कीं, आरोपीचे कबुलीजबाब, औषधें, इंजेक्शनें किंवा सूचना यांच्या जोरावर काढून घेतात, असा हे लेखक प्रचार करीत करीत सुटतात. मी स्वतः डॉक्टर आहें, मज्जातंतुशास्त्राचा माझा अभ्यास झालेला आहे, त्यावरून असे कबुलीजबाब मिळविणें शक्य नाहीं, हें मी सांगूं शकतों व आतां मी हें माझ्या स्वतःच्या अनुभवावरून शिकलों आहे. मग मी हें सगळें कबूल कां केलें ? तर या प्रश्नाचें उत्तर एकच आहे तें म्हणजे, अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याबाबत आतां जेवढें कांही परिमार्जन करतां येण्यासारखें असेल तें करणें हेंच होय. "

लाझार ब्रांकोव आपल्या भाषणाच्या अखेरीस म्हणाला कीं, " मी खरें बोललों, पण जुल्म जबरदस्तीखालीं नव्हे, हें सांगणें जरूर आहे. माझ्यावर जबरदस्तीचा किंवा भूल पाडणाऱ्या औषधाचा प्रयोग केला, असें म्हणणारांना माझें उत्तर पुढीलप्रमाणें आहे. मी सर्व कांही कां सांगितलें, प्रांजलपणें, दिलखुलासपणें, आडपडदा न ठेवतां कां सांगितलें हें जनतेच्या न्यायालयापुढें सांगणें, मी माझें कर्तव्य समजतों. " ( ब्रांकोवची भाषा वेडीवांकडी व बोजड असल्याचें कारण असें कीं तो हंगेरीयन भाषेंत बोलत होता व ती भाषा त्याला मोडकीतोडकीच येते. )

" माझी सदसद्विवेकबुद्धी अतिशय खराब आहे, मी हंगेरीयन जनतेचें जें नुकसान केलें, त्या पापाचें थोडेंतरी क्षालन व्हावें म्हणून मी हें सर्व कबूल केलें," असें सविस्तर स्पष्टीकरण ब्रांकोवनें केलें.

फार उशिरां पश्चात्ताप झालेल्या या इसमांचा कळवळा यायची आपल्याला कांहीं आवश्यकता नाहीं, कारण आपल्या कारस्थानांत ते जर यशस्वी झाले असते, तर त्यांच्या दुर्दैवी बळींबद्दल त्यांनीं तसूभरही दयामाया दाखविली नसती. या इसमांनीं आपले गुन्हे पटापट कां कबूल केले, हा प्रश्न अनेकांना गोंधळांत पडतो, म्हणून त्या प्रश्नाचा आपण विचार केला पाहिजे. आणखी कांहीं सांगण्यापूर्वीं एक मुद्दा नमूद केला पाहिजे तो हा कीं, खटल्याचे वेळीं अनेक परदेशी पत्रपंडित हजर होते, त्यांच्यापैकीं कित्येक विरोधी वृत्तपत्रांचे प्रतिनिधी होते. पण आरोपींवर, औषधें, अत्याचार, शारीरीक छळ यांचा उपयोग करून कबूलीजबाब काढण्यांत आले, असे त्यांच्यापैकीं एकानेंही मानलें नाहीं.

आपल्याला लवकरच देहांताची शिक्षा होणार, या काळजीमुळें आरोपी कसे दिसतील, याबद्दल साहजिकच कुणाचीही जी अपेक्षा असेल, त्यापेक्षां सगळे आरोपी उत्तम अवस्थेंत दिसले, सगळे न अडखळतां सविस्तरपणें भाषणें करीत होते, इतकेंच नव्हे तर त्यांचे सारे स्वभावविशेष आणि लकबी बोलण्यांत दिसून आल्या. त्यांच्यावर जर भूल घालण्यांत आली असती किंवा जर कोणत्याही प्रकारें त्यांचा स्वतःवर तावा राहिला नसता, तर या गोष्टी कशा दिसल्या असत्या ?

औषधें किंवा छळ ही शुद्ध पोरकट वडबड आहे. तसेंच आरोपीकडून कबूलीजबाब उकळण्यासाठीं, त्यांचा मानसिक घात करण्याची जबाबदारी जेलर्सवर

असते, म्हणून ते अनपेक्षितपणें भलतीच दया दाखवितात, असें म्हणणेंसुद्धां त्याचप्रकारचें आहे.

तर मग या आरोपींनीं आपले गुन्हे भराभर कां कबूल केले ? त्याचें एक कारण म्हणजे, त्यांच्यापुढें जबरदस्त व त्यांना पुरा गुंतवून टाकणारा, सुटकेची मुळींच पळवाट नसलेला, अफाट पुरावा मांडण्यांत आला होता. इतकें काळजीपूर्वकपणें गुप्त ठेवलेलें कारस्थान उकरून काढण्याची लायकी ज्या पोलिसांच्या आंगीं आहे, ते पोलिस पुरावा गोळा करण्याचे वेळीं लुळेपांगळे होऊन पडतील, अशी कल्पना करणें मूर्खपणाचें आहे. एकदां वास आला व कटवाल्यांना तुरुंगांत डांबून त्यांच्यावर नजर ठेवली, म्हणजे आत्मघातकी स्वरूपाचा अमर्याद पुरावा ते देणार, हें उघड आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे ध्येयवादी व बंधुभावप्रेरित, अशा माणसांशीं आपली गांठ नसून, एकमेकांच्या उरावर बसणाऱ्या हेरांच्या टोळक्यांशीं आहे. आपला गुन्हा जर थोडाफार कमी ठरत असेल तर हे इसम दुसऱ्याचें नांव न कचरतां बेधडक सांगून टाकतील. कारण बोलूनचालून हे हेरगिरीचा खेळ खेळणारे अट्टल गडी ! यांची उभी हयात बनवाबनवी व बेइमानी करण्यांत गेलेली. हे बेरड, भयंकर गोत्यांत सांपडल्यावर, अचानक अढळ नीतिमत्तेचे पाठ पढतील अशी कल्पनासुद्धां करणें विचित्र आहे.

तिसरी गोष्ट अशी कीं, आपण किती भयंकर स्वरूपाचा गुन्हा केला आहे याचें दडपण सर्वांच्या जरी मनांत नाहीं, तरी कांहींच्या मनांवर खात्रीनें पडलें, यांत संशय नाहीं. हें संभवनीय आहे, हें या पुस्तकाच्या पानापानांवर आढळेल.

आपल्या गुन्ह्यांचें स्वरूप कमी लेखण्यासाठीं कित्येक आरोपींनीं आपण धाकदपटशाहीचे बळी होतों, असें समर्थन केलें. रायक, झालाई व जस्टस यांना प्रथमपासूनच उघडें करण्याची धमकी देण्यांत आली व हेरगिरीच्या निसरड्या नी बुळबुळीत वाटेवर एकदां पाऊल टाकल्यावर, इतरांप्रमाणेंच त्यांना स्वतःला सांवरतां आलें नाहीं, हें खरें आहे. पण याला उत्तर असें आहे कीं, हेरगिरी करण्याची त्यांच्यावर जबरदस्ती करण्यांत आली असेल–पण कम्युनिस्ट चळवळींत व सरकारी नोकरींत घुसून, हळूहळू वरिष्ठ जागा बळकावणें हें काम जबरदस्तीचें नाहीं. पण स्वभावतःच ते जबर महत्वाकांक्षी व सत्तालोलुप असल्यानें ते कम्युनिस्ट चळवळींत व सरकारी नोकरींत घुसले व त्यांनीं वरिष्ठ जागा बळकावल्या.

या इसमांत निवडानिवड करणें म्हणजे उडदामाजी काळेगोरे निवडण्या-सारखेंच आहे. पण त्यांतल्यात्यांत खटला चालू असतांना रायक कांहीं बाबतींत उठून दिसला. रायक म्हणजे अतिशय मोठ्या नायकाच्या प्रमाणांवरील साहसबाज पुरुष होता. हा फांशाच्या पडेल त्या दानावर, सर्वस्व हरायला तयार होता; अखेरीस फांसा उलटा पडल्यावर, एकाद्या सद्गृहस्थाप्रमाणें आपलें झालेलें कर्ज द्यावयास तो तयार झाला. त्यानें दयेची विनंती करण्याचें नाकारलें, त्याच्या वकिलानें वरिष्ठ कोर्टाला अपील करण्याचें योजलें त्याला रायकनें पाठिंबा दिला नाहीं. पण रायक सद्गृहस्थ नव्हता व पब्लिक प्रॉसिक्यूटरनें याविषयीं विदारक विधान केलें आहे.

"हीं कोणत्या प्रकारचीं माणसें आहेत ? कशा तऱ्हेचा गट आहे हा ? " त्यानें विचारलें. "आरोपीच्या पिंजऱ्यांत क्षुद्र, हलकट व अट्टल राजकीय बगलबच्चे आहेत; ऑग्येन्योविच व लाझ्लो रायक यांतील फरक गुणात्मक नसून अंशात्मक आहे; कारण प्रतिक्रांतीच्या अध्यक्षपदाचा उमेदवार म्हणून नव्हे, अट्टल राजकीय बगलबच्चे म्हणून नव्हे, तर भिकार पोलिस खबरी म्हणून रायकच्या आयुष्याला आरंभ झाला. पण या व्यक्तींत केवळ हाच फरक नाहीं, पण त्यांच्यांत जनतेचा द्वेष करणारे, पाल्फि व कोरोंडीसारखे फॅसिस्ट आहेत, त्यांच्यापैकीं कांहीं कामगार चळवळींत घुसलेले, धंदेवाईक देशद्रोही आहेत.

" या सर्वांचा समान धर्म हा कीं, येथें आपली समाजांतल्या गाळाशीं गांठ पडली आहे: १९३० ते ४० च्या वाढत्या फॅसिझमच्या वातावरणांत या सर्वांना आज दिसतें आहे, तें स्वरूप मिळालें. स्झोनी, रायक, जस्टस, झालाई, कामगार चळवळीच्या अगदीं कडेला उचललेले गेले, पण पहिल्या कसोटीच्या प्रसंगीं, भेकड व डळमळीत स्वभावामुळें, मूळ नसलेल्या व्यक्तित्वामुळें ते देशद्रोही बनले.

क्षुद्र कबुलीजबाबांपेक्षां या तऱ्हेच्या माणसांच्या तोंडून निराळें बाहेर पडेल अशी लोकांनीं अपेक्षा केली किंवा अपेक्षा केल्याचें ढोंग केलें हें समजणें कठीण आहे. तत्वशून्यता व पगडी फिरविणें याच्यांत ज्यांची उभी हयात गेली अशा माणसांकडून अशा प्रसंगीं, तात्विक किंवा सुसंगत वागणूक व्हावी अशी अपेक्षा करण्याचा कुणाला काय हक्क आहे ? सातोरा लिआऊझेली तुरुंगांतून पळून जाण्याची योजना ज्यानें फोडली, असा झालाई, आपल्या खटल्याचे वेळीं एकदम बदलून जाईल, व ज्या टीटोच्या विचारसरणीवर आपला विश्वास आहे असा त्याचा दावा होता, त्या कल्पनांसाठीं लढेल हें कसें शक्य आहे ?

१९३१ पासून जो बेइमानी करीत आला तो रायक एकदम बदलेल व आपल्या साथीदारांना सोडून न जाण्याइतकी निष्ठा त्याच्या आंगीं बाणेल हें कसें शक्य आहे ? आपल्या बरोबरच्या कम्युनिस्टांना तो गेलीं अठरा वर्षे पोलिसांच्या हवालीं करीत होता; मग आतां त्रांकोव व पालिफ यांना पोलिसांच्या हातीं द्यायला तो कां कचरेल ? मुसोलिनीचें कौतुक करणारा व फॅसिस्टांच्या तालमींत तयार झालेला पालफीसारखा माणूस, कोर्टांत भांडवलशाहीचा किंवा ज्या फॅसिझमवर त्याचा विश्वास आहे त्या फॅसिझमचा आवेशयुक्त बचाव कसा करील ?

या खटल्यासंबंधीं सर्वांत विचित्र मतें जर कोणत्या वर्तमानपत्रांत प्रगट करण्यांत आलीं असतील तर "न्यू स्टेटसमन अँड नेशन," या पत्रांत होय. नव्या कम्युनिझमबद्दल, मग तो टीटोछाप असो कीं रायकछाप असो—या पत्रांत थोडीफार आस्था दाखविण्यांत आली होती. पण या नव्या राजकीय प्रगतीबद्दल त्यांना खटल्यांत कांहींच पुरावा न सांपडल्यानें त्यांची निराशा झाली. तें कांहीं असो, पण "न्यू स्टेटसमनचा," कारस्थान होतें यावर मुळीं विश्वास बसेना; रायकनें १९३२ सालीं हॉर्थीच्या राजकीय पोलिसांचें काम केलें असेल, हें मानणें, या वर्तमानपत्राला "अतिशय कठीण" आहे असें वाटलें.

पण हें मानणें कठीण कां व्हावें ? कामगार चळवळीचा इतिहास अशा हजारों कच्या व हलकट माणसांच्या कारवायांनीं गलिच्छ केला आहे. या लोकांनीं जें केलें तेंच रायकनें १९३५ सालीं हेत्येनीच्या पोलिस कचेरींत केलें. आणि या बाबतींतील पुरावा म्हणाल तर केवळ रायकचा तपशीलवार कबूलीजबाबच नव्हे, तर लाजोस बोकोर व इतर जुन्या राजवटींतील पोलिस अधिकाऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या साक्षी हा होय. हे जुन्या जमान्यांतील पोलिस अधिकारी, आतां रक्तलांछित सेवानिवृत्तींत पडले असून, रायकनें हेरगिरी करण्याचें लिहून दिलें त्यावेळीं जातीनें हजर होते.

गेल्या अडीचशेंहून अधिक वर्षांच्या इतिहासाचे धडे, "न्यू स्टेटसमन" पत्र कधींही शिकलें नाहीं किंवा त्या धड्यांकडे दुर्लक्ष्य करायचें असें या वर्तमान-पत्रानें ठरविलेलें दिसतें. कारण इतिहासांत मधूनमधून रायकपेक्षांही अधिक मोठ्या प्रमाणावरील देशद्रोह व बेइमानीच्या घटना घडलेल्या आहेत.

खुद्द दांतनच्या कागदपत्रांत, त्याला कन्व्हेंशननें अटक केली त्यावेळीं, ब्रिटिश परराष्ट्र खात्यानें, पेरेगो नांवाच्या बँकरला लिहिलेलें पत्र सांपडलेंच कीं नाहीं ? आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं दांतन, लाइस्लो रायकपेक्षां फार मोठी व्यक्ति होती व आजही आहे.

चार्टिस्ट चळवळींत, पोलिसांचे पगारी हस्तक, हेर म्हणून नव्हते काय ?

विशेषतः फ्रेंच पोलिसांचा, कामगार चळवळींतील चिथावणी व हेरगिरी या बाबतींत दांडगा इतिहास नाहीं काय ? त्यांचा हेर मार्सेल गितॉं, हा फ्रेंच कम्युनिस्ट पार्टीचा कित्येक वर्षे ऑर्गनायझिंग सेक्रेटरी होता. रशियन क्रांतिकारक चळवळीतील हेरांचीं विश्वासघातकी कृत्यें ज्याच्या त्याच्या तोंडीं झालीं आहेत व त्याच्या गोष्टी इथें पुन्हां सांगण्याची जरूर नाहीं. युद्धापूर्वी खुद्द युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीचा जनरल सेक्रेटरी गॉर्किक हा पोलिसहेर होता. जर गॉर्किकचा बुरखा कधींही फाडला गेला नसता तर " न्यू स्टेटमन " पत्रानें, त्याच्या मार्क्सवादी प्रामाणिकपणाचा, दौतींत शाईचा अखेरचा थेंब असेपर्यंत बचाव केला असता, यांत बिलकुल संशय नाहीं.

इतिहासावरून कांहीएक शिकायचें नाहीं, असें कांहीं लोकांनीं ठरविलेंच दिसतें. जेव्हां इतिहास शुद्धलेखन घालावें इतक्या संथ वेगानें आपल्या धड्यांची उजळणी करीत असतो, तेव्हांसुद्धां कांहीही शिकायला यांची तयारी नसते.

कामगार चळवळींत, आणि विशेषतः कम्युनिस्ट पार्टींत आपले हस्तक पेरण्यासाठीं पोलिसांनीं नेहमींच वेळ, अक्कल व पैसा खर्च केलेला आहे व पुढेंही ते नेहमींच करतील ही गोष्ट खरी आहे. अमेरिकेंत प्रत्येक वेळीं नवा खटला भरण्यांत आला कीं पुन्हां मूठभर हस्तकांना हुकूम दिले जातात व आपला क्षुद्र पुरावा ते ओकूं लागतात. १९४९ सालीं पार्टीच्या बारा नेत्यांवर अमेरिकेनें खटला भरला त्यावेळीं डझनभर हस्तक आपले हुकूम पाळीत होते.

आधींच कामगार चळवळींत हेर पेरायचें काम चालू होतें. युद्धपूर्व काळांत बेकायदेशीरपणामुळें हें कार्य सुलभ झालें.

पण छे : ! न्यू स्टेटसमन व इतर अनेक लोकांना बुदापेस्तचा खटला खालीलप्रमाणें चालावयास हवा होता. कम्युनिस्टांच्या प्रभावी सत्तारूढ गटानें, मूठभर ध्येयवादी पाखंडी कम्युनिस्टांवर खटला भरला आहे; या मूठभर कम्युनिस्टांचा पहिल्या इतक्याच कम्युनिस्ट मार्गावर विश्वास आहे; असा जर हा खटला झाला असता तर न्यू स्टेटमन व इतर लोकांना आनंद झाला असता. कारण आडपडदा ठेवणें, दुसरे मार्ग सुचविणें, सोवियत युनियनला विरोध करणें, या त्यांच्या दृष्टीनें अत्यंत जिव्हाळ्याच्या गोष्टी आहेत.

कदाचित अशा प्रसंगीं, रायक, टीटो, रांकोविच, झालाई, स्झोनी, पाल्फि व त्यांचें सबंध टोळकें, एक प्रकारचे " स्वतंत्र कम्युनिस्ट, " आहेत, हें

वादासाठीं मान्य करणें वरें पडेल. पण दुर्दैवानें, हे इसम फॅसिस्ट पोलिस हेर, देशद्रोही, अमेरिकन हस्तक व निदान हंगेरीच्या इतिहासांतील अत्यंत खुनी लष्करी कटाचे कारस्थान रचणारे आहेत हें या खटल्यांत चवाट्यावर आलें. अशा इसमांना जर न्यू स्टेटसमन पत्र मिठ्या मारणार असेल, तर त्याला आपण खेदानें एवढेंच सांगूं शकतों कीं—" जा खुशाल मिठ्या मारा ! पण रक्ताचे डाग मात्र सांभाळा."

याविषयीं अखेरचा शब्द म्हणून पब्लिक प्रॉसिक्यूटरचें भाषण देणें योग्य ठरेल.

" या बाबतींत पश्चिम युरोपांतील देशांत असे प्रश्न विचारण्यांत येतात कीं इतके देशद्रोही इसम, कामगार चळवळींत घुसले कसे ? वास्तविक ज्यांना या प्रश्नाचें उत्तर देतां येणें शक्य आहे, नेमके तेच लोक हा प्रश्न विचारतात हा दुर्विपाक आहे. कारण, हेर खात्याचे मुखंड जे आम्हांला हा प्रश्न विचारतात, त्यांनींच खुद्द आंतरराष्ट्रिय कामगार चळवळ कोसळावी म्हणून या देशद्रोह्यांना आमच्या चळवळींत घुसविलेलें असतें. हेर व चिथावणीखोरांना कामगारांच्या पक्षांतून घुसविणें ही सनातन पद्धत आहे.

कामगार पक्षांनीं या दगाबाजांना ताबडतोब उघडें-नागडें कां केलें नाहीं, असा प्रश्न कदाचित विचारला जाईल. ज्या फायलींत यांच्या नांवाच्या याद्या होत्या त्या फायली जर आमच्या हातांत असल्या तर मग काय ? परंतु हंगेरीयन पोलिसांच्या गुप्त फायली आमच्या नव्हे तर अमेरिकन हेरखात्याच्या हातांत आहेत."

आठ आरोपींच्या पुऱ्या जबान्या शिवाय, आरोपपत्र व इतर अनेकांच्या साक्षी कोर्टानें ऐकल्या.

डॉ. लाजोस बोकार व एक पोलिस अधिकारी यांनीं रायकच्या १९३१ सालच्या विश्वासघाताचा पुरावा दिला. १९४४ सालीं सोप्रोन कोहिदाला रायकवर खटला झाला, त्यावेळीं प्रॉसिक्यूटर होतों, अशी हॉर्थी लष्कराच्या कायदेखात्यांतील कॅप्टन डॉ० फेरेन्स जानोसी यानें साक्ष दिली. डॉ. सोंबोर श्वायनित्झेशीं व अमेरिकन्सशीं संधान जुळवायला रायकनें ज्या माणसाला जर्मनींत पाठविलें होतें त्या इस्तवान स्तोल्तनें आपल्या कामाची हकीकत सांगितली. डॉ. झेब्येनी व सांदोर झेरेस्न्येस यांच्या साक्षी झाल्या.

पाक्सची गुप्त भेट व म्राझोविचचें प्रेमप्रकरण यावर जॉर्जी सारिङ्न्यास या छोट्या मास्तरणीच्या साक्षीनें प्रकाश पाडला. सरदारी थाटाचा मि. अंतल क्राइन, तिची साक्ष झाली त्यावेळीं चिडून-गोंधळून पाय आपटीत होता.

आणखी इतरांच्या साक्षी झाल्या. त्यांत कोणकोण होते ? मॉस्कोंत ज्यानें हेरगिरी केली तो देझ्सो निमिथ; जोसेफ रेक्स, हेगेडस्; बुदापेस्तच्या स्झोनी-कडून निरोप घेऊन बर्नला ॲलन डलेसला नेऊन देणारा इव्हान फोल्डि; काल्मन व पॉल जस्टसच्या ट्राटस्कीवादी अभ्यासमंडळाचे दोन सभासद इतक्यांच्या कोर्टांत साक्षी झाल्या.

१९३३ मध्यें पेक्सला झालासी पोलिसहेर म्हणून कशी भरती करण्यांत आली हें मिक्लोस रेती या हॉर्थी जमान्यांतील पोलिस अधिकाऱ्यानें सांगितलें. कम्युनिस्टांना “ कटवाले ” म्हणतांना रेतीला जीभ आंवरणें जड झालें; आणि त्याची ही वृत्ति समजण्यासारखी होती. तो साक्ष देत असतांना जुन्या फॅसिस्ट पोलिस स्टेशन्सची आठवण होत होती.

लेफ्टनंट लाजोस लिंडनबर्ग साक्ष द्यायला उठला तेव्हां झालाईची चुळबुळ सुरू झाली. हा लिंडनबर्ग सातोरालिआउझेली जेल फोडीच्या वेळीं एकाद्या राक्षसारखा वागला पण आतां मात्र तो इतक्या हलक्या आवाजांत पुटपुटत होता कीं “ मोठ्यानें बोल, ” असें जज्जला त्याला सांगणें भाग पडलें.

कोर्टानें अक्कडबाज व उर्मट झिव्को बोरोवची साक्ष ऐकली. मिलोस मॉइखचा आपण खून केला व त्यांत ब्रांकोवचा भाग काय हें कबूल करीत असतांना तो प्रेक्षकांकडे पाहून दांत विचकीत होता.

लुबित्सा रिबारचीसुद्धां साक्ष झाली. हिच्या मनांतून टीटोसाठीं हेरगिरी करायची नव्हती म्हणून बुदापेस्तमधील युगोस्लाव मुत्सद्यांनीं तिला पळवून नेलें होतें.

कोर्टाचें काम चालू असतां, सहा दिवसानंतर प्रत्येकाची खात्री झाली कीं या कटवाल्यांविरुद्ध कडेकोट केस भरण्यांत आली आहे. आणि म्हणूनच कोर्टाच्या अध्यक्षानें शनिवार ता. २४ सप्टेंबरला शिक्षा ठोठावल्या तेव्हां त्या अधिक कडक कां नाहींत याचेंच प्रत्येकाला आश्चर्य वाटलें.

सहा आरोपी निरनिराळ्या प्रमाणांत दोषी असल्याचें आढळलें. पालिफ व कोरोंडी यांचे खटले फेर सुनावणीसाठीं मिलिटरी कोर्टाकडे पाठविण्यांत आले; ( या कोर्टांत पालिफ, कोरोंडी, निमिथ व आणखी

एक अधिकारी सर्व दोषी असल्याचें सिद्ध झालें. चौघांना फांशी देण्यांत आलें.) लाझ्लो रायक, तिबोर स्झोनी, आंद्रास झालाई यांना फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली. लाझार ब्रांकोवला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्याचा पुढील न्यायनिवाडा करण्याचें काम खुद्द युगोस्लाव जनतेचें आहे असा जज्जनें शेरा मारला. दक्षिणस्लाव फेडरेशनमधील हस्तक ऑग्न्यनोविच याला नऊ वर्षांची सजा मिळाली; पॉल जस्टसला जन्मठेपेची शिक्षा झाली. हंगेरियन कायद्याप्रमाणें जन्मठेप एकोणीस वर्षांची असते व कैद्याची वागणूक चांगली असल्यास त्याला चार वर्षांची माफी मिळते.

खटल्याच्या शेवटीं पब्लिक प्रॉसिक्यूटरनें खालील उद्‌गार काढले,

" आरोपी आपला गुन्हा कबूल कां करतात ? गुन्हा नाकारून ते स्वतःचा बचाव कां करीत नाहींत ? कारण आपलें बिंग फोडण्यांत आलें आहे, आपल्याला सर्वांसमोर उघडेंनागडें करण्यांत आलें आहे व आतां गुन्हा नाकारण्यांत हंशील नाहीं हें त्यांना ठाऊक आहे. त्यांना आपल्या कृत्यांबद्दल वाईट वाटलें म्हणून त्यांनीं गुन्हा कबूल केला असें नव्हे तर त्यांचीं कारस्थानें चवाठ्यावर येऊन ते उघडे पडले म्हणून त्यांनीं तसें केलें. म्हणूनच त्यांच्या गुन्ह्यांचें स्वरूप कमी लेखण्याची जरूरी नाहीं.

गुन्ह्यांचें स्वरूप कमी होण्याची परिस्थिती तर नाहींच पण तें अधिक भयंकर ठरण्याचीच परिस्थिती आहे. या खुनी टोळक्याचा पुढारी लाझ्लो रायक याला शिक्षा सुनावतांना फेरेन्स रोस्झा व झोल्तान शोनहर्झला विसरूं नका. यानेंच त्यांचे खून घडवून आणले; यानेंच विश्वासघात करून बिल्डिंग कामगारांना तुरुंगांत डांबलें ही गोष्टही विसरूं नका. आंद्रास झालाईला शिक्षा देतांना, सातोरा लिआऊझेली तुरुंगांत जे चौसष्ट क्रांतिकारक मारले गेले त्यांची आठवण ठेवा, व त्यांच्या मरणाला हा आंद्रास झालाईच जबाबदार आहे हें विसरूं नका.

पालिफ व कोरांडी या दोघांना शिक्षा सुनावतांना १९१९ सालची आठवण करा. त्या वेळीं प्रोने व ऑस्टेनबर्ग यांनीं क्रांतिकारक अधिकाऱ्यांचे खून पाडले; व त्यांचीच नक्कल करायला हे दोघे तयार होते हें लक्षांत असूं द्या. ब्रांकोवला सजा देतांना त्याचा धनी, खाटिक रांकोविच याला आठवा; युगोस्लाव देशभक्तांचे छळ लक्षांत घ्या. स्झोनीला शिक्षा ठोठावतांना, ग्रीसच्या

जनतेप्रमाणें हंगेरीयन जनतेला हालअपेष्टांत खेंचायची तयारी करणारे अमेरिकन साम्राज्यवादी या इसमाचे धनी होते, या गोष्टीचा विसर पडूं देऊं नका."

खटला संपल्यानंतर दुसऱ्या दिवशीं, त्रिवार्षिक योजना तीन वर्षांच्या आंतच पुरी करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करा, अशा विनंत्या हंगेरियन वर्तमानपत्रांतून चमकल्या. रायक व त्याच्या साथीदारांना हाच सडेतोड जबाब आहे, हें जनतेला समजलें असें दिसलें.

## प्रकरण अठरावें

# टीटोचें पोलिसराज्य

आपण आतां टीटोच्या विश्वासघाताच्या कहाणीअखेर येत चाललों आहों. या कहाणीचें एक महत्वाचें प्रकरण अजून सांगायचें राहिलें आहे. पाक्सच्या गुप्त भेटींत, टीटोनें युगोस्लाव जनतेला समाजवादी छावणींतून हळूहळू काढून साम्राज्यवादी गोटांत नेण्याची योजना आंखली आहे, असें रायकला सांगण्यांत आलें, हें वाचकांना आठवत असेलच. आतां आपण या योजनेकडेच वळणार आहों.

इन्फर्मेशन ब्यूरोचा ठराव जून १९४८ त प्रसिद्ध झाला, तेव्हांपासून तों थेट युगोस्लावजनीं सप्टेंबर १९४६ च्या युनायटेड नेशन्सच्या, जनरल असेंब्लींत अँग्लो-अमेरिकन गटाशीं हातमिळवणी करीपर्यंतचे, युगोस्लाव धोरणाचे टप्पे स्वच्छपणें दाखवितां येतात. रांकोविचनें आपल्याला हे निरनिराळे टप्पे दर्शविले होते, असें रायकनें खटल्याचे वेळीं जाहीर केलें. आणि ही भेट १९४८ च्या पावसाळ्यांत झाली असल्यानें, युगोस्लावियानें पुढें, सोवियत युनियन व जनतेचीं लोकशाही राज्यें या बाबतींत जें धोरण आंखलें, तें काळजीपूर्वकपणें पूर्वयोजित होतें असें स्पष्ट दिसतें.

ठराव प्रसिद्ध झाल्यावर लगेच, समजुतीचा भयंकर घोटाळा झाला आहे अशा अर्थाचें पत्रक, युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीनें प्रसिद्ध केलें. त्यावेळच्या युगोस्लाव पुढाऱ्यांच्या भाषणांतील सूर असा होता कीं, इन्फर्मेशन ब्यूरोंतील कम्युनिस्ट पक्षांनीं खेदजनक चूक केली आहे व ती दुरुस्त करावी,

अशी स्तालिनला विनंती करण्यांत येत होती. या काळांत युगोस्लावियांत स्तालिन व सोवियत युनियन यांच्या बाजूचा तुफानी प्रचार चालू होता.

त्याचबरोबर ठराव प्रसिद्ध झाल्यावर एक महिन्यानंतर, जी गोष्ट युगोस्लाव पुढारी करीत नव्हते म्हणून त्यांच्यावर टीका करण्यांत आली होती, तीच गोष्ट त्यांनी केली — त्यांनीं कम्युनिस्ट पार्टीला खुल्या मैदानांत आणून कॉंग्रेस भरवली.

पण या कॉंग्रेसमध्यें अशी कारवाई करण्यांत आली कीं, होयबा प्रतिनिधी निवडण्यांत आले. जे टीटोच्या धोरणाला हात वर करतील अशानांच कॉंग्रेसचे प्रतिनिधी निवडण्यांत आलें. याला फार थोडे अपवाद होते. आणि यामुळें कॉंग्रेसमध्यें " वीर टीटो ! वीर टीटो ! " असा बराच वेळ गजर केल्यानंतर, कॉंग्रेसनें टीटो-रांकोविच गटाला सत्तास्थानीं कायम केलें, व इन्फर्मेशन ब्यूरोची कानउघाडणी करणारा ठराव, रागानें नव्हे तर खेदानें पास करण्यांत आला.

ही पहिली अवस्था ारच थोडा काळ टिकली. १९४८ च्या उन्हाळ्यांत दुसरी अवस्था सुरू झाली व पहिली दुसऱ्या अवस्थेंत विलीन झाली. यावेळीं युगोस्लाविया सोवियत युनियनचा जिवलग दोस्त आहे असें अजून भासविण्यांत येत होतें, पण त्याचबरोबर जनतेच्या लोकशाही राज्यांवर अधिक प्रखर हल्ले चढविण्यांत येत होते. हंगेरी व बल्गेरियावर नाना प्रकारचे दुरुस्तीवादाचे खोडसाळ व वेडगळ आरोप करण्यांत आले. हें कां करण्यांत आलें याचीं कारणें आतां आपल्याला समजूं शकतात.

या काळांत अमेरिकन साम्राज्यशाहीवर नेहमींचे हल्ले करण्यांत युगोस्लाव पुढारी थोडासा वेळ खर्चीत होते. १९४८ च्या उन्हाळ्यापासून तों तहत आजपर्यंत युगोस्लावियाचें सबंध प्रचारयंत्र, युगोस्लाव जनतेला सोवियत युनियनबद्दल वाटत असलेलें प्रेम नष्ट करण्याच्या कामीं लावलें गेलें आहे.

१९४९ च्या जानेवारींत मार्शल टीटो आपल्या जाहीर भाषणांतून, शेजारच्या कम्युनिस्ट पक्षांच्या " अप्रामाणिकपणाचा " उल्लेख करून, याचे " गंभीर परिणाम " होतील, अशा भीषण सूचना गर्भितार्थानें देत होता. आतां युगोस्लाव पुढाऱ्यांनी सोवियत युनियनवर पहिले हल्ले चढविण्यास सुरवात केली. पण गोंधळ वाढविण्यासाठीं त्यांनी स्तालिन व सोवियत कम्युनिस्ट पार्टी यांच्यांत भेद पडल्याचे ढोंग केलें. स्तालिन चांगला, पण सोविएत कम्युनिस्ट पार्टी वाईट असा हा भेद होता.

एप्रिलच्या सुमारास आणखी अनेक गोष्टी उघड झाल्या. युगोस्लाव लष्कराच्या जनरल क्रिआतिचनें, पीपल्स फ्रंट कॉंग्रेसपुढें जाहिर केलें कीं, सोवियत

युनियन, "खोटानाटा व बनवाबनवीचा प्रचार करीत आहे." —याचवेळीं मॅास्कोच्या मार्क्सवादांत कांही तरी बिघाड झाला आहे, अशा अर्थाचीं विद्वत्तापूर्ण भाषणें करण्यांत आलीं.

पण लवकरच हें अर्धवट धोरण सोडून देण्यांत आलें. १९४९ च्या उन्हाळ्याच्या सुमारास बेलग्रादहून, सोवियत युनियन व जनतेचीं लोकशाही राज्यें यांच्याविरुद्ध दुष्ट, खोटानाटा, बेफाम प्रचार सुरू झाला. रशिया स्वारीची तयारी करीत आहे; सोवियत युनियननें युगोस्लावियांत यादवी युद्धाची हांक दिली आहे––चर्चिल व स्तालिन यांच्यांत कांही एक फरक नाहीं, अशा थाटाचा तुफानी प्रचार चालला होता. स्तालिन-चर्चिल विषयक प्रचार, रिअर-अॅडमिरल ज्यूरो लोचारेविच यानें नाविक दिनानिमित्त पाठविलेल्या तारेंत होता. हा प्रचार फारच पुढचें पाऊल आहे असें आढळल्यावरून, "बोर्बा" पत्रानें तो आपल्या बातमींत गाळला, पण "पोलिटिका" पत्रानें ती तार प्रसिद्ध केली होती.

या प्रचार मोहिमेंत, सर्वांत जहरी व पिसाट प्रसारक कुणी असतील तर ते मिलोव्हन जिलास व प्रोशे पिआदे हे होत. टीटोच्या पोलिसी राज्याच्या काळजांत बसून, जिलासनें, सप्टेंबर १९४९ मध्यें सोवियत युनियनवर—"निरपराध लोकांना अटक केल्याचा व ठार केल्याचा," आरोप केला. जिलास नियंत्रित वर्तमानपत्रांत, अमेरिकन साम्राज्यशाहीविरुद्ध महिनेच्या महिने एक कठोर शब्द येत नसला, तरी रशियन्स अलीकडे झारवर हल्ला चढवीत नाहींत, असें लिहून जिलासनें नकळत विनोद निर्माण केला आहे!

"त्यांच्या प्रचारांत झारशाही व झारचे साम्राज्यशाही धोरण यांवरील टीका बहुतेक नाहींशी झाली आहे, हा योगायोग नव्हे."

या काळजीपूर्वक आंखलेल्या पद्धतशीर प्रचारमोहिमेचा उद्देश केवळ युगोस्लाव जनतेचीं मनें नव्या राजकीय दिशेला नेण्यासाठीं तयार करणें एवढाच नव्हता. टीटोच्या मनांतून पश्चिम यूरोपच्या राष्ट्रांशीं निकटचे आर्थिक संबंध जोडायचे होते–व आतां आपण अमेरिकन कर्ज स्वीकारण्याची भाषा काढली तर लोकांना शंका येईल: कारण मार्शल योजना म्हणजे आर्थिक व राजकीय गुलामगिरी होय, असें खुद्द टीटोनेंच थोड्या दिवसांपूर्वीं त्यांना सांगितलें होतें.

आपण अमेरिकन कर्ज स्वीकारण्यास तयार आहों, असें जाहीर करण्याइतकी टीटोला ऑागस्टच्या सुमारास पुरेशी खात्री वाटली. सप्टेंबरच्या आरंभीं,

पुनर्रचना व प्रगतीच्या आंतरराष्ट्रीय बँकेच्या चौकशी कमिशनचें त्यानें बेलग्राद-मध्यें स्वागत केलें. साम्राज्यशाही राष्ट्रें, ज्याप्रमाणें नव्या वसाहतीची व्यापार-विषयक पहाणी, त्यांत भांडवल गुंतवण्यापूर्वी करतात, त्याप्रमाणें या कमिशननें देशभर दौरा काढला व आर्थिक पहाणी केली.

युगोस्लावियाला कर्ज देण्यांत येईल असें ब्रिटन व अमेरिका या दोन्ही देशांनी जाहिर केलें. सप्टेंबर महिन्यांत अमेरिकन स्टेट डिपार्टमेंटनें टीटोला एक अमेरिकन पोलाद-कारखाना विकत देण्यास मंजुरी दिली.

अमेरिकन एक्स्पोर्ट-इंपोर्ट (आयात-निर्यात) बँकेतर्फे टीटोला वीस मिलियन डॉलर कर्ज देण्याचें ठरलें. युगोस्लावियाच्या इमारती लांकडांच्या वाढीसाठीं आंतरराष्ट्रीय बँकेनें कर्ज देण्याची तयारी दर्शवली. नोव्हेंबरमध्यें ब्रिटन-अमेरिकेनें युगोस्लावियाला विमानें व विमानांना लागणारें तेल पुरविण्याचें मान्य केलें.

सप्टेंबरमध्यें, संयुक्त राष्ट्र संघाच्या जनरल असेंब्लीची लेकसक्सेसला बैठक भरली, त्यावेळीं गोष्टी कळसास पोंचल्या. या ठिकाणीं प्रथम ढोंगबाजी झुगारण्यांत आली. कार्देलीच्या नेतृत्वाखालील युगोस्लाव शिष्टमंडळानें अँग्लो-अमेरिकन गटाबरोबर मत दिलें, इतकेंच नव्हे, तर या शिष्टमंडळाने सोवियत युनियनवर हल्ले चढविण्यांत पुढाकार घेतला. कार्देलीच्या भाषणाचें ब्रिटिश अमेरिकन शिष्ट मंडळानें आनंदानें टाळ्या पिटून स्वागत केलें. त्यांनींच युगोस्लावियाला, सोवियतच्या इच्छेला न जुमानतां, सुरक्षामंडळांत आणलें.

पण त्यांनी वरपांगी दाखवला तेवढा आनंद, अर्थातच त्यांना झालेला नव्हता. कारण इन्फर्मेशन ब्यूरोचा ठराव जर कधींच प्रसिद्ध झाला नसता, तर त्यांना याहून अधिक बरें वाटलें असतें: टीटो ढोंगीपणें समाजवादी छावणींत राहिला असता व त्यानें हंगेरी आणि कदाचित इतर जनतेचीं लोकराज्यें, समाजवादापासून अलग पाडून, ब्रिटिश मिशननें १९४३ पासून कल्पिलेल्या बाल्कन फेडरेशनमध्यें आणलें असतें, तर त्यांना खराखुरा आनंद झाला असता.

युगोस्लाविया सोवियत युनियन विरुद्ध शत्रुत्वाचें धोरण अंमलांत आणीत आहे, असें रायक खटल्यांत उघड झालें आहे अशा अर्थाचा खलिता सोवियत युनियननें २८ सप्टेंबरला युगोस्लावियाला पाठविला. या घटणेनें, सोवियत युगोस्लाव मैत्रीच्या तहाच्या चिंधड्या उडाल्या व म्हणून आता आपण या तहाच्या जबाबदारींतून मुक्त झालों, असें सोवियत युनियनला वाटलें.

ज्यानें युद्धकाळांत, टीटोगटविरोधी भूमिका घेणाऱ्या हेब्रांग व झ्यूजोविच, यांना पाठिंबा दिला, त्या कर्नल जनरल योहानोविचविषयीं दोन शब्द सांगणें जरूर आहे.

हेब्रांग झ्यूजोविचप्रमाणें, योहानोविचनें इन्फर्मेशन ब्यूरोच्या टीकेला पाठिंबा दिला होता. तो गनिमी लष्कराचा प्रमुख असून अत्यंत लोकप्रिय होता, म्हणूनच तो टीटोगटाच्या डोळ्यांत एकसारखा सलत होता. साहजिकच १९४८ च्या ऑगस्टमध्यें जेव्हां योहानोविचला, "बेकायदेशीरपणें सरहद्द ओलांडण्याचा प्रयत्न करीत असतां गोळी घालून ठार करण्यांत आलें," असें सांगण्यांत आलें, तेव्हां जगांत कुणालाच आश्चर्य वाटलें नाहीं. रांकोविचनें खुनाला हें लाडकें नांव दिलें होतें. ब्रांकोवनें झाबाद न्येपमध्यें जें प्रकाशांत आणलें, होतें तें खरें होतें.

योहानोविच हा अत्यंत धैर्यशाली होता. हा मार्क्सवादी आहे हें उघड उघड सर्वांना माहित होतें. ट्रॉट्स्कीवाद्यांची पार्टीवरील भक्कम मगरमिठी तोडून युगोस्लावियांत खऱ्याखुऱ्या कम्युनिस्ट पार्टीची पुनः स्थापना करण्याचें महाकठीण व धोक्याचें कार्य त्यानें सुरू केलें होतें. त्याच्यासारख्या हजारों कार्यकर्त्यांना रांकोविचच्या तुरुंगांत डांबण्यांत आलें, किंवा गोळ्या घालण्यांत आल्या आहेत. टीटोचा युगोस्लाविया हें पुरेंपूर पोलिसराज्य झालें असून, त्याचा रोंख फॅसिस्टांविरुद्ध किंवा जुन्या युगोस्लाव भांडवलदारांविरुद्ध वळलेला नाहीं तर कामगार चळवळींतील खऱ्याखुऱ्या प्रतिनिधींविरुद्धच या टीटो पोलिस राज्याचा रोंख आहे. पण जो तुरुंगांत डांबला गेला, किंवा मारला गेला, त्याची रणांगणावरील जागा घेऊन लढा चालू ठेवण्यासाठीं अनेक पुढें येत आहेत.

नव्या बेकायदा युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीचें शौर्यशाली व तिच्यापुढील भयंकर संकटांचें तपशीलवार वर्णन या पुस्तकाच्या कक्षेंत येत नाहीं. पण आपण जर त्यांच्या महाकठीण कार्याचा त्रोटक उल्लेख केला नाहीं व त्यांचा गौरव केला नाहीं तर टीटोच्या युगोस्लावियाचें वर्णन अपुरें राहील. युगोस्लावियाच्या या नव्या बेकायदेशीर कम्युनिस्ट पार्टींत अनेकजण संकटांना न जुमानतां, कार्य करीत आहेत त्यांचे कार्य—जसें हिटलर जर्मनींत अतिशय बिकट आघाडीवर समाजवादासाठीं कम्युनिस्ट लढत होते-त्याचप्रमाणें आज जगांतील महाभयंकर व बिकट अशा वर्गयुद्धाच्या आघाडीवरील कार्य आहे.

# प्रकरण एकोणिसावें

## खटल्यावरून घ्यावयाचे धडे

रायक खटल्याचे वेळीं पश्चिम युरोपांतील अनेक निरीक्षकांनीं जी भूमिका घेतली. ती थोडक्यांत अशी : रायक व त्याचे साथीदार हेरगिरी व देशद्रोह या बाबतींत उघड दोषी होते. त्यांचे कबूली जबाब खरेखुरे असून बहुधा ते भक्कम पुराव्यावर आधारलेले होते. रायकला हंगेरीचा हुकुमशहा बनायचें होतें, व यासाठीं टीटोनें त्याला मदत केली, ती घेण्यास तो तयार होता यांत संशय नाहीं. टीटोच्या दृष्टीनें पाहिलें, तर तो आज्ञाधारक व दोस्त अशा हंगेरीच्या विरुद्ध नव्हता. पण या खटल्यांतील दोन गोष्टी मान्य करतां येणें अशक्य आहे. त्यांपैकीं एक ही कीं युगोस्लावियन पुढारी, सोशालिस्ट-विरोधी किंवा अमेरिकेचे हस्तक आहेत. अथवा बाल्कनमध्यें अमेरिकनतर्फी धोरण चालवीत आहेत. टीटोचीं युद्धकाळांतील व युद्धानंतरची कृत्यें पाहिलीं, तर या गोष्टी घडणें अशक्य वाटतें. दुसरी गोष्ट अशी कीं, ॲलन डलेस व अमेरिकन हेरखात्यावर, बुदापेस्तला "अमेरिकन" सरकार स्थापण्याचें कारस्थान केल्याचा आरोप करणें, हें हेरज्वरानें पछाडल्याचें लक्षण आहे. आतां मि. डलेसच्या १९४४ मधील कार्याबद्दल म्हणाल तर तो जें जें कांहीं करीत होता, तें जर्मनविरोधी युद्ध जिंकायला मदत करण्यासाठींच होय.

न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून पत्राचा प्रतिनिधी मि. स्टीफन व्हाईस हा खटल्याचे वेळीं हजर होता व तो या दृष्टिकोणाचा पुरस्कर्ता होता. त्याचें मत प्रामाणिकपणें मी वर दिलेलें आहे.

कबूलीजबाबांचा खरेपणा व गुन्ह्याचा पुरावा मान्य करण्यांत मि. व्हाईटना अडचण पडली नाहीं. या बाबतींत त्यांचें मत पहा : ( न्यू. यॉ. हे० ट्रि० ३० सप्टेंबर. )

"औषधें वापरण्यांत आलीं या गोष्टी, आपण एकदम नाकारूं शकतों. अगदीं अलिकडच्या काळांत या आठ आरोपींचा छळ करण्यांत आला नाहीं, असाच भरभक्कम पुरावा आहे.

आरोपींची वागणूक हाच याचा जबरदस्त पुरावा आहे. अगदीं खुद्द लाझ्लो रायकचें उदाहरण घ्या. सर्वांचें लक्ष तावडतोब वेधून घेणारी व प्रभावी व्यक्तिमत्व दर्शविणारी मूर्ति कोणती असेल, तर ती रायकचीच. त्याच्या पूर्वेतिहासावरून हा मनुष्य कर्तबगार, तीक्ष्ण बुद्धीचा, अभिमानी व धाडसी होता असें दिसतें. त्याची मुद्रा हें स्पष्ट दर्शवीत होती. तर याच्या उलट आंद्रास झालाईचें उदाहरण घ्या. आपण पोलिस हेर होतों, हें यानें आपल्या तोंडानेंच कबूल केलें आहे, त्यांच्या पूर्वकारवाया कागदोपत्रीं नमूद आहेत. हा अट्टल ढोंगी आहे असा याचा पूर्वेतिहास सांगतो, व कोर्टांत तो हुबेहूब तसाच दिसत होता.

या आरोपींपैकीं प्रत्येकजणाला विशिष्ट व्यक्तिमहत्व होतें. दोघे लष्करी अधिकारी, लष्करी अधिकाऱ्यांप्रमाणेंच वागले; फुटून निघालेला बुद्धिवादी त्याप्रमाणेंच वागला. म्हणून हे कबूलीजबाब, औषधें किंवा छळ यांच्या जोरावर उकळण्यांत आले, यावर जर विश्वास ठेवायचा झाला, तर मग पुढें जाऊन, कम्युनिस्टांनीं असें एक औषध शोधून काढलें आहे, किंवा छळ शोधून काढला आहे कीं, ज्यायोगें माणूस आपले गुन्हे कबूल करील, खुल्या कोर्टांत आपल्या कबूलीजबाबाचा निषेध करणार नाहीं, व त्याचें व्यक्तिमत्व अबाधित राहील, या गोष्टीवरही विश्वास ठेवावा लागेल. या सगळयावर विश्वास ठेवणें कठीण आहे; या प्रतिनिधीपुरतेंच बोलायचें झालें, तर खटल्याचे वेळीं वरील विचारसरणीवर क्षणभरही विश्वास ठेवायला कुणी तयार नव्हता."

रायक व त्याचे साथीदार यांनीं त्यांच्यावर आरोप केलेले गुन्हे केले आहेत, ते दोषी आहेत–या गोष्टीवर आपला विश्वास आहे असें मि. व्हाईटनें पुढें लिहिलें होतें.

पण ब्रिटिश व अमेरिकन धोरणाचा अगदीं साधाभोळा अर्थ आणणारे किंवा तशी बतावणी करणारे मि. व्हाईट व त्यांच्यासारखे इतर अनेकजण यांच्यांत, येथपासून आडपडदा ठेवून बोलायला सुरवात होते.

ते काय म्हणतात? त्यांच्यामतें १९४४ व ४५ सालीं ब्रिटिश व अमेरिकन हेरखात्यांच्या अंगीं पुढें हंगेरीत रायकचें कारस्थान, व युगोस्लावियांत टीटोचा विश्वासघात घडवून आणण्याइतकी दूरदृष्टी, कावेबाजपणा व राजकीय धूर्तता असणें शक्य नाहीं.

हे लोक ब्रिटिश व अमेरिकन भांडवलदारांच्या अंगच्या गुणांना कमी लेखीत आहेत. जेव्हां जगाच्या कोन्याकोंपऱ्यांतील कामगार, भांडवलशाहीविरुद्ध

उलटत आहेत व सत्ता जिंकण्यासाठीं झुंजत आहेत, यूरोपमध्यें जुन्या जमान्याचा अंत करून इतिहासानें नव्या मनूची तुतारी फुंकली आहे, अशावेळीं सत्ता बळकावण्याची ताकद असणारा, जगाचा प्रचंड विभाग जिंकून आपल्या काबूंत ठेवणारा, स्वतःचे हक्क व स्थान टिकवून धरणारा वर्ग कावेबाज व नीतिशून्य धोरणें न आंखता केवळ राजकीय साधेभोळेपणा व दयामाया यांवर अवलंबून राहील अशी यांची खरोखरीच कल्पना आहे काय ?

या ठिकाणींसुद्धां, भूतकाळच्या धड्यांकडे दुर्लक्ष केलें जात आहे. यूरोपमधील प्रत्येक देशाचा इतिहास कावेबाजपणा व कारस्थानें यांनीं भरलेला असून तीं, मि. डलेस व ओ. एस. एस. च्या कारस्थानांपेक्षां रेंसभरही कमी नाहींत.

फक्त बाल्कनमध्येंच हेर व चिथावणीबाज आढळतात असें सुचवणें सोपें आहे व मि. व्हाईट तसें सुचवितो. पण ब्रिटनचीं ग्रंथालयें, ब्रिटिश हस्तकांच्या लिहिलेल्या आठवणी ग्रंथांनीं, स्मृतिग्रंथांनीं भरलेल्या आहेत व अशा ग्रंथांतून ते मोठ्या अभिमानानें आपल्या कारवायांचीं वर्णनें करतात. बाल्कन्समध्यें हस्तक आहेतच; आणि त्यांपैकीं अनेकांना लंडन किंवा वॉशिंग्टनमधून हुकूम मिळतात.

ज्या राजकीय खुनाच्या कारस्थानांत फॅसिस्ट आहेत, अशा कारस्थानांत शंभर टक्के अमेरिकनानें भाग घेणें अशक्य आहे काय ?

जेथें भांडवलशाहीविरुद्ध समाजवाद, असा उग्र संग्राम चालू आहे अशा ठिकाणीं, वरील विधानांना थोडा सुद्धां अर्थ आहे, असें कुणी मनांत आणीत नाहीं. कारण तेंच तर आपण येथें तपासून पहात आहोंत.

मि. चर्चिल व त्यांचे परराष्ट्रीय खातें यांनीं युरोपचा गाळसाळ, तरुण सोवियत रिपब्लिकच्या विरुद्ध हस्तक्षेपाच्या लढाईंत वापरला. मग आतां त्यांनीं पूर्व यूरोपमध्यें समाजवादाविरुद्ध यूरोपची गटारघाण कां वापरूं नये ? अमेरिकन्स, बोल्शेविझम विरुद्ध सुप्रसिद्ध तटबंदी म्हणून, जपानी फॅसिस्टांचा व पश्चिम जर्मनींत फॅसिस्टांचा उपयोग करीत आहेत. मग हंगेरींत हेंच करायला त्यांनीं आढेवेढे कां घ्यावे ?

पण टीटो व त्याच्या गटाचें काय ? जे जर्मनाविरुद्ध लढले, ज्यांनीं प्रत्येक आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर, पश्चिम यूरोपवर प्रखर हल्ला चढविला, उत्पादन साधनांचें राष्ट्रीयीकरण केलें, बेलग्रादभर लेनिन-स्तालिनचे फोटो लावले, व सर्वसाधारण-कम्युनिस्टांसारखे वागले, ते पूर्व यूरोपमध्यें साम्राज्यशाही हल्ल्याचें अग्रदल बनणें खरोखरच इतकें अशक्य आहे काय ?

हें जर अशक्य असेल, तर मग इतिहासांतील अनेक गोष्टी अशक्य ठरतील. नेपोलियन अशक्य ठरेल, तसेंच जोसेफ फूश, रॅम्से मॅक्डोनल्ड, अर्नेस्ट बेव्हिन, जॅक दोरिओ व बेनिटो मुसोलिनी, हे अशक्य ठरतील. पगडी फिरविणारा ही अशक्य घटणा, विश्वासघात ही कल्पना ठरेल. पण पगडी फिरविणारे होऊन गेले, विश्वसघाताच्या घटणा घडल्या, हें आपल्याला माहित आहे. कारण निष्ठूर वर्गयुद्धाच्या धोक्यांत व मोहांत यांची निर्मिती झाली व अजून होत आहे.

जो नेपोलियन बोनापार्ट फ्रेंच राज्य-क्रांतिच्या तुंबळ संगरांत सत्तारूढ झाला, त्यानेंच क्रांतीच्या तत्वांचा विश्वासघात केला व वारसा म्हणून, तो "बोनापोर्टवाद" हा शब्द आपल्यामागें ठेवून गेला. फूशनें पांच धन्यांची थुंकी झेलली व सर्वांचा विश्वासघात केला; लोकशाही राज्यांतील आपल्या जिवलग दोस्तांना राजेशाही जमान्यांत त्यानें फांसावर लटकावलें. रॅम्से मॅक्डोनल्डनें ब्रिटिश कामगारवर्गाचा विश्वासघात केला. अर्नेस्ट बेव्हिननें ब्रिटिश लेबर चळवळीच्या मूलभूत तत्वांना केव्हांच हरताळ फांसला आहे. दोरिओ हा फ्रेंच कम्युनिस्ट पार्टीचा सभासद होता, पुढें तो देशद्रोही बनून फॅसिस्ट झाला. मुसोलिनी तरुणपणीं सोशालिस्ट होता.

हें सर्व अत्यंत असंबद्ध, अप्रस्तुत आहे काय? आपल्या तत्वांना मूठमाती देणें, किंवा आपली नसलेलीं मतें आपलींच आहेत असें मानणें हें १९४९ सालीं एकदम अशक्य झालें आहे काय?

टीटोच्या प्रकरणाचा विचार करतांना, 'बोनापार्टवाद' हा शब्द अतिशय सोईस्कर व उपयोगी ठरेल. कारण बोनापार्टवाद म्हणजेच क्रांतीची, दहशत व हुकूमशाही यांत झालेली अधोगती होय. तत्वांना मूठमाती व स्वातंत्र्यघात म्हणजेच बोनापार्टवाद. टीटोच्या युगोस्लावियांत नेमकी हीच गोष्ट घडलेली आहे. ही अधोगती कशी होत गेली, तिचीं चटकन ओळखता येण्यांसारखीं व प्रमुख स्वरूपें कोणतीं, याविषयीं भरपूर पुरावा या पुस्तकाच्या पानांत खात्रीनें आढळेल.

टीटोच्या अधोगतीची परिणती फॅसिझममधेंच होती हें मान्य केलें तरीसुद्धां, तो यूरोपमधील अमेरिकन धोरणाचा हस्तक कसा बनूं शकेल, असें कदाचित कुणी म्हणतील.

याचें उत्तर असें आहे कीं ( आणि हें टीटोला माहित आहे ) कीं, जें सरकार, सोवियत युनियन व नवे समाजवादी देश, किंवा अँग्लो-अमेरिकन गट यांच्याशीं सहकार्य करण्याचें नाकारील त्याला दुसरा मार्ग नाहीं; पश्चिमी राष्ट्रांशीं "सहकार्य" म्हणजे काय, हें मार्शल-योजना व अॅटलांटिक करार या घटनांवरून भरपूर सिद्ध झालें असल्यामुळें, टीटोला वॉशिंगटनचे हुकूम लाथाडून दुसरें कांहीं करतां येईलसें वाटत नाहीं.

युगोस्लाव यू. डी. बी. नें अमेरिकन्सच्या बाजूनें जीं कृत्यें केलीं तीं, त्याच्या अत्यंत लाचार इमानीपणाचा दणदणीत पुरावा नव्हे असें जर म्हटलें, तर समाधानकारक पुरावा म्हणजे काय हें समजणेंच कठीण होऊन बसेल.

या अप्रत्यक्ष पण दणदणीत पुराव्यावर, संशयवाद्यांनीं समाधान करून घ्यावें असें म्हणण्याची जरूर नाहीं. कारण या प्रकरणांत अमेरिकन जबाबदारी आहे, हें सिद्ध करण्याच्या कार्यांत आपल्या मदतीला अमेरिकेचें धोरण ठरविणारे असे दोन महत्त्वाचे मुत्सद्दी धांवून येत आहेत, असें आढळेल.

पहिला मुत्सद्दी मि. जॉर्ज केनन, अमेरिकन स्टेट डिपार्टमेंटच्या, धोरण योजना शाखेचा तो प्रमुख आहे. मि. केनन हा सोवियत युनियन संबंधींचा तज्ज्ञ आहे. याचा १९४७ सालीं एका प्रमुख अमेरिकन मासिकांत कम्युनिझमविरोधी लढ्यांतील अमेरिकन व्यूहरचनेची रूपरेषा दर्शविणारा लेख आला. लेखकाचें नांव क्ष म्हणून देण्यांत आलें होतें, पण हा क्ष कोण, हें ताबडतोब उघड झालें, व तें कधींही नाकारण्यांत आलें नाहीं.

अमेरिका व तिचे दोस्त यांनीं लष्करी व मुत्सद्दीगिरीच्या दृष्टीनें सोवियत युनियनला "बंद" केलें पाहिजे, व नंतर सोवियत युनियन व तिच्याशीं संलग्न असलेलीं राष्ट्रें, यांची समाजव्यवस्था आंतून मोडकळीस आणण्यासाठीं भांडवलदारी राष्ट्रांनीं झटलें पाहिजे.

हें जर स्टेट डिपार्टमेंटचें धोरण असेल—नंतर घडलेल्या घटणा, हें धोरण होतें असेच सिद्ध करतात, हें कोण नाकारूं शकेल ?—तर मग ही हवी असलेली मोडतोड लवकर घडवून आणण्यासाठीं, स्टेट व युद्ध खातें शक्य त्या सर्व लटपटी खटपटी करणार नाहींत, असें सुचवणें शुद्ध मूर्खपणा आहे.

येथें आपला दुसरा साक्षीदार, मि. जॉन फॉस्टर डलेस यानें १९४८ च्या वसंतऋतूंत केलेल्या भाषणाची दखल घेतली पाहिजे. मि. डलेस रिपब्लिकन पक्षाचे परराष्ट्रधोरणतज्ज्ञ आहेत, आणि ट्रूमन सिद्धांताच्या आरंभापासून अमेरिकन परराष्ट्रीय धोरणांच्या सूत्रधारांशीं त्यांचा घनिष्ट संबंध होता.

मि. डलेसनें आपल्या १९४८ च्या भाषणांत कोणा एका " क्ष ", योजनेचें अस्तित्व उघड केलें. " क्ष " या अक्षरांत अमेरिकन मुत्सद्यांना मंत्रतंत्राचें सामर्थ्य आढळतें असें वाटतें. या योजनेप्रमाणें हेरखात्याच्या अंदाजपत्रकांत अतिशय खर्च घालण्यांत आला असून, पूर्व यूरोपमध्यें दूरवर पसरलेलें व अधिक कार्यक्षम असें हेरगिरीचें जाळें विणण्याची तरतूद होती. या अशा उघड शब्दांतच हें मांडण्यांत आलें होतें. त्यावेळीं वॉशिंग्टनमधील इतर जबाबदार अधिकाऱ्यांनीं या बाबतींत लक्ष घातलें.

ही हेरगिरी कशासाठीं ? विद्यमान राजकीय रचना मजबूत करण्यासाठीं, कीं खिळखिळी करण्यासाठीं ? स्टँडर्ड ऑईल, शेल, डनलॉप या कंपन्या व पश्चिम यूरोपच्या बँका, हंगेरींत व इतर जनतेच्या लोकराज्यांत पुनः स्थापन करण्यासाठीं, कीं त्यांना बाहेरच ठेवण्यासाठीं ? या प्रश्नांचें उत्तर इतकें उघड आहे कीं तें येथें देण्याची बिलकुल आवश्यकता नाहीं.

अशा अमेरिकन योजना जर अस्तित्वांत आहेत, तर रायक खटल्यांत अमान्य करण्यासारखें असें काय आहे ? खात्रीनें या रायक खटल्या-वरून खालील गोष्टी उघडकीस आल्या आहेत. प्रत्येक जनतेच्या लोकशाही राज्याला जाऊन मिडणाऱ्या कार्यक्रमाची एक प्रमुख आघाडी, उघडीनागडी झाली आहे. ही आघाडी म्हणजे प्रथम शत्रुत्व व नंतर अखेरीस सोवियत युनि-यनविरोधी युद्धाच्या व्यूहरचनेचा एक भाग आहे. आपले यूरोपचे अखेरचे खंदक लढविण्याचा भांडवलशाहीचा हा निर्वाणीचा व गलिच्छ मार्ग आहे.

हें असें असल्यामुळें, या पुस्तकांत वर्णन केलेल्या दोन प्रमुख घटणा साम्राज्यवादी राष्ट्रांना पहिल्या प्रतीचे धडाके कां वाटले हें सहज कळून येईल.

कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोच्या ठरावांत, टीटो टोळक्याचें स्वरूप उघडें-नागडें केल्यानें, देशद्रोह्यांचें हें घरटें अलग पाडलें गेलें, व कम्युनिस्ट चळवळीं-तील अँग्लो-अमेरिकन कारस्थानाचा अड्डा कायमचा गाडला गेला. रायक खटल्यामुळें हंगेरीची योजना तोडून टाकण्यांत आली व अमेरिकन-युगोस्लाव व्यूहरचनेचीं पाळेंमुळें व लागेबांधे चव्हाट्यावर उघडेनागडे करण्यांत आले.

या बाबतींत व अलीकडच्या काळांतील इतर अनेक बाबतींत, अमेरिकन्स ब्रिटिश धोरणाचे वारसदार बनले आहेत. ग्रीसमध्यें डावा गट चिरडून टाकण्यासाठीं चर्चिलनें प्रथम ब्रिटिश फलटणी पाठविल्या, व नंतर काम पुरें करण्यासाठीं ग्रीसला अमेरिकन्सच्या हवालीं करण्यांत आलें. त्याप्रमाणें युगोस्लावियांत प्रथम ब्रिटिश हेरखात्यानें मोहिम सुरू केली, व नंतर खांदेपालट करून तें काम अमेरिकन्सवर सोंपविण्यांत आलें. चर्चिलच्या लष्करी शिष्टमंडळानें पाया घातला, मि. डलेस, ओ. एस्. एस्. व अमेरिकन स्टेट डिपार्टमेंट यांनीं त्यावर इमला बांधला. आतां अमेरिकन बँका आपले प्रतिनिधी युगोस्लावियांत पाठवीत आहेत. टीटो आपल्या शेजारील देशांत कारस्थानें रचीत आहे, लोकशाही ग्रीसचा विश्वासघात करीत आहे, व संयुक्त राष्ट्रसंघांत अमेरिकन गटाला मदत करीत आहे. या टीटोच्या कृत्यामुळें अमेरिकन स्टेट डिपार्टमेंटच्या पदरांत महत्वाची राजकीय खंडणी पडत आहेच. पण या बरोबरच आणखी जितकी आर्थिक उचलेगिरी करतां येण्यासारखी असेल, तितकी कांटेकोरपणें करणें हें या अमेरिकन बकप्रतिनिधींचें कार्य आहे.

समाजवाद चिरडण्यासाठीं व नव्या युद्धाच्या तयारीसाठीं अमेरिकेनें जी मोहिम चालविली आहे व तिच्यांत ब्रिटननें जी अपमानकारक भूमिका घेतली आहे तिचें, रायक खटल्यानें नवें दर्शन घडविलें आहे.

× × ×

मागच्या प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें, "स्वतंत्र कम्युनिस्टाचा," नवा नमुना म्हणून टीटोचें स्वागत करण्याची, ब्रिटनच्या कांहीं गटांत फॅशन पडली आहे. टीटोचे गुन्हे उघड झाल्यानंतरसुद्धां, कांहींजण या रक्तलांछित जुलमशहाचे पाहुणे म्हणून त्याच्याकडे राहून आले आहेत, व त्यांच्यांतील कांहीं व्यक्तींना पाहुणे म्हणून जाण्यापेक्षां अधिक समजूत असावयास पाहिजे होती.

रायक खटल्यांत अनेक घडामोडी चवाट्यावर आल्या. नंतर सहा महिन्यांत वर्तमानपत्रांत अनेक गोष्टी येऊन गेल्या; टीटोच्या युगोस्लावियाची फॅसिस्ट राज्यांत अधोगती झाली आहे, हें सिद्ध करण्यास आणखी कशाची जरूर आहे ?

जहाल मतांबद्दल प्रसिद्ध असलेले मुत्सद्दी व पत्रपंडित यांना टीटोच्या राजवाड्यांतील पाहुणचार झोडून, मानवी उदात्तता व न्याय या विषयांवरील मार्शलचे उद्‌गार उद्धृत करणें ठीक आहे. पण रांकोविच व यू. डी. बी. चें काय ? असों योहानोविचच्या व इतर हजारोंच्या खुनाचें काय ?

आपण पश्चिम गटांत सामिल होणार नाहीं, असें टीटोनें आपल्याला एका बाजूला नेऊन सांगितलें, म्हणून तो पश्चिमी गटाला सामील होणार नाहीं, असें घरीं परतल्यावर या पाहुण्यांनीं जाहीर करणें ठीक आहे. पण संयुक्त राष्ट्रसंघाची जनरल असेंब्ली व जागतिक बँकेचें शिष्टमंडळ यांचें काय ?

युगोस्लावियाचें सोवियत युनियन बरोबरचें भांडण, म्हणजे छोट्या राष्ट्रांचें, मोठ्या राष्ट्राच्या वर्चस्वाखालून निघण्याचें अभिजात भांडण होय, असें सुचविणें हेंसुद्धां ठीक आहे. पण हें वर्चस्व कशा स्वरुपाचें होतें ? वॉशिंग्टननें अटलांटिक करार लादल्यानें, करारांतील राष्ट्रें जशीं अफाट युद्ध-बजेटामुळें लुळी-पांगळी करण्यांत आलीं आहेत, तशी पूर्व युरोपमधील राष्ट्रांची स्थिती नाहीं. ही राष्ट्रें जेव्हां कर्ज स्वीकारतात, किंवा व्यापारी करार करतात, तेव्हां त्यांचें स्वरूप, देशाच्या समग्र अर्थव्यवस्थेला सहाय्यक असें असतें; मार्शल योजनेप्रमाणें त्यांत राजकीय अटी लादण्यांत येत नाहींत.

आज जें टीटोची प्रणयाराधना करीत असतांना, स्वतःला प्रगतीचे मित्र म्हणवून घेत आहेत, ते, टीटोगटानें आपली पाशवी व साम्राज्यशाहीवर अवलंबून राहण्याची वृत्ती याचा अधिक स्पष्ट पुरावा दिला, म्हणजे अत्यंत वेडगळ दिसूं लागतील. वेळींच सावध व्हा, हाच त्यांना उत्कृष्ट उपदेश होय. असा सल्ला देणें म्हणजेच, ते टीटोला देत असलेला पाठिंबा, डावपेंच नसून चूक आहे, असें धरून चालणें होय. व हें गृहीत धरणें म्हणजे पर्यायानें त्यांना मान देणेंच होय. आज टीटोला पाठिंबा देणाऱ्यांपैकीं अनेक, कावेबाजपणें डावपेंच म्हणूनच हें करीत आहेत.

---

टीटोच्यासारखा मधला मार्गच नाहीं, ही गोष्ट स्पष्टपणें समजली पाहिजे. एक तर, राष्ट्रें अस्तित्वांत असलेल्या किंवा प्रगत अशा समाजवादी पद्धतीवर आधारलीं आहेत किंवा, भांडवलदारी पद्धतीवर आधारलेलीं आहेत. जर तीं पहिल्या प्रकारचीं असतील, तर सोवियत युनियनच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं शांततेच्या गटांत सामील झालें पाहिजे, कारण सोवियत युनियनच्या सामर्थ्याविना व सहाय्याविना, तीं पारध्यासारखी नजर लावलेल्या साम्राज्यवादी राष्ट्रांकडून

गिळंकृत होणें अपरिहार्य आहे. जर तीं दुसऱ्या प्रकारची असतील, तर राजकीय व आर्थिक सत्यांच्या नियमानें, तीं जगांतील अत्यंत प्रभावी भांडवलदारी राष्ट्राच्या अमेरिकेच्या कक्षेंत खेंचली जातील. मग त्यांची राजकीय पद्धती ब्रिटनसारखी भांडवलदारी ( पश्चिमी ) लोकशाही असो, किंवा स्पेन, ग्रीस, युगोस्लाविया-सारखी पोलिसशाही असो, त्यांचें अस्तित्व अजून अमेरिकेच्या सदिच्छेवरच अवलंबून आहे.

युगोस्लावियाच्या उद्योगधंद्यांचा बराचसा भाग सरकारनें आपल्या हातीं घेतला आहे. पण लोकशाही व खरेंखुरें जनतेचें नियंत्रण, यांच्या अभावीं उद्योगधंद्याचें असें राष्ट्रीयीकरण म्हणजे सरकारी भांडवलशाही होय. तसें म्हटलें तर—नाझी जर्मनींत किंवा फॅसिस्ट इटलींतसुद्धां, सरकारनें उद्योगधंद्यांच्या महत्वाच्या विभागांचें राष्ट्रीयीकरण केलें होतें, किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवलें होतें. शिवाय खेडे विभागांतील कुलकांना, ( सधन शेतकऱ्यांना ) टीटोनें, उत्तेजन दिल्यामुळें, खेडेगांवात भांडवलदारी समाजपद्धतीची वेगानें पुनर्रचना होत आहे.

टीटोगटाच्या राजवटींत, युगोस्लाव " समाजवादाची " अधोगती लवकरच वेगानें होईल, व त्यांच्या पाठिराख्यांना मार्क्सवाद आणि समाजवाद यांच्या विषयींच्या आस्थेचें ढोंग दीर्घकाळ टिकवितां येणार नाहीं, हें निस्संशय आहे. याचा अर्थ असा कीं, युगोस्लाव जनतेचा भावीकाल भीषण व भयाण ठरला असता; पण युगोस्लाव जनता ही यूरोपमधील अत्यंत उत्साही, शौर्यशाली व दिलदार आहे, त्यांच्यांतील प्रतिकारशक्ति जाग्या होत आहेत, व आपल्या अनुभवांतून धडे घेऊन त्या सामर्थ्यवान बनत आहेत, आणि प्रत्येक ठिकाणच्या पुरोगामी चळवळीनें तेच धडे गिरविले पाहिजेत, कारण सोवियत युनियनच्या नेतृत्वाखालील समाजवाद व शांततेचा मोर्चा, आणि साम्राज्यशाही व युद्धाचा मोर्चा, यांतच आज निवड करावयाची आहे.

—०—

# पु र व णी

लेखक : **भाई श्रीपाद अमृत डांगे**

## [ १ ]

१९४८ च्या जून महिन्यांत जगांतील कम्युनिस्ट पक्षांना, कामगारवर्गाला व साम्राज्यशाहीविरोधी जनतेला कळविण्यांत आलें कीं युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी व त्यांचें सरकार म्हणजे टीटो-कार्देली आदि महशूर पुढारी, यांनीं कम्युनिझमचा, मार्क्सवादाचा रस्ता सोडून दिला आहे. त्यांनीं भांडवलदारीला पोषक अशा संकुचित 'जनताविरोधी राष्ट्रवादाचा रस्ता धरला आहे. त्यामुळें त्यांचें परराष्ट्रीय धोरण व त्यांच्या देशांतील कामगार-शेतकरी व इतर पीडित जनतेशीं वागण्याचें धोरण हें देशाच्या स्वातंत्र्याला विघातक व जनतेच्या हिताला मारक होणार आहे. युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी टीटो-वगैरे यांनीं त्यांच्यावर कम्युनिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोच्या इतर कम्युनिस्ट पार्ट्यांनीं केलेल्या टीकांना उत्तर देण्याचें किंवा त्या मानून आपल्या चुका दुरुस्त करण्याचें अमान्य केलें आहे. सारांश टीटो आदींचा गट कम्युनिझममधून फुटून बाहेर पडला आहे.

ही १९४८ ची जून महिन्यांतील घोषणा युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या फक्त चुकाच दाखवीत होती व त्यांनीं कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाला सोडून जाण्याचा कसा रस्ता धरला आहे व त्यापासून त्यांना युगोस्लावियाच्या कम्युनिस्टांनीं कसें परावृत्त करावें एवढेंच सांगत होती.

परराष्ट्रीय बाबतींत सोविएत-मैत्रीचें धोरण सोडून सोविएत-विरोधाचें धोरण टीटो घेत आहे, व राष्ट्रीय धोरणांत भांडवलदारी-पिळवणुकीला आळा घालण्याऐवजीं शेतकरी विभागांत गरीब व मध्यम शेतकऱ्यांच्या पिळवणुकीचा मार्ग त्यानें खुला केला आहे व कारखानदारीच्या वाढींत व आर्थिक पुनर्घटनेमध्यें कामगारांची सत्ता व पुढारीपण पुढें येत आहे असा स्पष्ट आरोप कॉमिन्फॉर्मच्या ठरावांत केला होता.

सारांश, सोविएतच्या लाल फौजांनीं मुक्त केलेले इतर देश ज्या कामगार-शेतकरी जनतेच्या लोकशाही मार्गानें जाऊन कम्युनिस्ट पार्टीच्या पुढारीपणाखालीं दारिद्र्य व पारतंत्र्य यांतून मुक्त होत होते तो मार्ग युगोस्लावियाचे टीटो आदि पुढारी सोडीत आहेत अशी घोषणा जगभर झाली.

त्यावेळीं मी नाशिकच्या तुरुंगामध्यें होतों. या घोषणेचे कांहीं तुरळक भाग, अगदीं विपर्यस्त स्वरूपांत आम्हांला 'टाईम्स ऑफ इंडिया' मधून वाचायला मिळाले. टीटो-कार्देली भांडवलदार धार्जिणे, म्हणजे विश्वासघातकी निघाले, त्यांनीं कॉमिन्फॉर्मची संघटना सोडली, हें ऐकून प्रथम अनेक जणांना धक्काच बसला.

पुष्कळ कम्युनिस्टांना प्रथम हा भांडवलदारी वर्तमानपत्रांचा कांहीं डाव आहे असेंच वाटलें. कारण युगोस्लावियाचा फॅसिस्टविरोधी लढा, टीटो-कार्देली यांचा नामांकित कम्युनिस्ट म्हणून जगभर झालेला गाजावाजा, हिंदी कम्युनिस्ट पार्टीच्या कलकत्ता येथील दुसऱ्या कॉंग्रेसमध्यें युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट प्रतिनिधींचा झालेला गौरव, कलकत्त्यास युवक-संघाच्या कॉंग्रेसमध्यें युगोस्लावियाच्या प्रतिनिधींना मिळालेला पुढारीपणाचा मान, हें सर्व पहातां कॉमिन्फॉर्मचा ठराव वाचून प्रथम कांहीं वेळ जरासें आश्चर्य वाटणें साहजिकच होतें.

पण सोविएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षानें टीटोवर केलेल्या राजकीय टीकांचे व आरोपांचे कांहीं मुद्दे व त्यांतील कांहीं शब्द ओझरतेपणें टाईम्सनें दिले होते. त्यामुळें आमच्या इकडे नाशिक जेलमध्यें हा प्रकार काय असावा याचा अंदाज येण्यास फारसा वेळ लागला नाहीं. तुरुंगाबाहेर कॉमिन्फॉर्मचा ठराव ताबडतोब मिळूं शकला व लवकरच आमच्या पक्षानें टीटो-कार्देली यांनीं मार्क्सवादाचा रस्ता सोडून भांडवलदारी धोरणाचा रस्ता धरला व कामगारवर्गाचा घात केला याबद्दल आपला निषेध जाहीर केला.

जून १९४८ च्या ठरावानें टीटोवादाचें फक्त राजकीय स्वरूप लोकांना कळलें. आणि भांडवलदारी वर्तमानपत्रांनीं व टीटोवाद्यांनीं त्याला कम्युनिस्टांमधील 'प्रामाणिक' मतभेदाचें स्वरूप दिलें. टीटो-कार्देली यांचा कम्युनिस्ट पक्ष आणि कॉमिन्फॉर्म व सोविएत युनियनचा कम्युनिस्ट पक्ष यांच्यामध्यें युगोस्लावियानें आपली सामाजिक-आर्थिक-राजकीय पुनर्घटना कशी करावी याबाबत 'मतभेद' झाले आहेत आणि टीटो–कार्देली यांनीं आपली स्वतंत्र वृत्ति व ज्ञान दाखवून आपलेंच मत खरें आहे असा हट्ट धरल्यामुळें व अशी 'स्वतंत्र वृत्ति' कम्युनिस्टांच्या आचरणांत खपत नसल्यानें कॉमिन्फॉर्मनें

टीटोवर हल्ला केला अशी हांकाटी येथील वर्तमानपत्रांनीं केली. युगोस्लाविया देश आपल्या 'लाल साम्राज्यशाहींत' दाखल करण्याच्या स्तालिनच्या महत्त्वाकांक्षी कटाला टीटोनें दाद दिली नाहीं व आपला देश स्वतंत्र राखून कोणाच्याही गटांत सामील न होतां, स्वतंत्र रस्त्यानें समाजवादी रचनेचा कार्यक्रम अंमलांत आणण्याचा बाणेदारपणा त्यानें दाखविला म्हणून चिडून जाऊन सोविएत रशिया व त्याचे साथीदार यांनीं टीटोला वाळींत टाकलें अशी ओरड राष्ट्रवादी भांडवलदार पक्ष व उजव्या गटाचे सोशालिस्ट, जयप्रकाश नारायण, मसानी, अशोक मेहता यांनीं सुरू केली. आश्चर्याची गोष्ट ही की जगांतील सर्व भांडवलदार पक्ष व भांडवलदारधार्जिणे उजवे सोशालिस्ट यांचे, जणूं काय ठरल्याप्रमाणें, ताबडतोब सोविएत–विरोधी व कम्युनिस्ट-विरोधी कर्णे एकाच सुरानें वाजू लागले.

हें सर्व ऐकत असतांना, मी स्वतः युगोस्लावियांत काय ऐकलें व पाहिलें याची माझ्या मनामध्यें आठवण करूं लागलों. मी युगोस्लावियामध्यें १९४७ सालीं दोनदां जाऊन आलों होतों. तसेंच इंग्लंड-फ्रान्समध्यें असतांना युगो-स्लावच्या ट्रेड युनियन व युवक संघाच्या पुढाऱ्यांच्या कांहीं चळवळी होत त्याही पहाण्याची मला संधि मिळाली होती. विशेषतः युगोस्लावियामध्यें मी गेलों त्यावेळीं टीटो आणि कार्देली तसेंच त्यांचे इतर पुढारी यांच्याशीं माझी गांठही झाली होती. कॉमिन्फॉर्मचा ठराव पाहतांच त्या सर्व गोष्टींची मला आठवण झाली व त्यावेळीं ज्या गोष्टी मला खटकल्या अथवा ज्यांचा नीट अर्थ लागत नव्हता किंवा ज्या मला क्षुल्लक वाटल्या त्यांची बरोबर संगति कॉमिन्फॉर्मच्या ठरावानें लागूं लागली.

पण १९४८ जूनच्या ठरावानंतर बल्गेरिया, हंगेरी वगैरे देशामध्यें तेथील कम्युनिस्ट पक्षांतील व सरकारांतील अनेक पुढारी गिरफदार झाले व त्यांच्या-वरील खटल्यांमध्यें जो पुरावा पुढें आला त्यामध्यें टीटो-कार्देलींचा युगोस्ला-वियांतील गट हा केवळ राजकीय गट नसून जर्मन-ब्रिटिश-अमेरिकन साम्राज्यवाद्यांचा एक अत्यंत पाताळयंत्री हेर खात्याचा गट आहे हें दिसून आलें. हंगेरीमधील रायक खटल्यामध्यें हा सर्व पुरावा संपूर्णपणें उजडकीला आला. त्यामुळें १९४९ च्या नोव्हेंबर महिन्यांत कॉमिन्फॉर्मनें जाहीर केलें की युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट पक्षाचें पुढारीपण फॅसिस्ट हेरांच्या कचाटींत सांपडलें आहे; युगोस्लावियाचें सरकार पूर्वीं जें जनतेच्या लोकशाही मार्गानें आपारें

होतें तें खलास झालें असून तेथें पूर्वी जी जनतेची क्रांति झाली होती ती मोडली आहे व तेथील राज्य फॅसिस्ट प्रतिक्रांतिकारकांनीं–टीटो–कार्देली गटानें–काबीज केलें आहे. युगोस्लाविया आतां ब्रिटिश अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या गटांत गेला आहे, त्यामुळें तेथील जनतेला व जे कांहीं कम्युनिस्ट शिल्लक असतील त्यांना परत नव्यानें जनतेच्या क्रांतीचा मार्ग रचावा लागणार आहे.

या कटाचे धागेदोरे कसे विणले गेले, जर्मन अमेरिकन हेर हेच नामांकित कम्युनिस्ट व कम्युनिस्ट पार्टीचे पुढारी कसे बनले, हें सर्व नाटक ते १९४९ पर्यंत इतकें बेमालूनपणें कसें करूं शकले व एका सबंध देशाच्या जनतेच्या सरकारचें स्वरूप पोखरून त्याला ते सोविएतविरोधी व कामगारविरोधी क्रांतिघातकांचें सरकार कसें बनवूं शकले याचा सविस्तर वृत्तांत पुस्तकरूपानें तयार व्हायला वेळ लागला. हंगेरींतील रायक खटल्यानंतर त्यांतील पुरावा घेऊन दरेक कार्तुननें ‘ टीटोचा युरोपविरुद्ध कट ’ हें पुस्तक इंग्रजींत प्रसिद्ध केलें.

तें पुस्तक नासिक जेलमध्यें कसेंबसें आम्ही मिळविलें. तें भाषांतर आज येथें प्रसिद्ध होत आहे.

महाराष्ट्रांतील कामगार–शेतकरी जनतेमधील प्रत्येक जाणत्या वाचकानें हा टीटो कट वाचणें अवश्य आहे. कारण जनतेच्या स्वातंत्र्याचा व कामगारवर्गाचा घात करणारे टीटोवादी फक्त युगोस्लावियांतच नाहींत. टीटोवाद, किंवा त्याचेंच दुसरें नांव ट्रॉटस्कीवाद, सर्व देशामध्यें उद्भवला आहे. तो निरनिराळीं रूपें, भाषा, घोषणा, धारण करतो. क्रान्तीच्या नांवानें उठावाच्या आघाडीवरसुद्धां उभा रहातो व त्याचस्थळीं क्रांति व प्रगति मारण्याचे, कामगारवर्गाला खच्ची करून भांडवलदारी–साम्राज्यशाहीला वाचविण्याचे डाव अंमलांत आणतो आणि म्हणून ट्रॉटस्की–टीटोवाद हा उघड भांडवलदारी पक्षांपेक्षां जास्त घातक व मारक असतो. हें तो कसें करतो याचा वृत्तांत या पुस्तकांत पहायला मिळेल.

## [ २ ]

हेरांचीं जाळीं विणून, आपले हस्तक दुसऱ्या देशांत पाठवून तेथील राज्य पोखरून उलथून पाडण्याच्या मनोरंजक अथवा भयानक कथा आपल्याला अनेक वाचायला मिळतात. नन्दांचें राज्य कौटिल्यानें पोखरून पाडलें; शिवाजी आपले हेर मोंगलाई दरबारांतसुद्धां पाठवी. फॅसिस्टांनीं फ्रान्स, इंग्लड, अमेरिका, इराण, इत्यादि देशांच्या सरकार-दरबारांत व सैन्यांत आपले हेर पेरून ठेवले होते, त्यांनीं तर हिटलरनें स्वारी करतांच फ्रान्स वगैरे देशाच्या लष्करांना

लढतां येऊं नये अशी आगाऊच तयारी आपल्या पगारी हेरांतर्फे केल्याचें आपण वाचलेंच आहे. पहिल्या महायुद्धाच्या वेळच्या माताहारी वगैरे सुप्रसिद्ध हेरांच्या कथा व सिनेमापट आपण अद्याप विसरलों नाहीं. मग टीटोवादी हेरांचा कट हा त्यांतलाच एक भाग नाहीं का ? आणि असेंच जर त्याचें स्वरूप असलें तर मग जगांतील कामगार–शेतकरी वर्गानें, त्यांच्या राजकीय पक्षानें, मार्क्सवादाचें तत्त्वज्ञान, डावपेंच, इत्यादींचा योग्य अभ्यास, विचार व आचार करून सावधगिरीनें या हेरबाजीला तोंड द्यावें एवढें सांगण्याची जरूरी काय ? गुप्त हेरांच्या जाळ्याला तोडायचें तर त्याला काटणारें दुसरें गुप्त जाळें विणलें म्हणजे झालें ! आणि हें सर्व करण्याचा खटाटोप ज्या त्या देशाच्या सरकारनें करावा. ज्यांचें सरकार जायचें त्यांच्या त्यांच्या पोलिसखात्यानें तिकडे लक्ष द्यावें. बरें, क्रांतिकारकांचे हल्ले मोडून काढण्यासाठीं जर सरकार हा हेरबाजीचा प्रकार वापरीत असेल तर त्यासाठीं आपल्या 'क्रांतिकारक कटांचे' धागेदोरे नीट सांभाळले म्हणजे झालें ! त्यामध्यें मार्क्सवाद, कम्युनिझमचें तत्त्वज्ञान, राजकीय डावपेंच, व्यूहरचना, डाव्या—उजव्यांचे मतभेद व पाखंड एवढा अवाढव्य विचार कशासाठीं, असा प्रश्न कोणी विचारतात.

त्याला उत्तर असें कीं हल्लीं आपण जी क्रांति करूं इच्छितों ती कांहीं एखाद्या पूर्व अथवा मध्ययुगीन राजाच्या वा प्रधानाच्या अदलाबदलीसारखी संकुचित अथवा व्यक्तिगत नसते. एकादा माणूस मारून किंवा गुप्त कट करून ती घडणारी नसते. त्याचप्रमाणें क्रान्तीला मारणारी प्रतिक्रान्तीही तितकीशी गुप्त अथवा व्यक्तिगत कटावर आधारूनच केवळ होत नसते. ज्या राज्याच्या फेरबदलानें अथवा ज्या क्रांतीनें सबंध समाजाची आर्थिक रचना बदलायची असते, ज्यामध्यें विशिष्ट वर्गाची, मालमत्तेची सत्ता बदलून त्याजागीं पूर्वी पिळल्या जाणाऱ्या वर्गाची नवोदित क्रांतिसत्ता स्थापन होऊन नवा समाज बांधायचा असतो, ती क्रांति रोखून धरण्याचें अथवा ती झाली असतां त्या क्रांतीच्या आधारावर स्थापन झालेल्या सरकारला उलथून पाडण्याचें काम नुसते पगारी हेर अथवा कुशल व क्रूर मारेकरी पाठवून यशस्वी होऊं शकत नाहीं. त्यासाठीं क्रांतिकारक वर्गाचें राजकीय पुढारीपण व त्याचा पक्ष यांचा नाश करून, व्यक्तींची कत्तल करून, तसेंच त्या पक्षाचें धोरण चुकीच्या रस्त्यानें नेऊन त्यांच्या अनुयायांना व त्या पक्षाच्या तंत्रानें चालणाऱ्या क्रांतिकारक वर्गाला आर्थिक, राजकीय, लष्करी व वैचारिक अडचणी, खड्डे, भोंवरे यांत घालून मारून काढावें लागतें. क्रांतिकारक वर्गाचें स्वरूप जितकें व्यापक, व संपुष्टांत आलेल्या

वर्गाचा पाया जितका संकुचित होत जातो, तितकें क्रांतिघातकांना क्रांतीचेंच सोंग घेऊन तिच्या पोटांत शिरून वागावें लागतें. भांडवलशाहीनें १९ व्या शतकांत सर्व जग व्यापल्यावर जगाला तिच्या प्राणघातक मिठींतून सोडवून कम्युनिझमकडे नेण्याचे दिवस जसे जवळ येत चालले व त्यासाठीं कामगारवर्गीय तत्त्वज्ञान व त्याचे पक्ष दिवसेंदिवस सज्ज होऊन वाढूं लागले तसतसें भांडवलदारी क्रांतिघातकांना त्या वर्गाचेंच तत्त्वज्ञान घेऊन, त्याच्याच पक्षाचे कार्यक्रम घेऊन अथवा त्याच्याच पक्षांत शिरून कामगार-क्रांति हमखास लोकांना तिरस्करणीय वाटून ती त्यांच्याच हस्तें मारली जावी किंवा जनतेपासून अलग पडून तिच्या शत्रूंना मारण्यास ती सोपी व्हावी, अशा प्रकारें पक्षाच्या तत्त्वज्ञानाला कलाटणी देणारे नवीन डावपेंच शोधावे लागले. क्रांतिघातक डावपेंचांचें हें नवीन स्वरूप आजच्या काळांत ट्रॉट्स्कीवाद किंवा टीटोवाद या नांवानें ओळखलें जातें.

याबाबत इतर देशांचीं उदाहरणें देण्यापेक्षां युगोस्लावियाचेंच उदाहरण घेऊन पाहूं. त्यावरून आपल्याला कळेल कीं, सोविएत युनियनच्या पुढाऱ्यांचे, तसेंच हंगेरी, बल्गेरिया, पोलंड, इटली वगैरे मधील कम्युनिस्ट पुढाऱ्यांचे बेधडक खून करण्याचे कट करीत असतांना सुद्धां त्या कटासाठीं व तेथील कामगारसत्तेचीं व जनतेचीं सरकारें उलथून पाडण्यासाठीं, ट्रॉट्स्की किंवा टीटो यांना नुसताच पैसा, हेरगिरी व हत्यारें यांवर अवलंबून राहून भागण्यासारखें नव्हतें. तर त्यांना कम्युनिस्ट पक्ष, कम्युनिस्ट तत्त्वज्ञान, त्याची शिस्त, विचार व आचार या सर्वांवर आपलें म्हणून कांहीं ' विशिष्ट मत ' मांडून पक्ष अथवा पक्षाचें स्वरूप घ्यावें लागलें. नामांकित कम्युनिस्ट क्रांतिकारक म्हणून प्रथम कीर्तीचें कवच कमवावें लागलें. आणि त्या कवचाआड दडून मग अपविचार, अपप्रचार, अपप्रवृत्ति, हीनाचार व मारेकरी–हत्यार या सर्वांचा मारा त्यांनीं क्रांतीवर केला. त्यापैकीं अत्यंत यशस्वी प्रयत्न म्हणजे युगोस्लावियांतील टीटो-कट.

## [ ३ ]

युगोस्लाविया हा ज्याला आपण बाल्कन पट्टीचे देश म्हणतो त्यांतील एक. मध्ययुगीन सरंजामदारी राज्यांच्या झटापटींत व आधुनिक भांडवलदारी राष्ट्रांच्या झटापटींत बाल्कन देशांना एक विशिष्ट महत्त्व असे. त्या पूर्वेतिहासांत येथें जाण्याची जरूरी नाहीं. गेल्या शतकामध्यें इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी यामध्यें

जेव्हां भांडवलदारी समाजरचना व वर्गसत्ता स्थापन झाली तेव्हां त्यांनीं बाल्कन देशांना आपल्या भांडवलदारी कारखान्यांच्या बाजारपेठा व वसाहती बनविण्याचे हल्ले सुरू केले. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व झारचा रशिया यामध्यें कुठचा बाल्कन देश कुणी, कसा व किती खायचा याबद्दल चुरस सुरू झाली.

भांडवलदारी देशांमध्यें सरंजामदाऱ्या, बलुते, गल्यागल्यांचें मुलकी राज्य, हीं मोडून तिथें अफाट उत्पादनाचीं नवीं साधनें, त्यांचा नवा मालक भांडवलशाही व नवा निर्माता वर्ग कामगार यांवर आधारलेली समाजपद्धती निर्माण झाली.

पण पोलंड, हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया, व हल्लीं युगोस्लाविया म्हणतात त्यांतील सर्बिया, क्रोशिया, मॅसडोनिया, वगैरे देशांना व राष्ट्रगटांना सरंजामी दारिद्र्यांतून निघून भांडवलदारी पद्धतींत प्रवेश करण्याची संधि मिळाली नाहीं. हे देश व राष्ट्रगट इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व रशिया यांच्या चढाओढीच्या क्षेत्रांत वाटले गेले. हंगेरी हा ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्याचा भाग झाला. पोलंड तीन साम्राज्यांनीं वाटून घेतला होता. युगोस्लाविया हाहि ऑस्ट्रियन साम्राज्याचा भाग होता.

स्पर्धाग्रस्त साम्राज्यवाद्यांनीं आपल्या नफेबाजीखातर जगाची फेरवांटणी करण्यासाठीं जें १९१४–१८ चें युद्ध केलें त्यांत जर्मन साम्राज्यवाद्यांचा पराभव झाला. त्यानंतर इंग्लंड–फ्रान्स–अमेरिका यांनीं जो व्हर्सायचा तह केला त्यांत मध्ययुरोपच्या देशांची फेरवांटणी केली. त्यांमधून पोलंड, हंगेरी, झेकोस्लोवाकिया, हीं जशीं नवीं 'स्वतंत्र' राज्यें अस्तित्त्वांत आलीं त्याचप्रमाणें युगोस्लाविया राज्य घडविण्यांत आलें.

त्या युद्धामध्यें रशियाची झारशाही तेथील कामगारवर्गानें लेनिन–स्तालिनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पुढारीपणाखालीं उलथून पाडली व तेथें सोविएत–सत्ता स्थापन केली. सोविएत सत्तेनें ताबडतोब झारच्या राज्यांत जे राष्ट्रगट अंकित म्हणून होते त्यांना स्वतंत्र होण्याची मुभा दिली, मदत केली. त्यामुळें पोलंड, फिनलंड, बाल्टिकमधील कांहीं देश वगैरे स्वतंत्र झाले.

पण या स्वतंत्र देशांतील सत्ताधारी वर्ग लवकरच इंग्लंड–फ्रान्स–जर्मनी अमेरिका यांच्या भांडवलदारी चढाओढीला बळी पडले. प्रत्येकानें आपापलें भांडवल त्यामध्यें पेरून तेथील व्यापार, कारखाने, व शेती हीं आपल्या भांडवलदारी नफेखोरीला अनुकूल करून घेतलीं. युगोस्लावियाची तीच गत झाली.

हें सर्व मागासलेले देश शेतीप्रधान राहिले. त्यांनीं कच्चा माल, धनधान्य, खाणीचा माल उत्पन्न करावा व तो उत्पन्न करण्यांत ज्या देशाचें

भांडवल घातलें असेल त्या देशांत रवाना करावा. आणि या निर्गत मालाऐवजीं तेथून पक्का माल आयात करावा. अशा रीतीनें युगोस्लावियाचा तंबाकू, फळें, दारू, कच्चे तांबें, जंगलाचें लाकूड इत्यादि सामान इंग्लंड, फ्रान्स, जर्मनीला जाई व त्यांचें कापड, गाड्या, हत्यारें युगोस्लाविया विकत घेई. परतंत्र वसाहतीसारखी त्यांची आर्थिक जीवनाची वेसण या भांडवलदारी देशांच्या व त्यांच्या राजकारणाच्या पकडींत असे.

जगांतील भांडवलदारी समाजाची आर्थिक कुचंबणा व अरिष्टें जसजशीं वाढत गेलीं व भांडवलशाहीला मारक अशा कामगार क्रांतीची शक्ति उग्र रूप धारण करू लागली तसतसा त्या कामगार-क्रांतीला मारण्यासाठीं व सोविएत युनियनला चिरडून भांडवलदारी प्रथेला जीवदान देण्यासाठीं फॅसिझमचा उदय झाला. जर्मन फॅसिझमला यंत्र व धनसामुग्री पुरविणारी अमेरिकन साम्राज्यशाही व जर्मन-इटालियन गट आणि इंग्लंड फ्रान्सचा वसाहत गब्रू गट यांमध्यें बाल्कन देशावरील वर्चस्वाबद्दल स्पर्धा लागली. दोन्ही गट आपल्याला अनुकूल असे भांडवली-फॅसिस्ट पक्ष बाल्कन देशांतील राज्यावर बसवूं लागला.

त्याचवेळीं सोविएत रशियाची वाढती संपत्ती, त्याची सुखदायी सोशालिस्ट समाजरचना, कामगार सत्तेची नवीन लोकशाही यांच्या अनुकरणानें बाल्कन देशांतील कामगार व पीडित शेतकरी, या परक्या साम्राज्यांच्या भांडवलदारांच्या कचाट्यांतून व त्यांचे स्वदेशांतील साथीदार जे देशी भांडवलदार-जमीनदार त्यांच्यापासून मुक्त होण्यासाठी क्रांतिकारक संघटना करीत होता. त्यांचें पुढारीपण तेथील कम्युनिस्ट पक्षाकडे होते. म्हणून कम्युनिस्ट पक्षांचें धोरण, संघटना, डावपेंच हा त्या त्या देशांच्या स्वातंत्र्याच्या चळवळींत अत्यंत महत्वाचा प्रश्न झाला होता.

## [ ४ ]

युरोपांतील देशांत भांडवलदारी प्रथेचा उदय होतांच, कामगारवर्गाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा, कम्युनिस्ट चळवळीचा, उदय १९ व्या शतकांतच झाला. १८४७ त मार्क्स-एंगलसच्या जाहीरनाम्यानें भांडवलशाहीविरुद्ध उठाव करणाऱ्या क्रांतिकारक कामगारवर्गाला शास्त्रीय दृष्टिकोणाचें तत्त्वज्ञान व कम्युनिस्ट पक्ष संघटनेचा तात्त्विक पाया मिळाला. १८४८ च्या फ्रान्समधील क्रांतीमध्यें जून महिन्यांत भांडवली रिपब्लिक व काम मागणारे कामगार यांची

जगाच्या इतिहासांतील पहिली भांडवलदारविरोधी—कामगार चकमक उट
समाजप्रगतीच्या ऐतिहासिक परंपरेनें प्रचंड यंत्रसाधना आज जगांत उत्पन्न झाली. ती यंत्रसाधना आज भांडवली वर्गाच्या खाजगी सुखासाठीं वापरली जाते; नफा, बाजारपेठा, महायुद्धें, यांचीं अरिष्टें निर्माण करते. त्याऐवजीं जर तिचा उपयोग संपूर्ण मानवजातीच्या सुखासाठीं व्हायचा असेल, तर ही विराट यंत्रसाधना समाजाच्या मालकीची करून टाकली पाहिजे. ती करण्यासाठीं व चालवण्यासाठीं कामगारवर्गाची सर्वाधिकारी राजसत्ता स्थापन झाली पाहिजे, त्याच वर्गाच्या आधिपत्याखालीं नव्या समाजाची उभारणी होऊं शकते व होईल, हें मार्क्सवादानें जाहीर केलें.

पण ही जाणीव भांडवलदारी वर्गाच्या खाजगी मालकीला विघातक असते. म्हणून तो वर्ग आपलीं सर्व साधनें—सरकार-संस्था, तुरुंग-कोर्ट-कचेऱ्या, फौजफाटा, आर्थिक बळ व बुद्धिबळ वापरून कामगारवर्गाला या जाणीवेपासून व तिला अनुरूप चळवळ, कार्यक्रम व कृति यापासून म्हणजे कामगार-क्रांतीपासून रोखून धरतो, त्यानें तो प्रयत्न केल्यास त्यास दडपून मारून काढतो. १८७१ च्या पॅरिस कम्यूननें कामगारवर्गाची राजसत्ता प्रथम स्थापन केली. त्यावेळीं फ्रान्सवर स्वारी करणारा जर्मन भांडवलदार वर्ग, त्या स्वारींत पराभूत झालेला फ्रान्सचा भांडवलदार वर्ग व युरोपांतील सर्व ऐतखाऊ वर्गांचे प्रतिनिधी, राजे व सरकारें, आपलें वैर विसरून त्या कामगारसत्तेविरुद्ध एक झालीं. जर्मन व फ्रेंच फौजांनीं मिळून पॅरिसच्या कामगारांची कत्तल केली, तेव्हांपासून कामगारवर्गाच्या क्रांतिकारक चळवळीला अत्यंत क्रूर हिंसेनें भांडवलदारवर्ग चिरडून कसा टाकतो, व कामगारराज्य स्थापन करणें म्हणजे भांडवलदारवर्गाचें राज्ययंत्र आहे तसें घेऊन त्यालाच जरासा मुलामा चढवून किंवा त्याच्या नांवाची पाटी बदलून कामगार सत्ता कशी होऊं शकत नाहीं किंवा समाज-रचनेचे प्रश्न कसे सुटूं शकणार नाहीत याचें स्पष्ट दिग्दर्शन झालें, व त्याचें तात्त्विक विवरण मार्क्सनें केलें.

तो अनुभव भांडवलदारी पक्षांनीहि लक्षांत घेतला. १९ व्या शतकाच्या काळांत भांडवलदारी साम्राज्यें सर्व जगभर पसरलीं. युरोपांतील भांडवली वर्गांना, आशिया, आफ्रिका-खंडाची लूट मिळाली, तेथील पूर्वसंचित धन त्यांनी लुटलें. हिंदुस्थान, चीन, वगैरे देशांतील करोडों शेतकरी व नवोदित कामगार वर्ग यांचे श्रम साम्राज्यशाहीच्या पिळणुकीच्या घाणींत घालून, युरोप-अमेरिकन

भांडवलदार तात्पुरता आपल्यावर कोसळणाऱ्या अरिष्टामधून रस्ता काढूं लागला. भांडवलदारी साम्राज्यांनी सर्व जग व्यापलें.

पण कामगार चळवळ बुडाली नाहीं. तेव्हां तिच्यामध्यें तात्त्विक दृष्टीचाच बुद्धिभेद करून तिला नामोहरम करावें, असा डाव भांडवलदारी वर्गानें केला. लुटलेल्या धनाचा कांहीं भाग कामगारवर्गाच्या अत्यंत वरच्या पातळीच्या पुढारी गटांना, भांडवलदारांनीं जादा पगार, सवलती, भागीदारी वगैरे प्रकारांनीं कामगारवर्गाचे संपलढे वगैरे होतांच सदलतीरूपानें वाटला. तसेंच भांडवली पार्लमेंटामध्यें वहुमत करून आपलें कामगार-राज्य स्थापणें शक्य आहे असा भ्रम त्यांच्यांत निर्माण केला. त्यासाठीं कम्युनिस्ट पक्ष संघटना, त्यांचें कांटेकोर तत्त्वज्ञान व आचार, वर्ग कलहाची त्यांची शास्त्रीय ऐतिहासिक दृष्टी वगैरे "भारुडा" ची जरुरी नाहीं, गोडीगुलावीनें, आस्ते आस्ते, हृदय-पालटानें, मतदानानें, शेअरच्या भागीदारीनें किंवा लेबर पार्टी सारखे सर्वमान्य पक्ष स्थापन करून, त्यांच्या मार्फत उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यानें व भांडवलदार-जमीनदार वर्ग संपूर्णपणें विकतच घेऊन टाकल्यानें नवा समाज आपण बनवूं शकतों, समाजाची पुनर्घटना आपण करूं शकतों, अशी सुधारणावादी विचारसरणी मांडणारी घातकी पाखंडें किंवा पंथ कम्युनिस्टांमध्यें उत्पन्न केले. सुधारणावादाची व पाखंडाची निरनिराळीं स्वरूपें झालीं. बर्नस्टाईन, बाकुनिन, टॉलस्टॉय, कॉऊटस्की, हाइंडमन इत्यादींचे पंथ निघाले.

या सर्व पाखंडाचा येथें विचार करणें शक्य नाहीं पण या सर्वांचें ध्येय एकच. मार्क्सच्या शुद्ध शास्त्रीय दृष्टिकोनानें चालणाऱ्या कामगारवर्गाला—, त्याच्या कम्युनिस्ट पक्षाला व विचारसरणीला भांडवली बुद्धिभेदाच्या गर्तेमध्यें लोटून नामोहरम करायचें. हिंसात्मक कत्तलींचें हत्यार वापरून भांडवलदार—जमीनदारशाही आपली वर्गसत्ता चालवूं शकते हें तर खरेंच, पण सुधारणावाद, अतिजहालवाद, एकांडे शिलेदारीच्या एकांगी पंथप्रवृत्त्या, या सर्वांनीं मिळून जर कामगारवर्गाची क्रांतिकारक आघाडी विस्कळीत केली तर काम सोपेंच झालें.

अशा परिस्थितींत लेनिनच्या बोल्शेविक पक्षाचा शुद्धस्वरूपी मार्क्सवाद रशियाच्या कामगार चळवळींत स्थापन झाला, त्या चळवळींतच मेन्शेविकांचा स्पष्ट सुधारणावाद व ट्रॉट्स्कीचा जहालवादाच्या बुरख्यांतला सुधारणावाद जन्माला आला.

पण त्या सर्वांना तोंड देऊन लेनिन-स्तालिनच्या पुढारीपणाखालीं, रशियांतील कामगारवर्गानें शेतकरीवर्गाला बरोबर घेऊन योग्य डावपेंच आंखून १९१४-१८ च्या महायुद्धांत ७ नोव्हेंबरची क्रांति केली.

ट्रॉट्स्कीवाद व मेन्शेविक पंथ यांच्याविरुद्ध लेनिन–स्तालिननें जी वैचारिक व संघटनात्मक लढाई दिली ती दिली नसती तर रशियन क्रांति यशस्वी झाली नसती, व पुढचा सोशालिस्ट रशिया यशस्वी झाला नसता १९१४ च्या महायुद्धानंतर युरोपांतील अनेक देशांमध्यें कामगार उठाव झाले, कांही ठिकाणीं तर तात्पुरती क्रांतिकारक सरकारेंही स्थापन झालीं. पण तेथील कम्युनिस्ट पक्षांत व सोशालिस्ट चळवळींत शुद्ध मार्क्सवादाचा अभाव असल्यानें व भांडवली बुद्धिभेद व विश्वासघातकी कामगार पुढारी यांच्या कचाटींत ते सांपडल्यानें, ते उठाव व त्या क्रांत्या मारल्या गेल्या. पण रशियांत मात्र भांडवली डावपेंच फसले.

जर्मनी, पोलंड, हंगेरी, बल्गेरिया वगैरे देशांत पहिल्या महायुद्धानंतर क्रांत्या झाल्या पण क्रांतीचे वर्गीय डावपेंच, कुणाशीं एकजूट करावी व कशी करावी, कोणच्या वर्गाच्या मागण्या व मैत्री कामगारवर्गाच्या कम्युनिस्ट पक्षानें ध्यावी वा घेऊं नये या बाबत अक्षम्य चुका केल्यानें, मध्य–युरोपांतील बाल्कन देशांतील सरंजामी-जमीनदारशाही व त्यांच्या पाठीशीं असलेली पश्चिम युरोपीय भांडवलदारांची सत्ता उलथून पडूं शकली नाहीं. उदाहरणार्थः हंगेरीमध्यें सोविएत सरकार स्थापन झालें. पण जमीनदारशाही-विरुद्ध क्रांतीचा उठाव करणाऱ्या शेतकऱ्याला जमीन वाटून देण्याऐवजीं, बेलाकुनच्या पुढारीपणाखालीं त्या मागणीचा अव्हेर झाला; व त्यामुळें गरीब व मध्यम शेतकरी क्रांतिविरोधक झाला.

त्याचा फायदा घेऊन ब्रिटिश—फ्रेंच—अमेरिकन भांडवलदारी गटांनीं सशस्त्र चढाई करून, बेलाकुनचें सरकार मारून काढून ॲडमिरल होर्थीचें फॅसिस्ट राज्य स्थापन केलें. हा बेलाकुन पुढें रशियांत गेला व पुढें ट्रॉटस्कीचा अनुयायी बनला. बल्गेरियामध्यें १९२३ त जे क्रांतीचे उठाव झाले त्यामधील मध्यमवर्गीय व कांहीं भांडवली राष्ट्रीय गटांना पाहून तेथील कम्युनिस्ट पार्टीनें त्या उठावाशीं हातमिळवणी केली नाहीं. त्यांत भाग घेतला नाहीं. त्याचा परिणाम तेथील शेतकरी चळवळ व कम्युनिस्ट पक्ष खच्ची होण्यांत झाला. पराजयांतून व चुकींतून पुढें कॉ. दिमित्रोवच्या पुढारीपणाखालीं बल्गेरियाच्या कम्युनिस्ट पक्षानें रस्ता काढला.

# [५]

कामगारवर्ग हा जरी भांडवलदारी समाजामध्यें क्रांतीचा अधिष्ठाता व पुढारी असतो व तें स्थान त्याला भांडवली समाजांतील उत्पादन साधनांचा यंत्रनेता असल्यानें मिळतें तरी तो वर्ग पिळलेला, दलित, व अज्ञानाच्या हलाखींत जखडून ठेवला गेलेला असतो. म्हणून समाजरचनेचें, त्या समाजाच्या विकासाचें तत्त्वज्ञान, तें बदलण्याचे डावपेंच, क्रांतिकारक जाणीवेची पोलादी वर्गीय संघटना उभारण्यास त्याला वेळ लागतो. वर्गलढे, संपलढे, उठाव यांच्या अनुभवाच्या आंचेमधून जेव्हां त्याला जावें लागतें, तेव्हां लेनिनच्या शिकवणीचा कम्युनिस्ट पक्ष बनतो, व अचुक मार्ग तो दाखवूं लागतो. या कार्यासाठीं जगांतील सर्व कामगारवर्गाच्या लढ्यांचें सार काढून, निरनिराळ्या देशांतील कामगारवर्गाच्या आचरणांना, कृतींना एकसूत्री स्वरूप देण्यासाठीं, जगांतील कामगारवर्गाची आंतरराष्ट्रीय संघटना असावी लागते. त्या संघटनेमध्यें मध्यमवर्गीय जीवनांतून फुटून निघालेले व त्या अवस्थेमध्यें त्यांना जें ज्ञान, संस्कृति वगैरे लाभलेली असते ती घेऊन, त्या वर्गातले जे क्रांतिकारक कामगारवर्गाच्या तत्त्व-प्रणालीला मानून क्रान्तीमध्यें सामील होतात तेही आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळींत भाग घेतात. अशा आंतरराष्ट्रीय संघटना आतांपर्यंत जगामध्यें तीन झाल्या व त्यांना पहिली, दुसरी व तिसरी इंटरनॅशनल असें नांव दिलें आहे. पहिली इंटरनॅशनल १८६५ त स्थापन झाली, व १८७७ विसर्जन झाली. दुसरी १८८९ त स्थापन झाली व १९१३ च्या महायुद्धांत क्रांतिकारक भूमिका सोडली म्हणून ती मृतप्राय झाली. तिसरी इंटरनॅशनल १९१९ मध्यें स्थापन झाली व १९४३ त ती विसर्जन करण्यांत आली.

१९१९ नंतर बाल्कन देशांत, युरोपखंडांत जे क्रान्तीचे उठाव झाले, प्रत्येक देशांतील कामगार-शेतकरी जनतेनें परकीय व स्वकीय भांडवलदार-जमीनदारवर्गाची सत्ता उलथून पाडण्याचा जो जो प्रयत्न केला, त्या प्रयत्नांत भाग घेणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांचे व कामगारवर्गाचें मार्गदर्शन योग्य रीतीनें व्हावें, रशियांतील व आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचा अनुभव सर्वांच्या कामीं लागावा म्हणून तिसरी इंटरनॅशनल अस्तित्वांत आली. युरोपांतीलच नव्हे तर जागतिक साम्राज्यशाहीच्याविरुद्ध, आशिया खंडांतील चीन, हिन्दुस्थान, ब्रह्मदेश, इंडो-नेशिया या सारखे देश ब्रिटिश-अमेरिकन फ्रेंच आदि साम्राज्यवाद्यांविरुद्ध जे

राष्ट्रीय स्वातंत्र्याचे उठाव करूं लागले होते, त्यांचेंहि मार्गदर्शन करून त्यामध्यें कामगारवर्ग व कम्युनिस्ट पक्ष यांनीं लोकशाही मोर्चाचे योग्य ते डावपेच आंखून राष्ट्रीय स्वातंत्र्याचा त्यांचा लढा यशस्वी व्हावा यासाठीं तेथेंहि तिसरी इंटरनॅशनल संघटनेचा व धोरणाचा रस्ता दाखवी.

कामगारवर्गाचे कम्युनिस्ट पक्ष, तिसरी इंटरनॅशनल व आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचे पहिलें यशस्वी राज्य म्हणजे सोविएत युनियन ही निव्वळ पोलिस व मिलिटरी दंडुकेशाहीनें मोडून काढणें अशक्य झालें, तेव्हां मार्क्सवादाची मूलतत्त्वें व त्यामध्यें बदललेल्या जगाच्या परिस्थितीला अनुरूप अशी त्याच मूलतत्त्वांना धरून लेनिननें घातलेली नवीन भर यांना विरोध करावयाचा किंवा मार्क्सवादाचाच बुरखा घेऊन तिसरी इंटरनॅशनल व लेनिनिझमच्या तत्त्वानें चालणारा सोविएत रशिया यामध्यें अपप्रवृत्ती वा पाखंडें निर्माण करावयाचीं व जरूरी पडल्यास क्रांतिविरोधी व सोविएतविरोधी कट करायचे असा डाव आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीनें केला. त्याचें पुढारीपण ट्रॉटस्की यानें घेतलें.

रशियन क्रान्ति, तिच्यांतला कामगारवर्गाचा मार्क्सवाद व लेनिननें आंखलेले डावपेंच, त्यानंतर सोवियटच्या पुनर्घटनेच्या स्तालिननें आंखलेल्या सर्व योजना अत्यंत धूर्त रीतीनें तसेंच विश्वासघातानें मोडून काढण्याचें काम ट्रॉटस्कीनें करण्याचा प्रयत्न केला. बुखारिन, झिनोवीच वगैरे, जे पूर्वी लेनिनबरोबर बोल्शेविक पक्षांत राहून मेन्शेविक सुधारणावाद्यांचे काम करीत त्यांनीं या कामीं त्याला मदत केली.

त्यांनीं तिसऱ्या इंटरनॅशनलच्या अनेक कमिट्यांमध्यें आपले गट व गुप्त हेर कायम केले. तेथून चीन-हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीबद्दल अथवा बाल्कन देशांच्या स्वातंत्र्याबद्दल अथवा पश्चिम युरोपच्या कामगार–क्रान्तीबद्दल, स्तालिनच्या नेतृत्वाखालीं जीं जीं धोरणें व तत्त्वें आंखलीं जात, त्यामध्यें चुकीच्या मार्गाचें पुढारीपण देऊन त्या चळवळी खच्ची करण्याच्या त्यानीं खटपटी केल्या. याचीं उदाहरणें अनेक देशाच्या क्रांतीच्या इतिहासांत आपल्याला पहायला मिळतील.

सोविएत युनियनमध्यें प्रथम प्रथम ट्रॉटस्कीवाद्यांनीं राजकीय व आर्थिक डावपेंचाबाबत मतभेद उपस्थित करून सोविएत युनियनची, सोशॅलिझमची प्रगती व कम्युनिस्ट इंटरनॅशनलची इतर देशांतील जनतेला क्रांतीत मदत करण्याची संघटना मोडून काढण्याचा प्रयत्न केला. उदाहरणार्थ, ज्यावेळीं लेनिननें

मागणी केली कीं सोविएत युनियनचीं राजसत्ता जरी कामगारवर्गाची असली व त्याचाच कम्युनिस्ट पक्ष त्या राजसत्तेच्या धोरणांत पुढारी असला तरी कामगारवर्गाच्या दैनंदिन जीवनाची दिशा आंखण्यासाठीं सोविएत कारखान्यांतील त्याचें जीवन सुधारण्यासाठीं वा नियंत्रित करण्यासाठीं कामगारांनीं त्यांच्या युनियन्स स्वतःच्या खुषीनें त्यांना पाहिजे तशा चालवल्या पाहिजेत, त्या वेळीं ट्रॉट्स्कीनें मत मांडले कीं ज्या अर्थी सोविएत युनियनचें सरकारच कामगारांचें आहे, त्याअर्थी त्या ट्रेड-युनियन्स सुद्धां त्या सरकारच्या सैन्याप्रमाणें चालल्या पाहिजेत, त्यांत सर्वांना भरती होण्याची सक्ती केली पाहिजे, त्यांत खुषीचा, नाखुषीचा प्रश्न नाहीं. हें मत अर्थातच बोल्शेविक पक्षानें हाणून पाडलें. हें मत दिसायला क्रांतिकारक दिसतें. जिथें सगळा देश, कारखाने व सरकारच कामगारांचें, तिथें त्या कामगारांना स्वतःच्या अशा निराळ्या, आपले प्रश्न आपल्याच सरकार पुढें व कारखान्यापुढें मांडण्यासाठीं, त्यावर जरूर पडल्यास वाद वा लढा करून सोडवून घेणाऱ्या स्वतंत्र ट्रेड युनियन्सची जरूरी काय ? पण हें मत मानलें असतें तर अफाट विस्ताराच्या अनेक कारखान्यांमध्यें, लाखों कामगारांची दैनंदिन स्थिति, गाऱ्हाणीं, त्यांचें शिक्षण, आरोग्य पहाणाऱ्या ट्रेड युनियन्स या हुकुमशाही संस्था बनल्या असत्या, व कामगारांनीं त्यांना असें वागवणाऱ्याची म्हणजे सोविएतची सत्ता उलथून पाडली असती. आणि हेंच ट्रॉटस्कीवाद्यांना पाहिजे होतें. पण लेनिननें तो डाव हाणून पाडला. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. पंचवार्षिक योजनेंत प्रथम कारखान्यांची वाढ करावी व श्रीमंत शेतकरी कुलकांची जमीन हिसकावून घ्यावी का मुळींच घेऊं न देतां त्यांना तसेंच वाढूं द्यावें, यावरही ट्रॉटस्कीवाद्यांनीं डावीकडून व बुखारिनवाद्यांनीं उजवीकडून हल्ले केले. सोविएट युनियननें व कम्युनिस्ट इंटरनॅशनलनें जागतिक क्रांतीची घोषणा सोडून दिली असून सोविएट युनियन फक्त आपल्याच देशाच्या वाढीकडे लक्ष देऊन आपमतलबी राजकारण खेळत आहे, आणि त्यामुळें इतर देशांच्या क्रांतीच्या उठावांना तें मदत करीत नाहीं अशी ओरड ट्रॉटस्कीनें व सर्व भांडवलदारी वर्तमान पत्रांनींहि केली. १९२० सालीं जगभर भांडवलदार ओरडत कीं हिंदुस्थान, चीन व इतर देशांत हस्तक्षेप करून कम्युनिस्ट इंटरनॅशल तेथें क्रांतीचा "माजवीत" आहे. तर त्याच्या उलट १९३०-३४ च्या सुमारास हेच भांडवलदार ट्रॉटस्कीवाद्यांचा सूर घेऊन म्हणूं लागले कीं सोविएत युनियन व कम्युनिस्ट इंटरनॅशनलनें स्तालिनच्या पुढारीपणाखालीं जागतिक

क्रांतीला दगा दिला आहे. उद्देश काय ? कीं साम्राज्यवादी देशांना सोविएतनें आपल्या पंचवार्षिक योजना यशस्वी करून सोशालिस्ट समाजरचना करून प्रबळ व्हावें हें घातुक वाटे. त्यांनी सोविएतचें शांततेच धोरण, व त्यावेळीं त्यानें राष्ट्रसंघांत मांडलेलें लष्करी खर्च व युद्धसामुग्री कमी करण्याचें धोरण हाणून पाडण्यासाठीं त्याला जगांतील कामगारांची क्रांति टाळावयाची आहे व स्वतः एक श्रीमंत भांडवलदारी देश बनावयाचें आहे अशी हांकाटी केली.

याच धोरणाला अनुसरून हिंदुस्थानमध्यें ट्रॉटस्कीचे अनुयायी व एम. एन्. रॉय यांचे अनुयायी, हिंदुस्थानच्या क्रांतीचे एका बाजूनें फाजील जहालपणाचे व दुसऱ्या बाजूनें सुधारणावादाचे डावपेंच कामगारांपुढें मांडीत व त्यामुळें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांतील कामगारवर्गाचें व कम्युनिस्ट पार्टीचें पुढारीपण खच्ची करीत.

कम्युनिस्ट इंटरनॅशनलची जी बाल्कन कमिटी असे त्यामध्यें ट्रॅटस्कीवादी बरेच होते. त्यांनीं युगोस्लाविया व बाल्कन देशांतील क्रांतिकारक चळवळीला पुढारीपण देणाऱ्या कम्युनिस्ट पार्ट्यांमध्यें आपले हस्तक घुसवले त्यापैकीं टीटो हा एक प्रमुख होता स्पेनची क्रांति होतांच तिथें फ्रँकोविरुद्ध लढण्यासाठीं जें इंटरनॅशनल ब्रिगेड गेलें त्यांत टीटो होता. तो त्याचवेळीं ट्रॉटस्कीचा अनुयायी होता, व ज्यावेळीं युगोस्लावियाचा टीटो हा सोविएत-मैत्रीची भाषा बोलतो, असें फ्रँकोच्या फॅसिस्ट राजवटीनें ऐकलें, तेव्हां तिनें जाहीर केलें कीं इंटरनॅशनल ब्रिगेडचा टीटो ट्रॉट्स्कीवादी, सोविएतविरोधक होता, तेव्हां हा टीटो तो नसून तोतया असावा. पण फ्रँकोच्या फॅसिस्टांना पत्ता नव्हता कीं तोच टीटो फॅसिस्टांनीं आपला हेर बनवून युगोस्लाव्हियांत पाठवला होता.

युगोस्लावियाच्या कामगार-शेतकरी जनतेनें जेव्हां फॅसिस्ट राजवटी-विरुद्ध लढण्यासाठीं कम्युनिस्ट पक्षाची बांधणी करण्याला सुरवात केली तेव्हां टीटो, कार्देलो, राकोविच व जिलास हे ट्रॉटस्कीवादी, फॅसिस्ट जर्मनीचे हस्तक त्या पार्टीमध्यें शिरले व तिचें पुढारीपण त्यांनी काबीज केलें. पार्टीच्या आघाडीला राहून त्यांनी युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट पक्षांतील अनेक नामांकित क्रांतिकारकांना फॅसिस्टांच्या हवालीं केलें व त्यांची कत्तल करवली. उठावाच्या योजना शत्रुपक्षाला कळवून, त्या उठावाची कत्तल करविली.

जो म्हणून सच्चा व हुशार कम्युनिस्ट निघेल तोच कसा मारला जायचा व सर्व उठावांतून हेच कसे अचानक वाचायचे याचा कुणाला अचंबा वाटला तरी संशय येण्यास जागा रहात नसे, कारण हे शुद्ध मार्क्सवादाची भाषा बोलत,

सोविएत युनियनचे गोडवे गात, व कामगार क्रांतीची घोषणा करीत. पण आतां कॉमिन्फॉर्मच्या ठरावानंतर व रायक खटल्यामध्यें उघडकीस आलेल्या गोष्टींनंतर या सर्व प्रकरणाचा अर्थ लागूं लागला. टीटो, कार्देली, रँकोविच व जिलास हे प्रथम फॅसिस्ट जर्मनीचे व नंतर अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांचे हस्तक होते. अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांना कामगारांच्या क्रांतिकारक चळवळीला, कम्युनिस्ट पक्षांत आपले हस्तक पेरून जें साधायचे होतें तें त्यांनीं युगोस्लावियाच्या बाबतींत तात्पुरतें तरी साधलें—तें कसें तें पाहूं.

## [ ६ ]

पहिल्या महायुद्धांत पराभूत झालेल्या जर्मनीला कामगार-क्रांति मारण्यासाठीं ब्रिटिश-अमेरिकन भांडवलदारांनीं हिटलरचा फॅसिस्ट जर्मनी बनविण्यास मदत केली; त्याला युद्धसामुग्री व पैसा पुरवून सोविएत युनियनवर हल्ला करण्यास सुसज्ज केलें. परंतु अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांचा डाव स्तालिननें आगाऊ सूचना दिल्याप्रमाणें त्यांच्या आंगलट आला. फॅसिझमला आळा घालण्यासाठीं व जगाला महायुद्धापासून वाचवण्यासाठीं सोविएतनें शांततेचें, फॅसिस्टविरोधी एकजुटीचें, युद्धसामुग्रीची रचना कमी करण्याचें, सर्व राष्ट्रांनीं परस्परांशीं मैत्री राखून एकमेकांच्या सहाय्यानें, आक्रमक, युद्धखोर फॅसिस्ट साम्राज्यवाद्यांपासून सर्वांचें रक्षण करावयाचें जें धोरण मांडलें होतें, तें ब्रिटिश, अमेरिकन, फ्रेंच गटांनीं नाकारलें व फॅसिस्ट जर्मनीला सोविएतवर हल्ला करण्यास प्रोत्साहन दिलें.

पण सोविएतची ताकद पाहून हिटलरनें प्रथम ज्या ब्रिटिश-फ्रेंच भांडवलदारांनीं त्याला सुसज्ज केलें त्यांच्या साम्राज्याची, भांडवलाची व बाजारपेठांची वांटणी मागितली. कम्युनिझमचा किल्ला व कामगारवर्गाच्या क्रान्तीचें माहेरघर असलेल्या सोविएत युनियनला, हिटलर-फॅसिझम मारील तर बाजारपेठांची व भांडवली हिश्श्यांची किंमत फार नव्हे असें समजून पहिल्या महायुद्धांत, ऑस्ट्रेलिया हंगेरीचें साम्राज्य मोडून जें झेकोस्लोवाकियाचें स्वतंत्र रिपब्लिक अस्तित्वांत आलें होतें त्याचा हिटलरच्या तोंडीं ब्रिटिश-फ्रेंच भांडवलदारांनी घांस दिला. २९ सप्टेंबर १९३८ ला म्युनिक करार करून झेकोस्लोवाकिया, ब्रिटिशांनीं हिटलरला दिला. आणि झेकोस्लोवाकियाच्या राज्यकर्त्या भांडवलदार पक्षांनीं सोविएतची दोस्ती व मदत नाकारून, तो करार व आपल्या देशाचा नाश, निषेध करीत करीत पण त्याविरुद्ध देशव्यापी लढा उभारण्याचें

नाकारून, मान्य केला. हिटलरनें लवकरच म्हणजे १९३९ च्या मार्चमध्यें सबंध झेकोस्लोवाकिया खाऊन टाकला, व त्याला फॅसिस्ट जर्मन राज्याचें संस्थान बनवलें. १९३९ च्या एप्रिलमध्यें इटलीनें अल्बानिया घेतला. तरीपण ब्रिटिश व फ्रेंच यांनीं हिटलरविरोधी एकजूट करण्यासाठीं सोविएत युनियनशीं तह करण्याचें टाळलें. त्यांनां आशा ही कीं झेकोस्लोवाकिया, पोलंड वगैरे देश दिल्यानंतर तरी हिटलर सोविएत युनियनवरच हल्ला करील. पण ही त्यांची आशा निष्फळ ठरली. सोविएतची ताकद पाहून व ब्रिटिश फ्रेंचांच्या साम्राज्यवादी गटांत आपल्याला मदत करणारे, भांडवली मुत्सद्यांचे, सेनापतीचे व राजकारणी पुढाऱ्यांचे अनेक गट आहेत हें पाहून हिटलरनें सोविएत युनियनशीं नॉन ॲग्रेशन पॅक्ट—म्हणजे दोस्तीचा नव्हे पण हल्ला न करण्याचें आश्वासन देणारा—तहनामा १९३९ च्या ऑगस्टमध्यें केला.

झेकोस्लोलावाकियानंतर पोलंड देश हिटलरनें घेतला. पोलंडच्या मदतीला आम्ही जाऊं असें उगाच नाटक करून ब्रिटिश-फ्रेंच राज्यकर्त्यांनीं व पोलंडच्या फॅसिस्ट जमीनदार-भांडवलदारांनीं, हिटलरनें आम्हांला मारलें तरी चालेल पण सोविएतच्या फौजांकरवीं, कामगारसेनेतर्फे आमचें स्वातंत्र्य आम्हांला नको असा हट्ट धरला. पोलंड मागच्या युद्धांत झारशाही पासून स्वतंत्र झाला, त्यावेळीं त्यानें भांडवलदारांच्या चिथावणीनें सोविएत युनियनचा एक भाग जबरदस्तीनें खाऊन टाकला होता. हिटलरी हल्ल्यापुढें पळ काढून जेव्हां पोलंडचें सरकार पळून गेलें तेव्हां सोविएतची लाल सेना पुढें सरसावली व तिनें पोलिश जमीनदार–भांडवलदारांनीं जो बेलो रशियाचा भाग खाल्ला होता तो परत घेतला, तसेंच हिटलरचा पूर्वेकडे घुसण्याचा रस्ता आडवून धरला.

येथून महायुद्धाला तोंड लागलें व जून पर्यंत हिटलरनें सबंध पश्चिम युरोप, ब्रिटिश-फ्रेंच, डच, बेल्जियम, नॉर्वे, डेन्मार्क या सर्वांच्या फौजा मारून आपल्या ताब्यांत आणला.

या लढ्यामध्यें हिटलरी सत्तेला खरा विरोध या देशांतील फौजांकरवीं फारसा झालाच नाहीं. कारण राज्यकर्ते व फौजांचे भांडवलदारवर्गाचे सेनापती हेच मुळीं आंतून हिटलरचे हस्तक होते. आघाडीवरच्या शिपायांनीं, कामगारांनीं, कम्युनिस्ट पक्षांनीं हिटरविरोधी प्रतिकाराची चढाई केली. पण स्वतःला 'देशभक्त' म्हणविणाऱ्यांनींच त्यांना हिटलरच्या हवालीं केलें. पॅरिसमध्यें जर्मन शिरूं लागले तेव्हां पॅरिसचा कामगार पॅरिस कम्यूनची आठण करून उठाव

करील व परत भांडवलशाहीविरोधी क्रान्तीचा लाल झेंडा पॅरिसवर फडकेल, या धास्तीनें फ्रेंच सरकारनें पॅरिस शहर अगोदरच खालीं केलें व त्याचा शांतपणें ताबा घेण्यास हिटलरला सांगितलें व ताबा देण्यास पॅरिसच्या लोकांना बजावलें. जून १७, १९४० ला स्वतंत्र फ्रेंच रिपब्लिक खलास झालें.

तरीसुद्धां अमेरिकन आणि ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं सोविएत-मैत्रीचा तह करून फॅसिझमला जागतिक युद्ध पेटविण्यापासून परावृत्त करण्याचें नाकारलें. उलट सोविएतवर हल्ला करण्यासाठीं जर्मनीला मदत करण्याचें त्यांचें धोरण कायमच होतें. फिनलंडच्या फॅसिस्ट मॅनरहाईम सरकारनें लेनिनग्राडच्या हद्दीवर हिटलरच्या मदतीनें जी तयारी केली होती ती बंद करा व लेनिनग्राड नजीकचा प्रदेश सोडून द्या आणि त्याबदली दुसरा प्रदेश व मोबदला देतों तो घ्या अशी दोस्तीची मागणी सोविएत युनियननें फिनलंडजवळ केली ती त्यांनीं नाकारून युद्धाचीच तयारी केली, तेव्हां फिनलंड व सोविएतचें युद्ध जुंपलें त्यांत फॅसिस्ट जर्मनी व फिनलंडवर हल्ला करण्याऐवजीं सोविएतवर हल्ला करण्याची घोषणा ब्रिटिश-फ्रेंच अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं केली. व त्यासाठीं हिटलरविरोधी युद्ध थांबवून त्यालाही या गटांत खेचून सोविएतविरोधी मोर्चा उभारण्याचा कट केला. पण सोविएत लाल फौजेनें झपाट्यानें फिनलंडच्या फौजांचा व तटबंदीचा पाडाव केला आणि फिनलंडशीं तह करून हा डाव मोडून काढला.

पण तेवढ्यानें अमेरिकन ब्रिटिश फ्रेंचाचे डाव संपले नाहींत. हिटलरनें सोविएतविरोधी युद्धासाठीं व सबंध जग पादाक्रांत करून जर्मन साम्राज्यशाहीचें एकमेव राज्य जगावर स्थापण्यासाठीं जारीनें तयारी केली. पश्चिम युरोप ताब्यांत आल्यावर त्यानें बाल्कन देशांकडे मोर्चा वळविला. १९४० च्या नोव्हेंबरांत हंगेरी व रुमानियाचीं फॅसिस्ट सरकारें त्यांच्या गोटांत सामील झालीं, मार्च १९४१ त बल्गेरिया सामील झाला. ग्रीस आणि युगोस्लावियामधील राज्यकर्त्या वर्गामध्यें मात्र दोन तट पडले. एक हिटलरी गोटांत सामील होणारा व दुसरा ब्रिटिश गोटांत. युगोस्लाविया व ग्रीस हे देश समुद्रा लगत असल्यामुळें व त्यांना ब्रिटिश-अमेरिकन आरमारातर्फे मदत पोंचण्याची शक्यता असल्यानें तेथील राज्यकर्त्या वर्गामध्यें हे तट पडणें शक्य झालें. मार्च १९४१ मध्यें युगोस्लावियाच्या एका गटानें हिटलरी फ्रंटमध्यें सामील होण्याचें ठरवितांच त्याची गादीवरून हकालपट्टी झाली. युगोस्लावियाचा राजा पीटर यानें ब्रिटिश वजनाखालीं कां होईना हिटलर-विरोधी कल दाखवितांच सोविएत युनियननें त्याच्याशीं एप्रिल १९४१ मध्यें तह केला. त्यानेंही तो मान्य केला कारण आतां युरोपमध्यें लहान देशांच्या

बाल्कन राष्ट्रांचा बलाढ्य असा त्राता एकटा सोविएत युनियनचा राहिला होता. पोलंडपासून तो तहत ग्रीसपर्यंतचा मध्य व दक्षिण पूर्व युरोप घ्यायचा, तेथील ब्रिटिश फ्रेंच भांडवल स्वतःच्या कबजांत घेऊन आपली सत्ता व संपत्ति वाढवायची व तेथील धान्यसामुग्री आणि सैन्यबळ उपयोगांत आणून रशियावर हल्ला चढवायचा अशी तयारी १९४१ मे पर्यंत जर्मनीनें केली, व या करारामध्यें ब्रिटन आणि अमेरिकेनें सामील व्हावें म्हणून बोलणी करण्यास एक फॅसिस्ट प्रमुख रूडॉल्फ हेस याला तो हिटलरपासून पळून गेल्याची भूमिका उठवून इग्लंडला रवाना केलें. इग्लंडमधला फॅसिस्ट गट त्याला अनुकूलच होता. पण हिटलर प्रत्यक्षपणें सोविएनवर हल्ला करीपर्यंत ब्रिटिश साम्राज्यवादी मुत्सद्दी हिटलरशीं दोस्ती करण्याचें पूर्वीचें धोरण आतां उघडपणें घ्यावयास धजेनात. फॅसिस्ट हल्यानें चिडून गेलेल्या जनतेची त्यांना धास्ती वाटत होती. अशा रीतीनें १९१४ च्या महायुद्धाच्या अगोदर जर्मन, ऑस्ट्रियन व रशियन साम्राज्यानें ग्रासलेले बाल्कन देश, आणि त्यानंतर रशियन क्रांति, जनतेचे उठाव व साम्राज्यशाहीची वाढती दुर्बलता यामुळें १९१८ नंतर जे स्वतंत्र झाले होते ते देश, परत १९४१ मध्यें हिटलरी फॅसिस्ट साम्राज्यशाहीच्या जबड्यांत चिरडले गेले. आपल्या जीवनाची व समाजाची मार्क्सवादी दृष्टीनें पुनर्घटना करण्याचें नाकारल्यामुळें, कामगार वर्गाला व त्याच्या कम्युनिस्ट पार्टीला चिरडून टाकून भांडवलदारी-सरंजामदारी वर्गाचें वर्चस्व मान्य केल्यानें या देशांवर आपलें मामुली स्वातंत्र्यसुद्धां गमावून आज अँग्लो-अमेरिकन फ्रेंच, तर उद्यां हिटलरी जर्मन गटांत परतंत्र होण्याचे नशिबीं आलें.

## [ ७ ]

भांडवलदारी साम्राज्यवाद्यांच्या समाज-रचनेला कधींच स्थिरता नसते.

पूर्व व मध्य युरोप काबीज करून हिटलर स्वस्थ बसला असता तर किती बरें झालें असतें, असा उसासा टाकणारे लोक अजूनही आहेत. पण त्यांना हें माहित नाहीं कीं भांडवलदारी नफेबाजीचे आर्थिक नियमच त्यांना महायुद्धाकडे दुसऱ्या देशावर हल्ले करून त्यांची संपत्ति, श्रमशक्ति, उत्पादन साधनें, बाजारपेठा काबीज करण्याकडे रेटीत असतात. तें तरी करा किंवा देशामध्यें कामगारवर्गाची सत्ता स्थापन करून समाजवादाकडे चला असें इतिहासच त्यांना सांगत असतो. आजच्या जगांत कुठचाही समाजवादी अथवा लोकशाही

जनसत्तेचा देश इतरांशीं सलोख्यानें व दोस्तीनें वागून वाढूं शकतो. पण भांडवलदारी देशांना तें अशक्य असतें. म्हणून ते सारखे आपलीच एकमेव सत्ता जगावर युद्धानें लादूं पहातात. याच नियमानें जर्मन साम्राज्यवाद्यांनीं २२ जून १९४१ ला सोवियत युनियनवर हल्ला केला.

पश्चिम युरोपच्या सैन्यांचा जसा एक महिन्यांत धुव्वा उडाला तसाच लाल फौजांचा उडेल अशी साम्राज्यवाद्यांची खात्री. परंतु सोविएत समाजाच्या आर्थिक राजकीय व आध्यात्मिक बलाची कल्पना भांडवली समाजांत वाढलेल्या व कम्युनिझमचें तत्त्वज्ञान मान्य नसणाऱ्यांना कशी येणार? म्हणूनच लेनिनग्राड, मॉस्को, स्टालिनग्राडपुढें जर्मन फौजांचा पराजय होईल अशी ब्रिटिश, फ्रेंच अमेरिकन वा जर्मन साम्राज्यवाद्यांना कल्पना नव्हती.

सोविएतवर हल्ला करतांच अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं काय धोरण स्वीकारलें? त्या सर्वांनी १९१७ पासून ते १९४१ पर्यंत निरनिराळ्या मार्गानें सोविएतला मारण्याचा प्रयत्न केला होता. पण तो फसला होता आतांतरी जर्मन फौजेसारखी अजिंक्य फौज तें काम करील अशी त्यांना आशा उत्पन्न झाली.

पण सोविएतचा पराजय फारच झपाट्यानें झाला व जर्मनी अतिप्रबल ठरला तर? मग तो आपलें ही साम्राज्य खाईल! त्याला तोड काय? त्याला तोड ही कीं सोविएत रशिया व जर्मनी यांचें युद्ध इतकें निकराचें व दूरवर चालावें कीं त्यामध्यें दोघे लढून लढून मरणोन्मुख व्हावेत व मग आपण मध्यें पडून युरोप व रशिया यांना " मुक्त " करून आपल्या कक्षेखालीं आणावें. म्हणजे सोविएतला मदत करण्याची घोषणा करायची पण फारशी मदत करायची नाहीं. तसेंच त्याला मारण्यासाठीं जर्मनीलाही मदत करायची नाहीं, उलट सोविएत बलवान निघालाच तर जर्मनीवर आपला हल्ला कमी करायचा, असा राक्षसी, विश्वासघातकी व आपल्या भांडवलदारी वर्गनीतीला साजेसा डाव ब्रिटिश व अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं रचला व त्याचें पुढारीपण चर्चिलनें घेतलें.

हा डाव अर्थातच कसा फसला हें येथें सविस्तर सांगण्याची जरूरी नाहीं. हा मुद्दा सांगण्याचें कारण असें कीं हा डाव जसा फसूं लागला तसतसे बाल्कन देशांतील उठावांना, तेथील सोविएतविरोधी पक्षांना व कटांना महत्त्व चढलें व त्या डावांत त्यांचा उपयोग चर्चिलनें झपाट्यानें करण्यास सुरवात केली. त्या डावांतील अत्यंत महत्त्वाचें मोहरें युगोस्लाव्हियाचा टीटो हा ठरला.

स्मोलेन्स्क व कीएवच्या लढयांमध्यें फॅसिस्ट फौजांची झालेली कत्तल व लेनिनग्राड आणि मॉस्कोच्या लढाईतील त्यांचा पराजय पाहून युरोपखंडांतील

जर्मनांनीं व्यापलेल्या देशांमध्यें प्रतिकाराची चळवळ सुरू झाली. गनिमी योद्धयांच्या तुकड्या देशोदेशीं उठाव करून फॅसिस्ट फौजांची रसद मारणें, त्यांची नाकीं रोखणें, रेल्वे, रस्ते, कारखाने यांची मोडतोड करून जर्मन फौजांचे बेत मोडून काढणें, हीं कामें करूं लागल्या. त्यामध्यें कम्युनिस्ट पक्षांच्या तुकड्यांनीं पुढारीपण घेतलें. पण गनिमी तुकड्यांना हत्यारें, रेडियो, वगैरे सामग्री पुरविणें अगत्याचें होतें. या हत्यारांचा पुरवठा कोणी करायचा ? व कुणाला करायचा ? हा महत्त्वाचा लष्करी तसाच राजकीय प्रश्न होऊन बसला. ग्रीस, युगोस्लाव्हिया, पोलंड, बल्गेरीया, फ्रान्स व झेकोस्लोवाकिया या देशामध्यें विशेषतः गरिला ( गनिमी ) उठावांची चळवळ जास्त जोरांत होती व त्यांत कम्युनिस्ट पार्टीचें स्थान अत्यंत महत्त्वाचें होतें.

गनिमी तुकड्यांमध्यें अनेक राजकीय मतांचे व पक्षांचे लोक असत. सर्वांचा हेतु एकच कीं फॅसिस्ट जर्मनीपासून आपण मुक्त व्हावें. पण मुक्त होत असतांना कसें वागायचें व मुक्त झाल्यावर आपला देश कोणाकडे जाईल हा ही प्रश्न सर्वांच्या पुढें असे. उदाहरणार्थ फ्रान्स मुक्त करण्यांत कम्युनिस्ट पुढारी झाले व मुक्तीचीं हत्यारें व नाकीं त्यांनीं धरलीं तर जर्मनीचा पराजय झाल्यावर तेथें परत पूर्वीसारखी भांडवलशाही व ज्यांनीं आपला देश हिटलरला विकला त्या सट्टेबाज विश्वास घातक्यांची राजवट ते कशी आणूं देतील ? मग जे पळपुटे फ्रेंच अथवा युगोस्लावियाचे वा ग्रीसचे वा झेकोस्लोवाकियाचे राज्यकर्ते, ज्यांनीं पूर्वी म्युनिक करारांचें ब्रिटिश-फ्रेंच 'राजकारण मानलें व आज लंडन न्यूयार्कला ज्यांनीं आपलीं नकलीं सरकारें स्थापून बाजार मांडला आहे ते गनिमी उठावाच्या तुकड्यांना मदत करतांना मुक्ततेनंतर सत्ता कोणाची होणार हा विचार करणार नाहींत का ? मुक्तीच्या लढाईत जो बलवान ठरेल, ज्याच्या मागें जनता जाईल, एवढेंच नव्हे तर ज्याच्या हातीं युद्धसामुग्रीची हत्यारें असतील त्या पक्षाची वा फ्रंटची सत्ता होणार हें स्पष्टच होतें.

जर्मन-सोविएत युद्ध चालू असतांना जर्मनांनीं जसे आपले हेर सोविएत पिछाडीवर पाठविण्याचे प्रयत्न केले तसेंच ब्रिटिश-अमेरिकन सरकारांनीं गनिमी उठावांमध्यें व सोविएत पिछाडीवरही आपले एजंट रोवले. गनिमी उठावांना ब्रिटिशांकरवीं जीं हत्यारें पुरविलीं जात तीं फक्त भांडवलदारी गटांच्या हेरांच्या हातीं ज्यांचें पुढारीपण असेल त्यांनाच मिळत. आणि उठावाच्या मोर्चामध्यें जरी

संयुक्त प्रतिगार कमिशनर्फे काम चाले तरी तिथेंही ब्रिटिश-अमेरिकन हत्यारें कम्युनिस्ट योध्यांना कधींच मिळूं नयेत असें धोरण व खबरदारी घेतली जाई. म्हणजे महायुद्धानंतर या देशांमध्यें परत आपली जुनी जनताविरोधी राजवट आणण्याची तयारी अँग्लो-अमेरिकन गट करूं लागले.

पण जर्मन फौजांचा नाश कांहीं गनिमी तुकड्यांच्या हातून होणार नव्हता. तो नाश सोविएत फौजांकडूनच होणें शक्य होतें. गनिमी उठाव हे केवळ मदतनीस म्हणून ठरत व मदतीमध्यें त्यांचें स्थान महत्वाचें होतें.

या गनिमी उठावांपैकीं महत्त्वाचे उठाव युगोस्लाविया, ग्रीस, बल्गेरिया-मध्यें झाले. युगोस्लावियामधील उठाव कम्युनिस्ट पार्टीच्या हातीं होता. ग्रीस-मध्यें " एलास " संघटनेनें उठाव केला. फ्रान्समध्यें सर्व पक्षांच्या एकजुटीनें स्थापन झालेल्या कमिटीतर्फे त्याची दिशा ठरे. बल्गेरियामध्यें फादरलँड फ्रंट क्रांतिकारक उठावाची आघाडी होती. त्यांत कम्युनिस्ट पक्ष प्रमुख होता.

उठाव सर्व देशांत झाले. पण युगोस्लावियाची नौबत फारच वाजली. युगोस्लावियाचे कामगार शेतकरी शौर्यानें लढले यांत संशय नाहीं. त्या ठिकाणच्या लढयाचें पुढारीपण कम्युनिस्टांकडे होतें यांतही शंका नाहीं.

पण केवळ याच कारणामुळें त्याची वाहवा जगांतील सर्व देशांत झाली नाहीं. ग्रीस, बल्गेरिया, फ्रान्सचे क्रांतिकारक काय कमी लढले ? पण ब्रिटिश-अमेरिकन वर्तमानपत्रांत त्यांचें नांव नाहीं ! एवढेंच नव्हे तर ग्रीसमधील ' एलास ' च्या फौजांना किंवा फ्रान्सच्या गनिमांना हत्यारें मिळूं न देण्याची खबरदारी घेण्यांत येई. ग्रीसमध्यें जो ब्रिटिशधार्जिणा " एडेस " गट होता त्यालाच हत्यारें मिळत. फ्रान्समध्यें क्रांतिविरोधक डिगाऊलच्या गटाला हत्यारें मिळत, पोलंडमध्यें अँडर्स, मिकोलायजिकच्या गटांना मिळत.

पण आश्चर्याची गोष्ट ही कीं स्तालिनग्राडच्या लढाईत जर्मनांचा पराजय होतांच व रशियन लाल फौज चढाई करून बाल्कन देशांकडे घुसूं लागतांच युगोस्लावियाच्या कम्युनिस्ट म्हणून नांवाजल्या गेलेल्या टीटोगटाशीं चर्चिलनें दोस्ती केली, त्याला हत्यारें, सामुग्री पुरविली. युगोस्लाव मिलिटरी मिशन लंडन मध्यें आलें. टीटोचें शौर्य, डावपेंच, त्याचा " देशाभिमान " व त्याच्या नामांकित कुत्र्याची सुद्धां ब्रिटिश वर्तमानपत्रांमध्यें वाहवा सुरू झाली. कां ? टीटोच्या " कम्यु-निस्ट " पार्टीचा व " देशाभिमानाचा " दिमित्राव, थोरे, राकोसी, गॉटवॉल्ड,

बेरून झकारिडे, यांच्या देशाभिमानाहून असा काय निराळा उपयोग चर्चिलला व अमेरिकनांना होणार होता कीं इतरांना त्यांनीं मदत नाकारली व टीटोला दिली ?

हा प्रश्न मी निराळ्या रीतीनें व अर्थानें, १९४७ सालीं टीटोगटाचे पुढारी व हल्ली·या युगोस्लावियन सरकारचे दुय्यम प्रधानमंत्री कार्देली यांना विचारला त्यावेळीं माझ्याबरोबर चीनच्या लेबर फेडरेशनचे पुढारी लियु निंग यी हे होते. ते चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे जुने सभासदही आहेत. मुलाखतीमध्यें चीनच्या स्वातंत्र्य संग्रामाची चर्चा निघाली त्यावेळीं मी कार्देलीला विचारलें कीं युगोस्लावियाची गनिमी लढाई इतकी नामांकित व मोठी होण्याचें कारण काय ? त्यावर कार्देली यांनीं मला उत्तर दिलें की "आम्ही अगदीं योग्य डावपेंच वापरले म्हणून आम्ही यशस्वी झालों. आणि आमचेच डावपेच वापरा असें आम्ही फ्रेंच, ग्रीक वगैरे पक्षांना सांगितलें पण त्यांनीं आमचें ऐकलें नाहीं. त्यांनीं मोठ्या चुका केल्या. म्हणून ते कापले गेले. टीटोचे डावपेच उच्च ठरले. फ्रेंच, ग्रीक, वगैरेंनीं शहरें सोडलीं नाहींत म्हणून ते मारले गेले व आम्हीं शहरें सोडून उठावासाठीं दऱ्याखोऱ्यांमध्यें लपलों व लढलों."

ज्यांना युरोपांतील गनिमी युद्धाची माहिती आहे व जे या पुस्तकांत दिलेला टीटोचा इतिहास वाचतील त्यांना सहज कळून येईल कीं हें उत्तर खोटें होतें. कार्देलीनें तें इतर कम्युनिस्ट पक्षांच्या बाबतींत आमचें मत कलुषित करण्यासाठीं दिलें होतें हें त्यावेळीं मला खटकलें पण लोकांना कम्युनिस्टांबद्दल कलुषित करण्याची टीटोवादची ही एक कुशल युक्ती आहे हें मात्र त्यावेळीं माझ्या लक्षात आलें नाहीं व येणें शक्य नव्हतें. प्रामाणिक टीका व आत्मटीका या सदरांत तें मी घातलें.

पण तें उत्तर प्रामाणिक नव्हतें. तर सोविएत लाल फौजेनें युगोस्लाविया मुक्त केला, गनिमी उठावानें तो मुक्त झाला नाहीं हें साफ दडवून ठेऊन, सोविएत युनियन व त्याचा कम्युनिस्ट पक्ष यांच्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचें मत कलुषित करण्याचा तो एक डाव होता, हें आतां स्पष्ट झालें आहे.

सोविएत युनियनच्या लाल फौजांची सरशी होऊन त्या बाल्कन देशांच्या दिशेनें व बर्लिनच्या रोखानें जात असतां युगोस्लाव ग्रीस मधील गनिमी उठाव करण्यांत ब्रिटिश अमेरिकनांचा काय डाव होता ?

सोविएत युनियनची शक्ती व लष्करी बळ साम्राज्यवाद्यांच्या कल्पनेहून अचाट ठरलें व जर्मनीचा पराभव झपाट्यानें होणार असें दिसूं लागलें. १९४२ पासून जर्मनीचें मुख्य सैन्य सोविएत आघाडीवर फेकलें गेलें होतें. त्यामुळें पश्चिम युरोपांतील अँग्लो फ्रेंच आघाडी सताड उघडी पडत चालली होती. सोविएत आघाडीवर सर्व जर्मन फौजा, विमानें जहाजें गुंतलीं असतां ब्रिटिश-अमेरिकन फौजांनीं जर्मनी विरुद्ध दुसरी आघाडी फ्रान्सवर हल्ला करून उघडावी, म्हणजे दोन आघाडींच्या मार्‍याखालीं फॅसिस्ट जर्मनी ताबडतोब कोलमडून पडेल, महायुद्ध लवकर संपेल, जनतेची कत्तल व हाल वाचतील अशी सूचना सोविएतनें केली. ती मान्य करणारा करार चर्चिलनें सोविएत युनियनशीं १९४२ च्या जुलै मध्यें केला होता. पण ही दुसरी आघाडी उघडण्याचा करार त्यांनीं पाळला नाहीं. कारण सोविएत देशाचा संपूर्ण नाश व लाल फौजांचा पराजय होईपर्यंत जर्मनीला त्यांच्याशीं लढूं द्यायचें हा या साम्राज्यवाद्यांचा मानस होता. त्यांनीं आफ्रिकेमध्यें जर्मनीवर हल्ला केला. अमेरिकेलगतची फ्रेंच बेटें ताब्यांत घेतलीं. जपानशीं आम्हांला लढायचें आहे असें ढोंग केलें, पण मुख्य शत्रू जो युरोपांतील फॅसिस्ट जर्मनी त्याच्याविरुद्ध दुसरी आघाडी उघडली नाहीं. आपण जर आतां युरोपांत घुसलों नाहीं तर जर्मनीचा पाडाव करून सोविएत फौजा एकट्याच सबंध युरोपला मुक्त करून तेथें जनतेची, कामगारवर्गाची राजसत्ता होऊं देतील असें ज्यावेळीं अँग्लो-अमेरिकन साम्राज्यवाद्यांना वाटलें तेव्हांच त्यांनीं १९४४ च्या ऑगस्ट महिन्यांत फ्रान्समध्यें आपल्या फौजा उतरविल्या.

पण त्याच्या अगोदर त्यांनीं जवळचा फ्रेंच किनारा सोडून बाल्कनमध्यें मात्र फौजा उतरविण्याचा प्रयत्न केला. उद्देश काय? सोविएत लाल फौज जर्मन फॅसिस्टांना मारून जर बर्लिनपर्यंत पोंचली व तिकडे जातांना बाल्कन देश स्वतंत्र करून गेली तर ते बाल्कन देश ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या परत हातीं पडणार नाहींत. त्यांचीं लोकशाही राज्यें बनून तीं समाजवादाकडे कूच करतील व ब्रिटिश अमेरिकन फ्रेंच भांडवलशाहीची ताकत खच्ची होईल, अशी साम्राज्य-वाद्यांना भीति वाटली म्हणून स्तालिनग्राडच्या विजयानंतर आम्ही बाल्कनकडे उतरून तुम्हांला मदत करतों अशी सूचना चर्चिलनें केली व अमेरिकन प्रेसिडेंट

रूझवेल्ट यांनींही ती मांडावी असा हट्ट धरला. या डावाला टीटोची अंतस्थ संमती होती. पण सोविएत युनियननें त्याला नकार दिला व फ्रान्समध्येंच उतार करण्याची मागणी केली. बाल्कनमध्यें उतार करण्यापासून ब्रिटिशांचा आणखी असा फायदा होता कीं त्यामुळें सोविएतचा जर्मनींत व पोलंडमध्यें शिरण्याचा मार्ग त्यांना रोखून धरतां आला असता व स्वतः ब्रिटिश फौजांना पूर्वेकडून व दक्षिणेकडून जर्मनीमध्यें घुसून त्या देशाचा सबंध ताबा घेतां आला असता. पण तो डाव सोविएतच्या दूरदृष्टीपुढें व ताकतीपुढें फसला.

तोच डाव निराळ्या रीतीनें साधण्यासाठीं आणखी एक प्रयत्न करण्यांत आला.

युगोस्लावियाचा टीटो आणि ग्रीसमधील "एडेस" गट यांना उठावाची चिथावणी चर्चिल कडून मिळाली. ती अशावेळी कीं ज्यावेळीं सशस्त्र उठावाची जरूरी नव्हती. उदाहरणार्थ १९४४ मध्यें ज्यावेळीं सोविएत फौजा पोलंड जर्मनीकडे सरसावूं लागल्या तेव्हां बाल्कनमधील आपल्या फौजा पिछाडीवरून तोडल्या जातील व सोविएतच्या हातीं सांपडतील अशी हिटलरला धास्ती पडली म्हणून ग्रीस व युगोस्लावियांतून जर्मन फौजा परत फिरविण्याचा त्यानें बेत केला. त्या परत फिरत्या तर घनघोर लढ्यावांचून हे देश लोकसत्तेखालीं आले असते. पण तसें होऊं नये म्हणून त्या फौजा मारण्यासाठीं नव्हे तर त्यांची पीछेहाट अडविण्यासाठीं युगोस्लावियांत व ग्रीसमध्यें कांही सशस्त्र उठाव करविण्यांत आले. परिणाम असा झाला कीं जर्मन फौजा तेथेंच लढत तळ देऊन बसल्या. उद्देश असा कीं ब्रिटिश-अमेरिकन फौजा इटली-ऑस्ट्रियामधून युगोस्लावियांत व समुद्रमार्गानें ग्रीसमध्यें उतरेपर्यंत जर्मनांनीं ते देश धरून ठेवावेत व मग ब्रिटिश-अमेरिकन आल्यावर त्यांनीं ते व्यापून टाकावेत. असाच डाव जपानी फौजांच्या बाबतींत करून आशियाचे देश जपान्यांनी आम्ही येईपर्यंत धरून ठेवावेत व क्रांतिकारक गनिम्यांच्या हातीं देऊं नयेत असा हुकुम अमेरिकनांनीं उघडपणें १९४५-४६ मध्यें दिला होता. पण युगोस्लावियामध्यें सोविएत फौजा ब्रिटिशांच्या अगोदर पोंचल्या. ग्रीसमधून मात्र जर्मन निघून जात असतां व तेथें जनतेच्या एका सच्चा फौजांनीं आपली हुकुमत करण्याची तयारी केली असतां चर्चिलनें ग्रीस किनाऱ्यावर ब्रिटिश फौजा उतरविल्या व जर्मनांचें नांव पुढें करून ग्रीस जनतेविरुद्ध युद्ध सुरू केलें. पण इतर बाल्कन देश मात्र या जाळ्यांत पकडले गेले नाहींत.

दुसऱ्या महायुद्धाचा निकाल कसा झाला हें सर्वांना माहीतच आहे. सोविएत लाल फौजांनीं बल्गेरिया, युगोस्लाविया, रुमानिया, हंगेरी, झेकोस्लोवाकिया, पोलंड व ऑस्ट्रियाचा पूर्व भाग जर्मन फॅसिस्टांपासून मुक्त केले व बर्लिनचा पाडाव करून १९४५ मे महिन्यांत फॅसिस्ट जर्मनविरोधी युद्ध खलास केलें.

पश्चिमेच्या बाजूनें ब्रिटिश-अमेरिकन फौजा घुसल्या. सोविएतपासून आपला शक्य तों बचाव व्हावा म्हणून जर्मन फॅसिस्टांनीं आपल्या आघाड्या भराभर अमेरिकन हल्ल्यांपुढें उघड्या केल्या. पश्चिम जर्मनीमधील श्रीमंत जमीनदार वा भांडवलदार व फॅसिस्ट अधिकारी आपली संपत्ति, सोनें नाणें, फायली, पेटंटें घेऊन अमेरिकनांच्या स्वाधीन होऊं लागले. ज्या फॅसिझमला सुदृढ करण्यासाठीं त्यांनी लढाईपूर्वी मदत केली होती ते आतां परत त्याला स्वतःच्या वर्गहितासाठीं, वाचवतील अशी जर्मन भांडवलदारांची पूर्ण खात्री होती म्हणून सोविएतला शरण जाणार नाहीं—कारण ती कामगारांची वर्गसत्ता, समाजवादाचें राज्य. त्याला शरण गेलों तरी ते आपले जनताविरोधी राज्य राहूं देणार नाहींत. पण अमेरिकन-ब्रिटिश हे तर आपले वर्गबंधू, जरी आपापसांत युद्ध झालें तरी तें भाउबंदकीसारखें. अखेर आपले भांडवलदारी वर्गबंधुत्व अँग्लो-अमेरिकन कसें विसरतील? हें जाणून जितक्या झपाट्यानें सोविएत लाल फौज लढून पुढें सरकेल तितक्या झपाट्यानें जर्मन फौजा पश्चिमेकडे घुसण्यास अमेरिकनांना वाट करून देऊं लागल्या. अशा रीतीनें फ्रान्स, इटली, बेल्जियम, हॉलंड, नॉर्वे, डेन्मार्क व पश्चिम जर्मनी, हा प्रदेश अँग्लो-अमेरिकन फौजांच्या म्हणजे भांडवलदारी सत्तेखालीं आला.

हे देशही "स्वतंत्र" झाले. पण एक गट अमेरिकन अंमलाखालीं गेला व दुसरा तात्पुरता सोविएत अंमलाखालीं आला. अर्थात दोन्ही विभागामध्यें जी नवी राज्यघटना होऊं लागली व समाजरचना घडूं लागली तिचें स्वरूप निरनिराळें झालें.

लाल फौजांनीं जेथून जर्मनांना घालवून लावलें तेथें तिथल्या गनिमी युद्ध करणाऱ्या क्रांतिकारक पक्षांना किंवा तेथील लोकांना ज्यांचें कोणाचें राज्य मान्य असेल त्यांचें सरकार बनविण्याची पूर्ण मुभा देण्यांत आली. बाल्कन देशांमध्यें फॅसिस्टांना जाऊन मिळणाऱ्या व पूर्वी कामगार-शेतकरी जनतेवर जुलूम करणाऱ्या भांडवलदार-जमीनदार गटांना परत आपली वर्गसत्ता स्थापन करणें अशक्य झालें. पोलिस लष्कराच्या जोरावर पूर्वी जी वर्गसत्ता आधारली होती तिला आतां

परत जीवदान मिळणें वा आपली गादी पटकावणें अशक्य झालें. कारण शस्त्रास्त्रें गनिमी क्रान्तिकारकांच्या हातांत होतीं व प्रतिक्रान्तिकारकांना भांडवलदारी फौजांचा आसरा मिळणें कठिण झालें होतें. कारण या देशांची मुक्तता सोविएत रशियाच्या कामगार-शेतकऱ्यांच्या लाल सेनेनें केली होती व ती तेथें हजर होती. बाल्कन देशांचा एवढा मोठा टापू भांडवलदारी समाजगटांच्या बाहेर पडला. तेथें जनतेची लोकशाही राज्यें स्थापन झालीं. १८५२ मधें मार्क्सनें 'क्लास स्ट्रगल्स इन फ्रान्स' या पुस्तकांत केलेलें भाकित खरें ठरलें—कीं जोंपर्यंत कामगारवर्ग स्वतंत्र होत नाहीं, तोंपर्यंत पोलंड आणि हंगेरीचें राष्ट्र व जनता स्वतंत्र होऊं शकत नाहीं. सोविएत युनियनच्या कामगारवर्गानें तें भाकित कृतींत उतरवलें.

याच्या उलट पश्चिम युरोपांत, फ्रान्स, इटली, बेल्जिअम, वगैरे देशांत गनिमी क्रान्तिकारक गटांचीं हत्यारें काढून घेण्यांत आलीं, त्यांचें सरकारांत बहुमत होणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत आली. डिगाऊलनें तर फ्रान्समध्यें आपलें सरकार स्थापन करतांक्षणींच फ्रेंच सैन्यांतून जे जे आफिसर्स कम्युनिस्ट होते किंवा ज्यांनीं हिटलरविरोधी उठाव खरोखरच केले व ज्यांनीं भांडवलदारी प्रथेविरुद्ध विचार प्रगट केले त्यांची हकालपट्टी केली. फॅसिस्ट बंधनांतून सोडवितांना सोविएतनें जनता मुक्त केली तर अँग्लो-अमेरिकन गटानें भांडवलदार गट मुक्त केले व जनतेला परत आपल्या पंजांत जखडलें.

[ ९ ]

फॅसिस्ट साम्राज्यवाद्यांचे जगावर स्वामित्व मिळविण्याचे बेत कामगारवर्गाच्या सोविएत युनियननें व तिच्या पाठीशीं उभ्या असलेल्या जनतेनें धुळीस मिळविले खरे, पण सोविएतचा विजय व नव्या नव्या लोकशाहीच्या सत्ता (पीपल्स डेमॉक्रसी) पाहून अमेरिकन-ब्रिटिश साम्राज्यवादी हैराण झाले. युद्धाचा फायदा घेऊन अमेरिकन भांडवलदारांनीं गडगंज नफे कमावले होते. त्यामुळें लोखंड, कोळसा, हत्यारें, अॅटमबॉम्ब यांचा संचय करून आपण आतां युद्धानें "हीन बल" झालेल्या सोविएत युनियनला व जगांतील इतर देशांना आर्थिक मदतीची लालुच व अॅटमबाम्बची धमकी दाखवून आपले अंकित करूं, त्यांना आपल्या वसाहती बनवूं व जे ऐकणार नाहींत त्यांना नव्या युद्धाच्या आगींत भस्म करूं, अशी हिटलरी महत्त्वाकांक्षा उराशीं बाळगून अमेरिकन साम्राज्यवादी पुढें सरसावले.

जर्मनी, जपान व इटलीच्या फॅसिस्टांच्या लष्करी नांग्या मोडून तेथें जनतेची सत्ता स्थापन होण्यास त्यांनी अडथळा केला. युद्धामध्यें क्रांतीच्या व स्वातंत्र्याच्या आघाडीवर राहिलेल्या कम्युनिस्ट पक्षांना जरी लोकांनीं फ्रान्स वगैरे सारख्या देशांत बहुमत दिलें तरी त्यांना राज्य चालविण्यांत भांडवलदार पक्षांनीं जागा देऊं नये, असा आदेश अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं दिला. फॅसीस्ट देशांतील युद्धसामुग्रीचे कारखाने बंद करून त्यांना जनतेच्या उपयोगाच्या वस्तु बनविण्यास लावण्याचें त्यांनीं नाकारलें, त्यामुळें युद्धकाळांत संसाराला लागणाऱ्या वस्तूंची पैदास बंद होऊन कौटुंबिक जीवनाला ज्या दुष्काळानें व महागाईनें ग्रासलें होतें तो दुष्काळ व महगाई युद्ध संपल्यावर कमी होण्याऐवजीं वाढू लागला. मार्शल योजनेच्या नांवाखालीं त्यांच्या हातीं गेलेल्या देशांतील कारखाने, शेती व संपत्ती आपल्या कब्जात घेण्याची सरसहा लूट अमेरिकन भांडवलदारांनीं आरंभली. स्वतःच्या देशांतहि कामगार चळवळ दडपून टाकून लोकशाही हक्क गारद करण्यास त्यांनीं सुरवात केली. पॉट्स्डॅमचा करार मोडला व जर्मनी व जपान आणि इतर देशांना परत युद्धाच्या तयारीस लावलें. सोविएत युनियन आणि युरोपांतील जनतेची राज्यें यांच्याशीं आर्थिक सहकार्य करून युद्धानें जळून खाक झालेल्या देशांचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं आपली अफाट यंत्रसिद्धि वापरण्याचा मार्ग त्यांनीं नाकारला. सोविएत हाच जगाच्या स्वातंत्र्याचा व जनतेचा शत्रु आहे, त्यापासून वांचविण्यासाठीं युद्धाचीच तयारी करणें जरूर आहे असे सांगून युद्धखोरांचा गट निर्माण करून अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं युद्धकाळांतील सोविएत दोस्तीचे संबंध तोडले व जगावर ताबा मिळविण्यासाठीं 'कोल्ड वॉरचा' म्हणजे "थंड युद्धा" चा पुकार केला.

पण येवढी तयारी करीत असतां साम्राज्यवाद्यांना एक भयंकर तडाखा बसला. जगांतील एक अत्यंत महान देश, म्हणजे चीन यालाकक्षेंत ठेवण्यासाठीं अमेरिकन ब्रिटश साम्राज्यवाद्यांनीं केलेले प्रयत्न फसले. चीनच्या जनतेनें कम्युनिस्ट पार्टीच्या व मावो त्से-तुंगच्या पुढारीपणाखालीं लढून अमेरिकन ब्रिटिश साम्राज्यवादी व त्यांचा हस्तक चँग कै-शेक यांचा पराजय केला व चीनसारखा देशही भांडवलशाहीच्या कक्षेंतून निघून सोविएत प्रधान जनतेच्या लोकशाहीच्या कक्षेंत व कम्युनिस्ट समाजरचनेच्या ध्येयाकडे जाणाऱ्या रस्त्यानें चालू लागला.

त्याच बरोबर जगांतील वसाहत अंकित देशांना पूर्वीप्रमाणेंच दडपून ठेवण्याचे साम्राज्यवादी प्रयत्न करूं लागले. तेव्हां त्यांची परकीय सत्ता व तिच्या आश्रयानें आपली वर्गसत्ता चालविणाऱ्या सरंजामी जमीनदारीचें कुजकें जूं

झुगारून देणाऱ्या स्वातंत्र्याच्या लढाया आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका खंडांतील कोट्यावधी शेतकरी-कामगार जनता लढूं लागली. विएतनाम, मलाया, ब्रम्हदेश, इंडोनेशिया, यामध्यें यशस्वी उठाव होऊं लागले. तेथील मळे व कारखाने, श्रम आणि संपत्ती, यांची लूट कायम राखण्याकरतां ब्रिटिश, अमेरिकन, फ्रेंच साम्राज्यवाद्यांनी लष्करी·युद्ध सुरूं केलें.

जगांतील जनतेच्या स्वातंत्र्ययुद्धाचा आसरा म्हणजे सोविएत युनियन. तेथें तर युद्ध संपतांच आर्थिक पुनर्रचना करून युद्धानें झालेला नाश कसा भरून काढायचा याच्या योजना व काम सुरू झालें व पुरेंही झालें. त्यानंतर सोविएत भूमीवरचे डोंगर, नद्या, वाळवटें, जंगलें यांचे फेरबदल प्रचंड यंत्रें व ॲटमची ताकद यांच्या सहाय्यानें करून, धनधान्य, फळफळावळ, कपडालत्ता, घरेंदारें व अत्यंत सुंदर सुखसोयींनीं भरलेला, रोगराई, दारिद्य व पीडा यांपासून संपूर्ण-पणें मुक्त असलेला, आपापसांत प्रेम आणि भक्ती राखून द्वेषाला व्यक्ती व्यक्तींच्या आचरणांत वाव न ठेवणारा असा नवा समाज घडविण्याच्या कार्यांत सोविएत युनियनचे लोक दंग झाले. जगाची लूट, वसाहती यांची, आणि साम्राज्यें कमावण्याची व त्यासाठीं युद्धें करण्याची त्यांना काय जरुरी ? नफेबाजीला व भांडवलशाहीला परक्यांचे देश व बाजारपेठा लागतात. कम्युनिस्ट समाजाला त्याची जरुरी नसते. यंत्रें वाढलीं कीं कामाचा दिवस कमी होतो, पगार वाढतो, मालाच्या किंमती घटतात व उत्पादन करणारा कामगार व शेतकरी व त्याचे बुद्धिवान थर वाढत्या उत्पादन-शक्तींचे भागीदार बनून खाऊनपिऊन जास्त सबल व सुखी होतात, संस्कृति. शिक्षण, कला वाढविण्यांत आपला वेळ खर्च करूं लागतात. प्रत्येक सोविएत नागरिक बुद्धिवान श्रमकर्ता होऊं लागतो. त्या देशाला अर्थातच युद्धाऐवजीं शांतताच प्रिय असते. भांडवल, भाषा, धर्म, जाती, वा जमिनींचीं युद्धें त्याला माजविण्याची जरूरी काय ? आपमतलबी साम्राज्यवाद्यांच्या आहारीं न जातां जनसंहार वांचविण्यासाठीं तो शांततेची चळवळ उभारतो. साम्राज्यवाद्यांनीं परकीय देशांतून पाय काढावा अशी मागणी करतो. जगाच्या स्वातंत्र्याचा व सुखाचा तो वाली बनतो.

म्हणून साम्राज्यवादी अमेरिकन–ब्रिटिश गटांना तो देश, त्याच्या बद्दलची जगांतील लोकांत असलेली सहानुभूति, व त्या देशाचे आदर्श धरून, त्याचें सर्व जीवनव्यापी तत्त्वज्ञान मानून चालणारे कम्युनिस्ट दक्ष व लोकशाही गट यांना मारण्याची नवीन कारस्थानें रचणें भाग पडलें. सोविएतचा व चीनचा विजय

व पोलंड, बल्गेरिया आदि लोकशाह्यांच्या विजयानें कम्युनिस्ट पक्ष व त्यांचें तत्त्वज्ञान यांचा प्रत्यक्ष अंमल जगांतील जवळजवळ अर्ध्या लोकसंख्येच्या जीवनांत सुरू झाला होता. फ्रान्स-इटली सारख्या देशांतही कम्युनिस्ट पक्षालाच जनतेंत बहुमत होतें. या प्रचंड ताकतीमध्यें खिंडार कसें पाडायचें याची विवंचना अमेरिकन साम्राज्यवाद्यांना पडली.

## [ १० ]

आर्थिक कोंडी करून किंवा उघड लष्करी हल्ले करून बाल्कन देश काबीज करणें आतां शक्य नव्हतें. चीनमध्यें तर तो ही प्रयत्न फसला. झेकोस्लोवाकियामध्यें दुष्काळ पडला, तेव्हां तेथें दंगे माजवून तेथील राज्य पाडावें तों सोविएत युनियनच्या सामायिक शेतीमधून हवें तेवढें धान्य सोविएत युनियननें त्यांना पुरविलें. पोलंडचा कोळशाच्या खाणीचा प्रचंड धंदा हिटलरशाहीनें मोडून टाकला होता. तो लवकर पुनरुज्जीवीत झाला नाहीं तर बेकारी व उपासमार वाढण्याचा संभव; मग तेथें दंगे व प्रतिक्रांति घडवून आणतां येईल, असें समजून पोलंडसाठीं आम्ही युद्धांत पडलों म्हणणाऱ्या इंग्लंड-अमेरिकेनें त्याला खाणीचीं यंत्रें देण्याचें नाकारलें. येवढेंच नव्हे तर तेथें आपले फॅसिस्ट हस्तक, जनरल अँडर्सचे हेर पाठवून मोडतोड करण्याचा प्रयत्न केला. तोही फसला. सोविएतनें खाणींची मशीनरी पोलंडला पुरविली. बल्गेरीयाच्या गिरण्या चालविण्यासाठी ताशकंदचा कापूस त्यांना दिला. हंगेरीचा पोलादाचा कारखाना उभा करण्यास मदत केली.

साम्राज्यवादी देश ज्यांना मदत करतात त्यांना फक्त आपला पक्का माल विकत देऊं करतात, व त्यांचा कच्चा मालच काय तो विकत घेतात. उद्देश हा कीं त्या देशांत यंत्रसामुग्री वाढून तो प्रबल होऊं नये, व तेथें निघणाऱ्या कच्चा मालावरील स्वस्त खरेदीचा आपला नफा बुडूं नये. पण सोविएत युनियनसारख्या समाजवादी देशाला हा नियम लागू पडत नाहीं. झेकोस्लोवाकियासारख्या औद्योगिक देशाचा व हंगेरीसारख्या शेतीप्रधान देशाचा, सर्वांचा माल ते घेतात व त्यांना हवीं तीं यंत्रें वा माल देतात. जेथें भांडवलशाही नाहीं तेथेंच हें होऊं शकतें. म्हणून आर्थिक कोंडीनें बाल्कन देश आपल्या कक्षेंत आणणें भांडवलदारी साम्राज्यवाद्यांना अशक्य झालें.

जगाची एवढी मोठी जनता सरंजामदारीचा व भांडवलशाहीचा रस्ता सोडून समाजवादाकडे निघाल्यानें भांडवलदारी देशांचें आर्थिक संकट वाढतच चाललें, आपली सद्दी संपली हें त्यांना दिसून आलें, पण आतां इलाज काय ?

इलाज तोच जुना. त्या इलाजाचें मुख्य हत्यार म्हणजे कट, खून, क्रांतिकारकांत फाटाफूट माजविणें, कम्युनिस्ट पार्टीमध्यें चुकीच्या धोरणाचे रस्ते दाखविणारे "पुढारी" पेरून जनतेच्या क्रांतीचा, देशरचनेचा मार्ग मोडणें व अखेर जागतिक युद्ध करून पहाणें. आणि हा रस्ता अमेरिकन व ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनीं चोखाळण्यास सुरवात केली.

त्यामध्यें कम्युनिस्ट पक्षांचें बळ आंतून पोखरून खच्ची करणें, त्यांच्या सूज्ञ व ज्ञानी अनुभवी पुढाऱ्यांचे खून करविणें, त्यांना "मार्क्सवादाच्या' नांवानें अपमार्गाला लावून कामगार वर्गामध्यें फाटाफूट करणें, इत्यादि डावपेंचांना फार महत्व आहे. या डावपेंचांची आंखणी जुन्या काळीं ट्रॉट्स्कीवादानें व त्यांच्या गटानें साम्राज्यवाद्यांना घालून दिली होती. तीच आंखणी आतां नव्यानें टीटो गटाच्या, युगोस्लावियाच्या 'कम्युनिस्ट पक्षाच्या' हस्तें जगभर करण्याचा कट अमेरिकन-ब्रिटिश भांडवलदारांनीं केला.

या कटांची हकीकत गेल्या दोन तीन वर्षांत झेकोस्लावाकिया, बल्गेरिया, हंगेरी, रुमानिया, पोलंड या देशांत जनतेच्या कोर्टासमोर जे कटाचे खटले झाले त्यामध्यें आपल्याला पहायला मिळते. त्यापैकीं हंगेरीमधील सुप्रसिद्ध रायक खटला व त्यांत उघडकीस आलेलें टीटोचें कारस्थान या पुस्तकांत तुम्हांला वाचायला मिळेल.

त्यावरून दिसून येईल कीं हेरगिरी करणारे हे गट, कम्युनिस्ट पक्षांत घुसून क्रांतिकारक कामगारवर्गाचे जें प्रमुख हत्यार म्हणजे कम्युनिस्ट तत्त्वज्ञान, डावपेंच, सोविएत मैत्री व भक्ति, व कम्युनिस्ट पक्षाचें संघटन व आचरण हीं कशीं सूक्ष्म रीतींनें पोखरून काढतात.

या प्रश्नांचें सविस्तर विवरण येथें करणें शक्य नाहीं पण कांहीं उदाहरणें घेउन पाहूं. बाल्कन देशांमधील जनतेमध्यें व विशेषतः कामगारांमध्यें सोविएतनें त्यांना फॅसिझमपासून मुक्त केलें म्हणून विलक्षण प्रेम. सोविएतविरोधी गटांत अशा देशांतील जनतेला नेणें व युद्धांत उभे करणें कठीणच. म्हणून टीटो-कार्देली गटानें युगोस्लाविया मुक्त कसा झाला याचा इतिहास विशिष्ट रीतीनें शिकविण्यास सुरवात केली. युगोस्लाविया हा त्याच्या जनतेनें जी गनिमी लढाई

केली त्यामुळेंच मुक्त झाला, आपल्या क्रांतीच्या शूरपणानें तो मुक्त झाला, एवढेंच सांगावयाचें व आपल्या उठावांचींच कवनें गाऊन त्या उठावाचा एकमेव वीर टीटो याची भक्ति सांगायची. कुठेंही व्याख्यानांत टीटोचें नांव आलें कीं एक गट उठून पांच मिनिटें " टीटो-टीटो-टीटो " असें ओरडत उभा राहायचा व बाकीचे लोक अर्थातच त्याला आपल्या शौर्याचें प्रतीक म्हणून समजून अभिमानानें ओरडूं लागायचे. असें नाटक तो एक अत्यंत कंटाळवाणा प्रकार होईपर्यंत सर्व सभांतून करविलें जाई. युगोस्लावियाच्या मुक्ततेचें श्रेय खरें सोविएतच्या लाल फौजांना आहे हें सांगावयाचें नाहीं किंवा तिनें फक्त " मदत " केली एवढेंच सांगायचें. इतिहास सांगतो कीं स्तालिनग्राडनंतर सोविएत लाल फौज येईपर्यंत युगोस्लावियाची गनिमी लढाई जवळ जवळ संपुष्टांत आली होती. पण हा इतिहास दडवून ठेऊन टीटो गटाला अशी भावना जागृत करायची होती कीं आपली मुक्तता, तसेंच आपलें पुढचें आर्थिक व राजकीय भवितव्य कांहीं सोविएत मदतीवर वा मैत्रीवरच अवलंबून नाहीं.

मी ज्या वेळीं बेलग्राडला गेलों तेव्हां सोविएत लाल फौजेनें कोठें कशा लढाया केल्या हें स्पष्टपणें विचारल्याशिवाय मला कधींच सांगण्यांत आलें नाहीं. पण सारायेव्हेच्या भागांत गनिमी योद्धे कसे लढले हें मात्र सांगण्यांत आलें येवढेंच नव्हे, तर एकदां टीटोला इटालियन सैनिकांनीं घेरलें असतां तो बाकीचे शिपाई झोपलेले पाहून एकटाच दोन पिस्तुलें घेऊन कसा लढूं लागला याचीं वर्णनें मला ऐकायला मिळत.

पण वर्णन करणाऱ्यांनीं हें ही सांगायचें ठेवलें नाहीं कीं टीटो विमानांतून जर इकडून तिकडे लढाईमध्यें गेला तर आपल्या कुत्र्याला ' टायगरला '— विसरत नसे. विमनामध्यें त्याची खास सोय ! टीटोच्या प्रेमाचा हा एक नमुना म्हणून तुम्हांला तेथें तो ऐकायला मिळेल. कुत्रा व घोड्यावरचें आपलें प्रेम गनिमी सैनिकांनीं दाखविलेलें इतिहासांत सांपडतें खरें. पण युद्ध कार्यांत त्यांचा भाग असे म्हणून. केवळ षोक म्हणून विमानांतही त्याची खास सोय करण्याच्या गोष्टी भांडवलदारी षोकिनांच्याच कादंबऱ्यांत काय त्या मिळतात !

दुसरा एक टीटोवादी कुशल प्रचार म्हणजे युगोस्लाविया मार्क्सवादाच्या रस्त्यानें जाऊन पांच वर्षांत संपूर्णपणें वर्गविहीन समाजवादी देश बनणार आहे असें ठोकून सांगणें. १९४७ त मला कार्देलीनें मोठ्या भरदार वर्णनांत

सांगितलें कीं पांच वर्षांच्या आंत आम्ही सोविएतच्या पुढच्या पायरीच्या सोशालिझममध्यें नाकापर्यंत बुडून जाऊं.

[ 'विदिन फाईव यिअर्स वुई शॅल बी अप टु दि नेक इन् सोशालिझम्' असें इंग्रजी भाषांतर कार्देलीचा दोस्त देदिये यानें करून मला सांगितलें.] सोविएतला जेथें इतका प्रयास करावा लागला व काळ लागला तेथें तुम्ही इतक्या लवकर औद्योगिक रचना व सामायिक शेती करून वर्गहीन समाज कसा आणणार असा प्रश्न मी केला. तेव्हां कार्देलीनें त्याचें उत्तर टाळलें. आज तें उत्तर मिळालें आहे. तेथें समाजवाद यायच्या ऐवजीं भांडवली राज्यच जोरांत आलें आहे.

युगोस्लावियाच्या लोकांना सोविएतविरोधी बनविण्याचा आणखी एक टीटोवादी उपाय म्हणजे युगोस्लावियाच्या पुनर्घटनेसाठीं सोविएत मदत करीत नाहीं असें सुचविणें. तसेंच आपल्याला अमेरिकनांकडून मदत मिळणें शक्य आहे पण आपल्याला ते सोविएतचा मित्र समजतात व म्हणून आपल्याला ते मदत करीत नाहींत, असें ध्वनित धरून सोविएत मैत्री म्हणजे उपासमार व बेकारी असें भासवून लोकांना चिथावणें.

ट्रॉटस्की टीटोवादी गटाचा आणखी एक मुख्य डाव असा कीं प्रत्यक्ष युगोस्लावियामध्यें कम्युनिस्ट पार्टी सुसंघटित होऊन ती कामगारवर्गाची पार्टी बनूं नये. त्यानें असाही सिद्धांत मांडला कीं, कम्युनिस्टांच्या नेतृत्वामुळें जिथें सर्व जनता, सर्व वर्ग साम्राज्यविरोधी युद्धांत सामील झालेलीं असतात तेथें वर्गीय दृष्टीनें स्वातंत्र्य युद्ध चालविण्याचा किंवा स्वातंत्र्य मिळाल्यावर वर्गीय दृष्टीनें समाजरचना करण्यासाठीं वर्ग लढा करण्याचा प्रश्नच उरत नाहीं, तेथें सर्व वर्ग व लोक एकच "पीपल्स फ्रंट" करून खुषीनें सोशॅलिस्ट समाज-रचनेकडे चालूं लागतात. अशा वेळीं या सर्ववर्गीय, सर्वग्राही फ्रंटच्या व्यतिरिक्त कम्युनिस्ट पार्टीचें असें खास काम व कार्यक्रम यांची जरूरीच नाहीं. असा सिद्धांत मांडून टीटोवाद्यांनीं कम्युनिस्ट पक्षाला उघडपणें वागण्याची व कामगारांत पक्ष-संघटना करण्याची संधीच दिली नाहीं.

ज्यावेळीं "यूथ रेल्वे" बांधण्याच्या जागीं आम्हाला नेण्यांत आलें व व्हांड्रुक टनेल खोदण्यांत युवकांच्या तुकड्यांनी दाखविलेला पराक्रम आम्हांला सांगण्यांत आला तेव्हां या तुकड्यांत कम्युनिस्ट तरुण किती असावेत व त्यांचें आणि इतर युवकांचे संबंध कसे असतात, काम कसें चालतें असा मी प्रश्न केला तेव्हां एक युवक उत्तर देण्याचा प्रयत्न करणार तोंच त्याला दुसऱ्या सीनीयर

माणसानें खुणावलें व प्रश्नाचें उत्तर तसेंच राहून गेलें. युगोस्लावियामध्यें असतांना कम्युनिस्ट पार्टीचें काम, घोषणा, किंवा तिच्याबद्दलच्या अभिमानाची एकही खूण मला आढळली नाहीं. मी बुदापेस्तला (हंगेरीमधें) गेलों तेव्हां दान्यूब नदीकांठच्या जुन्या तुर्की किल्ल्याच्या शिखरावर सोविएत लाल फौजांच्या वीरांचे व त्यांनीं बूदापेस्तच्या मुक्ततेसाठीं केलेल्या युद्धाचें स्मारक म्हणून उभारलेला 'लाल शिपायाचा' पुतळा पाहिला. पण युगोस्लावियांतील बेलग्राडच्या मुक्ततेचीं स्मारकें मात्र अदृश्य होतीं! तें आमच्या मनाला खटकें पण त्याचा त्यावेळीं अर्थ लागेना. आतां रायक खटला वाचल्यावर व कॉमिनफॉर्मचा ठराव पाहिल्यावर तो लागला. सोवियत मैत्री खचीं करणें व कम्युनिस्ट पार्टीचा कबजा घेऊनच तिची कत्तल करविणें हा टीटोचा डाव होता व तो युगोस्लावियांत तात्पुरता तरी यशस्वी झाला. मात्र युगोस्लावियाच्या जनतेच्या मनांतील सोविएत भक्ति मारणें त्याला अशक्य आहे.

## [ ११ ]

अमेरिकन साम्राज्यवाद्यांची महत्त्वाकांक्षा ही कीं कम्युनिस्ट पक्षाच्या पुढारी-पणानें लोकराज्याच्या पद्धतीनें समाजवाद आणूं पहाणारी बाल्कन राष्ट्रें परत आपल्या कक्षेंत आणायचीं. टीटोनें याच डावासाठीं असा बहाणा केला कीं अल्बानिया सारख्या लहान देशानें स्वतंत्र फौज, स्वतंत्र आर्थिक योजना वगैरे आखण्याऐवजीं युगोस्लावियाच्या अर्थ योजनेंत बसावें कम्युनिस्ट पार्टी सरकार व आर्थिक पुनरचना यांचें सर्व पुढारीपण आपल्या हातीं घेऊन अल्बा-निया साम्राज्यवाद्यांच्या कक्षेंत आणण्याचा तो डाव होता. पण अल्बानियाचा कम्युनिस्ट पुढारी आन्वर ओझा याच्या तत्त्वनिष्ठेमुळें तो फसला. सर्व स्लाव देश तेवढे एक करून टाकावेत व स्लाव आणि त्यांतही कम्युनिस्ट अथवा लोकशाही मार्गानें जाणाऱ्या देशानीं तरी देशाभिमानाचे भांडवली अपविचार सोडून देशविभिन्न दाखविणाऱ्या मर्यादा रद्द करून सर्वांचा एकच देश किंवा किमान फेडरेशन करावें असेंही त्यानें सुचविलें. पण त्याला इतर बाल्कन पुढारी बळी पडले नाहींत.

टीटो गटाचा आणखी एक असा पवित्रा असे कीं सर्व आंतरराष्ट्रीय परिषदांमधून आपलीं मोठमोठीं प्रतिनिधि पथकें पाठवायचीं, सगळीकडे आपल्या वकिलाती नेमायच्या व त्यांच्या करवीं परिषदांमध्यें, त्या त्या देशांमध्यें आपलें

खास "मार्क्सवादी" पुढारीपण स्थापन करून सर्व क्रांतिकारकांना व कामगारांना युगोस्लाविया हाच काय तो खरा कम्युनिस्ट प्रतिनिधिक देश असें भासवायचें. ऐन लढाईच्या रंगांत लंडनमध्यें युगोस्लावियाचें एक भलें मोठें युवक टोळकें तळ देऊन राहिलेलें मी पाहिलें होतें. इंग्रज जनतेपासून आम्ही मदत गोळा करतों असें ते म्हणायचे, चर्चिलविरोधी भाषणें करायचे. टीटो तर त्याच्या भेटीला कम्युनिस्ट गेला तर पहिलीं पंधरा मिनिटें अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं युगोस्लावियाची सोन्याची ठेव कशी अडवून धरली आहे व युगोस्लावियालामारण्याचा कसा कट ते करीत आहेत हें रागारागानें सांगे. पण अशाच भरांत त्याचा दोस्त दे दिये हा बोलून गेला कीं आम्हांला डॉलरची कांहीं कमतरता नाहीं. आणि सांगे कीं तो एकदां जखमी झाला असतां त्याला मोठ्या शिलकीनें व काळजीनें कायरोच्या इस्पितळांत ब्रिटिशांनीं पाठविलें होतें. ब्रिटिश–अमेरिकन जर यांचे इतके कट्टर शत्रू तर मग इतकी याची काळजी कशी घेतली गेली? प्रश्न सुटेना—रायकच्या खटल्यानें तो सुटला. हे कम्युनिस्ट नव्हते तर अमेरिकनांचे हेर होते म्हणून इतकी काळजी !

मार्क्सवादाचा बुरखा पांघरून कम्युनिस्ट पार्टीमध्यें हेरगिरी करून व इतर देशांच्या पार्ट्यांमध्यें आपले हस्तक पेरून कामगारवर्गाला हतबल करायचें व अखेरीस संधि मिळेल तेव्हां लष्करी चढाई करून स्वतंत्र देशांना परत अमेरिकन कक्षेंत ओढायचें आणि स्वतंत्र होऊं पहात असतील त्यांचा लढा मारून काढायचा हीच टीटोवादाची नीति व घटना हें आतां सिद्ध झालें आहे. ग्रीसमधील फॅसिस्टविरोधी लोकशाहीच्या फौजांना अमेरिकन सैन्याविरुद्ध लढून ज्यावेळीं विजय मिळूं लागला तेव्हां त्यांच्याविरुद्ध अमेरिकन सैन्याला पिछाडीवरून हल्ला करण्यासाठीं टीटोनें रस्ता करून दिला व ग्रीसच्या स्वातंत्र्याचा विश्वासघात केला हें त्याचें अत्यंत ताजें उदाहरण आहे.

अमेरिकन–ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचें एक क्रांतिघातक हत्यार म्हणून टीटो ट्रॉटस्कीवादाचें वैचारिक आणि संघटनात्मक जाळें हिंदुस्थानांतही पोंचलें आहे हें आतां सर्वविश्रुतच आहे. हंगेरीमध्यें जसा रायकचा गट सांपडला, झेकोस्लोवाकियामध्यें कार्डिनल मिंझेन्स्टीचा गट, बल्गेरियामध्यें ट्रायको कोस्टोव गट इत्यादि सांपडले तसें कांहीं हिंदुस्थानात आज हातीं लागणें शक्य नाहीं. कारण आपल्या येथें अद्याप जनतेची लोकशाही-सत्ता झालेली नाहीं. एवढेंच शक्य आहे कीं ज्या ज्या क्रांतिवादी पक्षांमध्यें टीटोवादी आपले हस्तक

पेरून बसले असतील त्यांचा ठाव त्या त्या पक्षाची वैचारिक घडण आणि आचरण व संघटनात्मक सावधगिरी लावूं शकेल.

हिंदुस्थानसारख्या देशांमध्यें टीटो-ट्रॉटस्कीवादी गट क्रांतिघातकाचें काम दोन रीतीनें करतात. एक मार्क्सवादी विचारसरणीचें आचरण, क्रांतीचे डावपेंच ठरविण्याची मार्क्सवादी दृष्टि पुढें करून चालू परिस्थितीला जे डावपेंच योग्य व बरोबर असतील तेच न वापरतां अतिजहाल किंवा अतिमवाळ धोरणें क्रांतिकारकांपुढें मांडायचीं आणि दुसरें तीं अमलांत आणण्यासाठीं जेथें जमेल तेथें प्रत्यक्ष हस्तक नेमायचे. हस्तक हेर नेमतां न आले तरी चुकीच्या डावपेंचांनीं अर्थातच लढा मारला गेला म्हणजे त्यांचें काम होतें. या पद्धतीमध्यें जे जे सांपडतात ते ते सर्व जाणून बुजून टीटो-ट्रॉटस्कीवादी अमेरिकन हेरच असतात असें नाहीं. त्यांच्या चुकीच्या विचारसरणीला, चुकीच्या डावपेंचांना मान्यता देऊन त्याला बळी पडणारे कांहीं लोक प्रामाणिक क्रांतिवादी व मार्क्सवादी ही असूं शकतात. मनानें ते जरी शुद्ध निघाले तरी त्यांच्या आचरणानें मात्र क्रांतिघात होतो यांत शंका नाहीं.

उदाहरण घेऊन पाहूं. हिंदुस्थानच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक जीवनावर ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची, त्यांच्या भांडवलाची व विचारसरणीची पकड कायम आहे हें स्पष्ट आहे. येथील जमीनदारवर्ग त्यांचा साथीदार व भागीदार आहे; त्यांच्याशीं कांहीं बडी भांडवलदार घराणीं सामील आहेत. अशा परिस्थितींत आपल्याला आपलें स्वातंत्र्य कमवायचें म्हणजे साम्राज्यविरोधी व जमीनदारशाहीविरोधी वर्गांची एकजूट करून, कामगारवर्ग व कम्युनिस्ट पक्ष यांच्या पुढारीपणाखालीं जनतेचें स्वातंत्र्य आणायचें आहे, तें टिकवायचें आहे. अशी आंच ज्यांना ज्यांना लागली असेल त्या सर्वांना आपले दोस्त म्हणून लेखून त्या सर्वांच्या एकजुटीनें कामगार-शेतकरी वर्गाच्या संघटित जोड आचरणानें आपल्याला हें स्वातंत्र्य घडवितां येईल, हेंही स्पष्ट आहे.

या क्रांतीला लोकशाही जनतेची क्रांती म्हणतात. तिच्यामध्यें सगळा कामगार वर्ग, सगळे शेतकरीवर्गाचे थर, शहरी मध्यमवर्ग, व लहान सहान भांडवलदारही भाग घेतात, तिच्याकडेच धाव घेतात, अशीच क्रांति आमचे प्रश्न सोडवील असें म्हणून कामगारवर्ग आणि तिचा कम्युनिस्ट पक्ष याकडे ते आशेनें पाहूं लागतात.

लोकशाहीची क्रांति यशस्वी झाल्यावर मग कामगारवर्ग त्या समाजाला, देशाला समाजवादाकडे, कामगारवर्गसत्तेच्या मार्गानें घेऊन जाऊं लागतो. आपल्या वर्गीय कर्तव्याला, इतिहासाच्या या गतीला कोणते कोणते दोस्त जास्तींत जास्त कसे शोधून काढावेत, त्यांचा एक मोर्चा, फ्रन्ट, कसा बांधायचा याची नीट दृष्टि व कला मिळविणें हें कम्युनिस्ट पार्टीचें मोठें व बिकट कर्तव्य आहे.

पण नेमक्या अशाच परिस्थितींत टीटो-ट्रॉट्स्कीवाद अगदीं याच्या उलट सिद्धांत मांडतो व तसें आचरण व संघटना करतो. उदाहरणार्थ, हिंदुस्थानामध्यें १९४४ त टीटोचे प्रतिनिधि दे दियें व झुगोविच आले होते. त्यांनीं आपल्या संभाषणांत मोठें दुटप्पी धोरण मांडलें. त्यांनीं सांगितलें, लोकशाही मोर्चा जरूर पाहिजे. युगोस्लावियांत आम्ही 'पीपल्स फ्रन्ट' नाहीं का तयार केला ? तसाच.

पण लोकशाहीचा मोर्चा बांधायचा तर वर्ग कुठचे, क्रांतीचें स्वरूप काय हा प्रश्न यायचाच. त्या बाबतींत या दोघांनीं अशी थाप मारली कीं हल्लींच्या नव्या जमान्यांत क्रांतीच्या टप्प्यांचा पूर्वींसारखा विचार करूं नये असें एक मत बोल्शेविक पक्षाच्या वाङ्मयांत मांडलें जात आहे व त्याबाबत मोठा वाद चालू आहे. सोविएत युनियन व जनतेच्या लोकशाह्या यांची ताकत प्रतिगामी भांडवलदारी ताकदीपेक्षां अनेक पटीनें मोठी झाली आहे. म्हणून आतां सर्वत्र एकदम एकच संमिश्र क्रांति करून ( लोकशाही क्रांति व समाजवादी क्रांति दोन्ही मिळून एकदमच म्हणून संमिश्र ) समाजवादाची स्थापना व कामगारवर्गाचें निर्भेळ राज्य स्थापण्याची वेळ आली आहे. अर्थात् अशा क्रांतीला लोकशाहीचे सगळे थर, श्रीमंत शेतकरी, किंवा लहान सहान भांडवलदार कसे मदत देतील ?

आणि ही विचारसरणी जरी त्या वेळीं स्पष्टपणें सर्वांना मान्य झाली नाहीं तरी त्याबरहुकुमचें वैचारिक आचरण व संघटण आज हिंदुस्थानांत बऱ्याच क्रांतिवाद्यांनीं व कम्युनिस्टांनीं केलें. त्यामध्यें लोकशाही क्रांतीचें, अनेक क्रांतिकारकांचें, व कम्युनिस्ट पक्षाचें नुकसान झालें.

टीटो-ट्रॉटस्कीवादी संप, लढे किंवा उठावाची वेळ नसतां उठावाच्या घोषणा देऊन, किंवा जनतेच्या पाठिंब्याची व सक्रिय आचरणाची तयारी नसतांना उठावाच्या घोषणा देऊन, शत्रुवर्गाच्या हातून क्रांतिकारकांचा संहार कसा घडवून आणतात व तसा संहार करण्यास प्रतिगामी सरकारें आगाऊच कशी तयारी ठेवतात हें युगोस्लावियाच्या इतिहासांत महशूर झालें आहे. तसेच प्रकार हिंदुस्थानांत घडवून आणले गेले अशीही बोलवा आहे.

सारांश टीटो ट्रॉटस्कीवाद वैचारिक रूपानें, तसेंच हेरगिरी करणाऱ्या व्यक्तींच्या रूपानें, दोनही मार्गानें हिंदुस्थानांत, इंडोनेशियांत, व इतरत्र जाऊन पोंचला आहे व त्या देशांच्या लोकशाही स्वातंत्र्याच्या चळवळींना, तेथील मार्क्सवादाला आणि कम्युनिस्ट व तत्सम पक्षांना अपमार्ग, अपविचार, व अपआचार यांच्या खोडींत टाकून तेथील क्रांती थोपवूं पहात आहे.

## [ १२ ]

आतां अखेरचा प्रश्न असा कीं या धोरणानें बाल्कनमधील इतर देशांपेक्षां युगोस्लाविया जास्त सुखी, स्वतंत्र सुव्यवस्थित झाला आहे कीं नाहीं ? असा प्रश्न अनेक राष्ट्रवादी, सोविएतविरोधक, किंवा कम्युनिझमची लोकशाही चांगली कीं वाईट हें वरील प्रश्नाचें उत्तर पाहून ठरविणारे तटस्थ, विचारतात.

त्याला उत्तर त्यांच्या देशांतील लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचें परीक्षण करून रोखठोक मिळूं शकतें. पहिली मुख्य बाब म्हणजे बाल्कन देशांत युद्धापूर्वी परकीय अँग्लो-अमेरिकनांचे भांडवल पेरलेलें असे. ते त्या त्या देशांतून कामगारांना राबवून, शेतकऱ्यांना लुबाडून आपल्या देशीं घेऊन जात व स्वतःचे खिसे भरीत. यांत फरक झाला काय ?

महायुद्ध संपतांच, साम्राज्यवाद्यांनीं आम्हांला आजपर्यंत लुटलें, आतां आम्हीं त्यांचें भांडवल व कर्ज देणार नाहीं, अशी घोषणा जनतेच्या उठावामुळें टीटो गटाला करावी लागली. पण आतां त्याच्या सरकारनें अमेरिकन, ब्रिटिश, फ्रेंच इत्यादींचीं कर्जें मान्य केलीं आहेत, त्यांचे कारखाने व भांडवल परत देण्याचें कबूल केलें आहे.

त्याविरुद्ध लोकांनीं टीका करूं नये म्हणून त्यांना सांगण्यांत येतें कीं अमेरिका-इंग्लंड आपल्याला त्याबदली यंत्रें व सामुग्री देईल, त्यांतून आपल्या पंचवार्षिक योजना पार पडतील व समाजवाद स्थापन होऊन आपण सुखी होऊं. पण इंग्लंड-अमेरिका युगोस्लावियाच्या खाणींची पैदास, जंगलपैदास तसेंच धनधान्य, स्वस्त भावानें निर्यात करीत आहे व त्याऐवजीं त्यांना तोफा, विमानें व लष्करी सामान पुरवून युगोस्लावियाला लष्कराचा तळ बनवीत आहे.

दुसरी बाब म्हणजे युगोस्लावियांतील लोकांचें राहणीचें मान वाढलें का ? तेथील जीवनमानाच्या वस्तूंच्या किंमती उतरल्या का ? सोशालिझम जवळ

आला असें सांगतां पण अद्याप रेशनिंग तरी संपलें का ? सर्वांना काम मिळूं लागलें का ? असे प्रश्न विचारले तर उत्तर काय ?

या सर्व महत्वांच्या प्रश्नांचें उत्तर ' नाहीं ' असेंच मिळतें. याच्या उलट हंगेरी, रुमानिया, बलगेरिया, पोलंड, झेकोस्लेव्हाकिया या सर्व देशांनीं परकीय देशांचें भांडवलदारी कर्ज व कारखाने जप्त केले, त्या देशाचें उत्पादन वाढलें, युद्धामुळें झालेला नाश भरून निघाला, लोकांच्या राहणीचें मान वाढलें, किंमती उतरल्या, रेशनिंग खलास झालें, बेकारी नष्ट झाली. ते देश आतां आपल्या पहिल्या आर्थिक पुनर्रचनेच्या योजना पूर्ण करून नव्या समाजरचनेच्या योजना हातीं घेऊं लागले आहेत. विद्यार्थी, शाळा, सिनेमा वगैरे सर्व अंगांचा विचार केला असतां सोविएत मैत्री वाढवून तिच्या मदतीनें कम्युनिस्ट पुढारीपणाखालीं लेनिन—स्तालिनच्या तत्त्वज्ञानानें चालणारे लोकशाहीचे हे देश आज सुखी झाले आहेत; याच्या उलट युगोस्लावियानें भांडवलशाहीचा व अमेरिकन गोटाचा रस्ता धरण्यानें त्याला इतर भांडवली देशांप्रमाणें आर्थिक कुचंबणेमध्यें पडून राहावें लागत आहे. दुष्काळानें त्याच्या जनतेला ग्रासलें आहे. आणि या सर्व अरिष्टांतून रस्ता म्हणजे त्याला एकच दिसतो. युद्धाची तयारी करून शेजारच्या शांतताप्रिय देशावर हल्ले करून साम्राज्यवाद्यांची सेवा करायची.

तिसरी बाब म्हणजे युगोस्लावियांत जनतेचें स्वातंत्र्य वाढलें आहे काय ? आपली सत्ता कायम राखण्यासाठीं टीटोचे फॅसिस्ट हेर व पोलिस आज त्याच्याविरुद्ध जो जो कोणी टीका करील त्याला तुरुंगांत घालून मारीत आहेत. इतर बाल्कन देशांच्या राज्यव्यवस्थेंत कारखाने, शेती, वगैरेंच्या कारभारांत, न्यायदानांत लोककमिट्यांचें राज्य आहे. तेथें नोकरशाहीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत गेला आहे व लोकशाही वाढली आहे. तेथें लोककमिट्यांचा व्याप आणि सत्ता वाढत आहे तर युगोस्लावियाच्या घटनेंतील लोककमिट्यांचा टीटोच्या पोलिसांनीं व भांडवलदारांनीं ताबा घेतला आहे. पूर्वी युद्धकाळांत युगोस्लावियांतील निरनिराळे राष्ट्रगट स्वातंत्र्याच्या लढ्यात एक होऊन आपसांतले वैर विसरूं लागले होते व सामायिक विचारानें वागूं लागले होते. तेथें आतां जातीजातीचे तंटे टीटोवाद्यांनी माजविले आहेत. सारांश, इतरत्र लोकशाही समाजाची सर्व लक्षणें वृद्धिंगत झालीं, येथें मात्र तीं खलास झालीं. तरीपण पूर्वी फॅसिझमला ज्या कामगार शेतकरी गनिमांनीं विरोध केला ते आतां नव्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं प्रतिकाराची संघटना करूं लागले आहेत.

टीटोच्या आचरणांतला ट्रॉट्स्कीवाद हा जरी नवीन नसला तरी त्यापेक्षां जास्त नांवाजला गेला. कारण ट्रॉट्स्कीला एक स्वतंत्र देश व त्याची कम्युनिस्ट पार्टी चालवायला अशी कधींच मिळूं शकली नाहीं. नाहींतर आज जें टीटोनें केलें तेंच त्याचेंही परिणत स्वरूप दिसलें असतें.

टीटोचा गट व टीटोवाद हा आज जगांतील कामगारवर्गाचा एक अत्यंत मोठा शत्रु आहे. कम्युनिझमच्याच नांवानें तो वावरत असल्यानें त्याचें विष फारच बाधक ठरतें. भांडवली जगामध्यें स्वातंत्र्याच्या लढ्यांत जी जनता उतरत आहे तिच्या पुढारीपणाची जबाबदारी कामगारवर्ग व कम्युनिस्ट पक्षांचें अचूक धोरण व आचरण यावर अवलंबून आहे. सोविएत युनियनशीं मैत्री, त्याचें अस्तित्व-रक्षण व आपलें स्वातंत्र्य रक्षण ही अजोड गांठ आहे. ती तोडण्यासाठींच टीटोवादाचा अवतार आहे. युद्धखोरांचें एक मोठें अस्त्र म्हणजे आजचा ट्रॉट्स्की-टीटोवाद.

साम्राज्यवाद्यांची महत्वाकांक्षा आहे कीं तिसऱ्या महायुद्धाचा वणवा पेटवून आपण कामगार शक्तींना मारून भांडवलदारी जग परत बलवान करूं. पण ही त्यांची आशा किती फोल आहे हें १९१७ पासूनचा इतिहास सांगतो आहे. कामगारवर्गाची, लोकशाहीची, समाजवादाची ताकत आज इतकी अजस्र आहे कीं ती आज सर्वांना सांगते कीं साम्राज्यवाद्यांच्या युद्धाच्या योजना शांततेच्या मोहिमेनें हाणून पाडूं नाहींतर राक्षसी साम्राज्यवाद परत कोट्यावधींचा बळी घेईल. पण तें अशक्यच झालें तर मग हेंही ध्यानांत ठेवा कीं युद्धखोरांचा यापुढें कधींहि विजय होणार नाहीं. सबंध जगच आतां भांडवलदारीपासून कायमचें मुक्त होणार आहे. मानवाच्या श्रमानें उत्पन्न झालेली ही प्रचंड यंत्रशक्ति मग मूठभर मालकवर्गाच्या खाजगी सुखासाठीं राबणार नाहीं तर या अफाट शक्तींना हातीं धरून श्रमकर्त्यांनें निर्माण केलेल्या धनानें सर्व मानवजात समृद्ध व सुखी होणार आहे. पूर्वीं म्हणत असत कीं सुख राईसारखें व दुःख पर्वताएवढें, आतां समाजवादांत पाऊल टाकल्यावर जगावर दुःख राईसारखें व सुख पर्वताएवढें होणार आहे. त्या पर्वतप्राय संचयाचा रस्ता दाखविणारा लाल सितारा लेनिन-स्तालिनचा सोविएत रशिया माव त्से-तुंगचा चीन, कम्युनिझमचें तत्त्वज्ञान, संघटन व आचरण आपल्या जवळ आहेत. या अजिंक्य शक्तींना व त्यांच्या श्रमकर्त्या मानवाला पोखरूं पहाणाऱ्या क्षुद्र कीटकांच्या कटाचें स्वरूप या पुस्तकांतून पहा आणि सावध व्हा.

—o—

# ग. कृ. गणेश जोशी

## अनुवाद साहित्य

१ लाल झेंडा (कथा)
२ तान्या आणि वान्या (बालकथा)
३ चंद्रास्त (कादंबरी)

## आगामी

१ महात्मा
२ अग्निमंथन
३ अखेरचा निर्णय

REFBK-0007245

REFBK-0007245

लौकरच प्रसिद्ध होतील

## अमरगीत

महाराष्ट्रांतील कामगार शेतकऱ्यांचे आवडते कवी शाहीर **अमर शेख** यांच्या निवडक गीतांचा संग्रह.

## पाहिला बळी

**अमर शेख** यांच्याच कसदार लेखणींतून उतरलेलें अत्यंत विचार प्रक्षोभक नाटक.

## चीनची रणरागिणी

**ले. अँग्नेस स्मेडल**

यु गां त र प्र का श न, मुं ब ई १४

# आजकालचें लोक-साहित्य

**माओ त्से-तुंग**
आत्मकथा किं. १ रुपया

**अण्णाभाऊ साठे, अमर शेख, गव्हाणकर**
शिवारिं चला (क्रांति गीतें) किं. ८ आणे

**शाहीर द. ना गव्हाणकर**
स्वर्गलोकचा बातमीदार (पोवाडे) किं. ४ आणे
देशासाठीं (नाटिका, कीर्तन, तमाशे)

**महापंडित राहुल सांकृत्यायन**
वोल्गा ते गंगा (दु. आ.) (कथा) किं ४॥ रु.
सिंह सेनापति (कादंबरी) किं. ३। रु,
बाविसावें शतक ,, किं. १॥ रु.
जय यौधेय ,, किं. ३ रु.
सरदार पृथ्वीसिंह (चरित्र) किं. ३ रु.

**मॅक्सिम गोर्की**
फोमा (कादंबरी) किं ६ रु.
गोर्कीच्या लघुकथा किं. २ रु.
एका काळीं माणसें असलेले प्राणी (कथा) किं. २ रु.
मालक (कादंबरी) किं. २ रु.
माल्वा : लाल्या : मवाली (कथा) किं. २ रु.
माणूस किं. ४ आणे
मॅक्सिम गोर्की चरित्र किं. १॥ रु.

**मुल्कराज आनंद**
अस्पृश्य (कादंबरी) किं. ३ रु.

**वि. म. भुस्कुटे**
दासू (कादंबरी) किं. ३॥ रु.

**शाहीर अण्णाभाऊ साठे**
नवे तमाशे किं १। रु.
वारणेच्या खोऱ्यांत (कादंबरी)
रानफुलांचा ढीग ,,
फकीरा ,,
चित्रा ,,
काळा ओढा ,,
हि‍ग ,,
भोमक्या आणि इतर गोष्टी (कथा)
स्तालिनग्राड व इतर पोवाडे (पोवाडे)

**सोविएत परिचय**
रेल्वे कामगार किं. १ आणा
खलाशी किं. ४ आणे
बस ड्रायव्हर किं. ३ आणे
अँग्लो-सोविएत साहित्य-चर्चा किं. ६ आणे
तिची शपथ किं. ४ आणे

**चीन परिचय**
चिनी जनतेची नवी दुनिया किं. २ आणे

**बालवाङ्मय**
मुलांचा लेनिन (७१ चित्रांसह) किं. २ रु.
टॉल्स्टॉयच्या बालकथा किं. १२ आणे

**वान्दा वासिल्येवस्का**
हिंवाळ्यांतलें इंद्रधनुष्य किं. ४ रु.

**श. वा. देशपांडे**
देशभक्तीची कसोटी किं. २ रु.

**अप्टन सिंक्लेअर**
नो पासारान् (कादंबरी) किं. ३ रु.

**लोक-साहित्य ८७ शिवाजी पार्क, मुंबई २८**